

महाराष्ट्राचे
शिल्पकार
भाई
उध्दवराव
पाटील
RAJA BADSAL
व. न. इंगळे
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमाणिका

# कष्टकऱ्यांचे कैवारी
# भाई उद्धवराव पाटील

प्राचार्य व.न. इंगळे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती  मंडळ, मुंबई

अनुक्रमाणिका

प्रथमावृत्त: सप्टेंबर २००३
महाराष्ट्राचे शिल्पकार: क्र. १८

प्रकाशक:
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधीन

मुद्रक:
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई – १३. (दूरध्वनी: २४९४५६१५)

मुखपृष्ठ: राजा बडसल

किंमत: रु. ५५/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

## अनुक्रमाणिका

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधरणतः शंभर सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती “महाराष्ट्राचे शिल्पकार” या योजनेअंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील “भाई उद्धवराव पाटील” हा अठरावा चरित्रग्रंथ आहे.

उद्धवरावजींचं कार्यकर्तृत्व उत्तुंग असूनही त्यांच्यावर फारसं लेखन झालेलं नाही त्याचं कारण अर्थातच बहुजन समाजाच्या मानसिकतेमध्ये आढळतं. ही मानसिकता बदलणं अगत्याचं आहे. “महाराष्ट्राचे शिल्पकार” ही ग्रंथप्रकाशनाची योजना राबविताना मंडळाने जे धोरण अवलंबिलेले आहे, त्याच धोरणानुसार ज्या दिवंगत महनीय व्यक्तींवर फारसे ग्रंथ लिहिले गेलेले नाहीत त्यांच्यावर मंडळ प्राधान्यक्रमाने ग्रंथ लिहून घेऊन ते या योजनेत प्रकाशित करीत आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार “भाई उद्धवराव पाटील” हा ग्रंथ प्रकाशित करण्यामागे तोच प्रधान हेतू आहे.

“भाई उद्धवराव पाटील हे ईर्ल्यासारख्या मागासलेल्या मराठवाड्यातील एका खेड्यात शेतकरी कुटुंबात वाढलेलं व्यक्तिमत्व. त्यांच्या घराण्यात ना विद्येच्या उपासनेची परंपरा ना राजकीय वारसा. उद्धवराव हे अशा प्रतिकूल परिस्थितीशी झगडा करीत स्वकर्तृत्वाने उदयाला आलेले एक क्रियाशील स्वयंभू विचारवंत नेते. ते मुळातच अभ्यासू. कुठल्याही विषयाच्या आकलनासाठी लागणारी कुशाग्र बुद्धी, विदारक वास्तवाचं निरीक्षण, परीक्षण आणि पृथक्करण करण्याची शक्ती, त्यांच्याकडे असल्याने त्यांचा ग्रंथाभ्यास निव्वळ पुस्तकी राहिला नाही. तो वास्तवाच्या व्यवहारी शहाणपणाच्या सहाणेवर घासून-पुसून घेण्याकडे त्यांचा कल. म्हणूनच विधानसभा, राज्यसभा आणि लोकसभा या विद्वत आणि राजनीतीज्ञांच्या लोकप्रतिनिधीगृहात त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी, विचारांची खोल जाण, त्यांची सुस्पष्ट आखणी, आपल्या मताची तर्कसंगत सडेतोड मांडणी, गोरगरीबांच्या सुखदुःखाची त्यांची चपखल जोडणी आणि तत्त्वनिष्ठेला घट्ट चिकटून राहणारी त्यांची धीरोदत्त धाटणी; या सर्व गुणांमुळे त्यांची अव्वल दर्जाच्या अभ्यासू तत्त्वनिष्ठ संसदपटूमध्ये वरच्या श्रेणीत गणना केली जाते.

“विधानसभा, राज्यसभा आणि लोकसभा या लोकशाहीच्या मंदिरात भाई उद्धवरावांनी केलेल्या कामाची केवळ यादीच पाहिली तरी त्यांचे सारं वक्तृत्व, कर्तृत्व आणि संसद विधानसभा पटुत्व हे वर उल्लेखिलेल्या दुर्बल घटकांना मध्यवर्ती ठेऊनच केल्याचं स्पष्ट होत. शेतकऱ्यांना द्यावी लागणारी चुकीची लेव्ही, जमीन सुधारणा, कसेल त्याची जमीन या तत्त्वावर जमिनीचे पुनर्वाटप, त्यासाठी करावयाचा कुळकायदा, कमाल जमीन धारणा, शेतीमालास त्याच्या उत्पादन खर्चावर आधारित भाव, शेतीमालाला स्वतंत्र बाजारपेठ, शेतकऱ्यांच्या एकजुटीतून सहकारी तत्त्वावर शेती, साखरकारखाने शेतकऱ्यांच्या ताब्यात देणे, शेती व्यवसायाला औद्योगिक धंद्याचा दर्जा आणि उद्योगधंद्याला मिळणाऱ्या सर्व सोयीसवलती शेतीधंद्याला मिळाव्यात हे धोरण, शेतकऱ्यांना कमी व्याजदराने दीर्घ मुदतीची कर्जे देणे, अल्पभूधारकांना सारा माफ, दुष्काळी काळात कर्जमाफी, शेतमजुरांना आधुनिक राहणीमानानुसार मजुरी मिळावी, महाराष्ट्रातील विविध भागातील विकासाचा समतोल साधावा, ग्रामीण भागातील गोरगरीबांना शासनाने प्राथमिक शिक्षण सक्तीचे नी मोफत द्यावे, दलितांना समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी त्यांना

अनुक्रमाणिका

शिष्यवृत्तीयुक्त शिक्षण, त्यांना नोकरीत आरक्षण आणि सत्तेत भागिदारी द्यावी इत्यादी मागण्या त्यांनी या लोकशाही मंदिरात मोठ्या पोटतिडकीने मांडल्या.”

श्री. व. न. इंगळे यांनी लिहिलेल्या या चरित्रग्रंथातील वरील दोन उतारे मी मुद्दाम वर उद्‌धृत केले आहेत. उद्धवरावजी पाटील यांच्या विचारांची, कार्यकर्तृत्वाची, थोडक्यात ओळख व्हावी हा त्यामागे माझा उद्देश आहे.

आमच्यासमोर कसलेही आदर्श उरलेले नाहीत, ज्यांच्या पायावर डोके ठेवावे असे पाय आपल्या अवतीभोवती व कुठेही दिसत नाहीत, असं अलीकडे बोललं जात आहे. किंबहुना, असे बोलण्याची अलीकडे टूम सुरू झालेली आहे. खरं तर शेंड्याचं अस्तित्व, फांद्यांच्या अस्तित्वाशी जितकं निगडीत असतं तितकंच किंबहूना त्याहीपेक्षा अधिक मुळांच्या अस्तित्वाशी निगडीत असतं. अशा स्थितीत आपल्या अस्तित्वासाठी केवळ फांदीवर विसंबून राहण्यात अर्थ नसतो. मुळांचं अस्तित्व संपुष्टात आलं तर झाडांचं अस्तित्वही संपुष्टात येतं हे केवळ शेंड्यांनीच नव्हे तर फांदीनीही लक्षात घ्यायचं असतं. याच जाणिवेतून महाराष्ट्राची विविधांगी जडणघडण करणाऱ्या व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचे वेळोवेळी स्मरण व्हावयास हवे.

“भाई उद्धवराव पाटीलांची आठवण चिरंतन राहावी. उस्मानाबाद शहरात भाई उद्धवराव दादांचं कायम स्वरूपी स्मारक शासनाने उभारावं ही महाराष्ट्रातील लोकेच्छा शासन पुरी करेल का?” असा एक प्रश्न या चरित्रग्रंथाच्या शेवटी लेखकानी उपस्थित केला आहे. या स्मारकाचं स्वरूप श्री. व. न. इंगळे यांनी स्पष्ट केलं नसलं तरी भाई उद्धवरावांचा भव्य पुतळा अथवा तत्सम स्वरूपाचं स्मारक त्यांना अपेक्षित असावं, असे मला वाटतं. खरं तर स्मारकाच्या बाबतीत भाई उद्धवराव पाटील यांच्या इतकी कुणा समाज पुरुषाची उपेक्षा झाली असे मला वाटत नाही. म्हणून भाई उद्धवराव पाटील दिल्लीला गेले असता एकदा संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये त्यांची व यशवंतरावजी चव्हाण यांची भेट झाली. त्यांनी भाई उद्धवरावजी पाटील यांची आपुलकीने चौकशी केली. उद्धवरावांचा निरोप घेताना ते म्हणाले, “उद्धवरावजी, तुम्ही खूप काम करता ; परंतु महाराष्ट्राला तुमच्या कामाची योग्य ओळख होत नाही. त्यासाठी पुण्या-मुंबईसारख्या ठिकाणी येऊन स्थायिक झाले पाहिजे. म्हणजे तुमच्या कार्याचे योग्य मूल्यमापन होईल.”

भाई उद्धवरावांच्या पासंगालाही पुरणार नाहीत अशा व्यक्तींची महाराष्ट्रात स्मारक झाली आहेत; पण भाई उद्धवरावजींचं स्मारक का होऊ शकलं नाही याचं कारण यशवंतराव चव्हाणांच्या वरील उद्‌गारात सामावलेलं आहे.

भाई उद्धवरावांचं उचित असे स्मारक झाल्यास त्यांच्या कार्यकर्तृत्वाविषयी आस्था असणाऱ्यांना निश्चितच आनंद वाटेल. पण तेवढ्यानं माझ्यासारख्याचं समाधान होणार नाही कारण मी विचारांची पूजा बांधणारा माणूस आहे.

भाई उद्धवराव पाटीलांच्या प्रत्येक कृतीला विचारांचे अधिष्ठान होते. विचार आणि कृती यामध्ये अभिन्नता असणाऱ्या ज्या काही मोजक्या व्यक्ती महाराष्ट्रात होऊन गेल्या त्या व्यक्तीपैकी भाई उद्धवराव पाटील हे एक होते. वेगवेगळ्या आंदोलनाच्या, चळवळीच्या निमित्ताने त्यांनी जे विचार व्यक्त केले ते ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे मला जसे निकडीचे वाटते तसेच विधानसभेत त्यांनी केलेली भाषणे ग्रंथरूपाने प्रकाशित करणे मला अधिक निकडीचे वाटते.

अनुक्रमाणिका

या निमित्तानं मला आणखी एक सूचवावेसे वाटते. महाराष्ट्र विधी मंडळाला फोर मोठी गैरवशाली परंपरा आहे. या विधी मंडळात अनेक सदस्यांनी वेळोवेळी अतिशय अभ्यासपूर्ण भाषणे केलेली आहेत. मौलिक विचार मांडलेले आहेत. या भाषणांपैकी निवडक भाषणाचे संपादन व ग्रंथरुपाने प्रकाशन व्हावयास हवे.

ठराविक निकषांच्या आधारे असे साक्षेपी संपादन दिल्यास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ते ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याबाबात अवश्य विचार करील.

**रा.रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
दिनांक : २५ जुलै, २००३

## अनुक्रमाणिका

- शेतीवर राबणाऱ्या
  जगातील
  तमाम
  शेतकरी,
  शेतमजूर आणि
  दलित
- स्त्री- पुरुषांना सादर अर्पण !

## अनुक्रमाणिका

## ॥ कथा भाई उद्धवरावाच्या चरित्र लेखनाची ॥

सन २००२-२००३ हे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचं जन्मशताब्दीचं वर्ष. त्यांच्या जीवनकार्यावर मी पूर्वी 'तपस्या ' हा चरित्रग्रंथ सन १९६८ साली लिहून प्रसिद्ध केला होता. मामांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने तो ग्रंथ वाढवून सुधारित नवा चरित्र ग्रंथ लिहिण्याचं काम मी २००१ या वर्षातच हाती घेतलं होतं. तेवढ्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांचं मला जानेवारी २००१च्या अखेरीस पत्र आलं. मंडळातर्फे महाराष्ट्राचे शिल्पकार पुस्तक योजनेत कर्मवीर मामांचं सर्वसामान्यासाठी सव्वाशे पृष्ठांचं चरित्र लिहिण्याची विनंती केली होती. ते काम मी तत्परतेनं पुरं केलं. आणि प्राचार्य बोराडे यानीही त्याच तत्परतेनं जुलै २००२ मध्ये ते छापून पूर्ण केलं. त्याचा प्रकाशन समारंभही त्यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे हस्ते ३० सप्टेंबर २००२ रोजी बार्शी येथे झाला. त्या समारंभातच प्राचार्य बोराडे यांनी आपल्या भाषणात जाहीर केले की, 'भाई उद्धवराव पाटील यांचेही चरित्र प्राचार्य इंगळे यांनी लिहावे.' त्यांचे तसे पत्रही मला ऑक्टोबर २००२च्या अखेरीस मिळाले. ३१ डिसेंबर २००२ पूर्वी चरित्राचे हस्तलिखित त्यांचेकडे पाठवण्याची शेवटची मुदत त्यात घातली होती. जेमतेम दोन सव्वादोन महिन्यात हे चरित्र लेखनाचे काम करणे असल्याने मनावर थोडे दडपण आले.

भाई उद्धवरावांचे चरित्र लिहायचे तर त्यासाठी लिखित स्वरुपातील माहिती मिळवण्यापासून सुरवात करावी लागली. मजकडे 'झुंजार सेनानी' हा भाई उद्धवराव पाटील स्मृती ग्रंथ आणि भाई उद्धवरावांच्या जयंतीनिमित्त ३० जानेवारी १९८९ रोजी भाई उद्धवराव पाटील जयंती महोत्सव समिती, उस्मानाबादने प्रकाशित केलेला विशेषांक एवढेच साहित्य होते. तेवढ्यावर चरित्रग्रंथ लिहिणे अशक्य वाटले. मग मी उस्मानाबादच्या वाऱ्या सुरू केल्या. भाई उद्धवरावांचे सुपुत्र श्री. धनंजय यांना मी भेटलो. त्यांचेकडील दादांच्या चरित्राची साधने लातूरचे प्रा. पारवे यांनी दादांच्या जीवनकार्यावर पी.एच्.डी करण्यासाठी नेली होती. ती त्यांचेकडून मागवून मला देण्याचे धनंजयने मला आश्वासन दिले. पत्रापत्री-फोनाफोनीत दिवस जाऊ लागले. तोपर्यंत मी उस्मानाबाद येथील दादांशी संबंधित सद्‌गृहस्थांना भेटून माहिती जमा करू लागलो. मी आणि माझे मित्र प्रा. एस. ए. पाटील दादांच्या इर्ले या गावी गेलो. तेथील त्यांच्या नातेवाईकांना भेटून त्यांना दादांबद्दल बोलके करून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करू लागलो. उद्धवरावांचा औरंगाबादला १९८३ मध्ये जो गौरव झाला, त्यावेळी प्रा. कल्याणकरांनी 'संघर्ष' नावाचा भाईंचा गौरवांक काढला होता. तो मिळविण्यासाठी उस्मानाबादेत अनेक कार्यकर्त्यांना भेटलो. माजी न्यायमूर्ती बी. एन. देशमुखांनाही फोनवर बोललो. औरंगाबादचे माझे मित्र ॲड. शिवाजीराव शिंदे यांना तर एक दिवसाआड फोन करू लागलो. दरम्यान प्रा. पारवे यांनी दादांचा गौरव झाला त्यावेळची वर्तमानपत्रे धनंजय पाटील यांचेकडे आणून दिली ती मला मिळाली. मी त्यावर आधारित एक प्रकरण पूर्ण केले. तेवढ्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे प्रभारी सचिव श्री. उ. बा. सुर्यवंशी यांनी श्री. व्यंकटेश हंबिरे संपादित दैनिक संघर्ष समाजवादाचा १२ जुलै २००१ चा 'भाई उद्धवराव पाटील स्मृती विशेषांक २००१' मजकडे पाठवून दिला. तेव्हा कुठे माझ्या जीवात जीव आला. मी प्रकरणामागून प्रकरणे लिहू लागलो. तेवढ्यात ॲड. शिंदे यांनी 'संघर्ष' चा दादांचा गौरवांक आणि प्रा. शहाजी अ. पाटील यांचा एम्. फील साठी तयार केलेला 'उद्धवराव पाटील : विविधांगी राजकीय नेतृत्व' हा प्रबंध पाठवून दिला आणि माझा जीव भांड्यात पडला.

अनुक्रमाणिका

चरित्र लेखनास जेमतेम दीडेक महिना उरला होता. त्यात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जन्मशताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या कर्मवीर स्मृती व्याख्यानमालेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आणि निधी संकलनात संस्था पदाधिकाऱ्यासमवेत गावोगाव फिरण्यात वेळ जात होता. त्यामुळे दिवस-रात्रीचा वेळही चरित्र लेखनाला कमी वाटू लागला.

भाई उद्धवराव यांच्या चरित्राची प्रकरणे जसजशी लिहून होत तसतशी ती माझे मित्र प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे वाचत. किरकोळ दुरुस्त्या सूचवत. ‘प्रकरणे चांगली उतरतील’ असा अभिप्राय देत. त्यामुळे माझा उत्साह वाढला. तरीही चरित्रग्रंथ ३१ डिसेंबर २००२ पर्यंत पुरा होऊ शकेल, याची शाश्वती वाटेना तेव्हा मी प्राचार्य बोराडे यांना फोनवरून दहापंधरा दिवसाची मुदत वाढवून मागितली. ती त्यांनी दिली. मी प्रयत्नाची पराकाष्टा केली. ३ जानेवारी २००३ रोजी चरित्र लेखनाचे काम पुरे झाले. त्यांना सारी प्रकरणे पुन्हा वाचणे, नव्याने मिळालेल्या साहित्य साधनातून मिळालेली माहिती त्या त्या प्रकरणात समाविष्ठ करणे हे काम चारेक दिवसात पूर्ण केलं.

खरं म्हणजे भाई उद्धवरावांच्या जीवनकार्यावर भला मोठा चरित्रग्रंथ लिहावा, असं त्यांची जीवनकार्य आहे. त्यांनी विधानसभा, राज्यसभा, लोकसभा, अधिवेशने आणि सभामधून केलेली भाषणे ही त्यांच्या अभ्यासूवृत्तीची निदर्शक. एखाद्या अभ्यासकाचा पी. एच्. डी. चा विषय होणारी पण या चरित्राच्या पृष्ठसंख्येची मर्यादा लक्षात घेता त्या संबंधी मी या चरित्रात न्याय देऊ शकलो नाही, याची खंत वाटते.

या चरित्र ग्रंथाला ‘गोरगरीबांचे कैवारी’, ‘कष्टकऱ्यांचे उद्धारकर्ते उद्धवराव’ आणि ‘कष्टकऱ्यांचे चालते बोलते कृषी विद्यापीठ’ अशी नांवे पुढे आली. भाईनी आपले सारे जीवन शेतकरी, कामगार, शेतमजूर, दलित कष्टकरी यांच्या उद्धारासाठी समर्पित केले. “सरंजामशहाच्या पाटलांचा पुत्र असतानासुद्धा दलित दुबळ्यांना कड्या खांद्यावर घेऊन महाराष्ट्रामध्ये पुरोगामी चळवळ मुंबईच्या विधानभवनापासून तळागाळाच्या वाड्याताड्यापर्यंत पोहचविण्याने महान कार्य उद्धवरावांनी केले आहे. म्हणून मराठवाड्यामध्ये त्यांचे एक ऐतिहासिक स्मारक असायला हवे. तेव्हा परभणीच्या मराठवाडा कृषी विद्यापीठाला भाई उद्धावरावांचे नाव देण्यासंबंधातले आवाहन औरंगाबादचे श्री. सतीश गव्हाणे यांनी दै. मराठवाडा, औरंगाबादच्या दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या अंकात सविस्तर पत्र लिहून केले आहे, म्हणूनच या चरित्र ग्रंथाला ‘कष्टकऱ्यांचे कैवारी भाई उद्धवराव पाटील’ हे नांव निश्चित केले आहे.

परभणीच्या कृषी विद्यापीठाला भाई उद्धवराव पाटील यांचे नाव देण्याचा मान राज्यकर्त्यांनी मिळवायचा आहे. पण या चरित्रग्रंथाने भाईजींच्या जीवन कार्याची आणि मोठेपणाची ओळख सर्वसामान्य श्रमजीवी वर्गाला व्हावी. त्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी पुरोगामी चळवळीला अधिक गतीमान करावे, एवढीच माझी माफक अपेक्षा आहे.

गुरुवार दि. ३ जानेवारी २००३ — प्राचार्य व. न. इंगले (सेवानिवृत्त)
सावित्रीबाई फुले जयंती — ‘तपस्या’, कर्मवीर नगर, बार्शी - ४१३४११
महिला मुक्ती दिन — ( जि. सोलापूर)

अनुक्रमाणिका

# ॥ अनुक्रमाणिका ॥

निवेदन ........ ४
॥ कथा भाई उद्धवरावाच्या चरित्र लेखनाची ॥ ........ ८
॥ गोरगरीबांचा कैवारी जन्माला आला ॥ ........ ११
॥-उद्धव॰ चे बालपण, शिक्षण ........ १५
आणि बंडखोरीचं लक्षण ॥ ........ १५
॥ जमिनदार आणि सावकारशाही ........ २२
विरुद्धचा पहिला लढा ॥ ........ २२
॥ हैद्राबाद मुक्ती संग्रामातील ........ २८
उद्धवरावांचा सशस्त्र लढा ॥ ........ २८
॥ उद्धवरावांचे चरित्र म्हणजे महाराष्ट्रातील ........ ३५
शेतकरी कामगार पक्षाचे चरित्रच ॥ ........ ३५
॥ उद्धवरावदादांनी लढविलेल्या निवडणुका ॥ ........ ४४
॥ गोवा मुक्ती संग्राम आणि भाई उद्धवराव पाटील ॥ ........ ५०
॥ भुदानाची चळवळ आणि भाई उद्धवरावांचा तिला विरोध ॥ ........ ५४
॥ संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे झुंजार सेनानी ॥ ........ ५९
॥ सीमा चळवळीचे समर्थ सरसेनापती ॥ ........ ६५
॥ अव्वल दर्जाचे अभ्यासू तत्त्वनिष्ठ संसदपटू ॥ ........ ७०
॥उद्धवराव दादांचा घर संसार॥ ........ ७५
॥लोकलेखा समिती अध्यक्ष, दुष्काळ निवारण समिती सदस्य आणि ........ ८०
राज्यस्तरीय भूविकास बँकेचे संचालक॥ ........ ८०
॥शेतकरी, शेतमजूर कष्टकऱ्यांचे चालते बोलते कृषी विद्यापीठ॥ ........ ८७
॥दलित चळवळ : नामांतर विरोधी चळवळीचे दुःस्वप्न॥ ........ ९६
॥फुले शाहू कर्मवीरांचा वसा घेऊन शिक्षणसंस्था चालवा॥ ........ ९९
॥गरीबांच्या सहभागाविना सहकार। नाही खरा उद्धार॥ ........ १०३
॥-उद्धवराव झिजले माणूस उद्धराया!॰॥ ........ १०७
॥कॅन्सरशी कडवी झुंज आणि महानिर्वाण॥ ........ ११२
॥ भाई उद्धवराव पाटील यांचा जीवनपट, ऋणनिर्देश लेखकांचा आणि संदर्भग्रंथ -स्मरणिका विशेषांक दैनिके यांची सूची आणि मुलाखाती देणाऱ्यांची यादी ॥ ........ ११७
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने ........ १२१
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई ........ १२३

**प्रकरण पहिले**

## ॥ गोरगरीबांचा कैवारी जन्माला आला ॥

इर्ले (ता. परंडा) हे एक निजामाच्या राज्यातील आडवळणी खेडेगांव. पन्नाससाठ उंबऱ्यांचं. पांचेकशे लोकसंख्येचं. सुधारणांच्या नांवाने शेकडो मैल दूर असलेलं. हे गांव वैरागपासून पांचेक किलोमीटरवर वसलेलं. पण वैराग आणि इर्ले या गावात जमीन अस्मानचा फरक! वैराग हे इंग्रजी राज्यातील बार्शी तालुक्यातील व्यापारी वळणाचे बार्शी-सोलापूर रस्त्यावरचे महत्त्वाचे गाव. आधुनिक सुधारणेचे वारे अंगावर घेत वाढू लागलेले. तर इर्ले हे गाव पत्ता नसलेले, सुधारणांचे नाव नसलेले. पूर्वापार चालत आलेल्या परंपरात अडकलेले आणि गरिबीने गांजलेले गांव. या गावचा संपर्क बैलगाडीनेच साधता यायचा. पावसाळ्याच्या चार महिन्यात तर या गावचा बाह्य जगाशी संपर्कच तुटलेला असे. या गावच्या पूर्वेला भोगावती ही नदी उत्तर दक्षिण दिशेला वाहत असलेली. बहुसंख्य प्रजा हिंदू. त्यामुळे निजामाचे प्रजेच्या शिक्षणाकडे वा इतर सोईसवलतीकडे कायमचे दुर्लक्ष! निजामाचे सारे लक्ष सारा वसुलीकडेच. तोही पाटील आणि कुलकर्णी यांनी वसूल करून तालुक्याच्या ठिकणी भरणा करण्याची पद्धत! अशी वस्तूस्थिती विसाव्या शतकातील पूर्वार्धामध्ये होती.

अशा या गावात चव्हाण घराणं अनेक वर्षापासून राहात होतं. या घराण्याचा मूळ पुरूष रामजी बाबा. रामजीचा मुलगा व्यंकटराव. व्यंकटरावचा मुलगा दत्ताजी. दत्ताजीचा मुलगा संतूबा. संतूबांन आपल्या बापाचं नाव मुलाला ठेवलं. तो दुसरा दत्ताजी. या दत्ताजीचा मुलगा हणमंता. हणमंताचा मुलगा विठूजी. विठूजीनं बापाची आठवण म्हणून आपल्या मुलाचं नाव हणमंतराव ठेवलं. हा दुसरा हणमंतराव आपल्या आज्याचं नाव घेऊन चव्हाण घराण्याची परंपरा चावलत होता. हा हणंतराव आणि त्याची पत्नी रंगूबाई हे विठ्ठलभक्त शेतकरी कुटुंब. घरात पाटीलकी असल्याने त्यांना सारे गाव पाटील म्हणूनच ओळखायचे. त्यामुळे चव्हाण आडनांव मागे पडले. पाटील हे आडनांव या घराण्याला कायमचे चिटकले.

हणमंतरावांचा मुख्य व्यवसाय शेतीचा. शेती करीत करीत ते पाटीलकी सांभाळायचे. ते कुलकर्ण्याच्या मदतीने गावचा सारा वसूल करायचे. कुलकर्ण्यामार्फतच ते परांड्याला तहसील कार्यालयात पोहचता करायचे. गावातील गरीब शेतकऱ्यांची वेळेवर सारा देण्याची ऐपत नसायची. तेव्हा हणमंतराव अशा गरीब शेतकऱ्यांचा सारा प्रथम स्वतः भरायचे आणि असे शेतकरी सुगी संपली म्हणजे साऱ्यांच्या रकमा धान्य रुपाने किंवा धान्य विकून हणमंतरावांना परत करायचे.

गावात बहुसंख्य घरे हिंदूंची. थोडीफार मुसलमानांचीही घरे होती. पण निजामाचे राज्य म्हणून मुसलमानामध्येही या गावी ताठा मुळीच नसायचा. तेही कष्ट करूनच जगायचे. गावात हिंदू-मुसलमान गुण्यागोविंद्याने राहायचे. एकमेकांच्या धार्मिक उत्सावात-सणावारात भाग घ्यायचे. या गावात मुसलमानांचा जसा दर्गा होता, तशी हिंदूची देवळेही होती. मारुतीचे देवालय गावाबाहेर तर विठ्ठलरखुमाईचे मंदीर गावात. हणमंतरावांच्या घराजवळ! संत तुकाराम महाराजांचे एक वंशज श्री. बाळकृष्ण महाराज. त्यांची समाधीही या गावात बांधलेली होती.

इर्ले हे खेडेगाव भारतातील इतर खेडपासारखेच होते. लोक कष्ट करून निढळाच्या घामावर भाकरी मिळवून 'ठेविले अनंते । तैसेची राहावे' या वृत्तीने समाधानाने जगायचे. गावात शिक्षणासाठी शाळा

अनुक्रमाणिका

काढायची निजामाला गरज वाटत नव्हती. तसेच येथील गावकऱ्याना कष्टकरी शेतकरी, शेतमजूर आणि दलितांना शिक्षण घ्यावे असेही वाटत नव्हते. शाळा नाही शिकली तरी त्यांचं कुठं अडत नव्हतं. पूर्वी गावठी शाळेत लिहाया-वाचाया पुरतं, हिशोब-ठिशेब ठेवण्यापुरतं कुणीतरी शिकायचं. फार उशीरा गावात एक शिक्षकी प्राथमिक शाळा सुरू झाली. हणमंतरावाकडे पाटीलकी म्हणून सही करण्यापुरतं ते शिकलेले. स्त्रियांना म्हणजे मुलीना शिक्षण देण्याचं कुणाच्या मनातही येत नव्हतं. भजन कीर्तन पोथी वाचणे या माध्यमातून दररोजच्या व्यवहारतलं शहाणपण त्यांना मिळत होतं.

इर्ले या गावचा इतर गावाशी संपर्क बैलगाड्यातून चालायचा. पण पावसाळ्यातील चारेक महिने या गावातील लोकांना बाहेरगावी जाता येत नसे की, बाहेरगावच्या लोकांना इर्ले गावात येता येत नसे. पाऊस आणि चिखल यांचे सर्वत्र साम्राज्य! त्यामुळे पावसाळ्यात हे गाव इतर गावापासून एकटे पडायचे. गावातील धनिक लोक उन्हाळ्यातच धान्य, किराणा माल वगैरे भरपूर प्रमाणात खरेदी करून ठेवायचे. त्यावर गावातील लोकांच्या गरजा कशाबशा भागविल्या जायच्या. विसावं शतक उजाडलं तरी या स्थितीत काहीच फरक पडलेला नव्हता.

हणमंतरावांनी पाटील घराण्याला शोभेल असा चौसोपी वाडा गावात बांधला होता. गावातील उंच भागावर. वाड्याचा दिंडी दरवाजा पूर्वाभिमूख. या दरवाज्यातून वाड्यात प्रवेश केला म्हणजे उजव्या डाव्या अंगाला दोन प्रशस्त ढाळजा. त्याला लागून पूर्व पश्चिम माळवदी बांधकाम. मध्ये मोठा चौक. चौकाच्या पश्चिमेला पुन्हा बारा खणांचा इमला. पश्चिम बाजूलाही एक लहान खिंड दार. त्यातून पायऱ्या उतरून खाली गेलं म्हणजे पुन्हा एक तसाच गाईगुरे, बैलं यांच्यासाठी चौसोपी वाडा. तो पत्र्यानी आणि काही ठिकाणी लाकडे, तुराट्या आणि उसाच्या पाचटांनी शाकारलेला. तिथचं कडब्याची गंज. शेतीची अवजारं, हत्यारं ठेवण्याची खोली.

हणमंतराव रंगूबाई या विठ्ठलभक्त शेतकऱ्याच्या पोटी चार मुलं जन्मली. पहिला साहेबराव आण्णा! दुसरा भिमराव बाबा, तिसरा शंकरअप्पा, आणि चवथा ज्ञानेश्वर तात्या. मुलाबाळानं आणि गाईगुरानं घराचं एका वारकऱ्यानं रंगूबाईला सांगितल्याप्रमाणं गोकूळ झालेलं. वारकऱ्यानं तेवढचं सांगितलं नव्हतं. दुसरी एक गोष्ट सांगितली होती. ती तर रंगूबाईच्या दृष्टीनं फारच अप्रूपाची होती. माळाकडल्या शेतात तो वारकरी भेटल्याची आठवण रंगूबाईच्या ह्रदयात ताजी होती.

गोरोबा काकाची दिंडी ‘ग्यानबा तुकाराम’ या गजरात तिच्या शेतातून नुकतीच निघून गेली होती. थोड्यावेळाने दिंडीच्या मागे राहिलेला एक तहानलेला वारकरी आला. रंगूबाईला पिण्यासाठी पाणी मागू लागला. तिने त्याला भाजीभाकरी खायला दिऊन पिण्याला पाणीही दिले. तेव्हा तो म्हणाला होता. “तुझं घराणं विठ्ठल भक्ताचं. पांडुरंगाची तुझ्या घरावर किरपा राहील. मुलाबाळानं घराचं गोकूळ व्हईल. एक खूनगाठ बांधून ठेव. तुझ्या थोरल्या पोराच्या पोटी गोरगरीबाचा कैवारी जन्माला येईल.” असं म्हणून त्या वारकऱ्याने रंगूबाईला शेतातली एक जागा दाखविली. तिथं पाणी असल्याचं व तिथं विहिर घेण्याचं सुचवलं. ‘विहिरीला पाणी लागल्यावर दरवर्षी इथं गोरोबा काकाच्या दिंडीला जेवण घाल’ असं म्हणून तो घाईघाईनं दिंडी गाठायला निघूनही गेला. वारकऱ्यानं दाखविलेल्या जागी हणमंतरावांनी विहिर खोदली. तिला बक्कळ पाणी लागलं. त्यांनी दरवर्षी पंढरपूरला चालत जाणाऱ्या दिंडीला थांबवून तिथं जेवण घालायची रूढ पाडली! त्यावेळी त्यांचा पहिला थोरला मुलगा साहेबराव सातआठ महिन्याचा होता. वारकऱ्याने सांगितल्याप्रमाणे ‘या साहेबरावाच्या पोटी गोरगरीबांचा कैवारी जन्माला येईल’ या बोलण्यावर

अनुक्रमाणिका

हणमंतराव-रंगूबाईचा विश्वास बसला होता. हणमंतराव-रंगूबाईची  चारही मुलं कर्तुकीला आली. शेतात कष्ट करून जीवन समृद्ध करू लागली. त्यांची जीवनशैली भागवत धर्माच्या माणुसकीवर आधारलेली. इर्लेसारख्या खेड्यात गरीब शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार आणि दलितांच्या उजाड जीवनात आपल्या कुवतीनुसार हिरवळ निर्माण करू लागली.

थोरले साहेबराव आण्णा. त्यांच्याकडे पोलीस-पाटीलकी आणि माली पाटीलकी अशा दोन्ही पाटीलक्या होत्या. त्या कामात ते अखंड बुडालेले असत. दुसरे भिमराव बाबा हे शेतीची देखभाल आणि कारभारपण करीत. तिसरे शंकरअप्पा शेती करीत. गड्याबरोबर शेतीत प्रत्यक्ष काम करीत तर चवथे ज्ञानेश्वर तात्या हे किराणा मालाचे दुकान सांभाळीत! चारही भाऊ आपापली नेमून दिलेली कामे बिनबोभाट करीत. आईवडील जिवंत असतांना वेगळं राहाण्याचा प्रश्नच नव्हता.

या चौघा भावापैकी धाकले ज्ञानेश्वर तात्या हे मनस्वी स्वभावाचे, परोपकारीवृत्तीचे आणि बंडखोर विचारसरणीचे होते. ते बैलगाड्यांनी कधी परांड्याहून, कधी वैरागहून तर बऱ्याचवेळा बार्शीहून दुकानासाठी लागणारा माल खरेदी करून आणायचे. त्यातील बरचसा माल गोरगरीबांना उधारीवरच विकायचे. सुगी संपल्यावर ही सारी उधारी वसूल व्हायची. शेतमजूर आणि दलिताकडील उधारी त्यांना आपल्या शेतात काम देऊन वसूल करावी लागे. दिवाळीच्या सणाच्यावेळी गावातील गोरगरीबांना दिवाळीला लागेल तेवढा माल ते साऱ्यांना बोलावून आणून द्यायचे. गरीबांच्या घरी दिवाळीचे गोडधोड झाल्यानंतरच या चौघा भावांची दिवाळी साजरी व्हायची!

एका वर्षी भीषण दुष्काळ पडला. लोकांच्या घरच्या चुली पेटेनात. भुकेले लोक झाडाचा पाला, तरवटाची पाने आणि उंबराच्या दोड्या शिजवून पोटाची भूक भागवायचे.जनावरे चाऱ्याविना मरू लागलेली. परिस्थिती फारच बिकट झालेली! माणसं कशीतरी जगवणं महत्वाचं होतं. ज्ञानेश्वर तात्यांनी आपल्या घरातील आईवडील भावांशी विचार विनिमय केला. दुकानातील माल केव्हाच संपून गेलेला. विठ्ठलरखुमाईच्या देवळाच्या पूर्वेला सार्वजनिक जागेत धनिक शेतकऱ्यांनी पेवे बांधून धान्याचा साठा केलेला. त्यात या चार भावांनीही मोठे पेव बांधून त्यात ज्वारीचा साठा ठेवला होता. धान्यापेक्षा माणसं महत्वाची म्हणून ज्ञानेश्वर तात्यांनी आणि पाटीलकी करणाऱ्या साहेबराव आण्णांनी धान्याचे पेव खोलून त्यातील सारी ज्वारी गावातील गोरगरीबांना वाटून टाकली आणि दुष्काळात माणसे जगविण्याचे पुण्य पदरी पाडून घेतले. ते एका अर्थाने मंगळवेढ्याचे दामाजी झाले. या माणुसकीच्या दातृत्वामुळे या पाटील घराण्याबद्दल गावकऱ्यांच्या मनाच आपुलकी, जिव्हाळा, माया आणि भक्ती वाढीला लागली. हे चारही भाऊ निर्व्यसनी होते. प्रामाणिकपणे कष्ट करणं आणि गोरगरीबांच्या अडीनडीला उपयोगी पडणं हा त्यांचा धर्म बनला होता.

साहेबराव आण्णा थोरले असल्याने त्यांचे लग्न प्रथम होणे स्वाभाविक. साहेबराव आण्णांचे लग्न माणकेश्वर ( ता. परांडा) या खेड्यातील श्री. अनंतराव पाटील घरण्यातील मुलीबरोबर झाले. सूनबाईचे माहेरचं नाव सोनूबाई. सासरी आल्यावर रंगूबाईनं तिचं नाव विठाबाई ठेवलं होतं. कारण वारकऱ्यानं सांगितलेलं भाकीत त्यांनी आपल्या ह्रदयात जपून ठेवलं होतं. म्हणून विठाबाई! हिच्याच पोटी गोरगरीबांचा कैवारी जन्माला येणार ही त्यांची द्दढ भावना होती.

अनुक्रमाणिका

साहेबराव आण्णांची ही थोरली सून सुंदर, साधीभोळी, सुस्वभावी आणि सुसंस्कृत होती. पहाटे उठल्यापासून दळण दळणे, कांडाकुटा करणं, घरअंगण झाडणं, घर सावरणं, अंगणात गाईच्या हिरव्यागार शेणाचा सडा टाकणं, आंघोळ करून नित्यनेमानं साऱ्यांचा स्वयंपाक करणं आणि विठ्ठलरखुमाईच्या देवळात जाऊन त्यांना निवद दावणं ही सारी कामं ती मोठ्या उत्साहानं आणि चपळाईनं करायची. त्याबरोबरच सासूबरोबर शेतातल्या कामातही ती भाग घ्यायची.

घरात तीन दिरांच्या तीन तऱ्हा. त्यांच्या आंघोळीसाठी पाणी तापवून देणं, त्यांना जेवणं वाढणं, त्यांची मनं सांभाळणं यात तिला धन्यता वाटे. या तीनही दिरांची लग्नं करतांना तिची धांदल धावपळ चांगलीच नजरेत भरायची. हे पाहून सासूबाई रंगूबाईचा जीव मोठा व्हायचा. डोळ्यात आनंदाश्रू उभं राहायचे! या तिन्ही दिरांच्या तीन बायकांना ती सख्या बहिणीपेक्षा जास्त माया लावायची. त्यांचं दुखलं खुपलं. आजारपणं मनापासून पाहायची. कामात कुणाकडून चूक होत नसेच पण एखादेवेळी चूक झाली तरी त्यांच्यावर खेकसणं-ओरडणं नाही. गोड बोलून इतरांच्या चुका सुधारण्याची युक्ती तिच्याकडं होती. त्या तीनही जावा विठाईला मानाने वागवायच्या. अशा तऱ्हेने एकत्र कुटुंबपध्दतीचा भारतीय संस्कृतीचा आदर्श या घरात नांदत होता.

वडील हणमंतराव पाटील वारल्यानंतर कुटुंबाची सारी जबाबदारी थोरले म्हणून साहेबराव आण्णांच्या अंगावर पडली. भिमराव बाबा, शंकरआप्पा, आणि ज्ञानेश्वरतात्या या आपल्या धाकल्या भावंडांना ह्यांनी मुलांप्रमाणे वागविले. हे तीन भाऊही साहेबराव आण्णांच्या अर्ध्या वचनात असत. घरं धनधान्यानं आणि एकमेकावरील आपुलकीनं आणि मायेनं भरून गेलं होतं.

साहेबराव विठाबाई या दांपत्याला ओळीने पहिल्या तीन मुलीच झाल्या. पहिली शांताबाई हिचे लग्न काटीचे ॲड. नरसिंगराव बलभीमराव देशमुख यांचेबरोबर झाले. दुसरी गोदाबाई मांगी (ता. करमाळा) येथील देवराव बागलांना दिली. तिसरी शकुंतला वाकडी (ता.परांडा) येथील बाजीराव पाटलांची पत्नी झाली. या तीनही मुलींची बाळंतपणे माणकेश्वरी विठाबाईच्या माहेरी झाली होती. चवथ्यांदा विठाबाईला दिवस गेले. याही बाळंतपणासाठी विठाबाई माहेरी माणकेश्वरालाच गेल्या. जातांना सासूबाई रंगूबाईनी पंढरीच्या पांडुरंगला मनोमन प्रार्थना केली. "देवा पांडुरंगा, आता तरी तीन पोरीवर पोरगा होवू दे. गोरगरीबांचा कैवारी हिच्या पोटी येणार हे तुझ्या भक्ताचं-वारकऱ्याचं भाकीत खरं ठरू दे!"

अखेर तो सुदिन उजाडला. दिनांक ३० जानेवारी १९२० रोजी विठाबाई बाळंत झाल्या. माणकेश्वरी त्यांना मुलगा झाला. रंगूबाईची प्रार्थना पांडुरंगाने ऐकली. साहेबराव-विठाबाई या विठ्ठलभक्ताच्या पोटी ज्ञान जन्मले. माणकेश्वरी माणिक जन्मलं! तिथचं बाळाचं बारसं धुमधडाक्यात साजरं झालं. बाळाचं नाव 'उद्धव' असे ठेवलं गेलं! गोरगरीबांचा उद्धार करणारा 'उद्धव' आणि गोरगरीबाचा कैवारी कृष्ण जन्मल्याचा आनंद रंगूबाईसह साऱ्यांना झाला.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण दुसरे**

## ॥'उद्धव' चे बालपण, शिक्षण आणि बंडखोरीचं लक्षण ॥

सातेक महिन्याच्या बाळ उद्धवला घेऊन विठाबाई माहेराहून सासरी इर्ले येथे आल्या. त्यावेळी बाळाला पहायला सारा गाव लोटला. बाळाच्या थोरल्या तीन बहिणी – शांता-गोदा-शकुंतला यांना तर आपल्या भावाला कुठे ठेवू आणि कुठं नाही, असं झालं. "आमचा दादा आला" असा गिल्ला करीत त्या चिमुरड्या उद्धवच्या भोवती जमल्या. त्याला घेण्यासाठी धडपडू लागल्या. एकमेकीत भांडू लागल्या. उद्धव त्यांच्यापेक्षा धाकला असला तरी त्या त्याला 'दादा, दादा' म्हणून खेळवू लागल्या. तेव्हा तिन्ही चुलतेही बाळाला 'दादा' म्हणूनच हाका मारू लागले! अंगाखांद्यावर घेऊन फिरवू लागले. रंगूआजीला तर स्वर्ग दोन बोटेच उरला. तीदेखील त्याला 'दादा'च म्हणायची. त्याच्या बाळलीलात ती गोरगरीबांच्या कैवाऱ्याचं रूप शोधायची! अशा तऱ्हेने बाळ उद्धवचे लहानपणीच 'उद्धवदादा' हे नाव सर्वांच्या तोंडी झालं. पुढे मोठेपणी त्याचेच रुपांतर 'उद्धवराव दादा' मध्ये झालं. साहेबराव पाटलांचा तोही तीन मुलीनंतर झालेला हा मुलगा म्हणूनच साऱ्यांचा लाडका बनला.

बाळ उद्धवला चांगले चालायला येऊ लागल्यापासून त्याच्या पायाला जणू भिंगरी बांधल्यासारखे झाले. तो घरात थांबेना. गावातले रस्ते त्याला अपुरे पडू लागले. लहान लहान सोबती-सवंगड्यांना बरोबर घेऊन तो विटीदांडू, आट्यापाट्या आणि लपाछपीचे खेळ खेळू लागला. लहानपणापासून त्याच्यात अवखळपणाबरोबर खिलाडूपणाही होता. खेळात जयपराजयाची त्याला कधी काळजी वाटली नाही. खेळात तो एकरूप व्हायचा.स्वतःला विसरून. पाटलाचा पोर असूनही त्याने रडीचा डाव कधी केला नाही की पाटीलकीचा तोरा कधी मिरवला नाही. खेळात सारे खेळाडू सारखेच मानायचा. त्यामुळे सारी मुलं त्याचं नेतृत्व मानायची. तो सांगेल त्याला 'हां' म्हणायची. पोराचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीचा भावी जीवनात प्रत्यय येईल, असं कुणाच्या स्वप्नातही वाटलं नाही.

ईर्ल्यात त्या काळी एक शिक्षकी तिसरीपर्यंतची शाळा होती. उद्धवदादा शाळेत जाऊ लागला. पहिल्या वर्षीच त्याने आपल्या हुशारीची आणि कुशाग्रबुद्धीची चुणूक दाखवायला सुरवात करून शिक्षकाकडून शाबासकी मिळवली. पहिली ते तिसरीचे वर्ग एकाच खोलीत भरत. पहिलीत असतानाच दुसरी आणि तिसरीच्या वर्गातील मुलांच्या तोंडून ऐकिलेल्या कविता त्याच्याकडून पाठ झाल्या होत्या. एक ते दहापर्यंतचे अंक शिक्षकांनी शिकवल्यानंतर वरच्या वर्गातील मुलांचे पाहून-ऐकून तो शंभरापर्यंतचे अंक काढू लागला. मोजू लागला. वरच्या वर्गातील मुलांनी म्हटल्या गेलेल्या परवचातील काही पाढेही त्याचे पाठ झालेले. त्याची तल्लख स्मरणशक्ती पाहून शिक्षकांचा तो आवडता विद्यार्थी बनला होता.

पहाता पहाता तीन वर्षे निघून गेली. तो तिसरी पास झाला. इर्ले गावी चवथीचा वर्ग नव्हता. त्याचे शिक्षण तेथेच थांबले. घरातील तो एकुलता एक लाडका मुलगा असल्याने त्याला पुढच्या शिक्षणासाठी बाहेर गावी पाठविण्याचेही कुणाच्या मनात आले नाही. त्यावेळी तिसरीपर्यंतचे शिक्षण म्हणजे डोक्यावरून पाणी गेले, असे खेड्यातील लोकांना वाटायचे. त्याला उद्धवदादाचे आईवडील अपवाद नव्हते. असा तऱ्हेने उद्धवदादाची शाळा सुटली. पाटी फुटली! पुस्तके घरातील फडताळात रूसून बसली.

उद्धवदादाची शाळा जशी बंद झाली तसे त्याचे फिरणे-खेळणे वाढले. खेळता खेळता अधून मधून त्याचे पाय आपसूक शेताकडे वळायचे. तो शेतावर जायचा. गुराख्याबरोबर गुरं राखायचा. चुलत्याला शेतातील कामात मदत करायचा. चुलते कुळव हाकीत असले म्हणजे तो कुळवावर बसायचा. बैलगाडीत बसून बैलाचे कासरे हातात घेऊन गाडी हाकीत घरी यायचा. शेतात फिरतांना ज्वारीच्या पानावर पडलेली साखर वरपून घेऊन खायचा. हुर्ड्याच्या दिवसात सकाळ संध्याकाळ गरमगरम कोवळ्या कोवळ्या गोड गोड हुर्ड्यावर ताव मारायचा. ढाळे खायचा. बोरे-आंबे हादडायचा. रानात गुराख्याबरोबर आंब्याच्या झाडावर सुरपारंबा खेळायचा. साऱ्यांना ह्या बाललीला पाहून त्याचे कौतुक वाटायचे!

ज्वारी गहू हरभरा-करडी या पिकांची खळीदळी संपली. माल घरात येऊन पडला. सारे शेतकरी मोकळे झाले. भजन-करण्यात, पोथी ऐकण्यात तसेच यात्रा-जत्रात मौजमजा करण्यात गुंग व्हायचे. उद्धवदादांची तेथेही हजेरी लागायची. यात्रा जत्रा संपल्यावर शेतकरी उन्हाळखरडा, नांगरणी आणि खत वहाणीच्या कामाला लागायचे. त्या कामातही उद्धवदादा लुडबुड करायचा. शाळा नसल्याने तो रानभरी झाल्यागत फिरायचा. वडील साहेबराव आण्णानी त्याचेवर कुठलेच बंधन घातले नव्हते. चुलत्यांनाही त्याचे कौतुक वाटायचे. शेतातील रानवाऱ्याचे चैतन्य त्याच्या अंगाअंगात सळसळायचे. यात पुढं शाळा शिकावी हेही तो विसरून गेला!

असेच एके दिवशी काटी गावच्या शाळेत शिक्षक असलेले श्री. हरिश्चंद्रराव भोसले गुरुजी इर्ले या गावी साहेबराव आण्णांच्या घरी काही कामानिमित्त आले. त्यांनी चुणचुणीत असलेल्या ‘उद्धव’ला पाहिले. त्याला काही प्रश्न विचारले. उद्धवने त्यांना खणखणीत आवाजात अचूक उत्तरे दिली. कविता म्हणून दाखविल्या. उद्धवची कुशाग्रबुद्धी आणि प्रखर स्मरणशक्ती पाहून भोसले गुरूजी खूश झाले. त्याचे शिक्षणाचे एक वर्ष वाया गेल्याबद्दल त्यांनी साहेबराव आण्णापुढे आपली खंत व्यक्त केली. साहेबराव आण्णांची परवानगी घेऊन त्यांनी उद्धवला काटीच्या शाळेत आणून चवथीच्या वर्गात दाखल केले. वर्षाखेरीस उद्धवदादा चवथी पास झाला. ‘काटी’ला चवथीपर्यंतच शाळा होती. तेव्हा भोसले गुरुजींनी उद्धवला पुढील शिक्षणासाठी तुळजापूरला नेले. तेथे त्याचे सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. त्याच सुमारास काटीचे श्री. नरसिंगराव देशमुख हे वकिलीची सनद घेऊन उस्मानाबादला वकिली करू लागले होते. उद्धवचे धाकले चुलते श्री ज्ञानेश्वरतात्या आणि श्री. नरसिंगरावांचा दोस्ताना जमला होता. श्री. नरसिंगराव देशमुखाचे घराणे ही तसे पाहुणेच लागत होते. तेव्हा ज्ञानेश्वर तात्यांनी उद्धवच्या थोरल्या बहिणीसाठी-शांताबाईसाठी नरसिंगरावांचे स्थळ साहेबरावांना सुचविले. रीतसर पाहुण्यांच्या घरी जाणे-येणे झाले. शांताबाई काटीच्या देशमुखांना पसंत पडली .नरसिंगराव आणि शांताबाईचा विवाह झाला. उद्धव दादा नरसिंगरावाचे मेहुणे झाले. नरसिंगराव दादा त्यावेळी उस्मानाबादला वकिली करत असल्याने त्यांचा लाडका मेहुणा-उद्धवदादाही हायस्कूलच्या शिक्षणासाठी उस्मानाबादला आला. बहिणीच्या घरी राहून उद्धवदादा ‘गव्हर्मेंट मल्टिपर्पज हायस्कूल’ मध्ये शिकू लागला. या काळात नरसिंगरावांच्या मार्गदर्शनाखाली उद्धवची राजकीय-सामाजिक जाण वाढत होती. अन्यायाविरुद्ध बंड करण्याची त्याच्यातील सूप्त शक्ती उसळी मारू पहात होती.

उद्धव उस्मानाबाद येथे हायस्कूलचा विद्यार्थी असतांना त्याचा उस्मानाबाद येथे कार्यरत असलेल्या आर्य समाजाशी जवळचा संबंध आला. तो आर्य समाजामध्ये कामही करत होता. स्वामी दयानंद सरस्वतींचे ग्रंथ वाचीत होता. आर्य समाजाच्या तत्वज्ञानाचा त्याचेवर त्यावेळी खूप खोलवर परिणाम झाला होता. उद्धवचे चुलते ज्ञानेश्वर तात्या पूर्वीपासून आर्य समाजाच्या चळवळीत होते. त्यामुळे उद्धवचेही या

चळवळीशी संबंध पक्के झाले होते. त्याकाळी आर्य समाजिष्ट पंडित शामलालजी, बन्सीलालजी आणि पंडित नरेंद्रजी यांची भाषणे ऐकून उद्धव आणि त्यांच्या मित्रांची मने भारावून गेली होती.

उद्धवदादा मॅट्रीकला असतांना निजाम सरकारने पंडित नरेंद्रजीना अटक केली होती. त्याचा निषेध करण्यासाठी उद्धवदादाने पुढाकार घेतला. त्यांने बी. एस. कुलकर्णी, बलभीम तांबे, भाऊसाहेब देशमुख, शंकर नायगावकर आणि वसंत सोनटक्के या सहाध्यायी मित्रांना एकत्र जमविले. नरेंद्रजींच्या अटकेचा निषेद व्यक्त करण्यासाठी त्यांनी एक दिवस हायस्कूलच बंद केले. वातावरण तंग झाले. उस्मानाबादेतील 'इत्तिहाइल मुसलमीन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संप करणाऱ्या पोरांना कडक शासन करण्याचा मुख्याध्यापक बेगसाहेबांच्याकडे आग्रह धरला. या संप करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये उद्धव पाटील यांचे नाव पहिले होते. पण विद्यार्थ्यांचे सुदैव की, त्यावेळी सफिलउल्ला गुरुजी आणि मुख्याध्यापक बेगसाहेब उदारमतवादी होते. हुशार विद्यार्थ्यांवर त्यांचे प्रेम असल्याचे. ते या संपकरी विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याच्या राजकीय दडपणाला बळी पडले नाहीत. संपकऱ्या विद्यार्थ्यांना तंबी देऊन त्यांनी त्यांची या प्रकरणातून सुटका केली.

त्या काळी मुख्याध्यापकांनी उद्धवदादा आणि त्यांच्या मित्रांना शाळेतून काढून टाकले असते तर उद्धवदादा पुढे शिक्षणही घेऊ शकले नसते. ते जास्तीत जास्त इर्ले गावचे पाटील झाले असते. पुढे जेव्हा उद्धवराव १९५२ ला हैद्राबाद असेंब्लीत आमदार म्हणून निवडून गेले. त्यावेळी असेंब्लीच्या लॉबीत हेडमास्तर बेगसाहेब आणि उद्धवराव दादांची भेट झाली. तेव्हा ते उद्धवरावांना कौतुकानं म्हणाले, “अरे पटेल तू बडा आदमी हो गया.” त्यावर उद्धवरावजीनी त्यांचे पाय धरीत सांगितले, “ये तो आपके मेहरबानीसे हुआ”. तेव्हा गुरूशिष्यांचे डोळे आनंदाने डबडबून गेले.

उस्मानाबादेतील मल्टिपर्पज हायस्कूलमधून उद्धव सन १९३७ मध्ये मॅट्रीक पास झाला. उद्धवने इंजिनिअर व्हावे असे ज्ञानेश्वर तात्यांना वाटायचे. म्हणून उद्धवला पुढील शिक्षणासाठी हैद्राबादला पाठवले. त्याने उस्मानिया विद्यापीठात विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. हे शिक्षण घेत असतांना हैद्राबाद राजकीय आणि शैक्षणिक परिस्थितीचे उद्धव बारकाईने निरिक्षण करीत होता. तेथील आर्य समाजाच्या चळवळीत भागही घेत होता.

निजामाच्या राज्यातील विद्यामंदीरे ही मुस्लिम जातीय वादाचे अड्डे बनली होती. सरकारी नोकरीतील जागा मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवल्यातच जमा होत्या. मुस्लिमेतर विद्यार्थ्यांची भविष्यकालीन स्वप्ने उध्वस्त होऊ लागली होती. त्यांच्यावर वेगळी बंधने लादली जाऊ लागली होती. त्यांचेवर मानभंगाचे प्रसंग वारंवार येऊ लागले होते. त्यांना दुय्यम स्थानी असल्याचे पदोपदी जाणवून देण्यात येऊ लागले होते. त्यात भर म्हणून की काय त्यावेळी सरकारी शाळा कॉलेजातून आसफजाही घराण्याच्या भरभराटीसाठी वर्ग सुरू होण्यापूर्वी एक प्रार्थना म्हणायची सक्ती केली गेली होती. हे गीत म्हणणे म्हणजे आपण आसफजाही घराण्याशी राजनिष्ट राहाण्याची प्रतिज्ञा घेण्यासारखे होते. उद्धवदादाला ही गोष्ट पटणे अशक्यच. या पद्धतीविरुद्ध बंडाचा झेंडा फडकावयाच्या वंदे मातरम् चळवळीत तो सहभागी झाला. ते गीत गाण्याऐवजी साऱ्यांनी 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत गाणे पसंद केले. संस्थानभर ही चळवळ फोफावली. उस्मानिया विद्यापीठाचे आवार 'वंदेमातरम्'च्या गाण्याचे दुमदुमून गेले. 'वंदे मातरम्' हे गीत गाण्यास बंदी घालणारे आदेश सरकारने काढले. तरीही विद्यार्थ्यांनी 'वंदे मातरम्' हे गीत गाण्याचा आग्रह कायम ठेवला. त्यावेळच्या हैद्राबाद संस्थानच्या पंतप्रधान सर अकबर हैदरीबरोबर वाटाघाटी

झाल्या. त्या फिसकटल्या. विद्यार्थांनी सरकारी शाळा-कॉलेजवर बहिष्कार पुकारला. तो कित्येक महिने चालला. सरकारी शाळा कॉलेजेस् जवळ जवळ बंद पडू लागली. बहिष्कार पुकारणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय नागपूर-जबलपूर येथील कॉलेजात करण्यासाठी हैद्राबादेतील स्वातंत्रप्रेमी धनिकांनी फंड जमा करून देण्यास सुरवात केली. तेव्हा उस्मानिया विद्यापीठाने पहिला आदेश मागे घेऊन 'वंदे मातरम्' गीत गाण्यास परवानगी दिली. उद्धव दादा या चळवळीत आघाडीवर होता.

विद्यार्थ्यांच्या या वंदेमातरम् चळवळीने हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्य आंदोलनाचा भक्कम पायाच घातला होता. हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासातील हे एक प्रेरक प्रकरण ठरले.

या चळवळीत भाग घेतल्यामुळे उद्धवदादाला फर्स्ट-इअर सायन्समध्ये उत्तीर्ण झाल्यावर विद्यापीठाने काढू टाकले. इंजिनियर व्हायची चुलत्याची ज्ञानेश्वर तात्यांची इच्छा पूर्ण करायची तर अगोदर इंटर सायन्स पास झाले पाहिजे. त्यासाठी उद्धव बनारस हिंदू विश्वविद्यालयात इंटर सायन्स वर्गात प्रवेश घ्यायला गेला पण तेथे उस्मानिया विद्यापीठास मान्यता नसल्याने प्रवेश मिळाला नाही. तेव्हा उद्धवला अलिगड मुस्लिम विद्यापीठात इंटरला प्रवेश घ्यावा लागला. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उद्धवने १९४१ मध्ये हैद्राबाद येथील इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज केला. इंटर सायन्सला उद्धवला गणितात चांगले गुण मिळाल्याने प्रवेश नक्की मिळले, याची त्याला खात्री वाटत होती. इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्याचे व तो प्रवेश ठराविक तारखेच्या आता घेण्याच्या सूचना देणारे पत्र ठराविक तारीक उलटून गेल्यावर इर्ले या खेडेगावी उद्धवला मिळाले. पोस्टाच्या गैरसोईमुळे यावेळी इंजिनिअरींग होण्याची संधी हातून निसटल्याचे दुःख मनात ठेवूनच उद्धवने सन १९४३ मध्ये गणित विषय घेऊन बी. ए. प्रथम श्रेणीत पास केल्यानंतर पुन्हा एकदा इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी अर्ज केला. प्रवेश मिळाल्याचे पत्र आले पण यावेळी उद्धवला टायफाइड या रोगाने गाठले. त्यामुळे त्याला इंजिनिअरिंग कॉलेजला प्रवेश घेणेही जमले नाही. उद्धवने इंजिनिअर व्हावे हे ज्ञानेश्वर तात्यांचं स्वप्नं उद्धवला पूर्ण करता आलं नाही.

गणित घेऊन बी. ए. झाल्यानंतर उद्धवदादाला वकील होण्याशिवाय दुसरा पर्यायच उरला नव्हता. पण उद्धवने वकील होऊ नये. ही चुलत्याची इच्छा सांभाळण्यासाठी तो हैद्राबाद पब्लिक सर्व्हिस कमीशच्या परीक्षेला बसला. त्या परीक्षेत पासही झाला. पण त्याला तोंडी परीक्षेत नापास केले गेले. कारण निजामराजवटीत हिंदूना नोकरी मिळणे कठीणच होते. त्यात तो उमेदवार मराठा असेल तर निजामाला त्याज्यच होता. कारण खर्ड्याच्या लढाईत निजामाला मराठ्यांनी धूळ चारली होती, ही गोष्ट निजाम विसरू शकत नव्हता. हे एक प्रमुख कारण उद्धवला तोंडी परीक्षेत नापास करण्यामागे होते. असा उमेदवार हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीतील सुरवातीच्या वंदे मातरम् चळवळीत भाग घेणारा म्हणजे तर त्यांच्या दृष्टीने शांतम पापम् होते.

हैद्राबाद पब्लिक सर्व्हिस कमिशनकडून अशा तऱ्हेने नाकारल्या गेलेल्या उद्धवदादापुढे वकील होण्याशिवाय पर्यायच उरला नव्हता. शेवटी नाईलाजाने त्याने एल्. एल्. बी. ला प्रवेश घेतला आणि शेवटी १९४५ मध्ये तो एल्. एल्. बी. परीक्षा पास झाला. आणि काळाकोट घालून आपल्या मेहुण्याच्या ॲड नरसिंगराव देशमुख काटीकर यांच्या दफ्तरी वकिली व्यवसाय करण्यासाठी दाखल झाला.

अनुक्रमाणिका

ही आहेत उद्धवराव दादांच्या शिक्षणातील नागमोडी वळणे! चढउतार! स्वप्नाच्या जवळपास ते पोहचायचे पण नियती ऐनवेळी त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर करायला तत्पर असायची. नियतीच्या मनात होते तरी काय? असा प्रश्न त्यांना नेहमी सतावीत असायचा!

इर्ले सारख्या खेडेगावात शिक्षण सुरू झाल्यापासून ते एल्. एल्. बी. होईपर्यंतच्या जवळजवळ दीडतपाच्या काळात उद्धवराव दादांचं व्यक्तिमत्व घडत होतं. अनेक बऱ्यावाईट अनुभवाने ते तावूनसुलाखून निघत होतं. त्यांच्या जडणघडणीत आईवडिलाबरोबरच त्यांचे चुलते ज्ञानेश्वरतात्या, त्यांचे मेहुणे ॲड. नरसिंगराव देशमुख काटीकर, यांचा वाटा मोठा होता. ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली, हे पहाणेही मनोरंजक आणि मार्गदर्शक ठरणारी बाब आहे.

उद्धवराव दादा ज्या घरात लहानाचे मोठे झाले, त्या घरातील सुसंस्कृतपणाचा तर त्यांचेवर आपोआप परिणाम झालाच. या घरात वारकरी परंपरा मोठ्या पोटतिडकीने सांभाळली जात होती. साहेबराव आण्णांचा अध्यात्माचा अभ्यास आणि आचरणही उद्धवला खूप काही शिकवून गेले. वारकरी परंपरेचे त्यांचेवर संस्कार घडत होते. गोरोबाकाकांच्या दरवर्षी पंढरपूरला जाणाऱ्या दिंडीला या घराण्याने आपल्या शेतात जेवण घालण्याचे व्रत मोठ्या जिद्दीने सांभाळले. त्यामुळे ज्ञानेश्वर, नामदेव, तुकारामांचे अभंग उद्धवरावांच्या मनावर संस्कार करीत राहिले. त्यापैकी तुकाराम हा समाजसुधारक बंडखोर संत असल्याने तो त्यांना अधिक भावला. शिवाजी महाराज तर महाराष्ट्राचे दैवत. शिवाजीनी गोरगरीब मावळ्यांच्या मदतीने 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' असे रयतेचे राज्य स्थापन केल्याने तेही त्यांचे लहानपणापासूनचे दैवत झाले होते.

उद्धवरावांना तिनही चुलत्याबद्दल नितांत आदर वाटत होता. पैकी ज्ञानेश्वर तात्यांचं वागणं, बोलणं आणि त्याप्रमाणे कृती करणं खूप आवडायचं! किराणा मालाचं त्यांचं दुकान म्हणजे गोरगरीबांचा आधार. दुष्काळात त्यांनी आपल्या पेवातील ज्वारी गोरगरीबांना वाटून टाकल्याचाही त्यांच्या बालमनावर खोल ठसा उमटवणार ठरला. त्यापेक्षाही गोरोबा काकांच्या पंढरपूरला जाणाऱ्या दिंडीला जेवण घालतांना पूर्वी दोन पंक्ती बसायच्या. पहिली सवर्णांची आणि दुसरी नी शेवटची अस्पृश्यांची. ही प्रथा मोडून सर्वांना एकाच पंक्तीला बसवायचा, ज्ञानेश्वर तात्यांचा आग्रह म्हणजे माणुसकीचं उत्तम उदाहरण होतं. या घटनेचा उद्धवरावांच्या संवेदनशील मनावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील?

ज्ञानेश्वर तात्या वारकरी होते पण केवळ टाळकुटे नव्हते. त्यातील माणुसकीच्या आणि समतेच्या विचाराचे आणि तो विचार आचरणात आणण्याचे धाडस त्यांच्यात पुरेपुर होते. त्यातून ते विविध सामाजिक सुधारण्याच्या चळवळीत झोकून द्यायचे. सत्यशोधक चळवळीचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. सत्यशोधक चळवळीच्या बैठकांना परिषदांना उपस्थित राहण्यासाठी ते नेहमी तुळजापूर-उस्मानाबादला जायचे. बऱ्याच वेळा विद्यार्थी असलेल्या उद्धवदादाना ते बरोबर घेऊन जायचे. सत्यशोधक चळवळीमुळे उद्धवरावदादांना विद्यार्थी दशेतच, सर्वकष क्रांतीचे अग्रदूत महात्मा फुल्यांचे आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुल्यांच्या मूलगामी कार्याची ओळख झाली होती. महात्मा फुल्यांचा 'शेतकऱ्याचा असूड' 'गुलामगिरी' या ग्रंथाची नावे कळली होती. महात्मा फुल्यांच्या चळवळीचा प्राण म्हणजे बहुजनामध्ये शिक्षणप्रसार करून समाजसुधारणा करणे हा होता. त्यासाठी वर्णव्यवस्था, निरर्थक कर्मकांड आणि पुनर्जन्म, स्वर्ग, नरक इ. बाबतच्या भोंगळ कल्पना फेकून देऊन, समाजातील उच्च नीच, श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव संपुष्टात आणणारे विचारही त्यांचे व्यक्तिमत घडाविण्यास उपकारक होऊ लागलेले.

अनुक्रमाणिका

ज्ञानेश्वरतात्या हे केवळ सत्यशोधक चळवळीचेच कार्यकर्ते नव्हते. सत्यशोधक समाजाशी समांतर वहाणारा प्रवाह असलेल्या आर्यसमाजातही ते सहभागी होत होते. उद्धवदादा उस्मानाबादला शिकायला गेले तेव्हा चुलते ज्ञानेश्वर तात्या आणि मेहुणे ॲड. नरसिंगराव देशमुख काटीकर हेही आर्यसमाजाचे सक्रिय कार्यकर्ते होते. साहजिकच उद्धवरावही आर्य समाजाकडे इतके ओढले गेले की निजामाने पंडित नरेंद्रजी यांना अटक केल्याच्या निषेधार्थ त्यांनी आपल्या मित्रांना बरोबर घेऊन मल्टिपर्पज हायस्कूल एक दिवसासाठी बंद पाडल्याचे आपण पाहिले आहेच. उद्धवराव दादांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करण्यात सत्यशोधक समाजाच्या आणि आर्य समाजाच्या तत्वज्ञानाचा सिंहाचा वाटा आहे. वेदाचा अभ्यास फक्त ब्राह्मण वर्गाने करावा या धोरणाला आर्यसमाजाने जबरदस्त धक्का दिला होता. इतर वर्णातील लोकांना आणि शूद्र, अती शूद्रांनाही तो अधिकार असल्याचे प्रतिपादन आर्यसमाज करीत होता. वर्णव्यवस्था त्यांना मान्य नव्हती. जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न चालविला होता. शूद्र, अती शुद्रांना ते वेद शिकविण्यात पुढाकार घेत असत. या संस्काराने विषमतेचा तिटकारा आणि समतेचा कळवळा. त्यांच्या मनात रुजला. अन्यायाची चीड आणि न्यायाची चाड त्यांच्यात फुलत गेली.

उद्धवराव दादा आणि ॲड. नरसिंगराव दादा हे नात्याने मेहुणे! पण हे संबंध नातीगोती ओलांडून पुढे गेले होते. त्यांच्यात गुरु शिष्याचे नाते दृढ झाले होते. गुरु म्हणून ॲड नरसिंगराव दादांनी उद्धवरावाची जडणघडण पूर्ण केली असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. उद्धवदादा काटीला चवथीच्या वर्गात शिकत असतांनाच नरसिंगराव दादांची ओळख झालेली! त्यांच्याप्रमाणे आपणही खूप शिकायची प्रेरणा त्यांनी घेतलेली! मेहुणे झाल्यावर तर उस्मानाबादला त्यांच्या घरी राहून त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण घेतले होते.

ॲड. नरसिंगराव दादाचं व्यक्तिमत्व शांत, शालीन, मायाळू, दयाळू आणि तितकेच अभ्यासू होतं. सन १९३४च्या काळात वकील होऊन उस्मानाबादेत वकिली सुरू करणारे बहुजन समाजातील हाताच्या बोटावर मोजावेत अशातले नरसिंगराव दादा एक होते. त्याकाळी वकिली व्यवसाय अमाप द्रव्यार्जनाचा व्यवसाय मानला जायचा. पण नरसिंगराव हे मार्क्सवादाला मानणारे, क्रांतीसिंहाशी मैत्री असलेले व्यक्तिमत्व. त्यांनी आपली वकिली द्रव्यार्जनापेक्षा पददलितांची, श्रमजीवी कष्टकऱ्यांची दुःखे आणि अन्याय दूर करण्यासाठीच केली. सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांची त्यांनी वकिली करायला सुरवात केली होती. त्यांच्या गैरहजेरीत त्यांच्या ज्युनिअर वकिलाने एका सावकाराचे वकीलपत्र घेतल्याचे समजताच त्यांनी आपल्या सहकाऱ्यास बजावले होते. "या दप्तराने सावकारांची वकीलपत्रे कधीच स्वीकारली नाहीत. सावराकाविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, तर आपला खरा लढा आहे. या वर्गाच्या चरकात आपला शेतकरी सापडला आहे, त्याची सोडवणूक आपणच केली पाहिजे. तेव्हा पुढील तारखेस सावकारास दुसरा वकील नेमण्यास सांगा व त्याचेकडून घेतलेले फीचे पैसे त्यांना परत करा." हा प्रसंग उद्धवदादाच्या डोळ्यासमोर घडलेला! उद्धवराव दादांना त्यावेळी नरसिंगराव दादा म्हणजे एक आदर्श वाटू लागला होता. शिक्षणप्रसारासाठी दादांनी पददलित मागासवर्गीय शेतकऱ्याच्या मुलासाठी 'मराठा तत्सम वर्गीय शिक्षण परिषदे'तर्फे मराठवाड्यात अनेक वसतिगृहे सुरू केली होती. त्यासाठी पदरमोडही केली होती. हेही कार्य उद्धवरावदादांनी विद्यार्थी दशेत जवळून पाहिले होते. अनेक वेळा उद्धवरावांनी त्यांना साथही दिली होती. नरसिंगराव दादांच्या सहवासाने त्यांना महात्मा फुले, दयानंद सरस्वती, पंडित नरेंद्रजी, क्रांतीसिंह नाना पाटील आणि मार्क्स लेनिन यांचे कर्तृत्व आणि वैचारिक विश्व समजायला मदत झाली. त्यांच्या प्रेरणेतूनच हैद्राबादला शिक्षण घेत असतांना उद्धवराव मार्क्सवादाच्या अभ्यास शिबीराला जात होते. त्याचवेळी मार्क्स एगल्सचा 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा' ही छोटीशी पण वैचारिक

स्फोटकांनी गच्च भरलेली पुस्तिका त्यांनी अभ्यासली होती. मार्क्स आणि महात्मा फुले यांचा अभ्यास करतांना महात्मा फुले हे भारतातील मार्क्स असल्याचा प्रत्यय त्यांना आला होता. या दोन्ही महापुरुषांच्या तत्वज्ञानाचा परिस्थितीसापेक्ष मेळ घालून भविष्यात गोरगरीबांचे कल्याण करण्याचे राजकारण करण्याचे विचार विद्यार्थी दशेतच उद्धवरावांच्या मनात घोळत होते.

आईवडील, चुलते ज्ञानेश्वर तात्या, मेहुणे आणि गुरु नरसिंगराव दादा यांनी केलेल्या सुसंस्कारांचे फळ म्हणजे उद्धवराव दादांचं घडलेलं व्यक्तिमत्व होय. त्यामुळेच उद्धवराव हे विद्यार्थी दशेपासूनच ध्येयानं धूंद झालेले, गरीबाबद्दलच्या करुणेने काठोकाठ भरलेले, आणि बहुजन समाज्याच्या हितासाठी, सुखासाठी, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी चळवळी करण्यास्तव पेटलेले तरुण होते. दिवाळी-उन्हाळी सुट्टीत ते आपल्या इर्ले गावी आले म्हणजे उद्धवराव शेतात जाऊन शेतकऱ्याबरोबर काम करत, शेतमजूरासोबत गप्पा ठोकत आणि दलितांच्या दयनीय अवस्थेचं बेसूर वास्तव उघड्या डोळ्यांनी पहात असत. भविष्यात त्या सर्वासाठी लहानमोठ्या चळवळीत झोकून देण्याची जणू पूर्वतयारीच ते करीत. त्यांचं पुढचं जीवन म्हणजे त्यांच्या गोरगरीबांच्या कैवारासाठी बंडाचा झेंडा उभारणारा आणि त्यासाठी आत्मसमर्पण करू इच्छिणारा एक नवा नेता उदय पाऊ लागला होता.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण तिसरे**

# ॥ जमिनदार आणि सावकारशाही विरुद्धचा पहिला लढा ॥

सन १९३८-३९चं साल असावं. नरसिंगरावदादांना सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात भाग घेण्याची संधी चालून आली. सुरुवातीला राजकीय कार्य करण्यापेक्षा शैक्षणिक-सामाजिक कार्य करण्याकडे त्यांचा ओढा होताच. सन १९३८ साली त्याला वाट मिळाली. नुकतीच मराठा परिषद स्थापन झाली होती. त्या परिषदेची बैठक बीडला बोलावण्यात आली होती. सदर बैठकीस उपस्थित राहण्यासाठी नरसिंगरावदादा आपल्या कार्यकर्त्यासह बीडला गेले. त्यावेळी उद्धवरावदादा उच्च शिक्षण घेण्यासाठी हैद्राबादेत होते. पण सदर परिषदेतर्फे शैक्षणिक-सामाजिक काम करण्याबाबत दोन्ही दादांची चर्चा झालेली होतीच. या परिषदेला बीडचे श्री बलभीमराव कदम आणि बापूसाहेब वेलणकर, पैठणचे नारायण चव्हाण, परभणीचे पंडीतराव आण्णासाहेब गव्हाणे, नांदेडचे भगवानराव लहानकर, तसेच विविध गावातून तात्याराव तलमोडकर,विश्वंभरराव हराळकर, देवीसिंह चौहान, जीकरे, कृष्णराव मास्तर, साहेबराव हंगरगेकर आदि प्रमुख कार्यकर्ते हजर होते. या बैठकीत देवीसिंह चौहान यांनी शेतकरी संघ काढायची सूचना केली होती पण अंज्ञानांधकारात चाचपडत असणाऱ्या बहुजन समाजाला ज्ञानाचा प्रकाश दाखवणं अधिक महात्त्वाचं आणि मूलगामी कार्य असल्याचं सर्वांना मान्य झालं आणि तिथं ‘ मराठा व तत्सम वर्गीय शिक्षण परिषद’ या नावानं शिक्षणसंस्था काढायची कल्पना पक्की झाली. या परिषदेत शिक्षणकार्य करण्याची तयारी ॲड. नरसिंगरावानी दाखवली. त्यामुळे या परिषदेचे अध्यक्षपद त्यांच्याकडं आलं. बीडचे बलभीमराव कदम उत्साही गृहस्थ. ते या शिक्षणसंस्थेचे सेक्रेटरी झाले. अन्य कार्यकर्त्यांचा कार्यकारिणीत समावेश झाला. मराठवाड्यात शिक्षणप्रसाराची पहाट उजाडली.

या शिक्षण परिषदेतर्फे अंबेजोगाई, नांदेड, हिंगोली, बीड, उस्मानाबाद आदी पंचवीस ठिकाणी वसतिगृहे काढण्याचा निर्णय झाला. एकेक वसतिगृह सुरू झाले. गोरगरीबांची मुलं त्यात शिकू लागली. या शैक्षणिक-सामाजिक कार्यात नरसिंगरावदादा, बलभीमराव कदम आणि आण्णासाहेब गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली या शैक्षणिक संस्थेत उद्धवरावदादाही सक्रिय सहभाग घेऊ लागले. पुढे मे १९४७ मध्ये नांदेड येथे या शैक्षणिक संस्थेचे अधिवेशन भरले. त्याचे अध्यक्ष होते शंभू गिरजी महाराज व उद्‌घाटक होते डॉ. पंजाबराव देशमुख. त्यावेळी उद्धवरावदादांवर या संस्थेचे चिटणीस म्हणून काम करण्याची जबाबदारीही येऊन पडली होती. या अधिवेशनातच साताराच्या प्रतिसरकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या क्रांतिसिंह नाना पाटील यांचे उजवे हात मानले गेलेले. श्री. जी. डी. लाड यांची भेट आणि ओळख झाली होती. त्यामुळेच यानंतरच्या उद्धवराव दादांच्या राजकारणाला नवे क्रांतिकारक वळण लागले.

या परिषदेपूर्वी दोनेक वर्षे अगोदर म्हणजे १९४५ साली. निझामानं मराठवाड्यातील शैक्षणिक कार्यावर बंदी घालण्याचे पाऊल उचलले. त्यानुसार त्या काळचे कलेक्टर आबीद अली खान यांनी गस्ती निशाण ५३ अ आणि ब अनुसार राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यावर बंधनं घातली. ५३ अ नुसार कोणतीही राजकीय हालचाल निजामाच्या परवानाशिवाय करता येत नव्हती आणि ५३ ब नुसार सामाजिक स्वरूपाचे (त्यात शैक्षणिक कार्य आलेच) कार्य करायचे असले तरी त्याची माहिती निजामाला देणं आवश्यक ठरविलं होतं.

अनुक्रमाणिका

अशी बंधनं या शिक्षण संस्थेवर लादण्याची दोन कारणं होती. ती म्हणजे संस्थेने पूर्वी केलेले दोन ठराव. एक, शिक्षण मराठी भाषेतून देण्यात यावे आणि दोन, मराठी माणसांना नोकरीत ज्यादा संधी द्यावी या मागण्या. या ठरावामागे राजकारण असल्याचा निजामाला वास आला होता. नरसिंगरावांचा दुसरा अनुभवही तेवढाच अन्याय करणारा होता. नरसिंगरावदादांनी आपल्या काटी या गावी तहसीलदाराची पूर्वपरवानगी घेऊन ग्रंथालय सुरू केले होते. नवीन रुजू झालेल्या तहसीलदाराचे ग्रंथालय सुरू करण्याचा पूर्वीच्या तहसीलदाराचा निर्णय फिरवला. स्टेट कॉंग्रेस या राजकीय संघटनेवर अगोदरचं बंदी होती. पण वसतिगृहे, ग्रंथालये काढण्याला जेव्हा निजाम अडकाठी घालू लागला. तेव्हा नरसिंगरावदादा आणि उद्धवरावदादा चिडले!

एवढ्यावरच निजामाचा अविवेक आणि दडपशाही थांबली नव्हती. पागोट्याऐवजी पांढरी टोपी, पांढरे कपडे घालणारावर निजामाची कधी अवकृपा होईल. हे सांगता येत नसे. कारण असे कपडे घालणारे एकजात त्याच्याविरुद्ध उठाव करणारे चळवळे असल्याची त्याची समजूत झाली होती.

कलेक्टराच्या शिक्षणसंस्थेबाबतच्या बेकायदेशीर नोटीसीवर चर्चा करण्यासाठी औरंगाबादला बहुजन समाजाच्या गटाची बैठक आयोजित केली होती. या बैठकीला नरसिंगरावदादाबरोबर उद्धवरावदादाही उपस्थित राहिले. शासनाच्या या अन्यायी धोरणाचा जोरदार निषेध केला गेला. ‘लढ्याशिवाय न्याय मिळणार नाही’. मूल रडल्याशिवाय आईदेखील मुलाला पाजायला घेत नाही. मग तर हा अन्यायी निजाम आपण स्वस्थ राहिल्यावर आपणाला काही देईल, हे संभवतच नाही. त्यासाठी राजकारणात उतरणं ही काळाची गरज आहे.’ या अर्थाचे बंडखोर विचार उद्धवरावदादांनी तर्कशुद्ध आणि जहालपणे मांडले. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. शिक्षण प्रसाराचे काम थांबवायचे तर नाहीच पण अन्यायनिवारण करण्यासाठी राजकारणात उडी घ्यायचे सर्वांनी ठरविले आणि १९४५ साली नरसिंगरावदादा आणि उद्धवरावदादा आपल्या कार्यकर्त्यांसह सर्वशक्तीनिशी राजकारणात उतरले. त्यावेळी उद्धवरावदादांचे वय केवळ पंचवीस वर्षाचे होते.

सन १९४५ मध्ये उद्धवरावदादा एल.एल्.बी झाले सुरुवातीस त्यांनी नरसिंगरावदादांच्या मार्गदर्शनाखाली वकिलीची उमेदवारी सुरू केली. त्यावेळी एकदा नरसिंगरावदादा काही कामानिमित्ताने सोलापूरला जायला निघाले. त्याकाळी आजच्यासारख्या एस. टी. बसेस नव्हत्या. ते खाजगी सर्व्हिस बसने सोलापूरला चालले होते. सदर बस सोलापूर नजिकच्या उळे गावाजवळ येताच एकाएकी उलटून पडली.या अपघातात त्यांच्या कमरेची हाडे पिचली-दुखावली. त्यांना सुमारे तीनेक महिने सोलापूरी दवाखान्यात पडून राहावे लागले. या काळात त्यांचे वकिलीचे दफ्तर उद्धवरावदादांनाच सांभाळावे लागले.

या काळात कोर्टातील वकिलीची दगदग, खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करून गोरगरीबांच्याकडून पैसा उपटण्यासाठी वकील वर्गात चाललेली धडपड या बाबी तत्त्वनिष्ठेने वागू पाहणाऱ्या उद्धवरावदादांना उबग आणि उद्वेग आणणाऱ्या वाटल्या. वकिलीत त्यांचे मन रमेना. अशी वकिली करणे म्हणजे स्वतःनेच स्वतःचा विश्वासघात करण्यासारखे असल्याची तीव्र जाणीव त्यांना झाली. त्यामुळे त्यांचे मन वकिलीच्या व्यवसायावरून उडून गेले. त्यांनी वकिलीचा व्यवसाय सोडण्याचा मनोमन निश्चय केला. नरसिंगरावदादा सोलापूरहून बरे होऊन येईपर्यंत बळेबळे त्यांनी कशीतरी वकिली केली.

अनुक्रमाणिका

नरसिंगरावदादा सोलापूरहून बरे होऊन आल्याक्षणी त्यांनी वकिली व्यवसायाला रामराम ठोकला. वकिली करण्यासाठी शिवलेला आपला काळाकोट त्यांनी नरसिंगरावदादांच्या घरीच ठेवला. थंडीच्या दिवसात घालण्यासाठी त्यांनी दुसऱ्या रंगाचा कोट शिवून घेतला. त्या काळ्याकोटाबद्दल त्यांचे मनात कमालीची नफरत उत्पन्न झाली होती. नव्या कोटाबद्दल कुणी विचारले तर ते म्हणत, “तो पूर्वीचा काळाकोट थंडी रक्षणासाठी मी घातला तर मी पुन्हा वकिली सुरू केली, असा लोकांचा गैरसमज होईल म्हणून हा नवा कोट शिवला.” खरं म्हणजे ज्ञानेश्वर तात्यांना आपला पुतणा-उद्धवरावदादा याने वकील होऊ नये असेच वाटायचे. शिक्षणातील इतर वाटा बंद झाल्याने नाईलाजाने उद्धवरावांना वकील व्हावे लागले हे ज्ञानेश्वर तात्यांना कळत होते. पण तरीही उद्धवरावदादाने वकिली करण्यापेक्षा राजकारणात पूर्णवेळ काम करावे असा उपदेश ते उद्धवरावांना सतत करायचे. ज्ञानेश्वर तात्याच्या म्हणण्याप्रमाणे मग उद्धवरावांनी डाव्या विचारसरणीच्या राजकारणात स्वतःला झोकून दिले.

तळागाळातल्या शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी दलित आणि स्त्रिया यांचा उद्धार करणं हा या उद्धवाच्या राजकारणाचा पाया होता. अधिष्ठान होते. त्यासाठी त्यांना महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीची आणि राजर्षी शाहूची प्रेरणा लाभली होती. सातारच्या क्रांतिसिंहाचं आदर्शवत जीवन दीपस्तंभाप्रमाणं उभा होतं. क्रिंतिसिंहाचा उजवा हात असलेल्या जी.डी. लाडांची मैत्री आणि मार्गदर्शन मिळत होतं. तसं महात्मा गांधीचं सर्व समावेशक धोरणही त्यांना भावत होतं. स्वातंत्र्याची गोमटी फळ बहुजन समाजाला चाखायला मिळावीत म्हणून त्यांना स्वातंत्र्यातील सत्तेत सामावून घेण्याचं त्यांचं बोलणं त्यांना चालना देत होतं. मार्क्स लेनिनच्या कामगारांच्या राज्याची स्वप्नं त्यांना खुणावित होती. नरसिंगरावदादा हे नात्याने मेहुणे असले तरी गुरुप्रमाणे ते त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. मग त्यांना आणखी काय हवे होते? गोरगरीबांच्या कल्याणासाठी राजकारणातलं करिअर त्यांना बनवायचं होतं. म्हणूनच ध्येयधुंद होऊन राजकारणात धावायला ते मोकळे होते.

त्याकाळी ॲड. नरसिंगरावदादा हे सावकारशाही आणि जमिनदारशाहीने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांची वकिलपत्रे घेऊन त्यांना न्याय मिळवून देत. त्यातूनच त्यांनी उद्धवरावांना बरोबर घेऊन सरंजामशाहीचे अवशेष असलेल्या जमिनदाराविरुद्ध संघर्ष सुरु केला. स्वजातीतील जमिनदार श्री. रामराव सरवदकर (ता. हातगाव) यांच्याकडून शेतकरी आणि शेतमजुरांवर होणाऱ्या अन्याय्य पिळवणुकीविरुद्ध त्यांनी संघर्ष पुकारला. कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्यात त्यांना यश लाभले. या यशाने त्यांचा उत्साहही वाढला!

शुद्ध हेतूने केलेल्या लढ्याचा शेवट विजयानेच होतो हे सिद्ध झाले. सरंजामशाही, जमिनदारशाही आणि सावकारशाही ही संपणारीच गोष्ट असते. त्यासाठी आपण लढा दिला पाहिजे. या जमीनदार सावकारशाहीविरुद्ध बोलताना उद्धवरावांच्या वक्तृत्वाला बहर येई. ते आपले विचार इतक्या पोटतिडकीने, तर्कशुद्ध पद्धतीने आणि सुस्पष्टपणे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या रोजच्या जीवनातील उदाहरणे घेऊन मांडीत असत की त्यामुळे ग्रामीण भागातील लोक मंत्रमुग्ध होऊन जात. नंतर ते उद्धवरावदादांच्या मताचेच होत. याचे प्रत्यंतर सुरुवातीच्या काळातच आले.

आपल्या इर्ले गावातच उद्धवरावांची सभा होती. या सभेत उद्धवरावांनी अतिशय प्रभावी भाषण केले. सरंजामशाही आणि सावकारशाहीच्या प्रवृत्तीवर तुफानी हल्ला चढवला. पुरोगामी विचार प्रभावीपणे मांडले. गावकऱ्यांची मने जिंकली. उद्धवरावांचे वडील साहेबराव आण्णा गावचे वतनदार पाटील हेही या

सभेत आपला पोरगा काय बोलतोय, हे ऐकायला उपस्थित होते. उद्धवरावांच्या भाषणाचा त्यांचेवरही खोल परिणाम झाला. मुलाच्या भाषणाने तेही प्रभावित झाले. तात्काळ ते व्यासपिठावर आले आणि आजच्या आमदार-खासदारकी एवढे महत्व असलेल्या आपल्या पाटीलकीचा त्यांनी जाहीरपणे राजीनामा दिला. निजामशाहीतील ग्रामीण स्तरावरील आपला अधिकार त्यांनी सोडून दिला. त्यावेळी ते म्हणाले, "पोरगा चौकात सार्वजनिक जीवनातील शहाणपण शिकवतोय, तर्कसंगत, सुस्पष्ट विचारांची मांडणी करतोय आणि मी गावचा पाटील, शोषकांचा प्रतिनिधी म्हणून राहणे चूक आहे." हा विचार मांडून साहेबराव आण्णांनी आपल्या पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या वतनदारीवर पाणी सोडले. पितापुत्राच्या पुरोगामीपणाची ही घटना त्याकाळी दुर्मिळच म्हटली पाहिजे.

नरसिंगरावदादा आणि उद्धवरावदादा मराठवाड्यातील सावकारशाही संपविण्यासाठी सावकारांच्या मागे हात धुवून लागलेले. नरसिंगरावदादा शेतकऱ्यांची वकिलपत्रे घेऊन सावकारांच्या घशात अडकलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळवून देत. पण तेवढ्याने काय होणार? सावकारशाहीचे बळी ठरलेल्या अनेक गोरगरीब शेतकऱ्याकडे कोर्टात येण्यासाठी आर्थिक परिस्थिती नव्हती. ही भीषण परिस्थिती त्यांच्या लक्षात आली होती. त्याकाळी उस्मानाबाद जिल्ह्यात अठरा सावकार होते. त्यातील फुलचंद गांधी तर बडे सावकार होते. भरमसाठ व्याज आकारून ते गबर-श्रीमंत झाले होते. अनेकांच्या जमिनी त्यांच्याकडे गहाण पडल्या होत्या. याशिवाय ते राजकारणातही गांधीजींच्या तत्त्वाचा जप करीत अग्रभागी होते. ही गोष्ट नरसिंगराव आणि उद्धवरावांना पटणे केवळ अशक्य! या सर्व सावकारांना सावकारी न करता सचोटीने व्यापार करण्याचा; तो वाढविण्याचा आणि त्यातून योग्य नफा कमविण्याचा सल्लाही उद्धवरावांनी बऱ्याच वेळा दिला होता. पण सावकारीतून विनासायास येणारा पैसा सोडण्याची सावकारांनी तयारी दर्शविणे ही देखील अशक्य कोटीतील गोष्ट होती. त्यात सावकार फुलचंद गांधी हे तर राजकारणात प्रतिष्ठित व्यक्ति. मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसणारे, सरकारी अधिकाऱ्यांना 'मृदंगे मुखलेपन' करून अंकित केलेले धनिक. त्यांच्या विरोधात संघर्ष करण्याचा या दोन्ही दादांनी निश्चय केला. तशी संधीही त्यांच्याकडे चालून आली!

सन १९४५-४६ च्या दरम्यान हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये उजव्या-डाव्या विचारांचे सारे कार्यकर्ते काम करीत होते. त्यात नेतृत्वावरून दोन गट पडलेले. एक जनार्दनराव देसाई गट. या गटाला वकील गट म्हणत. तर दुसरा गट स्वामी रामानंद गट. हा गट मास्तरगट म्हणूनही ओळखला जाई. वकील गटाची मंडळी स्वामी गटास 'गोसावी' गट म्हणून बोलत. नरसिंगराव दादा, उद्धवरावदादा आणि त्यांचे कार्यकर्तेही स्टेट कॉंग्रेसमध्ये काम करीत असत. त्यांचं तसं स्वतंत्र अस्तित्व होतं. सत्यशोधकी विचाराचा वारसा घेणारे हे कार्यकर्ते असल्याने स्वामी गट त्यांना अपमानास्पद वागणूक देई. वकिल गटापासूनही हे दादा थोडे अंतर राखूनच होते.स्टेट कॉंग्रेसवर निजामाने बंदी घातल्यामुळे महाराष्ट्र परिषद, कर्नाटक परिषद आणि आंध्र परिषद अशा परिषदा स्थापन होऊन हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा लढा लढला जाऊ लागला.

महाराष्ट्र परिषदेत स्वामी गटाचा जोर जास्त. स्वामी गटात शेटजी-भटजी या वर्गाच्या प्रतिनिधीचा भरणा जास्त. ते नरसिंगराव-उद्धवरावसारख्या बहुजन समाजातील ब्राह्मणेत्तर कार्यकर्त्यांची उपेक्षा करीत, त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक देत. त्यामुळे त्यांच्यात एक प्रकारचे वैचारिक शीतयुद्ध चालू असे. शितयुद्धाचे रुपांतर युद्धात होण्याचा प्रसंग एका घटनेमुळे उद्‌भवला.

अनुक्रमाणिका

दिनांक ५ मे १९४६ रोजी लातूर येथे महाराष्ट्र परिषदेचं पहिलं अधिवेशन भरणार होतं. त्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून उस्मानाबादचे मोठे सावकार श्री फुलचंद गांधी यांची निवड करण्यात आली होती. फुलचंद गांधींची उस्मानाबाद, कळंब, तुळजापूर या तालुक्यात मोठी सावकारी पसरलेली. त्यांच्या मनमानी व्याजदाराने गोरगरीब ऋणको गांजून गेलेले. ते स्वागताध्यक्ष झाल्याने लोक मनातून चिडलेले. नरसिंगराव-उद्धवरावांना ही निवड कशी पटणार? सावकारशाहीच्या विरोधात संघर्ष पुकारणारे हे दोघेही! तेव्हा दोन्ही दादांच्या नेतृत्वाखाली सदर अधिवेशनाला लोकांनी असहकार करण्याचा निर्णय घेतला. केवळ असहकार पुकारून काय होणार? सदर फुलचंद गांधी स्वागताध्यक्ष असलेले अधिवेशनच उधळून लावायचा त्यांनी बेत केला. फुलचंद गांधींच्या विरुद्ध त्यांनी 'भक्षक हा रक्षक होऊ शकत नाही' हे स्फोटक पत्रक काढले. उद्धवरावदादांनी हे पत्रक उस्मानाबाद जिल्ह्यातील गावोगावी जाऊन लोकांना वाटले. सभा घेतल्या.'सावकारशाही ठेवायची नाही, ती ठेचायची हाय-नव्हे गाडायची हाय!' हा त्यांचा परवलीचा नारा होता. फुलचंद गांधीविरुद्ध अधिवेशनात मोर्चा नेण्याचेही ठरले. गावोगावचे शेतकरी या निषेधपर मोर्चात सहभागी होण्यास सज्ज होऊ लागले. उद्धवरावदादांच्या संघटन कौशल्याची ती जणू परीक्षाच ठरणार होती. त्यामुळे उद्धवराव दादा रात्रंदिवस गावन् गाव पायदळी तुडवून फुलचंद गांधी विरुद्ध प्रचार करू लागले.

अधिवेशनाचा दिवस उजाडला. त्या दिवशी लाल-पिवळे हिरवे फेटेधारी शेतकरी शेतमजुरांचे लोंढेच्या लोंढे लातूरला येऊ लागले. अधून मधून 'सावकारशाही ठेवायची न्हाई ती ठेचायची हाय रं!' चं ध्रुवपद कानावर आदळायचं! लातूर शहर माणसांनी गजबजून गेलं. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी उद्धवराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेला मोर्चा अधिवेशनस्थळाकडे येऊ लागला. फुलचंद गांधीच्या सावकारशाही विरुद्ध घोषणा दिल्या जाऊ लागल्या. एकजण ओरडायचा 'सावकारशाही!' सारे जोराने ओरडायचे, 'ठेवायची न्हाई!' पुन्हा पहिला माणूस तोंडावर दोन हात ठेवून गर्जायचां. 'सावकारशाही...' त्याच्यामागून लोक ओरडायचे. 'ठेचायची हाय!' दुसऱ्या गटातील शेतकरी घोषणा द्यायचे-'भक्षक हा रक्षक होऊ शकत नाही.' या दोन्ही घोषणानी अधिवेशनाच्या सभामंडपात कहर केला. घोषणांनी जणू मंडप डोक्यावर घेतला. घोषणाचे आवाज टिपेला पोहचू लागले तेव्हा अधिवेशनाचे संयोजन गर्भगळीत होऊन गेले. 'लोकांनी शांत बसून घ्यावे' या सुचनाकडे कुणाचे लक्षच नव्हते. नव्हे अशा सूचना घोषणाच्या गदारोळात विरून जाऊ लागल्या. अधिवेशन बारगळते की काय अशी नाजूक परिस्थिती निर्माण झाली. अधिवेशनातील कार्यकर्त्यांना काय करावे हेच समजेना. तेव्हा बाबासाहेब परांजपे यांनी मध्यस्थी केली. 'फुलचंद गांधी येथून पुढे सावकारकी करणार नाहीत. तसेच सावकारकीत संपादन केलेल्या जमिनी ते शेतकऱ्यांना परत करतील', ह्या उद्धवराव-नरसिंगरावदादांच्या अटी परांजप्यांनी माईकवरून मान्य केल्याचे सांगितल्यावर उद्धवराव-नरसिंगरावदादांनी हात वर करून 'आपण जिंकलो. शांत रहा' असे हावभाव केले. तेव्हा कुठे प्रक्षुब्ध झालेले मोर्चेकरी शांत झाले. नंतर अधिवेशनास सुरुवात झाली. ते सुरळीतपणे पार पडले. महाराष्ट्र परिषदेचं हे पहिलं आणि अखेरचंच अधिवेशन झाले.

सावकारशाही विरुद्ध उद्धवराव दादांच्या नेतृत्वाखाली नरसिंगरावाच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांनी लढवलेला हा पहिला जाहीर लढा कमालीचा यशस्वी झाला. आपण आवाज उठविला तर तो ऐकला जातोच पण तो मानलाही जातो. हा विश्वास शेतकऱ्यात निर्माण करण्यात उद्धवरावदादा यशस्वी झाले. या लढ्यातून शेतकऱ्यांना जसं आत्मभान मिळालं तसं त्यांना स्वाभिमानाने लढ्यात उभा करणारा नवा नेता उद्धवरावांच्या रुपाने लाभला. या लढ्यातून गोरगरीबांचा कैवार घेणारा, त्यांच्या कल्याणासाठी तळमळणारा, त्यांच्याबरोबरीने लढ्यात उभा राहणारा, अन्यायाविरुद्ध लढत देणारा, निर्भय, निर्मळ,

निस्पृह आणि निगर्वी नेता मिळाला. या लढ्यातून ग्रामीण भागातील गोरगरीब लोकांचं संघटन करण्याचं कौशल्य आणि जिद्द प्रकट झाली. या लढ्यातून उद्धवरावांनी फुलचंद गांधीसारख्यांचं शत्रूत्व अंगावर घेतल्याची खंत होती पण त्याचबरोबर हजारो भोळेभाबड्या, जीवाला जीव देणाऱ्या कार्यकर्त्याचं मित्रत्वं त्यांना मिळू लागलं.

हा उद्धवरावदादांचा विचारांचा आणि विचारपूर्वक केलेल्या संघर्षाचा विजय होता. सावकारशाहीशी दिलेल्या लढ्याची छोटीशी यशोगाथा म्हणजे उद्धवराव दादांच्या पुढे येणाऱ्या संघर्षाच्या चित्रपटाची लहानशी चूणूक होती. नांदी होती.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण चवथे**

## ॥ हैद्राबाद मुक्ती संग्रामातील उद्धवरावांचा सशस्त्र लढा ॥

महाराष्ट्र परिषदेच्या लातूर येथे सावकारशी विरुद्ध गाजलेल्या अधिवेशनच्या वेळी स्टेट कॉंग्रेसमध्ये अनेक विचारधारा असलेले कार्यकर्ते काम करीत होते.गांधीवादी, समाजवादी, मार्क्सवादी आणि कम्युनिस्ट हे सारे त्यात होते. नरसिंगराव-उद्धवराव मार्क्सवादाला मानणारे. तेही स्टेट कॉंग्रेसचं कार्य करीत होते. त्यांच्या गटाला सापत्नभावाची वागणूक दिली जात होती. तरी हैद्राबाद मुक्ती संग्रामासाठी विविध गट आपापसातील मतभेद विसरून स्टेट कॉंग्रेसचा रथ ओढीत होते. पुढे स्टेट कॉंग्रेसला निजामानं मान्यता दिली. स्टेट कॉंग्रेसचं पहिल अधिवेशन हैद्राबादला उजळ माथ्यानं झालं. त्यात मराठवाड्यातील पाचेकहजार प्रतिनिधींचा सहभाग होता. नरसिंगराव-उद्धवरावांचा गटही त्यात आघाडीवर होता. या परिषदेत इंग्लंडप्रमाणे निजामाच्या कृपाछत्री जबाबदार राज्य पद्धती हैद्राबाद संस्थानात उभी करण्याचा महत्वाचा ठराव झाला. त्यासाठी सत्याग्रहही सुरू करण्यात आले.

सन १९४६-४७ मध्ये निजामाविरुद्ध तीन पातळ्यावरून रान पेटविणारे काम सुरू झाले. हे त्रिसूत्री काम तीन वेगवेगळ्या गट वा पक्षानं चालू केलं होतं. ते तीन विभाग म्हणजे स्टेट कॉंग्रेसचा राजकीय लढा, आर्य समाजाची धार्मिक चळवळ आणि हिंदू महासभेचा भागानगर सत्याग्रह. या तिहेरी हल्ल्याने निजाम पुरता गोंधळून गेला. त्याचा स्वभाव चिडचिडा बनला. क्रूरपणा करण्यालाही त्याला काही वाटेना.

स्टेट कॉंग्रेसचं सत्याग्रहाचं तंत्र मोठं गमत्तीचं. गांधींच्या तंत्राचीच कार्बन कॉपी. कुठून तरी दोघां-तिघांनी रस्त्यावर यायचं. स्टेट कॉंग्रेसचा झेंडा खांद्यावर घ्यायचा. 'निजामाच्या कृपाछत्राखाली जबाबदार राज्यपद्धती झाली पाहिजे' अशा घोषणा द्यायच्या. मग कुणीतरी यायचं. त्यांना टिळा लावायचे. गळ्यात हार घालायचे. त्या दरम्यान निजामाचे पोलीस यायचे आणि सत्याग्रहीना पकडून न्यायचे. गांधीजींच्या सत्याग्रहीनाही इंग्रज पोलीसांनी हीच पद्धत अवलंबिलेली होती. निजाम तरी दुसरी कुठली पद्धत अवलंबीणार?

आर्य समाजाची चळवळ जहाल असायची. आपल्या मागण्या मंजूर व्हाव्यात यासाठी ते मोठमोठे सत्याग्रह करायचे. कलकत्ता, पंजाब, गुजराथहून त्यांचे दोनदोनशेचे सत्याग्रहीचे जथ्ये संघ यायचे. आर्यसमाजाच्या चळवळीचा भर धार्मिक मागण्यावर जास्त. धर्मवेडा निजाम या मागण्याने भलताच चिडायचा. तो मुसलमानांना फितवून आर्यसमाजी सत्याग्रहीना झोडपून काढायचा. तुरुंगात डांबायचा. छळ करायचा कारण त्याला हिंदूना धार्मिक स्वातंत्र्य द्यायचं नव्हतं. उलट हैद्राबाद संस्थान हे मुस्लीम राज्य करायचं होतं!

हिंदू महासभेच्या 'भागानगर' सत्याग्रहाची कथा मोठी मनोरंजक आहे. हिंदूमहासभावाल्याचे मत असे की हैद्राबादचे खरे नाव 'भागानगर' आहे. हैद्राबादऐवजी ते नाव रुढ व्हावे म्हणून सत्याग्रह. या मागणीची कथा अशी की, गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने त्याची हिंदू प्रेयसी 'भागाबाई' हिची आठवण चिरंतन राहावी म्हणून हैद्राबादला 'भागानगर' असं नाव पूर्वी ठेवलं होतं. भागाबाई ही मुसलमानाची प्रेयसी

असेना कां पण हिंदूबाईचं हैद्राबाद शहराला पूर्वी दिलेलं नाव पुन्हा चालू करावं, ही त्यांची मागणी. त्यासाठी त्यांचा भागानगर सत्याग्रह!

आर्यसमाज आणि हिंदूमहासभा यांच्या धार्मिक चळवळीने हैद्राबाद संस्थानात हिंदू-मुसलमानात तणावाचे वातावरण पसरले. त्यातून दोन्ही धर्मियात हाणामाऱ्या, भोसका भोसकी होऊ लागल्या. तेव्हा म. गांधीनी स्टेट कॉंग्रेसला लढा थांबवायचा आदेश दिला. लढा थांबला. तर निजाम आणि त्यांच्या निलाजऱ्या रझवीसारख्या चमच्यांनी अर्धवट शिक्षित केलेली निमलष्करी रझाकारी ही सेना उभी केली. आणि ती राज्यात धुमाकूळ घालीत फिरू लागली. पोलीस रझाकार यांचेकडून सामान्य रयतेवर जुलूम जबरदस्ती होऊ लागली. लुटालूट होऊ लागली. स्त्रियांची अब्रू घेण्याचे प्रकार प्रसंग वाढू लागले. तेव्हा लष्करी प्रशिक्षण घेऊन आलेल्या उद्धवरावांनी नरसिंगरावदादाच्या सहकार्याने पुणे, बडोदा, आणि गोवा येथून हत्यारे मिळविली आणि सोलापूर जिल्ह्यातील सरहद्दीवर तरुणांना, शेतकऱ्यांना लष्करी प्रशिक्षण देण्यासाठीच्या हालचालींना सुरुवात केली. कॅंप सुरू केले.

त्या धांदलीच्या काळातच ॲड. नरसिंगराव देशमुख आणि नरसिंगरावाचे चुलतभाऊ श्री. गणपत देशमुख यांनी उद्धवरावांचे लग्न जमवून टाकले. बंकलगी (ता. दक्षिण सोलापूर) येथील सधन शेतकरी श्री. भिमराव देशमुख यांनी कन्या कृष्णाबाई यांचेबरोबर उद्धवरावांचे लग्नही इर्ले या गावी उरकून टाकले होते. लग्न झाल्यावर उद्धवरावांनी उस्मानाबादला भाड्याचे घर घेऊन तेथे संसार थाटला आणि त्याचवेळी या रझाकारांचा सावळागोंधळ सुरू झाला. या जुलमाविरुद्ध तोंड देण्यासाठी उद्धवराव सज्ज झाले आणि कृष्णाबाई उर्फ शारदाबाईला, आपला संसार एका लढवय्या स्वातंत्र्य सेनानीशी सुरू झाल्याचं कळलं! संसाराची गोड गुलाबी स्वप्नं रंगविणाऱ्या शारदाबाईला सुरुवातीलाच अगावर शहारे आणणाऱ्या प्रसंगाला सामोरे जावे लागले.

त्याचे असे झाले. लग्न झाल्यावर उद्धवरावदादांनी उस्मानाबादला बिऱ्हाड थाटलं.एखादा आठवडा उलटला असेल नसेल तर टोळधाडीप्रमाणे रझाकार सेनेने उस्मानाबाद शहरात दाब-दडपशाही, लुटालूट करायला सुरुवात केली आणि शहारावर कब्जा केला. उस्मानाबादवर राज्य निजामाचेच. त्यामुळे निजामाचे भाडोत्री सैनिक म्हणून रझाकारांना प्रतिबंध करण्याऐवजी निजामाच्या शासनयंत्रणेने त्यांचे स्वागतच केले. उस्मानाबादेतील लोक कमालीचे घाबरून गेले. काही घरे सोडून वाट फुटेल तिकडे सैरावैरा धावू लागले. या परिस्थितीत उद्धवरावदादा घरगुती कामासाठी बाहेर पडलेले. काय घडते आहे; हे समजायच्या आत रझाकारांच्या एका टोळीने त्यांना पकडले. त्यांना धरून मुस्लीम मोहल्ल्यात आणले. रझाकार आनंदाने बेहोष होऊन बडबडत होते. “बकरा मिल गया. इसे हम काटेंगे.” त्यावर त्याही परिस्थितीत उद्धवरावदादा त्यांना म्हणाले, “तुम्ही मला मारणार आहात. ठीक आहे, पण एक गोष्ट लक्षात ठेवा. मी मरण्याआधी तुमच्यातील दोघांना घेऊनच मरेन.”

ही बाचाबाची आणि गोंधळ त्या मोहल्ल्यातील एका वयस्कर ग्रहस्थाने ऐकला. ते गृहस्थ मुळचे माणकेश्वर ( ता. परांडा) या गावचे होते. उद्धवरावदादांच्या आजोळचे ते सद्गृहस्थ होते. उद्धवरावदादा अनेक वेळा आजोळी गेलेले असल्याने तेथील सर्वांच्या परिचयाचे झाले होते. त्या मुसलमान सद्गृहस्थाने विचारले, “कौन है बकरा ? किसको पकडकर लाये?” तेव्हा रझाकारांनी पकडून आणलेल्या उद्धवरावांना त्यांच्यापुढे उभे केले. सदर सद्गृहस्थाने उद्धवरावांना पाहिले. ते ओरडलेच. “हे अल्ला, तुमने क्या किया है! अरे ये तो मेरा भांजा है! इसे छोड दो !” तेव्हा रझाकारांपासून उद्धवरावांची सहीसलामत सुटका झाली.

अनुक्रमाणिका

वेळ आली होती पण काळ आला नव्हता. माणकेश्वरचे मुसलमान सद्‌गृहस्थ तेथे नसते तर... कल्पनाच करवत नाही. शारदाबाईचे कुंकू बळकट ठरले.

रझाकारांचे अत्याचार वाढू लागले. त्यामुळे उस्मानाबाद आणि परिसरातल्या खेडोपाड्यातील लोक भिऊन घरेदारे- मालमत्ता सारे सोडून सीमेवरील इंग्रजी राज्यातील गावागावातून आपापल्या नातेवाईकाकडे आश्रयासाठी जावू लागले. परिस्थितीचे गांभिर्य आणि जनतेच्या रक्षणाची जबाबदारी लक्षात घेऊन उद्धवरावांनी प्रथम आपल्या पत्नीस-शारदाबाईस आपल्या इर्ले या गावी नेऊन ठेवले आणि स्वतः रझाकाराशी दोन हात करायला ते तयार झाले.

उद्धवरावदादांनी आपल्या कार्यकर्त्यासह ताबडतोबीने पानगाव, काजळा आणि बार्शी येथे लष्करी प्रशिक्षणाचे काम सुरू केले. त्यांना आण्णासाहेब गव्हाणे ॲड. नरसिंगरावदादा, विश्वासराव पाटील, ज्ञानोबा तात्या पाटील यांचे तर मार्गदर्शन व सक्रिय साह्य होतेच पण क्रांतिसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकारनेही आपली प्रशिक्षित-माणसे आणि हत्यारे अहमदनगर आणि पानगाव-काजळा-बार्शीच्या लष्करी कँपमध्ये साह्यार्थ पाठविली. त्यात क्रांतिसिंहाचे उजवे हात असलेल्या जीडी तथा बापूसाहेब लाड यांचा प्रमुख सहभाग होता. बापूसाहेब लाड यांच्या मार्गदर्शनाखाली उद्धवराव निजाम आणि त्यांच्या रझाकार विरोधी लढ्यात सशस्त्र होऊन लढण्यास सज्ज झाले! स्थानिक लढवय्ये साथीला घेऊन उद्धवराव रझाकारांच्या तळावर गनिमी काव्याने हल्ले करू लागले.

या लष्करी कॅपप्रमाणेच स्वामी गटही विविध ठिकाणी असेच कँप सुरू करून रझाकारांच्या हल्ल्यांना प्रतिबंध करीत होते. पण स्वामी गटांचे कँप आणि उद्धवरावदादा गटाचे कँप यात तसा मेळ नव्हता. स्वामी गटाचे कार्यकर्ते अडी ठेऊनच या दादांच्या कँपशी वागायचे. पण आपापसातील हेवेदावे, द्वेष मत्सर याकडे लक्ष देण्यास उद्धवरावांना वेळही नव्हाता. त्यांच्यापुढे रयतेचे रझाकारांच्या हल्ल्यापासून रक्षण करणे हे महत्वाचे काम होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. पण हैद्राबाद संस्थानात कुठले स्वातंत्र्य? रझाकारांचा हैदोस धुल्ला चाललेला. त्यांच्या विरोधात उद्धवराव आणि त्यांचे सहकारी सशस्त्र लढा देत होतेच. स्वातंत्र्य मिळाले त्याच दिवशी भाई उद्धवराव पाटील यांनी इर्ले ग्रामपंचायतीवर तिरंगी झेंडा फडकविला. आणि “आपण सारे आता निजामाच्या पारतंत्र्यातून मुक्त झाल्याचे, स्वतंत्र झाल्याचे” त्यांनी जाहीर केले. पोलीस ॲक्शनपूर्वी निजामी अंमलापासून मुक्त होणारे इर्ले हे मराठवाड्यातील पहिले गाव होते.

उद्धवराव गटाचा बार्शी येथे एक कँप होता. ॲड. नरसिंगराव देशमुख व ज्ञानेश्वरतात्या पाटील यांचे देखरेखीखाली उद्धवरावांचे रझाकारावर हल्ले चालू होते. या कँपमध्ये दत्तोबा भोसले हे एक रगेल आणि रांगडे व्यक्तिमत्त्वाचे गृहस्थ होते. त्यांचा कँपमधील वकील-डॉक्टर या सुशिक्षितावर भारी राग. नेहमी ते शिकलेल्या कार्यकर्त्यांना हिणवत. तिरके बोलत. वकिलापैकी ॲड. उद्धवराव पाटील हे अलिगड उस्मानिया विद्यापीठाचे हुशार पदवीधर. हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठातून वकिलीची डिग्री घेतलेले. पण वकिली न करता रझाकाराशी दोन हात करण्यासाठी उत्तेजित झालेले घरंदाज, धाडसी , अभ्यासू, उगवते नेतृत्व. म्हणून त्यांचे कँपमध्ये नेहमी कौतुकही होई. दत्तोबांना हे कौतुक आवडत नसे.

अनुक्रमाणिका

एके दिवशी कँपमध्ये अभ्यास शिबीरात चर्चा चालू होती. त्यात उद्धवराव आपले सडेतोड तर्कशुद्ध मुद्दे मांडत होते. त्यांचे बोलणे संपण्यापूर्वीच मध्येच दत्तोबा झटकन बोलून गेले, "शिकल्यासवरल्यांनी आम्हाला नुसता उपदेश करू नये. त्यांच्याकडून रझाकारांशी दोन हात होणार नाहीत. ते नेभळट आहेत. नुसते बोलके ढलपे आहेत." या उद्गाराने उद्धवरावांची अस्मिता जागृत झाली. त्यांनी हाती बंदूक घेतली. एकदोन शिकलेल्या सहकाऱ्यांना बरोबर घेतले. आणि 'सुशिक्षितांचे पाणी आम्ही दाखवतो" असे म्हणून त्यांनी तत्क्षणी शिबीर सोडले. तावातावाने ते निघाले.

त्यांना बातमी लागली होती की, पिंपरी गावाहून शेंदरी गावाकडे एक रझाकारांचा तांडा सकाळी दिवस उगवण्याचे वेळी जाणार आहे. निजामाच्या हद्दीतील खेडीगावे उध्वस्त करण्याला! उद्धवरावांनी या रझाकारी तांड्याशी सामना करायचे ठरवले. त्यांनी शेंद्री स्टेशन गाठले. सामना करण्यासाठी शेंदरी स्टेशनजवळच्या उताराची जागा निश्चित केली. ते दोघेतिघे शेंदरी स्टेशनवरच झोपून राहिले. सकाळी उठून ते रझाकारांच्या तांड्याची वाट पाहत त्या उताराला लपून बसले! बंदुकी सरसावून!

पिंपरीहून तो रझाकारांचा तांडा सकाळी शेंदरीकडे यायला निगाला. दिवस कासराभर वर आलेला होता. रझाकारी तांडा आपल्या बायकापोरांसह रायफली, भाले, बरच्या घेऊन येत होता. त्यांचेबरोबर घोडी-खेचरे लुटीची ओझी वाहत येत होती. त्यामुळे धुरळा आकाशात उडत होता. ती धूळ इतकी दाट होती की त्यात तांडा जवळ आला तरी स्पष्ट दिसत नव्हता. शेंद्रीच्या रेल्वेलाईनपासून शंभर सव्वाशे यार्डावर तो तांडा आला. उद्धवराव आणि त्यांच्या मोजक्या साथीदारांच्या रायफलीमधून धडाडाऽऽ गोळ्यांचा वर्षाव तांड्यावर होऊ लागला. दिवसा उजेडीचा हा संग्राम! त्या तांड्यात अनेक रझाकार होते. शस्त्रास्त्राने सुसज्ज होते. त्यांचे जवळ दारुगोळाही भरपूर प्रमाणात होता. इकडे गोळ्या झाडणारे इनमिन तीन. उद्धवराव आणि त्यांचे दोन साथीदार मोजक्या शस्त्रांनी लढत होते. त्यांच्या रायफलमधून सुटणाऱ्या गोळ्यांच्या वर्षावाचा वेग एवढा प्रचंड होता की, अनेक बंदुका आग ओकत असल्याचा रझाकारांना भास झाला. आता आपली धडगत नाही, असे समजून रझाकार परत पिंपरीच्या दिशेने पळू लागले. त्यांना मागे वळून पाहण्याचेही सुचले नाही. रझाकारांना माघारी पिटाळले गेले. त्यांनी पाटलांच्या वाड्यात जाऊन आश्रय घेतला. शिकलेले उद्धवराव आणि त्यांचे सहकारीही लढू शकतात. रझाकारांना पिटाळून लावू शकतात हे सिद्ध करूनच ते परत आले. दत्तोबा भोसल्यांना हा पराक्रम मान्य करावा लागला. त्यानंतर त्यांनी शिकलेल्या वकील-डॉक्टरांना घालूनपाडून बोलण्याचे सोडून दिले.

पिंपरीच्या पाटालाचा वाडा टोलेजंग. दोन मजली. अनेक खोल्यांचा. त्यात धनधान्य भरपूर. वाड्यातच आड. बाहेर यायची गरज नाही. किल्ल्यासारखा मजबूत. या वाड्यात रझाकार लपून बसल्याचे उद्धवरावांना समजले. बापूसाहेब लाड, उद्धवरावदादा, विश्वासराव पाटील यांनी काही सहकाऱ्यांनाबरोबर घेऊन वाड्याला वेढा घातला. गोळीबार केला पण काही उपयोग होईना. मात्र आतले रझाकार पार घाबरून गेलेले. दुसऱ्या दिवशी ही मंडळी बॉम्ब घेऊन गेली. बॉम्ब वाड्याच्या चौकात पडू लागले. उद्धवरावांनी वाडाच पेटवून देण्याची कल्पना मांडली. त्यांनी त्यासाठी वाड्याच्या मालकालाही तयार केले होते. पण नरसिंगरावदादांनी सांगितले, "एवढे कोणते मोठे संख्येचे रझाकार तेथे आहेत? त्यांच्यासाठी एवढा मोठा खर्च करणं काय कामाचं? " या सांगण्याने उद्धवरावांनी वाडा जाळण्याची योजना रद्द केली. पण उद्धवरावांनी त्या रझाकारांना बरेच दिवस बाहेर पडू दिले नाही. त्यामुळे त्या रझाकारांच्या संभाव्य हल्ल्यामुळे अनेक गावे आणि माणसे वाचली.

पुढे निजामाने भारत सरकारला पत्र लिहून वाड्यात अडकून पडलेल्या माणसांना सोडविण्याची विनंती केली. दोन ट्रकमधून माणसे आणण्याची परवानगी मागितली. तेव्हा निजामाच्या त्या विनंती पत्राचा भारत सरकारने सहानुभूतीने विचार केला. भारत सरकारच्या पोलीसांनी त्या वाड्यात अडकून पडलेल्या रझाकारांची झडती घेऊन बाहेर सोडले. निजामाच्या हद्दीतील परांडा गावी त्या रझाकारांना हलविले. या प्रसंगातून उद्धवरावदादांच्या धाडशी, जिद्दी आणि लढावू वृत्तीचं पुन्हा एकदा सर्वांना दर्शन झाले!

या रझाकारांच्या रणधुमाळीचा उद्धवराव आणि नरसिंगरावांच्या घराला धक्का बसला. रझाकारांनी नरसिंगरावदादांचे काटी येथील घर ताब्यात घेतले. जप्त केले आणि ते अरबांना राहायला दिले. त्यांच्या घरातील सामानही लुटून नेले. त्या घरात उद्धवराव दादांचेही सामान लुटले गेले. घर सामान गेल्याचे त्यांना दुःख नव्हते पण काटी येथे रझाकारांनी हल्ला केला. त्यात नरसिंगरावचे चुलतभाऊ आणि उद्धवरावचे साडू गणपतराव देशमुख यांना रझाकारांनी गोळ्या घालून ठार केले होते. उद्धवरावांची एवढी व्यक्तिगत आणि कौटुंबिक हानी झाली तरी त्याचा बदला घेऊन सामान्य मुसलमानांचा छळण्याचा वा मारण्याचा दुष्ट विचार त्यांनी मनातही आणला नाही. त्यांचं शत्रूत्व रझाकाराशी आणि मुख्यतः निजामाशी होतं. सर्वसामान्य गरीब मुसलमान लोकांशी  नव्हतं. त्यांची ही आदर्श वैचारिकवृत्ती विसरता न येण्यासारखी आहे.

उद्धवरावाच्या कँपच्या कर्तृत्वाचा अविस्मरणीय प्रसंगही ऐतिहासिक स्वरूपाचा ठरावा असा आहे. बार्शीच्या आसपास शेकडो निजामी खेडी विखुरलेली. त्या साऱ्या खेड्यातील लोकांना रझाकारांच्या त्रासातून मुक्त करण्याचा उद्धवरावांनी विडाच उचलला होता. त्यांनी या खेड्यातून सरकारी कर्मचारी, निजामाचे पोलीस आणि रझाकार यांना हुसकावून आणि धुडकावून लावण्यात यश मिळविले होते. हे यश त्यांनी अनोख्या पद्धतीने साजरे केले. या निजामी अधिपत्याखालील पन्नासेक गावातील लोक, तीनही कँपमधील सारे प्रशिक्षित सशस्त्र दले इर्ले या गावी एकत्र जमविली. श्री. जी. डी. उर्फ बापूसाहेब लाड यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित केली. त्यात उद्धवरावदादांनी प्रथम भाषण करून रझाकाराविरुद्ध केलेल्या यशस्वी संघर्षाची गाथा सांगितली. याच सभेत उद्धवरावांचे चुलते ज्ञानेश्वरतात्या यांनी या पन्नास गावातील निजामाची सत्ता झुगारून देऊन तेथे लोकांची प्रतिसत्ता स्थापन झाल्याचे जाहीर केले. बापू लाडांनी सर्वांच्या शौर्याचे-धैर्याचे कौतुक केले. यामुळे प्रतिसत्ता स्थापन करणारे उद्धवराव-नरसिंगराव-ज्ञानेश्वरतात्या हे सातारच्या प्रतिसरकार स्थापणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटलाचे वारसदार ठरले. एक नवे चैतन्य, नवा उत्साह आणि नवा आत्मविश्वास लोकात सळूसळू लागला. हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा नव्याने इतिहास लिहिणारांना या प्रसंगाची दखल घ्यावीच लागणार आहे!

या रझाकाराशी झुंज देताना उद्धवरावांचे योगदान लक्षणिय होतं.रझाकार व पोलीस ठाण्यावर हल्ले करणे, सारा लुटून आणणे, शत्रूवर बॉम्ब टाकणे, लोकांना एकत्र करणे, गोळीबार करणे, रझाकारांना पळवून लावणे इत्यादी धाडशी आणि धोक्याची कामे करण्यात उद्धवराव नेहमी आघाडीवर असत. हे नरसिंगरावदादांनीही अनेक प्रसंगी कबूल केले आहे.

या साऱ्या गोष्टी पोलीस ॲक्शनपूर्वीच्या होत्या. भारत स्वतंत्र झाल्यानंतर निजाम मुस्लीम राज्याच्या सार्वभौमत्वाची स्वप्नं पाहत होता. इंग्रजांची 'सार्वभौम सत्ता संपुष्टात आल्यानंतर हैद्राबाद संस्थान कोणत्याच घटना समितीत जाणार नाही व हैद्राबादला स्वतंत्र सार्वभौम राज्याचा दर्जा प्राप्त होण्याचा अधिकार आहे.' असे फर्मानही त्याने काढले होते. तर हैद्राबाद स्टेट काँग्रेस हे राज्य भारतात

अनुक्रमाणिका

विलीन झाले पाहिजे, अशा तत्त्वाचे होते. त्यासाठी संघर्ष चालूच होता. निजामाभोवती 'इत्तिहादुल मुसलमीन' चे नेते आणि काशीम रझवीसारखे अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणारे पसरले होते. विलिनकरण झाल्यास मुसलमान दंगली करतील अशी धमकी ते देत होते. काशीम रझवी तर 'बंगालच्या उपसागराच्या लाटा आमच्या सर्वसत्ताधिशांचे चरण प्रक्षालन करण्यास येतील' असे म्हणून निजामाचा अहंकार गोंजारीत होता. एवढेच नाही तर 'दिल्लीच्या लाल किल्ल्यावर आपण आसफजाही झेंडा नेऊन रोवू' अशा बेताल वल्गना तो करीत होता. त्याची रझाकार ही संघटना त्याच्या या बहकावण्याने राज्यात गोंधळ घालीत होती. त्याला स्वामी गटाचे आणि उद्धवराव गटाचे लष्करी कॅम्प्स चोख उत्तर देत होते. तरीही साऱ्यांना वाटायचे की,भारत सरकारने आक्रमण करून हैद्राबाद संस्थान पदरात पाडून घ्यावे. पण निर्णय होत नव्हता. नेहरूंना पोलीस ॲक्शन घेणे पसंत नव्हते. पण वल्लभभाई पटेलांनी मात्र पोलीस ॲक्शन घेण्याचे निश्चित केले. वल्लभभाई पटेलांनी दिनांक १३ सप्टेंबर १९४८ रोजी पहाटे पूजा केली आणि हैद्राबाद संस्थानात पोलीस ॲक्शन सुरू झाली. भारतीय फौजापुढे रझाकार टिकणे असंभवनीय होते. ते ठिकठिकाणी शरण येत होते. काही माथेफिरू रझाकारांनी कुठे कुठे मिलट्रीशी मुकाबला करण्याचा मुर्खपणा केला. त्यामुळे विनाकारक मानवी संहार झाला. दि. १७ सप्टेंबरात निजाम ४० मैलावर येऊन शरण आला. त्याने सामीलनाम्यावर सही केली व हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झालं. पुढं निजामानं केंद्र शासनाशी विचार विनिमय करून आपलं राजप्रमुख म्हणूनचे आसन टिकवलं. मात्र त्याच्याच स्वार्थी अहंकारानं आणि मुर्खपणामुळं हजारो निरपराध हिंदू व मुसलमान जनतेची वित्त व प्राणहानी झाली. हिंदू मुसलमानामध्ये पूर्वी कधी नव्हती तेवढी तेढ वाढली. याची उद्धवरावांना नेहमी खंत वाटायची.

पोलीस ॲक्शननंतर निजामाचे सैनिक शरण आल्यानंतर मराठवाड्यात मुसलमानांचा छळ होऊ लागला. रझाकारांनी केलेल्या अत्याचाराचा बदला लोक सर्वसामान्य मुसलमानांची लुटालूट आणि प्रसंगी प्राणहानी करून घेऊ लागले. रझाकाराच्या पापात खरे म्हणजे सामान्य माणसांचा मनापासून भाग नव्हताच. पण अशा वेळी हा सारासार विचार करण्याच्या मनःस्थितीत लोक नसतात. त्यांना बहकवून स्वतःचा स्वार्थ साधणारेही समाजात असतात. तेव्हा उद्धवरावांनी सर्वसामान्य गरीब मुसलमानांना संरक्षण देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. "आमचा लढा निजाम सरकार व त्यांच्या जुलमी कृती व वृत्ती विरुद्धचा लढा होता. गोरगरीब मुसलमानांशी आमची कसलीच दुश्मनी नाही." या तत्त्वाला जागून त्यांनी गरीब मुसलमानांना अभय दिले. अनेक ठिकाणी जाऊन सभा घेतल्या. मुसलमानाविरुद्ध सुडाने पेटलेल्या आणि सूड घेण्यासाठी संतप्त झालेल्या अनेकांची डोकी शांत करण्यात उद्धवरावांना यश आले.

पोलीस ॲक्शनपूर्वी निजामी राजवटीविरुद्ध झगडणारे उद्धवराव प्रसंगी कठीण वज्रासारखे झाले होते. पण पोलीस ॲक्शननंतर गोरगरीब मुसलमानांवर होणारे अन्याय अत्याचार पाहून त्यांचे मन मेणाहूनही मऊ झाले होते. उस्मानाबाद शहरातील मुस्लीम मोहल्ल्यावर हल्ला होणार हे कळताच उध्दवराव हे नरसिंगरावदादांना बरोबर घेऊन मुस्लीम मोहल्ल्यात धावून गेले. आपल्या छातीचा कोट करून ते हल्लेखोरासमोर उभे राहिले. संघर्षाच्या पवित्र्यातील मारेकऱ्यांना त्यांनी आपले तत्त्वज्ञान ऐकवले. ते म्हणाले, "आपण निजामाची अन्यायी राजवट संपवायला झुंजलो. आता त्याचेबद्दलचे शत्रूत्व संपले आहे. मग या गोरगरीब लोकांना छळण्या-मारण्यात कोणता पुरुषार्थ आहे?" हे सांगूनही चवताळलेला चिडलेला जमाव ऐकेना. तेव्हा उद्धवराव दादांनी त्या मारेकऱ्यांना ठणकावून आव्हान दिले. "तुम्हाला हल्लाच करायचा असेल तर अगोदर नरसिंगराव व माझेवर हात टाका व त्यानंतरच मुस्लीम बांधवावर हात पडतील." तेव्हा कुठे जमाव शांत झाला. आणि मुसलमानांवर येणारं आक्रित टळलं. आजही अनेक

अनुक्रमाणिका

मुस्लीम मंडळीचा कंठ त्यावेळचा प्रसंग आणि आठवणी सांगताना दाटून येतो. डोळ्यात पाणी तराळते. ही होती उद्धवरावदादांची माणुसकीवरील निष्ठा!

उद्धवरावांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामात सशस्त्र लढा दिला, ही बाब जितकी महत्त्वाची आहे. त्यापेक्षाही त्यांनी या लढ्यातून सामाजिक एकतेचा, बंधूभावाचा आणि समतेचा विचार ग्रामीण भागात रुजवण्याचा मूलगामी प्रयत्न केला ही गोष्ट फार मोलाची आहे. गोरगरीबांचा कैवार घेण्यासाठी उद्धवरावदादांच्या राजकीय कारकिर्दीचा हा दिप्तीमान शुभारंभच झाला. तोही पुढे अनेक संग्राम-संघर्ष करण्यासाठीच!

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण पाचवे**

## ॥ उद्धवरावांचे चरित्र म्हणजे महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाचे चरित्रच ॥

सन १९२० पर्यंत महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते समाजसुधारणेचे काम करीत होते. ते स्वातंत्र्य चळवळीपासून दूरच होते पण लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधीचे नेतृत्व उदयाला आले. त्यांनी आपल्या सर्वसमावेशक धोरणानुसार स्वातंत्र्याची फळे सर्वसामान्यांना मिळावीत हे जाहीर केल्याने सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते दे. भ. केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले. सन १९३७च्या निवडणूकात प्रांतोप्रांती काँग्रेसची मंत्रीमंडळे अधिकारावर आली पण त्यांची धोरणे भांडवल धार्जिणी असल्याचे कळू लागले. तरी म. गांधी आपले कल्याण करतील; आपणाला सत्तेमध्ये सामावून घेतील म्हणून ते कॉंग्रेस पक्षात राहून निष्ठेने काम करू लागले.

बेचाळीसची चळवळ म. गांधीनी 'चलेजाव' या घोषणेने केली. मुंबईतील गवालिया टँकवर भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या खुल्या अधिवेशनात गांधीजींनी 'करेंगे या मरेंगे' हा आदेश जनतेला दिला. हा लढा अंतिम स्वरूपाचा असल्याचे सांगितले. प्रत्येक हिंदी माणूस हा त्याचा त्याचा नेता असेल. काँग्रेस कोणतेही मार्गदर्शन करणार नाही. ही लढ्याची व्यूहरचना त्यांनी स्पष्ट केली. गांधीजींचा आदेश मानून जनता लढ्यात उतरली. या लढ्याची व्याप्ती आणि तीव्रता इतकी वाढली की कॉंग्रेसने त्याचा धसका घेतला. कॉंग्रेस पुढाऱ्यांनी हिंदी जनतेशी दगलबाजी करून लढा मागे घेतला. तरीही महाराष्ट्र काँग्रेसमधला डाव्या विचाराचा गट जेधे-मोरे-राऊत यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्येच कार्य करीत होता.

शेहेचाळीसच्या निवडणुका जिंकण्यास जनताभिमुख गटाने महाराष्ट्रातही काँग्रेसला निवडून आणले. खेर मुख्यमंत्री झाले. त्यांनी जेधे-मोरे-खाडिलकर या गटाला मंत्रीमंडळात डावलले. खेर मंत्रीमंडळ बहुजन समाज कल्याणाचे निर्णय घेण्याऐवजी भांडवलदारधार्जिणे धोरण राबवू लागले. तेव्हा जेधे-मोरे-राऊत यांनी काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन करून ते जनतेच्या प्रश्नाकडे मंत्रीमंडळाचे लक्ष वेधू लागले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कॉंग्रेस पक्षाचे विसर्जन करून तिचे रुपांतर 'लोकसेवा' संघात करण्याची गांधीजींची इच्छा. पण तीही काँग्रेसमधील नेत्यांनी मानली नाही. एवढेच नाहीतर स्वातंत्र्यपूर्व काळात कॉंग्रेस अंतर्गत जे राजकीय उपपक्ष वा शेतकरी कामगार संघ यासारख्या गटांना काँग्रेसबाहेर हुसकावून लावण्यासाठी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने घटनेत बदल करून भिन्न विचारसरणीच्या गटांना कॉंग्रेस पक्षात राहता येणार नसल्याचा ठराव केला. त्यामुळे बहुजन समाजातील कार्यकर्त्यांना कॉंग्रेस सोडून स्वतंत्र राजकीय पक्ष म्हणून काम करण्याचा निर्णय घ्यावा लागला. यातूनच २६ एप्रिल १९४८ रोजी श्री. भाऊसाहेब राऊत यांच्या मुंबई निवासस्थानी त्यांनी स्वतंत्र 'शेतकरी कामगार पक्षाची' स्थापना केली.

या घटना घडत असताना उद्धवराव पाटील हे हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये कार्यरत होते. निजामाच्या अन्यायी राजवटीविरुद्ध सशस्त्र लढा देत होते. तो लढा लढताना ते या घटनेबाबत सतर्क होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या संपर्कात होते. ऑल इंडिया काँग्रेससारखीच स्थिती हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्येही होती. येथेही नेतृत्वावरून दोन गट पडलेले. एक जनार्दनराव देसाईचा वकील गट आणि दुसरा स्वामी गट. स्वामी गटाला 'मास्तर गट वा गोसावी गट' या नावानेही ओळखले जाई. वकील गटाची

अनुक्रमाणिका

विचारसरणी वल्लभभाई पटेलांच्या पध्दतीची तर स्वामी गट नेहरूवादी विचाराचा! अॅड. नररसिंगराव देशमुख आणि उद्धवराव पाटील हे मार्क्स-लेनिनवादी. सत्यशोधक चळवळीचा पाया असलेले. ते या वरील दोन गटात सामावू शकले नाहीत.

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमध्ये काम करताना नरसिंगराव-उद्धवरावदादांनी कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ काढला. त्याला मान्यता देण्याचा प्रश्न निर्माण झाला. स्वामी गटाने या शेतकरी संघाला आणि त्याच्या कार्यकर्त्यांना सापत्नभावाची वागणूक देण्यास सुरुवात केली. नरसिंगराव-उद्धवरावांना त्यांनी कधीच जवळ केले नाही. वकील गटाचे रामचारी बी राम किसनराव त्यांना म्हणायचे, “देसाई गटाचे काम करा. आम्ही तुमच्या शेतकरी संघाला मान्यता देतो.” पोलीस अॅक्शननंतर प्रतापगिरजी कोटीमध्ये स्टेट कॉंग्रेसच्या बैठकीत स्वामी गटाने कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ विसर्जित करावा, असा ठराव पास केला. उद्धवरावदादांनी शेतकरी संघाची भूमिका मांडताना सांगितले की, “प्रो. रंगा यांचा जसा किसान संघ गट आहे. तसाच आमचा शेतकरी संघ राहायला काय हरकत आहे?” यावर वाटाघाटी झाल्या. पण काहीच उपयोग झाला नाही. महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाचे नेते केशवराव जेधे, शंकरराव मोरे, क्रांतिसिंह नाना पाटील, भाई जी. डी. लाड यांचेशी उद्धवरावांचा संपर्क तर होताच पण त्यांच्यात वैचारिक एकवाक्यताही होती. स्टेट कॉंग्रेसने ठराव करून कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी संघ विसर्जित केल्याने या संघाच्या कार्यकर्त्यांनी निर्णय घेण्यासाठी काटीला सन १९४९ साली बैठक बोलावली. या बैठकीस सर्वश्री अॅड. नरसिंगराव देशमुख, उद्धवराव पाटील, भाऊसाहेब भोकरदनकर, ज्ञानोबातात्या पाटील, आण्णासाहेब गव्हाणे, खुशालराव मोताळे, अंकुशराव घारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत श्री. उद्धवराव पाटील यांनी आक्रमक पवित्रा घेतला.‘कॉंग्रेस पक्षात राहून शेतकरी , कामकरी शेतमजूर आणि दलितांचे प्रश्न सोडविता येणार नाहीत. त्यासाठी स्वतंत्र शेतकरी कामगार पक्षाची मराठवाड्यात स्थापना केली पाहिजे. आणि हा मराठवाड्यातील शेतकरी कामगार पक्ष मुंबई राज्यात स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षात सामील केला पाहिजे.’ हा उद्धवरावांचा आग्रह सर्वांनी मान्य केला आणि मराठवाड्यात शेतकरी कामगार पाक्षाची स्थापना करण्याचा ठराव झाला. त्याच साली बार्शी येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जंगी जाहीर सभेत टाळ्यांच्या कडकडाडात व जयघोषात हा निर्णय कायम झाला. त्या क्षणापासून मराठवाड्यात खऱ्या अर्थाने शेतकरी कामगार पक्षाच्या कामास सुरुवात झाली. आणि भाई उद्धवराव पाटील यांचेवर मराठवाड्यातील या पक्षाची बांधणी आणि प्रसाराची जबाबदारी येऊन पडली.

मुंबई राज्यात जेधे-मोरे-जाधव-क्रांतिसिंह यांच्या ठिकठिकाणी मोठमोठ्या सभा होऊ लागल्या. कॉंग्रेसच्या भांडवलदारधार्जिण्या धोरणाचा निषेध होऊ लागाला. शे. का. पक्षाला प्रचंड साथ मिळू लागली. त्याच पद्धतीने मराठवाड्यात भाई उद्धवराव पाटील यांच्या झंझावती दौऱ्यातून शे.का.पक्षाच्या ध्येयधोरणाचे, शेतकरी-कामगारांच्या हिताचे ‘बळीचे राज्य’ आणण्याचे तत्त्वज्ञान लोकांना पटू लागले. जनतेत एवढी जागृती झाली की जुन्या उस्मानाबाद जिल्ह्यातील  उस्मानाबाद, तुळजापूर, कळंब, औसा, उमरगा, अहमदपूर, परांडा, भूम, निलंगा तालुक्यात आणि परभणी जिल्ह्यात शे. का. पक्षाने आपले पाय रोवले. मराठवाड्यात शे. का. पक्षाचा प्रसार करण्यात उद्धवरावदादांचा फार मोठा वाटा आहे.

शेतकरी-कामगार पक्ष वाढवायचा म्हणजे कार्यकर्ते तयार करायचे. ते कार्यकर्ते ‘जय’ म्हणणारे असे उद्धवरावांना नको होते. कार्यकर्त्यांना शे. का. पक्षाचे तत्त्वज्ञान आणि पक्षाची धोरणे चांगली समजली

पाहिजेत. यावर त्यांचा जोर होता. त्यासाठी त्यांनी अनेक अभ्यास शिबिरे घेतली. उस्मानाबाद येथील जुन्या गल्लीतील तनपुरे मठातील अभ्यास शिबीर तर विशेष गाजले. हे शिबीर पंधरा दिवसाचे होते. त्यात काजळा कँपातील दोनशे कार्यकर्ते सहभागी झाले होते. इतर ठिकाणाहून आलेले कार्यकर्ते तर वेगळेच. या अभ्यास शिबीरात मार्गदर्शन करणारी जुनी नेते मंडळी ऐनवेळी काही अडचणीमुळे येऊ शकली नाहीत. तेव्हा नरसिंगराव दादांनी उद्धवरावांच्यावर ही जबाबदारी टाकली. उद्धवराव दादांनी कम्युनिझमवरची काही इंग्रजी-मराठी पुस्तके मिळवली. दुसरे दिवशी शिबीरार्थींना सांगायच्या विषयाचा रात्री प्राध्यापकाप्रमाणे अभ्यास करायचा, नोटस् काढायच्या आणि दिवसभर शिबीरार्थीपुढे व्याख्याने द्यायची. अशा तऱ्हेने उद्धवदादांनी हे शिबीर यशस्वी केले.

या शिबीरात उद्धवराव दादांनी शे. का. पक्षाची तात्त्विक बैठक, मार्क्स-लेनिनवादाची गरज, शे. का. पक्षाची ध्येय धोरणे कशी राबवावीत, इत्यादी बाबींवर आपल्या भाषणातून सुरेख विवेचन केले. नरसिंगरावदादा म्हणत, “कोणत्याही प्रश्नावर वैचारिक मार्गदर्शन मी करायचो तर त्या विचारांना योग्य दिशेने नेण्याचे, त्यांना तात्विक बैठक देण्याचे काम प्रत्येक वेळी उद्धवरावादादांनी केले,” या अभ्यास शिबीरात प्रशिक्षित झालेल्या एकही कार्यकर्ता पुढे पक्ष सोडून गेला नाही. इतका भाई उद्धवरावांच्या राजकीय विचारांचा पगडा त्यांच्यावर पडला होता.

या प्रारंभीच्या काळापासून भाई उद्धवराव पाटील यांनी स्वतःच्या संसाराकडे दुर्लक्ष करून शे. का. पक्षाचा संसार उभा करण्यासाठी झोकून दिले होते. त्यांचे त्यासाठी अहोरात्र दौरे चालत असत. निवडणुकीच्या काळात तर त्यांच्या पायाला भिंगरी बाधलेली असे. रात्रीची पुरेशी झोपही त्यांना मिळत नसे. राजकारणात एक प्रकारचा कर्मयोगच ते आचरीत असत.

या कर्मयोग्याच्या कमरेला मळखाऊ धोतर, अंगात पांढरा किंवा मातकट रंगाचा नेहरू सदरा, डोक्यावर लाल अथवा बदामी रंगाची टोपी. ती टोपीही बऱ्याच वेळा डोक्यावर नसे. त्यावेळी डोके उघडे. केस मागे फिरवलेले. पानाच्या विड्याने तोंड रंगलेले. खांद्यावर तीन चांदण्या आणि कोयत्याचा लालबावटा. पायात उस्मानाबादी वहाणा. हा वेष म्हणजे उद्धवरावांच्या अंगावरील आभुषणे. असा हा गरीबांचा कैवारी, समतेचा यात्रेकरू वारकऱ्यांच्या निष्ठेने काट्याकुट्यांचा, खाचखळग्यांचा, उन्हातान्हाचा आणि अंधाऱ्या रात्रीअपरात्रीचा रस्ता आत्मविश्वासाने अखंड तुडवित चालायचा. लाल वाट रुळवित चालतच राहायचा.

शेतकरी कामगार पक्षाला सुरुवातीच्या काळापासून ग्रामीण भागात भरघोस पाठिंबा मिळू लागला. तेव्हा सन १९५० मध्ये शेतकरी कामगार पक्षाचे अधिवेशन दाभाडी येथे भरले. या अधिवेशनात कार्यकर्त्यांनी खूप चर्चा केली. या पक्षाच्या वैचारिक भूमिकेचे जे मथंन झाले. त्या मंथनातून मार्क्सवाद-लेनिनवादाचे लोणी निघाले. ते दाभाडी प्रबंधाच्या रुपाने बाहेर पडले. हा दाभाडी प्रबंध खूप गाजला. शे.का. पक्षाचा तो एक ऐतिहासिक दस्तऐवज बनला.

स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने वर्ग समन्वयाचं धोरण स्वीकारलं होतं. ब्रिटिशांना हाकलून देण्यासाठी ते धोरण त्या काळात योग्यही होतं. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही वर्ग समन्वयाचे तेच धोरण काँग्रेसने चालू ठेवणे म्हणजे शोषित, श्रमजीवी वर्गाशी केलेली गद्दारीच म्हणावी लागेल. स्वातंत्र्य चळवळीत शेतकरी, कामगार, शेतमजूर, आणि दलित वर्गांनी त्यांच्या वर्गशत्रूबरोबर सहकार्य केले ते

केवळ स्वातंत्र्य पदरात पाडून घेण्यासाठीच! स्वातंत्र्योत्तर काळात कारखानदार विरुद्ध कामगार; जमिनदार विरुद्ध गरीब शेतकरी शेतमजूर अशा वर्गीय भूमिका स्वीकारून त्यांचे वर्गीय लढे उभे करण्याकडे कॉंग्रेसने पूर्ण दुर्लक्ष केले. ही बाब शेतकरी कामगार पक्षाला पटणे अशक्य होते. यातूनच दाभाडी प्रबंधाचा जन्म झाला. शे. का. पक्षाने कामगारांच्या आणि शेतकरी-शेतमजुरांच्या कल्याणासाठी वर्गलढे लढविण्याची भूमिका घेतली.

शेतकरी कामगार पक्षाने ही भूमिका आंधळेपणाने स्वीकारली नाही. मार्क्स-लेनिनवादाशी भारतीय संस्कृतीमधील म. फुले-राजर्षी शाहू-डॉ. आंबेडकर यांचा विचाराचा धागा जोडला. ही दाभाडी प्रबंधाची भूमिका स्वीकरण्यापूर्वी पक्षाच्या विविध पातळ्यावर कार्यकर्त्यात वैचारिक मंथन झाले होते. या वैचारिक मंथनात भाई उद्धवराव पाटील यांचे योगदान फार मोलाचे होते. दाभाडी प्रबंधाचे जनक, शे.का. पक्षाचे संस्थापक सदस्य आणि पक्षाचे पहिले सरचिटणीस भाई शंकरराव मोरे यांनी हा प्रबंध लिहिला. पण या प्रबंधाच्या निर्मितीविषयी ते म्हणत, "प्रबंधाची  राजकीय मांडणी ही पक्षकार्यकर्त्यांच्या विचारमंथनातून झालेली असून त्यावर मी भाषेचा पारा चढविण्याचे काम केलेले आहे." या दाभाडी प्रबंधाचा प्रक्रियेत भाई उद्धवराव पाटील आणि भाई दाजीबा देसाई यांनी खूप कष्ट उपसले. यातूनच त्यांची जीवलग मैत्री जमली. म्हणूनच दाभाडी प्रबंधाच्या प्रक्रियेत या दोन्ही मित्रांचा सिंहाचा वाटा असल्याचे मानले जाते.

या देशात १९२५ पासून हिंदी कम्युनिस्ट पक्षाने साम्यवादी चळवळीत काम केलेले असूनही शे. का. पक्षाने सन १९५० मध्ये स्वीकारलेल्या या दाभाडी प्रबंधाला आणि शे.का. पक्षाला साम्यवादी चळवळीत महत्त्वाचे स्थान लाभले आहे. असे का व्हावे, याला हिंदी कम्युनिस्ट पक्षाची धोरणेच कारणीभूत आहेत. सन १९३० आणि १९४२ साली कम्युनिस्ट पक्ष स्वातंत्र्य चळवळीपासून फटकून राहिला. एवढेच नाही तर स्वातंत्र्याच्या लढ्याला त्यांनी विरोधही केला. या त्यांच्या अराष्ट्रीय धोरणामुळे तो पक्ष कामगारांच्या आणि ग्रामीण भागातील लोकांच्या मनातून उतरून गेला होता. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीच्या सूत्राकडून ज्या त्या देशाच्या स्वराज्याच्या चळवळीत रशियाला धोका आहे, म्हणून लोकयुद्ध पुकारा आणि ब्रिटिशाला साह्य करा. अशी भारतीय कम्युनिस्ट पक्षानं भूमिका घेतली. त्यामुळे त्यांची चळवळ आणि ट्रेड युनियन देशातील शेतकऱ्यात बदनाम झाली होती. म्हणून स्वराज्याच्या चळवळीचा वारसा सांगणाऱ्या, शेतकऱ्यातून, श्रमजिवीवर्गातून आलेल्या कार्यकर्त्यांना स्वतंत्र विचाराच्या शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्याची गरज भासली. शे. का. पक्षाच्या नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीत जीवाची बाजी लावून इंग्रजाविरुद्ध लढा दिला होता. तश्या लढ्यात भाग घेण्यास ग्रामीण जनतेला पटवून दिले होते. म्हणून त्यांना शे. का. पक्ष आपला वाटत होता. शे. का. पक्षाच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वराज्याच्या चळवळीमुळं, त्यांच्या त्यागामुळं खेड्यापाड्यातील जनमानसात त्यांना प्रतिष्ठा होती. म्हणून हा लाल झेंडा आपल्या तत्त्वज्ञानानं शे. का. पक्ष तळागाळातलं भक्कम अधिष्ठान मिळवू शकला. म्हणूनच शे. का. पक्षाच्या नेत्यांची मते डाव्या पक्षाकडे झुकणारी असली तरी हा पक्ष कम्युनिस्ट पक्षात विलीन झाला नाही. पण कम्युनिस्ट पक्षांशी आणि लोकशाही समाजवाद मानणाऱ्या इतर पक्षाशी आघाडी करण्यात शे. का. पक्ष नेहमीच तयार असतो.

शेतकरी कामगार पक्ष महाराष्ट्रात चांगलाच फोफावू लागला होता. महाराष्ट्रात कॉंग्रेसला पर्यायी पक्ष होण्याच्या दिशेने त्याची घोडदौड चालू होती. ही शक्ती जर  अभंग राहिली असती तर महाराष्ट्राच्या राजकारणात शे. का. पक्ष हा सत्ताधारी पक्ष बनला असता. त्याला जणू दृष्ट लागल्यासारखे झाले. सन १९५० ते १९५६ या काळात शे. का. पक्षात अंतर्गत कुरबुरी सुरू झाल्या. भाई शंकरराव मोरे आणि श्री दत्ता

अनुक्रमाणिका

देशमुख यांच्यात पक्षीय धोरणाबाबत मतभेद होऊ लागले. अशा स्थितीत वाठार (ता. कराड) येथील शेतकरी कामगार पक्षाच्या तिसऱ्या अधिवेशनात हे मतभेद तीव्र झाले. त्यांच्यात समेट घडवून आणण्यासाठी भाई उद्धवराव आदी नेत्यांनी केलेले प्रयत्न फोल ठरले. श्री. शंकरराव मोरे आणि श्री दत्ता देशमुख यांचे गट निर्माण झाले. शे. का. पक्ष दुभंगला. पुढे श्री. दत्ता देशमुखांनी 'लाल निशाण' गटाची स्थापना केली. हा 'लाल निशाण' गट श्री. एस्. के लिमये यांच्या 'नवजीवन' संघटनेत विलीन झाला. पुढे निवडणुकीच्या तोंडावर श्री. दत्ता देशमुखांनी नोव्हेंबर १९५१ मध्ये नवीन 'कामगार किसान' पक्षाची स्थापना करून बावन्नच्या निवडणुका लढविल्या. पुढे शे. का. पक्षाचे संस्थापक सदस्य श्री जेधे-मोरे-जाधव कॉंग्रेसमध्ये गेले. शे. का. पक्ष अधिकच दुर्बल झाला. त्याचे अस्तित्व राहते की नाही असा संभ्रम निर्माण होण्यासारखी परिस्थिती झाली. पण शे. का. पक्षाचे निष्ठावंत पाईक सर्वश्री  र. बा. राऊत, नरसिंगराव देशमुख, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, कृष्णराव धुळप, विठ्ठलराव हांडे, एन्. डी पाटील, जी. डी लाड, भगवानराव पाटील, भगवानराव सुर्यवंशी, भाऊसाहेब राऊत, आण्णासाहेब गव्हाणे आदीनी पक्षावर अन्यभिचारी निष्ठ ठेऊन शे. का. पक्षाचा लालबावटा फडकत ठेवला.

श्री. यशवंतराव चव्हाण यांना आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मानले होते. क्रांतिसिंहानी निर्माण केलेल्या प्रतिसरकारमध्ये प्रथमतः काही दिवस त्यांनी डिक्टेटर म्हणून काम केले होते. कॉंग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघातील नेत्याशी त्यांची जवळीक होती. त्यामुळे शे.का.पक्षाच्या प्रमुख नेत्याशी त्यांचे संबंध सलोख्याचे होते. कॉंग्रेसमध्ये ते बेरजेचे राजकारण करणारे होते. त्यांच्या मते 'बहुजन समाजातील चारित्र्यसंपन्न, अभ्यासू आणि कार्यक्षम नेत्यांनी कॉंग्रेसमध्ये येऊन सत्तेत सहभागी व्हावे आणि सत्ता बहुजन समाजाच्या कल्याणासाठी राबवावी.' या हेतूने त्यांनी शे. का. पक्षातील अनेक कार्यकर्त्यांना हस्तेपरहस्ते निरोप पाठवून गळ घालण्याचा प्रयत्न केले. रेठऱ्याचे कार्लमार्क्स म्हणून मानले गेलेल्या श्री. यशवंतराव मोहित्यांचे मन वळविण्यातही ते यशस्वी झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील भाई उद्धवरावांचे कार्य, त्यांचे धवल चरित्र्य आणि गोरगरीबाविषयीची त्यांची कळकळ या गोष्टी यशवंतरावाना माहित होत्या. म्हणून श्री नरसिंगरावजी देशमुख आणि भाई उद्धवरावजी पाटील यांना मंत्री कदाचित मुख्यमंत्री पदाची प्रलोभने दाखविली गेली पण दोघांनीही सत्तेचा मोह नाकारून आपली शे. का. पक्षावरील अविचल आणि अव्यभिचारी निष्ठा अभंग राखली आणि शे. का. पक्षाचे अस्तित्व सावरून धरले आणि पक्ष वाढविण्याचा सतत प्रयत्न केला. हल्लीच्या काळातील सत्तेसाठी चालणाऱ्या लटपटी, धडपडी पाहिल्यानंतर नरसिंगराव आणि उद्धवरावांनी सत्ता नाकारली हे उदाहरण आदर्शवत असल्याचे मानावे लागेल.

शे.का. पक्ष स्थापन करणारी, शे. का. पक्षात वाढलेली मोठी माणसे पक्ष सोडून कॉंग्रेसमध्ये गेली याबाबत श्री. नरसिंगराव देशमुखांना प्रश्न केला असता, ते म्हणाले होते. "पक्ष सोडणारी मंडळी कोणती? केशवराव जेधे-मोरे तुळशीदास जाधव-खाडीलकर ही मंडळी कॉंग्रेसमध्ये स्थान मिळाले नाही म्हणून केवळ शे. का. पक्षात आलेली होती. आम्ही तसे नव्हतो. आमची वैचारिक बैठक पक्की होती. त्यामुळे प्रलोभनाला बळी पडून पक्ष सोडण्याचा विचारही आमच्या कोणाच्या मनात येणे कदापीही शक्य नव्हते." नरसिंगरावदादा प्रमाणेच भाई उद्धवरावदादांनी सत्तेसाठी कधीच राजकारण केले नाही. सत्यासाठी, तत्त्वासाठी आणि प्रामुख्याने तळागळातल्या लोकांच्या भल्यासाठीच राजकारण केले. आपल्या तत्त्वाशी त्यांनी तडजोड कधीच केली नाही. त्यांची पहिली आणि शेवटची निष्ठा गोरगरीबांचा कैवार घेण्याशी, त्यांचे कल्याण करण्याशी होती. त्यासाठी सत्तेकडे त्यांनी कधी पाहिले नाही.सत्ता त्यांच्याकडे चालत आली तरी ती आपल्या पक्षाची नाही म्हणून तिच्याकडे त्यांनी पाठच फिरविली. त्यामुळे जीवनात त्यांना खूप हालअपेष्टांनाना तोंड द्यावे लागले. तरीही ते आपल्या तत्त्वापासून तीळमात्र बाजूला सरकले नाहीत.

सत्तेपेक्षा लोकसेवा त्यांनी महत्त्वाची मानली. त्यासाठी त्यांनी जीवनभर निष्काम आणि निरीच्छवृत्तीने राजकारण केले. काही तरुण कार्यकर्ते सत्तेच्या मोहाने आकर्षित होत असल्याचे पाहून त्यांना आश्चर्य वाटे. ते म्हणत "सत्तेसाठी आपले जीवन नाही. आपण संघर्षात जगायचे!" हे तत्व त्यांनी मनीमानसी जपले होते. 'तुफानोंसे टकराता है उसे इन्सान कहते है।' असे ते नेहमी म्हणत असत.

सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रतिसरकार स्थापन करून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले होते. त्याचवेळी समाजातील शेतकरी, शेतमजूर आणि दलित वर्गांना पिळणाऱ्या आणि पिडणाऱ्या जमीनदार सावकारशाहीला, अंधश्रद्धेचे भांडवल वापरून भोळ्या जनतेला भुलवून फसविणाऱ्या भटभिक्षूकशाहीला शह दिला. तसेच समाजाला नाडणाऱ्या सरकारी नोकरशाहीला; गुंडगिरीची दहशत बसवून लुटणाऱ्या गुंडपुंडाना वठणीवर आणले होते. हाच क्रांतिसिहाचा आदर्श नरसिंगराव-उद्धवराव दादांच्या पुढे उभा होता, हा आदर्श वास्तवात आणण्यासाठी या दोघांची मराठवाड्यात जमीनदार-सावकारशाही विरुद्धची चळवळ यशस्वी करून दाखविली. सन १९४८-५२ च्या काळात सरकार शेतकऱ्याकडून सक्तीने धान्य वसूल करायचे. ते करीत असतांना त्यांच्या शेतीमालाला योग्य भाव देत नसायचे. उद्धवराव पाटील यांनी शेतकऱ्यावरील होणाऱ्या या अन्यायाला तोंड फोडले. त्यांनी लेव्ही पद्धतीविरुद्ध चळवळ केली. जमिनदारी नष्ट करून नव्याने जमीन वाटप करण्याची सतत आग्रही भूमिका घेतली. 'कसेल त्याची जमीन' ही घोषणा घेऊन शेतात घाम गाळणाऱ्यां दलित शेतमजूरांना शेतकऱ्याचा दर्जा बहाल करण्याचा प्रयत्न केला. शेतीमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी पहिल्यापासून आटापिटा केला. लिलाव पद्धतीचे दलाल शेतकऱ्यांच्या शेतीमालाचा भाव ठरवितात. ते करताना शेतकऱ्यांच्या मालाची नासाडी तर करतातच पण हे दलाल आणि व्यापारी संगनमताने शेतीमाल कमी भावात खरेदी करतात आणि नंतर तोच माल चढ्या भावाने विकून धनाढ्य बनतात. ही दलालीची पद्धत बंद व्हावी, यासाठी शे.का. पक्षाच्या माध्यमातून उद्धवरावांनी चळवळ केली. शेती मालाच्या योग्य किंमती शासनाने बांधून द्याव्यात यासाठी उद्धवरावांनी विधानसभेत आणि बाहेरही सतत आग्रह धरला. एकाधिकार कापूस योजना हे त्याचेच यश म्हणावे लागेल.

शेतीमालाला त्याच्या उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नसल्याने शेतावर राबणाऱ्या शेतमजुरांनाही शेतकरी योग्य मजुरी देऊ शकत नाही. हे दुष्टचक्र कायमचे थांबावे म्हणून उद्धवरावानी शेती व्यवसायाला उद्योगधंद्याचा दर्जा द्यावा; उद्योगधंद्याला ज्याप्रमाणे शासन प्राधान्य देते, भांडवल देते आणि सबसिडीच्या स्वरूपात अनेक सवलती देते तसेच उद्योगधंदा तोट्यात गेला तर त्यासाठीही अनुदान देते त्याप्रमाणे शेती उद्योगालाही या सर्व सोयी सवलती द्याव्यात, हा उद्धवरावांनी आपल्या मृत्यूपर्यंत आग्रह धरला होता.

भाई उद्धवराव पाटील हे इर्ले या खेडेगावातील शेतकरी कुटूंबातून वर आलेले स्वयंभू व्यक्तिमत्व होते. त्यांच्या नेतृत्व गुणांची, लढवय्या वृत्तीची आणि जहाल वक्तृत्वाची चुणूक सर्वांनाच हैद्राबाद मुक्तीसंग्रामात रझाकाराविरुद्ध लढतानाच आली होती. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा त्यांचा परिचय पक्का. ते प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी शे.का. पक्षाचं माध्यम वापरलं. सुरुवातीला त्यांचे कार्यक्षेत्र उस्मानाबाद जिल्हा हे होतं. उद्धवराव दादा हे उस्मानाबाद जिल्ह्याचे खंदे विरोधी पक्ष नेते म्हणून ओळखले जात. सत्ताधारी काँग्रेस पक्षाला बरेच दिवस त्यांचे विरुद्ध या मतदार संघात आपला उमेदवार निवडून आणता आला नाही. ही एकच गोष्ट उद्धवरावांनी उस्मानाबाद जिल्ह्यात शे.का.पक्षाची पाळेमुळे किती खोल आणि घट्ट रोवली होती, याचे जिवंत उदाहरण होय. ते कार्यप्रिय होते. प्रसिद्धी पराङमुख राहून काम करण्यात त्यांना धन्यता

वाटे. स्वकर्तृत्वाने वर आलेल्या भाई उद्धवरावासारख्या गरीबांच्या कैवारी असलेल्या नेत्याला ना शिक्षणाचा वारसा ना राजकारणाची पुर्वपुण्याई! त्यामुळे त्यांना पांढरपेशी पंडितांनी आणि पोपटपंची करणाऱ्या पत्रकारांनी काही दिवस तर अनुल्लेखानेच मारले. तरीही उद्धवरावाचं नेतृत्व फुलतयं हे पाहिल्यावर ते उद्धवरावांना उस्मानाबादचे पुढारी म्हणून लागले. ५२ साली ते हैद्राबाद असेंब्लीत निवडून गेले. आमदार झाले तेव्हा त्यांना ते मराठवाड्याचे पुढारी म्हणू लागले. त्यांनी उद्धवरावांचं कार्यकर्तृत्व संकुचित करण्याचा प्रयत्न केला. तरी देवीचा पोत बळेच खाली केला तरी 'ज्वाला वरती उफाळे' याप्रमाणे उद्धवरावाचं नेतृत्व वरचेवर उफाळून येऊ लागले. सन १९५६ च्या निवडणुकीत उद्धवरावांनी उस्मानाबाद मतदार संघातून शे.का.पक्षातर्फे विधानसभेची निवडणूक लढविली. मंत्री असलेल्या फुलचंद गांधीचा त्यांनी पराभव केला. मंत्र्याला पराभूत करणारे आमदार म्हणून त्यांचा महाराष्ट्रभर बोलबाला झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जी प्रचाराची रणधुमाळी माजली. त्यात भाई उद्धवरावांचा वाटा क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यापेक्षा कमी नव्हता. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न खेडोपाड्यात, दऱ्याखोऱ्यात-वाडीवस्तीवर राहणाऱ्या माणसामाणसांपर्यंत पोहचविण्यात भाई उद्धवराव कमालीचे यशस्वी झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रगण्य नेते एस्.एम.जोशी, भाई डांगे आणि आचार्य अत्रे यांच्यात भाई उद्धवरावांची गणना होऊ लागली. महाराष्ट्राचे नेते म्हणून त्यांना मान्यता देण्याशिवाय गत्यंतर नव्हते. उद्धवरावांच्या कर्तृत्वाला महाराष्ट्र ही मर्यादाही अपुरी पडू लागली.

उद्धवराव दादांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीबरोबरच गोवामुक्ती संग्रामातही जागृती केली. आपल्या कार्यकर्त्यासह त्यात ते सहभागी झाले. पुढे १९६० साली मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळाला पण बेळगांव, कारवार, निपाणी, खानापूर, बिदर भालकी, संतपूरसह संपूर्ण महाराष्ट्र झालाच पाहिजे या ध्येयाने धूंद होऊन संपूर्ण संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष झालेल्या भाई उद्धवराव पाटील यांनी ह्या प्रश्नाच्या चळवळीने सीमावासियांच्या हृदयसिंहासनावर आपले आसन सुस्थिर केले. आणि त्याचवेळेस दिल्लीला धडक मोर्चा नेऊन केंद्र शासनाच्या उरात धडकी भरविण्याचा पराक्रम केला. या चळवळीने भाई उद्धवराव पाटील यांचे नेतृत्व महाराष्ट्राला व्यापून उरलेले आणि नवी दिल्लीला धडक देणारे ठरले आहे.

उद्धवराव हे कुणाला ईर्ल्यागावचे म्हणजे परांडा तालुक्याचे वाटतात. उद्धवरावांचे घर आणि कर्मभूमी उस्मानाबादची असल्याने काहींना ते उस्मानाबाद जिल्ह्याचे भासतात. तर शे.का. पक्षातील त्यांच्या विधानसभेतील कार्यामुळे विधानसभेत विरोधी पक्ष नेते झाल्याने ते अखिल महाराष्ट्राचे असल्याचे कुणाला वाटले तर नवल नाही. ते दोनदा नवी दिल्लीला जाऊन खासदार झाल्याने त्यांच्या भक्तांना ते राष्ट्रीय पातळीवरचे नेतृत्व असल्याचा अभिमानही वाटतो. आणि त्यांच्या मार्क्सवादी विचारसरणीमुळे ते देशाचे आणि साऱ्या जगाचे देखील होते. असेही कुणाला वाटले तर अतिशयोक्ती ठरू नये इतकं व्यापक मनाचं उद्धवरावांचं नेतृत्व होतं.

सन १९७२ च्या दुष्काळात महाराष्ट्रात 'मागेल त्याला काम द्या. कामाचा योग्य दाम द्या. जगण्यापुरतं रेशन-दुकानातलं धान्य द्या. जनावरांना चारा द्या.कर्जवसुली स्थगित ठेवा. गरीब शेतकऱ्यांचा सारा माफ करा.' या मागण्या घेऊन शे.का. पक्षानं महाराष्ट्रभर चळवळ उभी केली. त्याला मार्गदर्शन उद्धवरावांचं! नियोजन उद्धवरावांचं! सरकारी गोदामातील धान्याचे दुष्काळग्रस्तांना वाटप करावे ही मागणी घेऊन ठिकठिकाणी मोर्चे निघाले. बार्शीलगतच्या वैरागला धान्य गोदामावर निघालेल्या मोर्चावर दि.६सप्टेंबर १९७१ रोजी धान्य देण्याऐवजी गोळ्या घातल्या. त्यात सात पुरुष आणि एक स्त्री असे आठ हुतात्मे झाले. तीच बाब इस्मालापूरच्या गोळीबारात घडली. त्यात दोन हुतात्मे झाले. उद्धवरावांच्या

नेतृत्वाखाली उस्मानाबादला 'काम द्या' मागणीसाठी पंधरा हजार शेतकरी-शेतमजुरांचा मोर्चा निघाला. त्यावेळी तेथे आलेल्या पुरवठा मंत्री भाऊसाहेब वर्तक यांची गाडी मोर्चेकरांनी अडवली. पोलीसांनी अश्रूधूर सोडला. लाठीमार केला. या प्रश्नाची तड लावण्यासाठी उद्धवरावदादांनी विधीमंडळात मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना रोजगार हमी योजना करायला भाग पाडले. म्हणूनच त्याचा कायदा करणारं देशातील महाराष्ट्र सरकार हे पहिलं आहे!

शे.का. पक्ष हा भांडवलदारी अर्थकारणाच्या विरोधात ठाम भूमिका घेऊन उभा आहे. भाई उद्धवरावांनी शे.का. पक्षाच्या माध्यमातून खाजगीकरणाला सतत विरोधच केला आहे. हल्लीच्या खाजगीकरण-उदारीकरण आणि जागतिकीकरणातील खुल्या बाजार व्यवस्थेलाही कठोर विरोध केला आहे. त्यांच्या शिकवणूकीचा वसा घेऊन राजकारणात काम करणारे शे.का. पक्षाचे सरचिटणीस प्रा.एन्.डी. पाटील यांचा एन्.रॉन विरोधी पवित्रा जगजाहीर आहे. बहुराष्ट्र कंपन्यांना आपले पाय भारतात पसरू द्यायला हल्लीचं केंद्र शासन मोकळं रान सोडू इच्छित आहे. पूर्वीची ब्रिटिशांची गुलामगिरी काही अंशी लोकांना सुसह्य वाटायची पण हल्लीच्या बहुराष्ट्रीय कंपन्यानी निर्माण केलेली आर्थिक गुलामगिरी महाभयानक असून त्यामुळे देशच मोडीत निघेल की काय अशी भिती वाटू लागली आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधातही शे.का. पक्षानं चळवळीच्या माध्यमातून लोकजागरण सुरू ठेवलं आहे. त्यातही उद्धवराव सतत आघाडीवर राहिले.

२१ जानेवारी १९८३ रोजी अलिबाग येथे शे.का. पक्षाचे बारावे अधिवेशन मा. भाई उद्धवराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्यावेळी भाई उद्धवरावांना कॅन्सरसारख्या रोगाने पुरते घेरले होते. तशाही स्थितीत भाई उद्धवरावजी अधिवेशनाला उपस्थित राहिले. त्यांनी कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. एवढेच नाही तर अधिवेशनात जो ठराव केला. शे.का. पक्षाचा चोवीस कलमी कार्यक्रम तयार केला त्यात भाई उद्धवरावांचे मार्गदर्शन आणि योगदान महत्त्वाचे होते.

या अधिवेशनात जो ठराव संमत करण्यात आला. त्यात समाजाच्या मूलभूत परिवर्तनाची वाट स्पष्ट दाखविली आहे. शे.का. पक्षाच्या इतिहासातील हे अधिवेशन म्हणजे महत्त्वाचा मैलाचा दगड मानला जातो. हा संमत झालेला कार्यक्रम म्हणजे कार्यकर्त्यांना दिशा दाखवणारा दीपस्तंभच म्हणावा लागेल. त्या कार्यक्रमाकडे नुसती नजर टाकली तरी याची कोणालाही कल्पना येईल. कार्यक्रमातील काही कलमे कॉ. चंद्रगुप्त चौधरी यांनी आपल्या 'शेतकरी कामगार पक्षाच्या संदर्भात समविचारी डाव्या पक्षांची भूमिका' या 'संघर्ष' गौरविकेत प्रसिद्ध झालेल्या लेखात दिली आहेत. ती अशी."बहुराष्ट्रीय कंपन्या व बड्या आणि मक्तेदार कंपन्यांचे, उद्योगांचे, व्यवसायांचे, आयात निर्यात व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करणे....

"औद्योगिक व शेती उत्पादन यांच्या किंमतीत समतोल करणे व त्यासाठी घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण करणे....."

"जमीन मालकीसंबंध कायद्यात मूलभूत सुधारणा करून कसेल त्याची जमीन हे सूत्र प्रत्यक्षात अमलात आणणे व गैरहजर मालकांचे मोठ्या जमिनी ताब्यात ठेवणाऱ्या जमीन मालकाचे उच्चाटन करून ह्या जमिनी भूमिहीन व अल्पभूधारक शेतकऱ्यांना वाटून देणे...."

"अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, औषधे या किमान गरजांच्या आधारावर ग्रामीण जीवनखर्चाचा निर्देशांक ठरवून त्या निर्देशांकाशी शेतमजुरांचे वेतन निगडीत करणे."

अनुक्रमाणिका

“शिक्षण व नोकऱ्या या क्षेत्रात अनुसूचित जातीजमाती यांच्या राखीव जागांचे संरक्षण करणे आणि इतर मागासलेल्या जाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलामुलींसाठी अनुक्रमे २५ ते २७ टक्के राखीव ठेवणे....”

सामाजिक प्रश्नावर इतकी स्पष्ट आणि परखड भूमिका घेणारा, मुख्यत्वे शेतकऱ्यांची कामकऱ्यांची बाजू घेऊन लढे लढवणारा, डाव्या, शास्त्रशुद्ध मार्क्सवादी विचार आणि म. फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा सुरेख मेळ घालून महाराष्ट्राच्या राजकारणात समाजवादाचा लाल झेंडा घेऊन वाटचाल करणारा शेतकरी कामगारपक्ष आणि त्या पक्षाचे धुरीण भाई उद्धवराव पाटील हे महाराष्ट्रात आपल्या वेगळेपणाने उठून दिसतात. “उद्धवरावांचे चरित्र हे जवळजवळ महाराष्ट्रातील शेतकरी कामगार पक्षाचेच चरित्र ठरेल.महाराष्ट्राच्या डाव्या चळवळीशी उद्धवराव इतके एकरूप झाले की, त्यांना वगळून डाव्या चळवळीचा आढावाच घेता येणार नाही.” हे दैनिक मराठवाडा औरंगाबादचे संपादक श्री. अनंतराव भालेराव यांचे म्हणणे खूपच बोलके आहे.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण सहावे**

## ।। उद्धवरावदादांनी लढविलेल्या निवडणुका ।।

लोकशाही क्रांतीवर शे.का. पक्षाचा आणि भाई उद्धवराव दादांचा प्रथमपासून विश्वास होता. लोकशाही म्हटले की निवडणुका आल्या. आपल्या मताचा प्रचार आला. शे.का. पक्षाचे कार्यकर्ते हे प्रामुख्याने ग्रामीण भागातील गरीबीतून वा मध्यमवर्गातून आलेले आहेत. निवडणुकीसाठी वारेमाप पैसा उधळणे त्यांच्या तत्त्वातही बसत नव्हते आणि त्यांना शक्यही नसायचे. ते सारे लोकशाही समाजवादावर निष्ठा ठेऊन अल्पस्वल्प पैशावर आणि मतदारांच्या सद्सद्विवेक बुद्धीवर भरवसा ठेऊन निवडणुका लढवायचे. भाई उद्धवराव पाटील याला अपवाद नव्हते. अशा परिस्थितीत पक्षाचे तत्त्वज्ञान घेऊन गोरगरीब लोकांच्या कल्याणाची धोरणे घेऊन भाई उद्धवराव पाटलांनी साऱ्या निवडणुका लढविल्या. निवडणुकीच्या यशापयशापेक्षा निवडणुकीच्या माध्यमातून लोकशिक्षण आणि लोक जागरण होते, हे त्यांना महत्त्वाचे वाटे. लोक चळवळी उभारून त्याचा दट्ट्या शासनाला लावून लोकहिताचे निर्णय घेण्यास शासनास भाग पाडणे यातही ते पक्षाचा विजय मानत असत.

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते, हैद्राबाद मुक्ती संग्रामातील झुंजार स्वातंत्र्य सेनानी आणि नव्यानेच स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक सदस्य असलेल्या भाई उद्धवराव पाटील यांनी सन १९५२ ची देशातील पहिली सार्वत्रिक निवडणूक लढविली. त्यावेळी अल्पावधीतच बहराला आलेल्या शे.का. पक्षात फाटाफुटीला सुरुवात झाली होती. या पार्श्वभूमीवर भाई उद्धवरावांनी शे.का. पक्षातर्फे त्यावेळच्या उस्मानाबाद-तुळजापूर या द्विमतदार संघातून हैद्राबाद असेंब्लीची निवडणूक लढविली. त्यावेळी त्यांच्या विरोधात जोशी ब्रदर्स बुकसेल्सचे मालक श्री. कॅप्टन जोशी हे कॉंग्रेसचे तुल्यबळ उमेदवार होते. देशात आणि मराठवाड्यात त्याकाळी कॉंग्रेसचे वातावरण होते. तरीही भाई उद्धवरावदादांनी पैशाची, वाहनांची कमतरता असतांना तुटपुंजी साधने हाताशी घेऊन गोरगरीबांच्या कल्याणाचे तात्त्विक अधिष्ठान घेऊन मोठी झुंज दिली. आणि त्यांनी कॅप्टन जोशींचा पराभव केला. ते हैद्राबाद विधानसभेचे पहिल्यांदा आमदार झाले.

हैद्राबाद विधानसभेत भाई उद्धवरावांनी अल्पावधितच एक अभ्यासू संसदपटू म्हणून नावलौकिक मिळविला. बहुजन सामाजातून स्वतःच्या कर्तृत्वाने पुढे आलेले ते एक स्वयंभू नेतृत्व असल्याची जाणीव त्यावेळी अनेकांना झाली होती. या विधानसभेत दीनदुबळ्यांचा आवाज बुलंद करणारा विरोधी पक्षाचा जागरूक आमदार म्हणून त्यांची ख्याती पसरली होती. सन १९५२-५४ या काळात हैद्राबाद विधानसभेत जमीन सुधारणा बील आले. त्या बीलात जमीन मालकावर घातलेल्या मर्यादा, कुळांना व लहान जमिनधारकांना संरक्षण आणि कसेल त्याची जमीन आदी प्रश्नाबाबत त्यांनी आग्रही भूमिका घेतली. त्यासाठी त्यांनी आपला अभ्यास आणि वक्तृत्व पणाला लावले. त्यावेळी त्यांनी मांडलेले विचार आजही प्रेरक ठरावेत असेच आहेत. असे मूलगामी विचार परिणामकारक पद्धतीने मांडण्यासाठी ते रात्रीच्या रात्री जागून ग्रंथामागून ग्रंथ वाचीत असत. टिपणे काढीत असत. जुन्या हैद्राबाद राज्यातील श्री.एम. चेनारेडी, सभापती गोपाळराव एकबोटे आणि माजी कृषि मंत्री ना. श्री.व्ही. सुब्रम्हण्यम् उद्धवरावांची तारीफ करताना म्हणायचे, “भाई उद्धवराव पाटील यांच्याइतका अभ्यासू लोकप्रतिनिधी आम्ही पाहिला नाही.” तेथील सत्ताधारी मंत्री आपल्या पक्षाच्या आमदारांना सल्ला देताना सांगत,“तुम्हाला चांगले पार्लमेंटेरियन (संसदपटू) व्हायचे असेल तर तुम्ही भाई उद्धवराव पाटलांची विधानसभेतील भाषणे वाचा.” तर दुसऱ्या

एका माजी मंत्र्याने प्रांजळपणे सांगितले की,"उद्धवरावांची विधानसभेतील भाषणे आमच्या कॅबिनेटमध्ये धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी चर्चिली जात होती."

पक्षीय अभिनिवेश आणि मतभिन्नता बाजूला ठेवून भाई उद्धवराव पाटील यांनी तेलंगण आणि कर्नाटकात अडकलेला मराठी भाषिक भूप्रदेश महाराष्ट्राला मिळवून देण्यासाठी इतर पक्षांच्या आमदाराबरोबर सलोख्याचे संबंध ठेवून एक दिलाने त्या प्रश्नाचा पाठपुरावा केला. या समझोत्यामध्ये म्हैसा तालुका आणि देगलूर तालुक्यातील दोन सर्कल आंध्रला द्यावे लागले आणि माहुरगडची रेणुका माता, किनवट व राजुरा माणिकगड हे मराठी भाषिक तालुके महाराष्ट्राला मिळविण्यात त्यांनी यश मिळविले. अशाप्रकारे तेलगू आणि मराठी भाषिकांनी आपला सीमाप्रश्न भातृभावाने सोडवून घेतला.

मार्च १९५७ मध्ये देशातील दुसरी निवडणूक झाली. या निवडणुकीच्या वेळी संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न ऐरणीवर होता. भाई उद्धवरावजींनी उस्मानाबाद मतदार संघात संयुक्त महाराष्ट्र समितीचे पुरस्कृत आणि शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी जाहीर केली. त्यांच्या विरोधात काँग्रेस पक्षातर्फे हैद्राबाद राज्यातील शिक्षणमंत्री म्हणून राहिलेले श्री. फुलचंद गांधी उभे होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमुळे काँग्रेस विरोधी लोकमत पश्चिम महाराष्ट्रात तापले होते पण मराठवाड्यातील उस्मानाबाद मतदार संघाला त्या वातावरणाची म्हणावी तशी धग पोहचलेली नव्हती. त्यात सत्ता-संपत्तीने भारी असलेला प्रतिनिधी रिंगणात होता. फुलचंद गांधी मूळचे मोठे सावकार. या सावकारशाहीविरुद्ध लातूरात भरलेल्या महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनात मोर्चा काढून उद्धवरावांनी त्यांचे शत्रूत्व अंगावर घेतलेले. भाई उद्धवरावांना ही निवडणूक जिंकणे तसं अवघडच होतं. तरीही भाई उद्धवरावांनी निवडणुक प्रचारात फुलचंदजीचा व्यक्तिद्वेष वा चरित्र्य हननाचा वापर केला नाही. पक्षाची ध्येयधोरणं, मुंबईसहित संयुक्त महाराष्ट्र मंजूर करण्यात काँग्रेसने चालविलेली टोलवाटोलवी आणि काँग्रेसचं भांडवलदारधार्जिणं धोरण यावर भाईनी भर दिला होता आणि आश्चर्य घडले. एके काळी मंत्री असलेल्या फुलचंद गांधींना हरवून भाई उद्धवराव पाटील विजयी झाले. या यशाने भाई उद्धवरावांची चारित्र्यसंपन्न, त्यागी आणि तत्वदर्शी प्रतिमा अधिकच तेजाळून गेली. या विजयामुळे भाई उद्धवराव पाटील एक रात्रीत साऱ्या महाराष्ट्राला महाजूर झाले.

सन १९५८-५९ या वर्षात एस.एम्. जोशी यांच्यानंतर दादा विशाल द्विभाषिक मुंबई राज्य विधानसभेचे विरोधी पक्षनेते झाले. पण दादांचे दुर्दैव्य असे की, त्यावेळी हल्लीच्या प्रथेप्रमाणे विरोधी पक्ष नेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा नव्हता. उद्धवरावदादा विरोधीपक्ष नेते झाल्याचे शहरी पांढरपेशीना खपले नाही. त्यावेळी आचार्य अत्र्यांनादेखील उद्धवरावदादांच्या कर्तृत्वाबद्दल शंका वाटली. ते म्हणाले,"ज्यांना धड कपडे घालता येत नाहीत ते महाराष्ट्राचे पुढारीपण करायला निघाले आहेत." पण संयुक्त महाराष्ट्र चळवळीमधील उद्धवरावांची झुंजारवृत्ती आणि विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदी भाईनी सत्ताधाऱ्यांची केलेली कोंडी पाहून आचार्य अत्रे यांची शंका फोल ठरली. ते उद्धवरावाचे चांगले मित्र बनले. पुढे उद्धवरावांना त्यांनी मानाने वागविले. काँग्रेसने तर उद्धवरावदादांच्या विरोधी नेते पदाचे मुक्त कंठाने कौतुक केले. त्यांच्यामते विरोधी पक्षाची उंची उद्धवरावजीमुळे एक इंचाने वाढली.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही महाराष्ट्राच्या राजकारणातील ऐतिहासिक घटना. या चळवळीत कॉ. डांगे, आचार्य अत्रे, एस. एम्. जोशी आणि उद्धवराव पाटील यांचे नेतृत्व उजळून निघाले. सन १९६०

अनुक्रमाणिका

मध्ये मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश जरी दिल्लीहून यशवंतराव चव्हाणांनी आणला असला तरी त्या यशात इतर विरोधी नेत्याप्रमाणे उद्धवरावाचा वाटा दुर्लक्ष करण्यासारखा मुळीच नव्हता.

सन १९६२ च्या लोकसभा निवडणुकीत उस्मानाबाद मतदार संघातून भाई उद्धवराव पाटील यांनी शे.का. पक्षातर्फे उमेदवारी अर्ज भरला. त्यांच्या विरोधात काँग्रेसचे तुळशीराम पाटील उभे होते. या लढतीत भाई उद्धवरावदादा पराभूत झाले. या पराभवाने ते मुळीच खचले नाहीत. निराश तर मुळीच झाले नाहीत. की त्यांनी आपले लोक चळवळीचे कामही बंद केले नाही. निवडणुकाच्या जय पराजयात त्यांची वृत्ती आणि वागणं स्थितप्रज्ञाला शोभेल असेच होते. निवडणूक हरल्यानंतर शे.का. पक्षाचं काम करीत करीत ते स्वतःच्या शेतीवर जाऊन अक्षरशः शेतीत काम करायचे. स्वतःच्या शेतात नांगर हाकण्यातही त्यांनी कमीपणा मानला नाही.

शेतकरी कामगार पक्षाचे तत्त्वधिष्ठित राजकारण करताना भाई उद्धवरावांनी आपल्या मुद्देसूद आणि सडेतोड भाषणांनी सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडले पण त्यांच्या या विरोधात त्यांनी सत्ताधारी पक्षातील मंडळीबद्दल शत्रूत्वाची भावना कधीच बाळगली नाही. त्यांच्या स्वभावात पहिल्यापासून ऋजुता आणि मार्दवता होती. राजकारण करताना माणसे तोडण्याची त्यांनी कधीच चूक केली नाही. वैयक्तिक मैत्रीत कधी अडसर येऊ दिला नाही. त्यामुळे सत्ताधारी पक्षातही त्यांचे अनेकांशी जवळचे आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. हे मित्रत्वाचे संबंध त्यांनी राजकारणाच्या चौकटीबाहेरही कसोशीने सांभाळले. त्यामुळेच ६२ ची लोकसभेची निवडणूक हरल्यानंतर त्यांना पक्षाने दिल्लीच्या राज्यसभेसाठी उभे केले.

राज्यसभेसाठी ना. यशवंतराव चव्हाणांनी रिपब्लिक पक्षाचे बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांना निवडून देण्याचं आवाहन केलं असतानाही सत्ताधारी काँग्रेस पक्षातील आमदारांनी विरोधी पक्षाचे उमेदवार भाई उद्धवराव पाटील यांना मते देऊन राज्यसभेवर निवडून दिले. राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारी सभा बार्शीत पन्नालाल सुराणांनी आयोजित केली होती. आजूबाजूच्या तालुक्यातून या सभेला प्रचंड जनसमुदाय जमला होता. या सभेत बोलताना उद्धवराव दादा राज्यसभेच्या निवडणुकीबद्दल म्हणाले, “ही निवडणूक झाली असे वाटलेच नाही. ना जीपचा धडधडाट, ना खकाणा. मुंबईत आमदार निवासात निवांत राहिलो. कधी गणपतरावांच्या तर कधी एसेम पाटलांच्या खोलीत. इतर आमदारांना घेऊन ते येत. ओळख करून देत. चहा पिता पिता ते सांगत,“दादा तुम्ही काळजी करू नका. सगळे बिनबोभाट होऊन जाईल.” आणि तसेच झाले. दुपारी बारा वाजता मतदान संपले आणि दोन वाजता निकाल जाहीर! या तुमच्या पठ्ठ्याला त्या आमदारांनी थेट दिल्लीला पाठवले. आता आपल्या शेतकऱ्यांचं दुखणं देशाच्या चावडीवर मांडीन बघा.”

भाई उद्धवरावजी सन १९६४ ते ६६ या काळात खासदार होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वास दिल्लीला व्यापक क्षेत्र लाभले. तेथेही त्यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीची, सडेतोड वक्तृत्वाची आणि गोरगरीबांच्या हिताच्या कार्यप्रणालीची चुणूक दाखविली.

सन १९६७ ची विधानसभेची निवडणूक भाई उद्धवरावांनी उस्मानाबाद मतदार संघातून शे.का. पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून लढविली. सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे श्री. किसनराव समुद्रे त्यांचे प्रतिस्पर्धी होते. निवडणूक अटीतटीची झाली. त्यात भाई उद्धवराव निवडून आले. भाई उद्धवराव विरोधी पक्ष सदस्य असूनही सन१९६८ साली प्रथमच लोकलेखा समितीचे अध्यक्षपद त्यांच्याकडे चालून आले. हा त्यांच्या

समतोल आणि न्यायी वृत्तीचा गौरवच झाला असे म्हणावे लागेल. याच काळात विरोधी पक्षांनी बेळगांव, कारवार आदी सीमा भाग महाराष्ट्रात सामील करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र समितीचे गठण केले. या समितीच्या अध्यक्षपदी भाई उद्धवरावांची बिनविरोध निवड झाली. म्हैसूर राज्यातील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्राला मिळण्याचा प्रश्न अनेक वर्षे भिजत पडला होता. उद्धवरावांनी सीमाप्रश्नाची ऐतिहासिक चळवळ उचलून धरली. कॉ. व्ही. डी. चितळे, दत्ता देशमुख, एस्. एम. जोशी आणि उद्धवरावदादांनी या प्रश्नावर जीवाचे रान केले.

संपूर्ण महाराष्ट्र समितीचे नेते म्हणून भाई उद्धवरावांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय ठरली. सन १९६७ साली कोल्हापूर त्यांच्या नेतृत्वाखाली भरलेल्या विराट सीमा परिषदेत 'महाजन अहवाल सप्त पाताळात गाडा' हा संदेश सीमावासियांना दिलासा देणारा होता. उद्धवरावांनी या समितीच्यावतीने सीमा भागात 'साराबंदी' हा ऐतिहासिक लढा संघटित करून डी. एस्. पी. लुईसला पळती भुई थोडी करून सोडली होती. लक्षावधी सीमावासियांची अंतःकरणे भाई उद्धवरावानी आपल्या झुंजार वृत्तीने काबीज केली होती. पण हा सीमाप्रश्न सुटल्याचे त्यांना पहाता आले नाहीच.

सन १९७२ च्या विधानसभा निवडणूकीत भाईनी त्यांचा नेहमीचा उस्मानाबाद मतदार संघ सोडून परांडा-भूम मतदार संघातून निवडणूक लढविली. काँग्रेसतर्फे वाशीचे अरुणोजीराव देशमुख तर रिपब्लिक पक्षातर्फे परांड्याचे ॲड. वासुदेवराव उर्फ नानासाहेब देशमुख त्यांच्या विरोधात ते लढा देत होते. या तिरंगी लढतीत परंड्याच्या स्थानिक उमेदवार नानासाहेबांचे पारडे जड झाले. ते निवडून आले, उद्धवरावदादा पराभूत झाले. तरी नानासाहेबाबद्दलचा मनाचा प्रांजळपणा आणि मोठेपणा एका प्रसंगाने सिद्ध झाला. निवडणूकीच्या निकालानंतर प्रवासात उद्धवराव आणि नानासाहेबांची भेट रेल्वेच्या डब्यात झाली. तेव्हा उद्धवरावांनी नानासाहेबांचा हात आपल्या हातात घेतला आणि ते म्हणाले, "नानासाहेब, निवडणुकीत व्यक्तीगत टीका केली ती केवळ कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे. अन्यथा माझ्या तत्त्वात ते बसत नाही." हा उद्धवरावांचा प्रांजळपणा ऐकून श्री. नानासाहेब देशमुख सद्‌गदित झाले. उद्धवरावांबद्दल पूर्वी नानासाहेबांच्या मनात असलेला आदर द्विगुणित झाला.

बहात्तरच्या निवडणूकीत पराभूत झाल्यानंतर विधान परिषदेच्या आमदार मतदार संघातील निवडणुकीच्या निमित्ताने उद्धवराव काँग्रेसच्या एका माजी मंत्र्याला भेटले. बोलता बोलता त्या मंत्र्यांनी दादांना प्रश्न केला.

"तुम्ही उस्मानाबाद मतदार संघ सोडून परंडा-मतदार संघात का गेलात?"

"तुमच्या पक्षाची लाटच अशी होती की, मी उस्मानाबादहूनही पडलोच असतो." उद्धवराव उत्तरले.

"असे नव्हते दादा", मंत्री बोलू लागले. "मी आता मंत्रीमंडळात नाही. तेव्हा गुप्ततेचं बंधन माझ्यावर नाही. म्हणून सांगतो की, सी. आय्. बी. चा रिपोर्ट असा होता की तुम्ही उस्मानाबादहून निवडून आला असता."

"त्यामुळे असा काय फरक पडला असता?" उद्धवरावजींचा प्रतीप्रश्न.

अनुक्रमाणिका

"उद्धवरावजी," माजी मंत्री स्पष्टीकरण देऊ लागले, "मी मंत्रीमंडळात नाही, याचे मला दुःख नाही पण तुम्ही विरोधात नाही याचे मला दुःख आहे. मी तुमची सभागृहातील महत्त्वाच्या विषयावरील भाषणे ऐकून प्रभावित झालो. अशी अभ्यासपूर्ण व रोखठोक भाषणे ठोकणारा आमच्या सभागृहात आहे का कोणी? सभागृहातील तुमची एकेक भाषणे आमच्या कॅबिनेटचे विषय होते. तात्त्विक आणि वैधानिक लढाईतील ती आम्हाला आव्हाने असायची. गेल्या वीस वर्षापासून तुमच्यावर सतत प्रयोग करूनही काही उपयोग झाला नाही. पण तुमची मात्र विचारांची संघटनात्मक किंवा वैधानिक आघाडीवरील लढ्याची धार जरासुद्धा बोथट झाली नाही. तडजोडीचा विचारसुद्धा कधी तुम्हाला शिवला नाही आणि त्याचे रहस्य तुम्ही कधी स्वतःचं व्यक्तीगत काम घेऊन आला नाहीत, यात आहे."

बहुजन समाजाच्या कल्याणासाठी तत्त्वनिष्ठ राहून सतत प्रामाणिकपणे काम करणाऱ्या उद्धवरावसारख्या नेत्याला काम नाही, असं कधीच होत नाही. गरिबी, अज्ञान आणि दुःखं हीच त्यांना कामाला लावत असतात. मग ते निवडणुकीत विजयी होऊन आमदार असोत किंवा पराभूत होऊन लोकचळवळीत असोत. त्यांना कुठल्याही पदाची, सत्तेची अपेक्षा नसते. भाई उद्धवरावजी अशा प्रकारच्या लोकनेत्यापैकी एक चकाकणारा हिरा होते. म्हणूनच ७२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला तेव्हाही काही पदे त्यांच्याकडे चालत आली. ७१-७२ च्या दुष्काळ निवारण समितीच्या सदस्यपदी शासनाने त्यांची नेमणूक केली होती. दुष्काळ निवारण समितीमधील त्यांचं काम खूपच बोलकं ठरलं. त्याचप्रमाणे शासनाने भाई उद्धवराव यांची सन १९७३ मध्ये राज्यस्तरीय भूविकास बँकेच्या संचालकपदी सन्मानाने नेमणूक केली होती. त्यांनी तेथे सन १९७७ पर्यंत जे काम केले, ते शेतकऱ्यांच्या जीवनाला एक नवे वळण देणारे ठरले. तो इतिहास जितका नाट्यपूर्ण आहे तितकाच तो बँकिंग क्षेत्राला मार्गदर्शक ठरला आहे.

भाई उद्धवराव पाटील यांच्या भूविकास बँकेच्या संचालकपदाच्या कार्यकाळातच पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीनी देशात आणीबाणी पुकारली. विरोधी पक्षातील लोकांची धरपकड सुरू झाली. उद्धवरावांनाही अटक व्हावी, अशी उस्मानाबाद जिल्ह्यातील काँग्रेस नेते मंडळीची इच्छा होती. त्यासाठी काहींनी गोपनीय पत्रे पाठविली. तर काहींनी जिल्हाधिकाऱ्यांना तोंडी सूचना दिल्या. भाई उद्धवराव नेहमीप्रमाणे शे. का. पक्षाची शिबीरे घेत होते. आपले विचार मांडत होते. तसेच भूविकास बँकेचे संचालक म्हणून कामही पाहत होते. अखेर उस्मानाबाद जिल्हाधिकाऱ्याऐवजी सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना पकडले. त्यावेळी उद्धवराव सोलापूरी एका बैठकीला उपस्थित होते. त्यांना त्या काळात तुरुंगवासही सोसावा लागला होता.

आणीबाणी संपल्यानंतर सन१९७७ मध्ये लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका जाहीर झाल्या. देशात नुकताच जनता पक्षाचा उदय झाला होता. महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्ष हा जनता पक्षाचा सहयोगी पक्ष होता. मा. श्री. उद्धवरावजी पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार म्हणून लातूर लोकसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्याचे ठरविले. लगेच त्यांनी भूविकास बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा दिला. संचालक म्हणून वापरायला मिळालेली गाडी (कार) बँकेकडे सुपूर्द केली. आणि खाजगी गाडीने उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ते लातूरला निघाले. जाताना अर्ज भरताना भरावयाच्या डिपॉझिटचीही रक्कम त्यांचेकडे नव्हती. पण उस्मानाबाद ते लातूर या प्रवासात गावोगावच्या लोकांनी न मागता गाडी थांबवून दादांना पैसे दिले. लातूरला आले त्यावेळी नोटांनी त्यांचे खिसे भरले होते.

अनुक्रमाणिका

या लोकसभेच्या निवडणुकीत भाई उद्धवराव पाटील यांच्या विरोधात काँग्रेसचे श्री. पी. जी. पाटील हे उभे होते. ते उदगीर भूविकास बँकेचे संचालक तर होतेच पण उदगीरच्या शैक्षणिक संस्थेशीही संबंधित होते. पण आणीबाणीमुळे लोक काँग्रेस पक्षावर नाराज होते. त्यामुळे या निवडणुकीत मा. भाई उद्धवराव पाटील अपेक्षेप्रमाणे विजयी झाले. आणि खासदार म्हणून दिल्लीला गेले. त्यावेळी श्री. एस्. एम्. पाटील हे महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष होते. दिल्लीला जनता पक्षाचे मंत्रीमंडळ बनू लागले तेव्हा एस. एम. जोशी यांनी उद्धवरावांना केंद्रात मंत्री होण्याची गळ घातली. त्यांच्याकडे कृषी खाते देण्याचीही तयारी दाखविली. पण सात-आठ खासदारांच्या संख्याबळावर मंत्री होऊन आपण सत्तेत सामील झालो तर तळागाळातील पक्ष कार्याकडे दुर्लक्ष होईल. पक्षप्रगतीस पायबंद बसेल, ही कारणे नमूद करून त्यांनी ही मंत्रीपदाचा देकार विनम्रपणे नाकारला. या त्यांच्या निर्णयात सत्ता मिळवून देणारा पक्ष वाढला पाहिजे हा उद्धवरावांचा विचार होता.

खासदार म्हणून भाई उद्धवराव पाटील दिल्लीला गेले. एकदा संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये बीडचे खासदार रामरावजी आवरगावकरबरोबर ते चहापानाच्या निमित्ताने गप्पा मारीत बसले होते. त्यावेळी मा. ना. यशवंतरावजी चव्हाण त्यांचेजवळ आले. त्यांनी उद्धवरावदादांची आपुलकीने चौकशी केली. आणि उद्धवरावांचा निरोप घेताना ते म्हणाले, "उद्धवरावजी तुम्ही खूप काम करता परंतु महाराष्ट्राला तुमच्या कामाची योग्य ओळख होत नाही. त्यासाठी तुम्ही पुण्यामुंबईसारख्या ठिकाणी येऊन स्थाईक झाले पाहिजे. म्हणजे तुमच्या कार्याचे योग्य मूल्यमापन होईल."

हा सल्ला कितीही चांगला असला तरी उद्धवरावदादांनी आपलं उस्मानाबादचं घर काही सोडलं नाही. ग्रामीण भागातील जनतेशी जी नाळ जोडली गेली आहे ती तुटू नये. हा त्यांचा घर न सोडण्यामागचा हेतू. पुण्यामुंबईच्या लोकांनी आपल्या कार्याचं मूल्यमापन करण्यापेक्षा ग्रामीण भागातील जनतेनं ते करावं. असं त्यांना वाटत असे. म्हणूनच त्यांनी चालत आलेली सत्ता नाकारली. आणि स्वाभिमान जोपासला. आपल्या पक्षावरील, पक्षाच्या तत्त्वज्ञानावरील आणि गोरगरीबांच्या हितासाठी कार्यरत राहण्यावरील आपली निष्ठा त्यांनी कधीच शबलित होऊ दिली नाही. शाहीर लुधियांनी यांच्या कवितेतील

"न मुंह छुपाके जीओ, और न सर झुकाके जिओ
गमोंका दौरभी आये तो मुस्कुराके जिओ"

या काव्यपंक्तीतून व्यक्त होणारं त्यांचं जीवन संघर्षमय, दुःखमय असलं तरी ते हसत हसत स्वाभिमानाने जगले!

अनुक्रमाणिका

**प्रकरण सातवे**

## ।। गोवा मुक्ती संग्राम आणि भाई उद्धवराव पाटील ।।

सन १९५४ सालातील जुलै-ऑगस्ट मधील एक दिवस. वर्तमानपत्रातील एका बातमीने भाई उद्धवराव पाटील एकदम आनंदित आणि उत्तेजितही झाले. पोर्तुगींजांच्या ताब्यात असलेलं दादरा आणि नगरहवेली भारतीय राष्ट्रवादी तरुणांनी चळवळ करून मुक्त केलं होतं. हीच ती बातमी. या बातमीनं त्यांच्या मनाचं विचारचक्र फिरू लागलं.

'ज्यांच्या राज्यावर सूर्य कधी मावळत नाही', असं मानलं जायचं, अशा ब्रिटिशांची भारतातील राजवट संपविण्यात आली. भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर हैद्राबाद मुक्ती संग्राम झाला. जनतेनं निजामाच्या विरुद्ध अहिंसक सत्याग्रह केला. अनेकांनी भूमिगत राहून रझाकाराबरोबर प्राणपणाने लढा दिला. त्यात आपण सहभागी होतो, ही भाग्याची गोष्ट! अशा तऱ्हेने लोक चळवळीने हैद्राबादच्या निजामी राज्यावर भारत सरकारने पोलीस ॲक्शन घेण्याची पार्श्वभूमी तयार केली. आणि पोलीस ॲक्शन होऊन निजामाला शरण यायला भाग पाडलं आणि हैद्राबादचं निजामाचं राज्य भारतात विलिन झालं.

असं झालं तरी भारताचं स्वातंत्र्य अपूर्णच होतं. इंग्रज भारतात येण्यापूर्वी फ्रेंच आणि पोर्तूगीजांनी अनुक्रमे पाँडेचरी आणि गोवा येथे आपल्या वसाहतवादी राजवटी स्थापन केल्या होत्या. त्या वसाहती अजूनही पारतंत्र्यात खिचपत पडल्या होत्या. त्यावर भारत सरकारने आपला हक्क असल्याचे सांगायला सुरवात केली. फ्रेंचांनी शहाणपणा दाखवून आपल्या ताब्यातील चंद्रनगर, पाँडेचरी, कारिकल, माहे आणि यानाम या वसाहती शांततेच्या मार्गाने वाटाघाटी करून स्वातंत्र्य प्राप्तीनंतर थोड्याच काळात भारत सरकारच्या ताब्यात दिल्या पण पोर्तूगीज सरकारच्या बाबतीत मात्र अगदी उलटा अनुभव येत होता.

पोर्तूगालचा हुकुमशहा अन्तोनिओ सालाझार याने गोवा, दीव आणि दमण हे पोर्तूगालचे अविभाज्य प्रांत असल्याची ताठर भूमिका १९५१ मध्ये जाहीर केली. या पार्श्वभूमीवर मुंबई विभागातील काही गोवेकर भारतीय राष्ट्रवाद्याशी जाऊन मिळाले. जुलै-ऑगस्ट १९५४ मध्ये त्यांनी पोर्तूगीज अंमलाखालील दादरा व नगरहवेली या प्रदेशावर चाल केली. चळवळ करून तेथील पोर्तूगीज शासन उलथून टाकले. ते प्रदेश मुक्त केले. पंडित नेहरुंनीही ते प्रदेश स्वतंत्र झाल्याचे अधिकृतपणे घोषित केले. गोवा मुक्ती संग्रामातील दादरा व नगरहवेलीची मुक्तता महत्त्वाची ठरली. या बातमीवरच भाई उद्धवराव चिंतन करत होते.

गोवामुक्तीसाठी हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा आदर्श भारतीय राष्ट्रवादी आणि भारत सरकार यांचापुढं होता. हैद्राबाद मुक्तीसंग्रामाप्रमाणे लोकांनी सत्याग्रहाच्या मार्गाने तसेच भूमीगत राहून चळवळ केली पाहिजे. पोर्तूगीज सरकारला सळो की पळो करून टाकले पाहिजे. म्हणजे भारत सरकारला गोवा मुक्तीसाठी लष्कर पाठवून कार्यवाही करता येईल. दादरा आणि नगरहवेलीच्या यशामुळे महाराष्ट्रातील लोकांचा आणि गोव्यातील स्वातंत्र्यवादी जनतेचा आत्मविश्वास वाढला होता. त्यासाठी चळवळ सुरू व्हावी आणि आपणही या नव्या चळवळीत सहभागी व्हायला पाहिजे असा आमदार भाई उद्धवराव पाटलांनी मनोमन निश्चयही केला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता प्रस्थापित करू पाहणाऱ्या कुठल्याही चळवळीत झोकून द्यायला तरुण उद्धवराव नेहमी तयारच असत.

अनुक्रमाणिका

गोव्यातील पोर्तुगीज राजवटीचा, गोवामुक्ती संग्रामाचा आणि त्यातील भाई उद्धवराव पाटील यांच्या सहभागाचा इतिहास येथे संक्षेपाने देत आहे.

गोवा शहर हे हिंदू दंतकथेतील आणि इतिहासातील प्रसिद्ध शहर. या शहराचा पुराणात गोवे, गोवापुरी आणि गोमंत असे उल्लेख असलेले हे शहर. कदंब राजघराण्याने दुसऱ्या शतकापासून चौदाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत येथे राज्य केले. त्यानंतर गोव्यावर विजयनगरच्या राजाने, बहामनी राजाने राज्ये केली. याच काळात सन १४४० मध्ये जुने गोवे उभारले गेले. पुढे विजापूरचा मुस्लीम राजा युसुफ आदीलशहाने गोव्यावर आपला हक्क प्रस्थापित केला. नेमके त्याचवेळी पोर्तुगीज भारतात आले. आणि १५१० मध्ये पोर्तुगीज सरदार अल्बुकर्क यांच्या नेतृत्वाखाली युद्ध करून पोर्तुगीजांनी गोवा हस्तगत केला. पुढे त्यांनी दीव, बेटही विकत घेतले आणि १८७० साली मराठ्याकडून दमण व नगरहवेली मिळविले. या काळात गोवा हे महत्त्वाचे शहर गणले जायचे. भारतातील मुस्लीम यात्रेकरू येथूनच मक्केला जायचे. हे शहर व्यापाराचे आणि मुख्यतः घोडे बाजाराचे प्रमुख केंद्र होते.

पोर्तुगीज सत्ता जुलमी आणि धर्मांध! या शहराने हिंदू व मुस्लीमराजे पाहिले होते. त्यात या पोर्तुगीज राजाची भर पडली. ख्रिश्चन धर्माभिमानी राज्यकर्त्या पोर्तुगीजांची दडपशाही करून या प्रदेशातील लोकांना धर्मांतर करायला भाग पाडले. या जुलमी सत्तेविरुद्ध १८५२ साली गोव्यात दीपाजीराजे आणि त्यांच्या भाईबंधानी पोर्तुगीजाविरुद्ध बंडाचा झेंडा फडकावला होता. पण ते बंड पोर्तुगीजांनी बळाचा वापर करून मोडून काढले. त्यानंतर शंभरेक वर्षे गोव्यात पोर्तुगीजांची सत्ता निरंकूश राहिली, असे असले तरी गोवेकरांनी आपली भारतीय संस्कृती जतन केली. निसर्ग-सौंदर्याने नटलेल्या गोव्यात पारतंत्र्यातही साहित्य, संगीत आणि कलांची जोपासना उत्तम प्रकारे केली गेली.

गोव्यात स्वातंत्र्याची सुप्त स्वरुपात आकांक्षा होतीच. पोर्तुगीज राजवटीत या आकांक्षेचा थोडा जरी अविष्कार झाला तरी तो निर्दयपणे दडपून टाकला जाई. सन १९४६ मधील जून महिन्यात डॉ. राम मनोहर लोहिया गोव्यात आले. त्यांनी गोव्यातल्या जनतेच्या मनात स्वातंत्र्याचे अंगार फुलविले. महात्माजींच्या सत्याग्रहाच्या मार्गाने जाऊन गोव्यात स्वातंत्र्यसंग्राम सुरू झाला पाहिजे. त्यांनी दिलेल्या संदेशाने गोव्यात नवे चैतन्य सळसळू लागले.

भारत स्वतंत्र झाल्यावर भारत सरकारने गोवा, दीव, दमण या प्रदेशावर आपला हक्क सांगितला. पण सालाझारने त्याकडे दुर्लक्ष केले. भारतीय राष्ट्रवाद्यांनी आणि गोवेकरांनी गोवामुक्ती चळवळ सुरू केली आणि सन १९५४-५५ च्या सुमाराला गोवा मुक्ती हा भारतात एक ज्वलंत प्रश्न बनला. महाराष्ट्रातून निःशस्त्र स्वातंत्र्यप्रेमी नागरिक गोव्यात जाऊन सत्याग्रह करू लागले. 'घराघरातून एक पुकार। गोवे सोडून चल सालाझार।' या घोषणा गोव्यात दुमदुमू लागल्या. १५ ऑगस्ट १९५४ रोजी भारताच्या स्वातंत्र्यदिनी गोव्यात जाऊन सत्याग्रह करण्यात आले. त्या चळवळीत सौ. सुधाताई जोशी, नानासाहेब गोरे, शिरुभाऊ लिमये, भाई वैद्य, आत्माराम पाटील, कॉ. राजाराम पाटील, मधु लिमये, मधु दंडवते, क्रांतिसिंह नाना पाटील आणि भाई उद्धवराव पाटील यांचा विशेष उल्लेख करावा लागेल.

पोर्तुगीज सत्तेशी अखेरचा संघर्ष करण्यासाठी सत्याग्रहीनी १९५५ मध्ये जोरदार मोहीम आखली. त्याकरिता पूर्वतयारी म्हणून भारत सरकारने गोव्याची कोंडी करावी अशी त्यांनी मागणी केली. त्याला

प्रतिसाद म्हणून नेहरुंनी दिल्ली येथील पोर्तूगीज वकिलात पोर्तूगालने बंद करावी, असे सालाझाराला कळवले आणि गोव्याकडील रेल्वे वाहतूक बंद केली.

१५ ऑगस्ट १९५५ या स्वातंत्र्यदिनी कॉ. चितळे यांच्या नेतृत्वाखाली गोव्यात सामुदायिक सत्याग्रह करण्याचं ठरले. देशाच्या कानाकोपऱ्यातून आत्मसमर्पण भावनेने सत्याग्रहींच्या तुकड्या जात होत्या. त्यावेळी भाई उद्धवराव पाटील यांनी महाराष्ट्रातून, मराठवाड्यातून आणि कोल्हापूर विभागातून अशा सत्याग्रहीच्या तुकड्या तयार करून त्या गोव्याकडे पाठविण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यासाठी त्यांनी सभा, परिषदा आणि व्यक्तिगत पातळीवर चर्चा या माध्यमातून गोव्यात सत्याग्रह करायला लोकांना तयार करण्यासाठी जीवाचे रान केले. महत्त्वपूर्ण काम केले. त्यांच्या सरळ, सोप्या आणि तितक्याच ज्वलंत वाणीत कार्यकर्त्यांना सत्याग्रहात खेचून आणण्याचे सामर्थ्य होते. त्यांनीही सत्याग्रहीच्या एका तुकडीचे नेतृत्व केले पण त्यांना दुर्दैवाने गोवा हद्दीत प्रवेश करायला पोर्तूगीज पोलीसांनी मज्जाव केला.

१५ ऑगस्टचा हा सामुदायिक सत्याग्रह भव्य होता पण त्या सत्याग्रहीवरही पोर्तूगीज पोलीसांनी लाठीहल्ला आणि गोळीबार केला. आतापर्यंतच्या गोवामुक्ती संग्रामात निःशस्त्र सत्याग्रहीवर केलेल्या लाठी-फांदी हल्ल्यात व गोळीबारात सुमारे १२१ भारतीय हुतात्मे झाले. तर हजारो सत्याग्रही जखमी झाले. पुढे पोर्तूगीज लष्करी कोर्टाने नानासाहेब गोरे आणि शिरुभाऊ लिमये यांना दहा दहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली.

भाई उद्धवराव पाटील या चळवळीबद्दल, सालाझारच्या क्रूरपणाबद्दल आणि गोळीबारात हुतात्मा झालेल्या सत्याग्रहीबद्दल खूप विचार करायचे. दुःखी होऊन. सालाझार राजवटीवर चिडून जाऊन. थोडीतरी न्यायबुद्धी असलेल्या इंग्रजाविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रह करणे ठीक होते पण क्रूर, मग्रूर, रानटी आणि अहंमन्य पोर्तूगीज राजा सालाझार याच्या बिनडोक सरकारपुढं सत्याग्रह करणं म्हणजे भिंतीवर डोकं आपटून घेण्यासारखंच होतं. अशा सरकारला अहिंसेची भाषा समजत नसते. त्याला सशस्त्र लढ्यांचीच भाषा समजत असते. दादरा आणि नगरहवेली भाग भारतीयांनी लढून ताब्यात घेतल्यावर सालाझारने काय केले? हैद्राबादच्या निजामाविरुद्ध पोलीस ॲक्शनची कार्यवाही केली. तेव्हा निजामाला शरण यावेच लागले ना! तशीच त्वरीत लष्करी कार्यवाही भारत सरकारने करून गोवा स्वतंत्र केला पाहिजे. त्यासाठी सत्याग्रहीचे पुन्हा बळी देण्याची गरज नाही. असे भाई उद्धवराव पाटलांचे स्पष्ट मत होते. अशा मताचे दडपणही भारत सरकारवर वाढू लागले होते. त्यामुळेच भारत सरकारनेही सत्याग्रहींना पुन्हा गोव्यात जाण्यास बंदी घातली. त्यामुळे १५ ऑगस्ट १९५५ नंतर गोवा मुक्तीची चळवळ थंड झाली.

गोवा मुक्ती शांततेच्या मार्गाने वाटाघाटीद्वारे व्हावी हे नेहरुंचे धोरण. त्यास सालाझारचा शून्य प्रतिसाद. अमेरिकादि पाश्चिमात्य राष्ट्रे पोर्तूगीजांच्या बाजूंची, तर आफ्रिका-रशिया आदि साम्यवादी राष्ट्रे भारताला साथ देणारी. आफ्रिकेतील काही देशांनाही पोर्तूगीज वसाहतीवादी सरकार पासून मुक्तता हवी होती. पंडित नेहरुंच्या वसाहतवाद विरोधी धोरणाची गोवा प्रश्नात कसोटीच लागणार होती.

सन १९५५ च्या अखेरीस निकीता क्रुश्चेव्ह आणि निकोलाय बुल्गानिन हे रशियन नेते भारत भेटीला आले. त्यांनी नेहरूंची वसाहतवाद विरोधाची तळी उचलून धरली. ‘गोवा प्रश्नाबाबत सोव्हिएत भारताला निःसंदिग्ध पाठींबा देईल’ हे त्यांनी उघडपणे जाहीर केले. त्यावेळचे संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांनी गोव्यात लष्करी कार्यवाही करण्याचा तात्विक निर्णय घेण्यात सन १९५७ साली पुढाकार घेतला.

अनुक्रमाणिका

तरीही आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची छी : थू : होऊ नये म्हणून नेहरू लष्करी कार्यवाही करायला धजत नव्हते. पण लष्करी कार्यवाही करण्याबाबत त्यांची मानसिक तयारी होऊ लागली होती. कारण शांततेच्या मार्गाने वाटाघाटी करून गोवा प्रश्न सोडविण्याचे नेहरूंचे सारे प्रयत्न पोर्तूगीज सरकारने हाणून पाडले होते.

"गोवा, दीव, दमण हे पोर्तूगीज स्वामित्वाखालील प्रदेश स्वयंशासित नाहीत किंवा ते पोर्तूगालचे प्रांतही नाहीत. तर ते प्रदेश म्हणजे पोर्तूगालच्या वसाहती आहेत" अशा अर्थाचा निर्णय संयुक्त राष्ट्र संघाने एका ठरावाद्वारे १५ डिसेंबर १९६० रोजी दिला होता. भारतास तो पोषकच होता. नेहरुच्या लष्करी कार्यवाहीला हा नैतिक पाठिंबाच होता. तेव्हा नेहरूनी गोवा प्रश्न सोडविण्यासाठी लष्करी कार्यवाहीशिवाय अन्य पर्याय नसल्याचे सूचक उद्‌गार काढले.

या नेहरूच्या वक्तव्याने सालाझार चिडला. डिसेंबर १९६१ च्या प्रारंभी त्याने आपल्या गोव्यातील लष्कराला सुसज्ज राहण्याचा आदेश दिला. त्याशिवाय त्याने पोर्तूगालचे बारा हजार सैनिक गोव्यात उतरविले. त्यांच्या लष्करी हालचाली संशयास्पद होऊ लागल्या. दि.११ डिसेंबर १९६१ रोजी तर पोर्तूगीज लष्कराने दोंडा मार्गानजिक हिंदी हद्दीत गोळीबार करून भारताची आगळीक केली. त्यामुळे भारताला लष्करी कार्यवाही करणे भागच पडले. दिनांक १७ डिसेंबर १९६१ रोजी सैन्यदल-प्रमुख मेजर जनरल कँडेथ यांच्या नेतृत्वाखाली गोव्यात लष्करी कार्यवाही सुरू झाली. त्यांनी तीनच दिवसात पोर्तूगीज लष्कराला हैराण केले. दि. १९ डिसेंबर १९६१ रोजी पोर्तूगीज लष्कर पणजीत शरण आले. गोवा, दीव आणि दमण येथील पोर्तूगीज सत्ता संपली. तो सारा प्रदेश भारताच्या ताब्यात आला.

दिनांक १८ डिसेंबर १९६१ रोजी पोर्तुगालने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीकडे गोव्याच्या संदर्भात भारताविरुद्ध तक्रार केली. पाश्चिमात्य राष्ट्रांनी भारताला आक्रमक ठरवले. एवढेच नाहीतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली त्यांनी सुरक्षा समितीपुढे भारत विरोधी ठराव मांडला. पण सोव्हिएत संघाने नकाराधिकार वापरून तो फेटाळला गेला. सोव्हिएत संघ हा भारताचा खरा मित्र असल्याचे जगापुढे स्पष्ट झाले.

साडेचारशे वर्षे पोर्तूगीज अंमलाखाली भरडल्या गेलेल्या गोवा, दीव आणि दमण हे प्रदेश स्वतंत्र झाले आणि भारतीय संघराज्यात सामील झाले. या घटनेने साऱ्या भारतीवासीयांबरोबर भाई उद्धवराव पाटील यांचे मन कर्तव्यपूर्तीने सुखावले.

*

**प्रकरण आठवे**

## ।। भुदानाची चळवळ आणि भाई उद्धवरावांचा तिला विरोध ।।

भारतीय समाजात कमालीची विषमता आहे. त्यामुळे श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत होतो आहे आणि गरीब अधिकाधिक गरीब होतो आहे. उद्योगधंदे सारे भांडवलदार श्रीमंताच्या मालकीचे असल्याने तेथे काम करणाऱ्या कामगारांचे जीवन अधिकाधिक उध्वस्त होते आहे. म्हणून डाव्या विचारसरणीच्या पक्षानी उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण करून ही विषमतेची दरी कमी करण्याची शासनाला आव्हाने केली. चळवळी केल्या. उद्योगधंद्याप्रमाणेच जमिनीचे वाटपही विषमच आहे. हजारो एकर जमीनी जमिनदारांच्या मालकीच्या तर गरीब शेतकऱ्याकडे तीनचार एकर जमीन आणि शेतमजूर दलित यांना तर जमिनीचा पत्ता नाही. ह्या जमिनीचे न्याय तत्त्वावर पुर्नवाटप करण्याची मागणी मार्क्सवाद मानणाऱ्या पक्षांनी केली. शे. का. पक्षानेही तीच मागणी सतत लावून धरली. भाई उद्धवराव पाटील यांनी जमिनदार आणि सावकारशाही विरुद्ध लढे पुकारून शेतकरी-शेतमजुरावरील होणारे अन्याय कमी केले आहेत. म्हणूनच 'कसेल त्याची जमीन' हे घोषवाक्य घेऊन भाई उद्धवरावांनी शे. का. पक्षातर्फे चळवळीला प्रारंभ केला. जमिनदारांच्या हजारो एकर शेतावर अर्धपोटी राहून वेठबिगारासारखे वागविले जाणाऱ्या शेतमजूरांची दुःखे कमी करण्याचा प्रयत्न केला. 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वावर जमिनीचे समानतेच्या तत्त्वावर आधारित वाटप व्हावे, असे उद्धवरावांना वाटत असे. त्यास अनेक कारणे आहेत. जमीनदार आपल्या हजारो एकर जमिनीत स्वतः राबत नाही. तो ती जमीन शेतमजुर वेठबिगारी लोकांकडून अन्यायी पद्धतीने कसून घेतो. त्यामुळे भुकेले शोषित-पिडीत शेतमजूर अंतःकरण ओतून काम करू शकत नाहीत. त्यामुळे जमिनीतून जास्त उत्पादन येऊ शकत नाही. जमिनदारांचे इतर अनेक उद्योगधंदे असतात आणि त्यातूनही प्रचंड फायदा ते मिळवित असताना त्यांना जमिनीची मालकी हवीच कशाला? हे उद्धवरावांचे मत होते.

'कसेल त्याची जमीन' हे त्यांचे तत्त्व होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच तत्त्वावर कम्युनिस्ट पक्षाने तेलंगणात मोठी चळवळ उभारली. तेलंगणातील काळे सावळे, वाळून गेलेल्या निष्पर्ण काटक्या झालेल्या झाडासारखी शरीरे असलेल्या अर्धनग्न आणि अर्धपोटी लोकांनी या चळवळीत झोकून दिले होते. तेथील गरीब कास्तकार शेतकरी यांनी नांगराला लाल बावटा व खांद्याला बंदूक अडकवून या प्रश्नावर जमिनदाराविरुद्ध लढत दिली होती. पुढे या लढ्याला हिंसक रूप आले. जमिनदारांच्या धान्याची-संपत्तीची लुटालूट होऊ लागली. जमीनदारावर शस्त्रे उगारली जाऊ लागली. प्रसंगी जमिनदारांना जमिनीवरून हुसकावून लावून त्यांच्या जमिनीही शेतकऱ्यांनी ताब्यात घेतल्या. या तीन वर्षाच्या चळवळीत जाळपोळ, लुटालूट, खून या दहशतीच्या मार्गाने कम्युनिस्टांनी जवळजवळ ३० हजार एकर जमीन मिळविली होती. अर्थात या चळवळीस भाई उद्धवरावांचा नैतिक पाठिंबा होता. या हिंसक चळवळीच्या पार्श्वभूमीवर भुदानाची अहिंसक चळवळ विनोबा भावे यांनी सुरू केली. 'भारताची भूमिसमस्या सुटल्याखेरीज मी पवनारच्या आश्रमात पाऊल म्हणून ठेवणार नाही' अशी प्रतिज्ञा करून त्यांनी आपल्या भूदान यज्ञाचा प्रारंभ केला.

विनोबा भावे हे गांधीजींचे पट्ट शिष्य. अहिंसेच्या तत्त्वाने जीवन जगणारे. गांधीजीप्रमाणे गरीबांसाठी तळमळणारे. तेलंगणातील जमिनीच्या प्रश्नावरील हिंसाचाराने त्यांचे मन उद्विग्न झालेले. त्यातून ही भूदानाची अहिंसक चळवळ त्यांनी सुरू केली. तेलंगणात त्यांनी पायी दौरे सुरू केले. विनोबा जमीनदाराकडून एक षष्ठांश जमीन मागू लागले. "मी देवासाठी नैवद्य मागतोय. मला हा नैवद्य देणार

नसाल तर सर्वस्व गमावून बसाल.' 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्ध त्यजति पंडितः' या न्यायाने सारं गमावण्यापेक्षा शहाणा माणूस फक्त अर्धा भागच गमावतो." असे त्यांचे जमिनदारांना आवाहन असायचे. लोकांच्या हृदयपरिवर्तनावर त्यांचा विश्वास होता. या भूदान यज्ञातून ते अहिंसक क्रांती करू पाहत होते. कायद्याने जमीन वाटप करण्याची पूर्वतयारी या भूदानातून करत असल्याचे ते लोकांना सांगायचे. या आवाहनाला तेलंगणात म्हणावा तेवढा स्वेच्छेचा प्रतिसाद जमिनदारांनी दिला नाही. दहशतीमुळे काही जमिनी त्यांना दान मिळाल्या. त्याही मुरमाड, माळरानाच्या! पिकाऊ जमिनी फारच थोड्या मिळाल्या. तरीही विनोबांनी अडीच वर्षात २४ लक्ष एकर जमीन दान मिळविली. त्यातील बिहार आणि उत्तर प्रदेशातून अनुक्रमे तेरा लाख व पाच लाख एकर दान मिळाले. त्यामुळे हा शेतीप्रश्न सुटल्यास भुदान चळवळ हा चमत्कार ठरेल असे लोकांना-नेत्यांना वाटू लागले. सन १९५७ पूर्वी पाच कोटी एकराचे दान मिळवून जमिनीचा प्रश्न सोडविण्याचा विनोबांनी संकल्प केला होता.

पंडीत नेहरुंनी भुदानाची मुक्त कंठाने प्रशंसा केली. पंचवार्षिक योजनेच्या कर्त्यांनीही याला पाठिंबा दर्शविला. ग्रामीण विकासाच्या कार्यात भुदानाचा अंतर्भाव करावा, अशी त्यांनी शिफारसही केली. हे आंदोलन नैतिकदृष्ट्या अतिशय थोर होते. त्यामुळे या भूदान यज्ञात स्वप्नाळू माणसे सहभागी होऊ लागली. शंकरराव देव, आण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, दादा धर्माधिकारी आणि जयप्रकाश नारायण या चळवळीत उतरून विनोबाजींना साथ करू लागले. "आम्ही स्वतः थंडीत कुडकुडत असताना, भुकेने तडफडत असताना दगडाच्या मूर्तीला कपडे घालायचे, तिला दुध तूप मधाचा नैवद्य द्यायचा. तिच्याकरता घर म्हणजे मंदीर बांधायचे, हे नाटक कुठपर्यंत चालणार आहे?" असाही हे भुदानातील नेते प्रश्न विचारायचे. आर्थिक विषमता आणि अन्याय यांच्याप्रमाणे सामाजिक आणि धार्मिक विषमता यांचीही आहुती या भूदान यज्ञामध्ये पडेल. एवढेच नाहीतर समाजवादी पक्षाला अभिप्रेत असलेली वर्गहीन समाजरचना यातून पुढे निर्माण होईल, असा विश्वास त्यांना वाटत होता. यावर कम्युनिस्ट व डाव्या विचारांचे पक्ष सोडले तर इतर पक्षांची मान्यता होती.

कम्युनिस्ट आणि शे. का. पक्षांना मात्र या भुदान चळवळीने म्हणजेच एवढ्या सौम्य साधनाने जमिनीची समान वाटणी पूर्ण होईल, असे वाटत नव्हते. हृदय परिवर्तन या गोलमोल संकल्पनेवर त्यांचा विश्वास नव्हता. या भूदान यज्ञामुळे जमिनीचे तुकडे होतील, उत्पादन घटेल, सामुदायिक शेती करण्याच्या ध्येयापुढे अडचणी येतील. हे आक्षेप त्यांनी घेतलेच पण त्याहीपेक्षा जमिनदार सहजासहजी आपल्या जमिनी दान देतील, याबद्दलही पुर्वानुभवावरून ते साशंक होते. भुदान यज्ञानचं सर्वत्र कौतुक चालू असताना डाव्या पक्षांनी आणि प्रामुख्याने भाई उद्धवराव पाटील आणि त्यांच्या शे. का. पक्षाने या भूदान चळवळीस आपला वैचारिक-तात्विक विरोध असल्याचे स्पष्ट केले होते.

भाई उद्धवराव पाटील यांच्या राजकीय दूरदृष्टीचे एक उत्तम उदाहरण म्हणजे भूदान चळवळीला त्यांनी केलेल्या कडव्या विरोधाचे देता येईल. विनोबाजी भावे हे देशातील जमिनदारांचे हृदयपरिवर्तन करणे शक्य नाही. ज्या थोड्याफार जमिनदारांचे हृदयपरिवर्तन झाल्यासारखे दिसेल ते आपली उपजाऊ जमीन भुदानात देण्याऐवजी नापिकावू-माळरानाची जमीन भुदानात देऊन पुण्य मिळवितील. या भुदान यज्ञात दान मिळालेल्या जमिनीचे वाटप करण्याची स्वतंत्र यंत्रणा व त्यास कायदेशीर मान्यता याबाबीही निश्चित नसल्याने ही चळवळ यशस्वी होऊ शकणार नाही, हा उद्धवरावांचा दावा होता. याशिवाय ही भूदानाची चळवळ थोतांड तर आहेच पण ही चळवळ सरंजामदारांना आणि जमिनदारांना वाचविणारी आणि

अनुक्रमाणिका

त्यांना प्रशस्तीपत्रे देणारी चळवळ असल्याची जाहीर टीका शे. का. पक्षाने आणि प्रामुख्याने भाई उद्धवराव पाटील यांनी त्यावेळी केली होती.

चळवळीच्या संदर्भातील एक प्रसंग उद्धवरावांच्या तत्त्वाची कसोटी पाहाणारच ठरला होता. विनोबांची भूदान यात्रा कर्नाटकातून महाराष्ट्रात प्रवेश करणार होती. आचार्य विनोबा भावे यांच्या स्वागतासाठी ना. यशवंतराव चव्हाणापासून ते विरोधी पक्षाने सर्वांना सामावून घेणारी एक समिती स्थापन करण्यात आली. विरोधी पक्षातील साथी एस्. एम्. जोशी, आचार्य अत्रे, जयवंतराव टिळक, आर. डी. भंडारी अशी सर्व नेते मंडळी त्या समितीमध्ये होती. परंतु भाई उद्धवराव पाटील यांनी या स्वागत समितीमध्ये सहभागी होण्याचे चक्क नाकारले. ते त्यावेळी म्हणाले, "विनोबांच्या भूदानातून भारताची भूमीसमस्या कदापी सुटू शकणार नाही. त्यासाठी भूमी आंदोलनच केले पाहिजे." अशी स्पष्ट भूमिका घेऊन उद्धवरावांनी एक धोक्याचा इशारा दिला की, "या भूदान यज्ञामुळे शेतकरी-शेतमजुरांच्या मनात संभ्रम मात्र निर्माण होईल. त्यांच्या स्वागत समितीत सहभागी होऊन मी त्यांच्या संभ्रमात भर टाकू इच्छित नाही."

भुदान यज्ञाला राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांची मान्यता, विचारवंतांचा पाठिंबा आणि मूलगामी क्रांतीकडे वाटचाल करणारी चळवळ असा बोलबाला झाला असताना, तसेच विनोबाजींना कृषीक्रांतीचा अग्रदूत म्हणून मानले जात असताना भाई उद्धवराव पाटील यांचा भूदानाला विरोध म्हणजे मोठी आगळीकच म्हणावी लागेल. संवेदनशील पत्रकार असलेल्या आचार्य अत्र्यांना भाई उद्धवराव पाटलांची भूमिका आवडणे शक्यच नव्हते. ते त्यावेळी म्हणाले, "आचार्य विनोबाजींच्या स्वागत समितीवर बहिष्कार टाकणाऱ्यांना महाराष्ट्र कदापि क्षमा करणार नाही." असे म्हणून आचार्य अत्रे अतिशय उत्साहाने विनोबांच्या स्वागताला गेले. त्यांच्याबरोबर फिरले. आणि काय आश्चर्य, त्यांचाच भूदान आणि विनोबा यांचेबाबत भ्रमनिरास झाला असावा. कारण तिकडून परत मुंबईला आल्यानंतर त्यांनी 'दैनिक मराठा' पत्रात जे अग्रलेख लिहिले त्यांचे मथळेच भूदानावर आणि विनोबाजीवर प्रकाश टाकणारे होते. ते मथळे म्हणजे 'संत की जंत!', 'विनोबा की वानरोबा?' आचार्य अत्र्यांनी या लेखातून आचार्य विनोबा भावे आणि त्यांच्या भूदान यज्ञाचे वाभाडे काढले आहेत. यावरून उद्धवरावजीनी विनोबांच्या भूदान यज्ञाचे किती अचूक निदान केले होते, त्याबाबत यापेक्षा अधिक भाष्य करण्याची गरज वाटत नाही.

भारताची भूमीसमस्या सुटल्याखेरीज विनोबाजी पवनारच्या आश्रमात पाऊल ठेवणार नव्हते. तशी प्रतिज्ञाच त्यांनी केली होती. त्यांनी आपल्या मृत्यूपूर्वी आश्रमात पाऊले ठेवली असणारच. त्या वेळेपर्यंत नव्हे आतापर्यंत तरी 'भूदान चळवळीतून भारताची भूमिसमस्या संपलेली नाही. हे नक्की!' तेव्हा विनोबाजींच्या प्रतिज्ञेचे काय? असा प्रश्न विचारणं लहान तोंडी मोठा घास ठरेल! पण याबाबत एखाद्या अभ्यासकाने संशोधन करून त्याचे निष्कर्ष काढायला हरकत नसावी.

भाई उद्धवराव पाटील अर्थातच विनोबाच्या स्वागतासाठी तयार झालेल्या समितीत गेले नाहीत की त्यांच्या स्वागतालाही फुलेहार घेऊन गेले नाहीत. असे उद्धवराव तत्त्वाचे प्रामाणिक आणि खंबीर! पण पुढे जेव्हा विनोबा भावे उस्मानाबादला आले तेव्हा उद्धवराव त्यांच्या खाजगी भेटीला गेले. त्या भेटीत विनोबांनी उद्धवरावांच्या प्रामाणिकपणाबद्दल कौतुक केले. या कौतुकापेक्षाही उद्धवरावजी आपल्या सत्यमताबद्दल कसे ठाम आणि आग्रही होते. त्याचप्रमाणे विनोबाजींशी मतभेद असले तरी त्यांना भेटण्यास जाणं यातून उद्धवरावदादांचं सुसंस्कृत मन किती मोठं होतं, याचं प्रत्यंतर यामुळे सर्वांना येऊन गेलं!

अनुक्रमाणिका

पुढे जेव्हा जयप्रकाश नारायण यांनी भूदान चळवळीला जीवनदान देण्याचे ठरविले. तेव्हा त्यांना भूदान चळवळ म्हणजे भारतीय शेती सुधारणेतील ते क्रांतिकारक पाऊल वाटले. त्यावेळी त्यांच्या समाजवादी पक्षातील तत्त्वचिंतक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी भूदान चळवळीस तात्त्विक विरोध दर्शवला. ना. ग. गोरे या संबंधात म्हणाले, 'कसेल त्याची जमीन' या तत्त्वानुसार कुळकायदा व्हावा हा पक्षाचा पहिल्यापासूनचा आग्रह. ही समस्या सुटण्यासाठी भुदानचळवळ. हा प्रभावी मार्ग आहे, असे जयप्रकाशजींना वाटते. ह्याबद्दल माझी तक्रार नाही. तो जजमेंटचा प्रश्न आहे. पण तोच एकमेव मार्ग आहे आणि भुदानामुळे समाज बदलेल असे मात्र मला मुळीच वाटत नाही." आचार्य नरेंद्र देव यांनीही भुदानाबाबतचा आपला विरोध स्पष्टपणे नोंदवला आहे. "हृदयपरिवर्तनावर माझा विश्वास नाही. वर्गसमन्वय, ट्रस्टीशीप या भूमिका उदात्त वाटल्या तरी त्यामुळे हितसंबंध कायम राहतात आणि गरीबांना न्याय मिळत नाही. भूदानाची चळवळ समाजवादी आंदोलनाशी सुसंगत नाही.... जमीन वाटपाच्या प्रश्नावर चहूबाजूनी हल्ला करावा लागेल. भुदान चळवळ हा एका बाजुवरचा हल्ला आहे."

या भूदान चळवळीबद्दल समाजवादी पक्षातील नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी तात्त्विक आक्षेप घेतले होते. भूदान हा धर्मविचार असल्याचे सांगून विनोबांनी तंत्रमुक्तीचं खूळ या चळवळीतून उभं केलंय्. भूदानात जी जमीन मिळते ती चांगली का बरड-माळरान, ती भूमीहिनांना मिळते का, ती लागवडीखाली आणण्यास पुढे साह्य होतं का, या गोष्टींची फिकीर विनोबा करत नाहीत. भूदानाचा जमाखर्च ते मांडत नाहीत. भुदानाला बरड जमीनीची दानपत्रे देऊन जमीनदार प्रतिष्ठा मिळवतात. पण विनोबा पुढे गेले की, ते दानपत्राला कसलीच किंमत देत नाहीत. दान मिळालेल्या जमिनी भूमिहिनांच्या नावावर करण्याचेही राहून जाते. जमीन वाटपाची कायदेशीर यंत्रणाही भूदानात नव्हती. देशातील जमीन वाटपाचा प्रश्न या भूदानाने नव्हे तर चळवळीनेच सुटेल. त्यासाठी भूमीहिनांना लढाही पुकारावा लागेल. जमिनीसाठी असा लढा पुकारला तर भूमीहिनांना स्वत्वाची जाण येईल. भुदान चळवळीत असे लोक शिक्षण होतच नाही.

असे आक्षेप समाजवादी पक्षातील कार्यकर्त्यांनी घेतलेच पण त्याबरोबर श्री. जयप्रकाश नारायण यांच्या विचारातील विसंगतीवर ही बोट ठेवले होते. 'Why solialism?' या पुस्तकात जयप्रकाशजीनी बाबू भगवानदास यांच्या अध्यात्मिक भूमिकेचे खंडन करून बुद्धिवादावर आधारलेल्या ऐहिक जीवननिष्ठा मोलाच्या मानल्या होत्या. ही विचारधारा भुदान चळवळीत नेमकी उलटी झाली असल्याचे निदर्शनास आणून दिले गेले. तसेच 'चलेजाव' चळवळीत भूमिगत क्रांतीकारकचे नेतृत्व करताना जयप्रकाशजी 'गांधीजींनी सतत शुराची अहिंसा शिकवली आणि भ्याडपणापेक्षा हिंसा करणे पत्करीन', असे गांधीजींनी सांगितल्याचे जयप्रकाश बोलत. पण भुदानाच्या चळवळीत भ्याडपणापेक्षा चळवळीतून उद्भवणाऱ्या हिंसेचे त्यांना वावडे कां वाटावे? तेलंगणातील शेतकऱ्यांनी जमिनी मिळविण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली चळवळ उभी केली. त्या चळवळीतील हिंसाही होऊ लागल्या. पण त्यातून त्यांनी जमिनदाराकडून हजारो एकर जमिनी ताब्यात घेतल्याही. या हिंसेने व्यथित झालेले गांधीभक्त विनोबाजीनी प्रतीक्रांतीवादी भुदान चळवळ सुरू केली. पण ती तरी कडाला नेली का? 'भारताची भूमी समस्या सुटल्याखेरीज मी पवनारच्या आश्रमात पाऊल ठेवणार नाही.' या विनोबाजींच्या भीष्म प्रतिज्ञेचे पुढे काय झाले? जयप्रकाशजींनी भूदान चळवळीला जीवनदान दिले होते, ते तरी टिकेल काय? असे प्रश्न आजही सर्वांपुढे उभे राहतात.

या पार्श्वभूमीवर भाई उद्धवराव पाटील यांनी भुदान चळवळीला केलेला स्पष्ट विरोध, विनोबा भावे यांचे स्वागत करण्यासाठी विविध पक्ष नेत्यांनी तयार केलेल्या स्वागत समितीत सभासद होण्यास दिलेला

स्पष्ट नकार आणि देशातील जमिनीचा प्रश्न भुदानाने सुटणे अशक्य कोटीतील गोष्ट असून त्यासाठी चळवळच उभी करावी लागेल, ही उद्धवरावदादांची सडेतोड मते म्हणजे त्यांच्या राजकीय प्रश्नाच्या आकलन क्षमतेची आणि दूरदृष्टीची साक्ष देणारी आहेत.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण नववे**

## ।। संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे झुंजार सेनानी ।।

भाई उद्धवराव पाटील हे बहुजन समाजातून नव्याने उदयाला आलेले नेतृत्व. मुळातच प्रसिद्धी परांङ्मुख. त्यातच शहरातील पत्रकारांनी दुर्लक्षित केलेले. त्यामुळे वर्तमानपत्रात कधी गाजावाजा नाही. त्यामुळे त्यांचं मोठेपण समजायला उशीर झालेला. सुरुवातीला त्यांनी उस्मानाबादचे नेते म्हणून बोळवण केली जायची. पुढे मराठवाड्याचे नेते असल्याची मान्यता त्यांना द्यावी लागली. पण खऱ्या अर्थाने उद्धवरावांचं मोठेपण हे असं मर्यादित नव्हतं. त्यांची झेप मानवतेला गवसणी घालणारी होती. केशवसुतांच्या 'शूर शिपाई'चे ते प्रतिनिधी होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी हे नेतृत्व महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने परिचित झालं.

भाई उद्धवरावांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात स्वातंत्र्य सैनिक म्हणून काम केलेलं. जमिनदारी, सावकारशाही नेस्तनाबूत करण्याच्या चळवळी केलेल्या. शे. का. पक्षाच्या संस्थापक सदस्यापैकी ध्येयवादाने झपाटलेले एक आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जेव्हा क्षीण स्वरूपात होती, त्यावेळी हैद्राबाद विधानसभेत आमदार असताना मराठवाडा हा संयुक्त महाराष्ट्रात बिनशर्त सामील करण्याचे त्यांनी प्रयत्न केलेले. अशा पार्श्वभूमीवर बहरलेल्या उद्धवराव पाटलांच्या नेतृत्वाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीत उडी घेतली नसती तर नवल! संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात त्यांच्या नेतृत्व गुणाचा खरा कस लागला. महाराष्ट्रातील आणि प्रामुख्याने मराठवाड्यातील शेतकरी, शेतमजूर, दलित आणि स्त्रियांना चळवळीत आणणाऱ्या भाई उद्धवराव पाटील यांचे योगदान कुणी विसरूच शकत नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शहरी भाग कॉ. डांगे, आचार्य अत्रे आणि श्री. एस. एम. जोशी यांचा सांभाळला तर ग्रामीण भाग चळवळीत सामील करण्याचे काम या उद्धवराव पाटील आणि क्रांतीसिंह नाना पाटलांनी केले म्हणून चळवळीला मोठे क्रांतीकारक रूप आले. ते स्वरूप समजून घेण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास संक्षेपाने का होईना, पाहावा लागेल.

ब्रिटिश साम्राज्यवादी राज्यकर्त्यांनी राज्यकारभाराच्या सोईसाठी भारताच्या साम्राज्याची अकरा प्रांतात विभागणी केली होती. त्यांनी भाषिक एकजीनशीपणाकडे दुर्लक्ष केले होते. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत अखिल भारतीय काँग्रेस समितीने बहुभाषिक इलाखे रद्द करून भारताची भाषावार पुनर्रचना करण्याची म्हणजेच नवे भाषावार प्रांत निर्माण करण्याची मागणी सन १९२० मध्ये एका ठरावाद्वारे केली होती, एवढेच नव्हे तर काँग्रेसने आपल्या संघटनात्मक कार्यासाठी भाषावार प्रदेश काँग्रेस कमिट्याही नियुक्त केल्या होत्या.

सन १९३० मध्ये महाराष्ट्र एकीकरण समितीनेही संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली होती. त्यावेळचे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. केदार आणि बॅ. रामराव देशमुख हे या मागणीचे खंदे पुरस्कर्ते होते. सन १९३७ मध्ये दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राचा ठराव एक मताने पास झाला होता. तर १९४६ सालच्या बेळगांवच्या साहित्य संमेलनातही संमेलनाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबाबत ठराव पास करून घेतला होता. या ठरावात मराठी भाषिक राज्याचा भूप्रदेश व सीमारेषांचा स्पष्ट निर्देश केला होता.

अनुक्रमाणिका

सन १९३७ व १९४६ साली झालेल्या निवडणुकीत मराठी भाषिक प्रदेशातील लोकप्रतिनिधींची संख्या सर्वाधिक असूनही काँग्रेस पक्ष श्रेष्ठींनी बाळासाहेब खेरांचे नेतृत्व त्यांच्यावर लादले. परिणामस्वरूप मराठी भाषिक बहुजन समाजाचे नेतृत्व नाराज आणि असमाधानी होते. मराठी भाषिक प्रतिनिधींना मंत्रीमंडळात तर पुरेसे प्रतिनिधीत्व दिले नव्हतेच पण त्यांची गळपेची आणि मानहानी करण्याचेच धोरण त्यांनी ठेवले होते. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा प्रश्न ऐरणीवर आला. महाराष्ट्र काँग्रेसलाही संयुक्त महाराष्ट्र हवाच होता. त्यासाठी काँग्रेसचे जेष्ठ नेते श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'संयुक्त महाराष्ट्र परिषदे' ची स्थापना झाली होती. त्यांनीही स्वातंत्र्यपूर्व काळात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठपुरावा केला होता.

घटना परिषदेने भाषावार प्रांत रचनेच्या प्रश्नाबाबत दार आयोगाची नियुक्ती केली. ८ ऑगस्ट १९४७ रोजी महाराष्ट्र, वऱ्हाड आणि नागपूर भागातील मराठी भाषिक नेत्यांनी 'अकोला करार' करून संयुक्त महाराष्ट्र या वेगळ्या प्रांतनिर्मितीची मागणी केली. पण दार आयोग आणि 'जेव्हीपी' समितीने भाषावार प्रांतरचनेमुळे भारताची छोट्या छोट्या प्रांतात विभागणी होईल व ती भारताच्या ऐक्याला धोकादायक ठरेल, हे कारण सांगून संयुक्त महाराष्ट्राची मागणी नाकारली. आणि काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळात घेतलेली भूमिका स्वातंत्र्य मिळाल्यावर पूर्णपणे बदलली. 'दार आयोग' आणि 'जेव्हीपी समिती'चे अहवाल येईपर्यंत महाराष्ट्र काँग्रेसने शंकरराव देवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या 'संयुक्त महाराष्ट्र परिषदे'च्या व्यासपीठावरून संयुक्त महाराष्ट्राची मागणी चालू ठेवली होती पण काँग्रेस श्रेष्ठींचा आणि मुख्यतः नेहरुंचा त्याला विरोध असल्याचे पाहून त्यांची कोंडी झाली होती.

हैद्राबाद संस्थानात तेलगू, मराठी आणि कन्नड भाषिक प्रदेश एकत्र होते. ते तसेच राहावेत, अशी नेहरुंची भूमिका होती. पण आंध्रमधील तेलगू भाषिकांना तेलगू भाषिकांचे स्वतंत्र राज्य हवे होते. या मागणीसाठी सन १९५३ मध्ये आंध्रचे एक स्वातंत्र्य सैनिक पोट्टी श्रीरामलू यांचा आमरण उपोषणात मृत्यू झाल्याने जनता प्रक्षुब्ध झाली आणि नेहरुंना तेलगू भाषिकांच्या आंध्र प्रदेश या स्वतंत्र राज्याला मान्यता द्यावी लागली. त्यामुळे भाषावार प्रांतरचनेला नैतिक वाट मिळाली आणि महाराष्ट्रातील मराठी भाषिकांच्या चळवळीला आधार प्रेरणा मिळाली. तरीही केंद्रिय नेत्यांचा संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला विरोधच होता.

भारतीय संघराज्यात घटक राज्यांची रचना कशी असावी, हे निश्चित करण्यासाठी केंद्राने फाजलअली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोग नेमला. या आयोगाने ही सन १९५५ मध्ये अन्य ठिकाणी भाषावार राज्ये मान्य केली पण महाराष्ट्र आणि पंजाब यांच्याबाबत वेगळे निर्णय घेतले. पंजाबी सुभ्याच्या आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. त्यांनी विदर्भ वगळून उर्वरित महाराष्ट्र आणि गुजराथ अशा द्वैभाषिक राज्याची शिफारस केली. ही शिफारस मराठी भाषिकांनी नाकारली. तेव्हा केंद्र सरकारने मुंबईचे स्वतंत्र राज्य, विदर्भासह महाराष्ट्राचे राज्य आणि महागुजराथ अशी त्रिराज्य योजना जाहीर केली. हा महाराष्ट्रावर घोर अन्यायच होता. त्याला मुंबई विधानसभेत एस्. एम्. जोशींनी स्पष्ट विरोध केला आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांनी मोठमोठ्या निषेधाच्या सभा घेऊन या निर्णयाचा धिक्कार केला. बेळगावपासून जळगावपर्यंत हरताळ, मोर्चे आणि निदर्शने यांचा धमाका सुरू झाला. 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' या घोषणांनी महाराष्ट्र हादरून गेला. यात महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांनी अर्थातच भाग घेतला नाही. आणि संयुक्त महाराष्ट्राचा दुसरा धगधगता टप्पा सुरू झाला.

अनुक्रमाणिका

काँग्रेसतर सर्व पक्षांनी या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबई शहरात कडकडीत हडताळ केला. २२ डिसेंबर १९५५ रोजी मुंबई महापालिकेत मुंबई शहर हे महाराष्ट्रातच समाविष्ट करण्याबद्दल त्यांनी बहुमताने ठराव पास केला. काँग्रेस पक्षाच्या अनेक सदस्यांनी पक्षाचा आदेश झुगारून देऊन या ठरावाला पाठिंबा दिला. २७ डिसेंबर १९५५ ला मुंबई राज्याचे दारुबंदी मंत्री डॉ. नरवणे यांनी मंत्रीपदाचा व काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा देऊन 'मुंबई जन काँग्रेस' पक्षाची स्थापना केली. असे असतानाही १६ जानेवारी १९५६ रोजी मुंबई शहर केंद्रशासित करण्याचा निर्णय घोषित झाला. आगीत तेल पडले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा भडका उडाला.

दिनांक १७ ते २२ जानेवारी १९५६ या काळात मुंबई शहरात या निर्णयाविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. मोठ्या प्रमाणात दंगे झाले. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी 'दिसता क्षणी गोळ्या झाडा'चा आदेश पोलिसांना दिला. गोळीबारात १०५ निरपराध माणसे मृत्यूमुखी पडली. संयुक्त महाराष्ट्रासाठी ते हुतात्मे झाल्याची भावना जनमाणसात रुजली. काँग्रेसेतर पक्षांनी ८ फेब्रुवारी १९५६ रोजी 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ची स्थापना केली. या पोलिसी अत्याचाराचा निषेध म्हणून भारताचे अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुखांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. पण पक्षश्रेष्ठींच्या दबावापुढे मुंबई राज्यातील मंत्र्यांनी राजीनामे देण्याची इच्छा असतानाही नांगी टाकली आणि १९५६ पासून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ निर्णायक अवस्थेला येऊन ठेपली.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेण्यासाठी विरोधकांनी आपापल्या पक्षाच्या बैठका घेतल्या. त्याप्रमाणे शेतकरी कामगार पक्षानेही आपल्या पक्षकार्यकर्त्यांची बैठक घेतली. या बैठकीला सर्वश्री जी. डी. लाड, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, इस्लामपूरचे एन. डी. पाटील आणि कार्यकर्ते हजर होते. भाऊसाहेब राऊत यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा सुरू झाली. बैठकीत 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' करण्याबाबत एकमत होते पण तरीही एकदोघा कार्यकर्त्यांनी आडवे प्रश्न विचारलेच. भाई उद्धवरावांनी त्यांच्या प्रश्नांवर सडेतोड युक्तीवाद करून चांगलेच झापले. बैठकीत पक्षाची कृती-समिती निवडण्यात आली. अध्यक्षीय भाषणापूर्वी भाई उद्धवरावांनी पुन्हा आपले मुद्दे आवेशपूर्ण शैलीत मांडले. ते म्हणाले,"संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर महाराष्ट्रातील राजकीय पक्षात मतभेद नाहीत हे खरं असलं तरी अखिल भारतीय पक्षात या प्रश्नावर दुफळी माजेल, असं मला वाटतं. अनेक काँग्रेसवाल्यांना मुंबई महाराष्ट्रापासून तोडणं मान्य नव्हतं. पण पंडित नेहरुंच्या विरुद्ध बोलण्याची त्यांची हिम्मत नाही. शिवाय काँग्रेस आमदार गुळाला चिटकून बसणाऱ्या मुंगळ्यासारखे सत्तेला चिटकून बसतील. ते कधी बंडखोरी करणार नाहीत. सोशॉलिस्ट पक्षात मतभेद होतील. कम्युनिस्ट पक्षाचा थीसिस हिंदुस्थानात अनेक नॅशनॅलिटिज आहेत. असा आहे. त्यामुळं ते लढ्यात येतील. जनसंघ हा युनिटरी कॉन्स्टिट्यूशन असावी असं म्हणणारा आहे. त्यामुळे ते या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेणार नाहीत. आपला पक्षच मराठी जनतेचं खरं प्रतिनिधित्व करील. अखिल भारतीय राजकारणाचा अडसर आपल्या मार्गात नाही. खऱ्या अर्थाने बहुजन समाजापर्यंत आपलाच पक्ष पोचलेला आहे. ह्यावेळी आपण लढ्यात अग्रेसर राहिलं पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शेतकरी व कामगार ह्यांची टिकाऊ फळी आपल्याला उभी करायची आहे. आपल्यात मतभेद नाहीत. आपले कार्यकर्ते महाराष्ट्राच्या, मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यापर्यंत पसरले आहेत. आपण सर्वस्व पणाला लावून महाराष्ट्रावरील अन्याय दूर केला पाहिजे. मुंबई, बेळगाव, कारवार, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र आपल्याला निर्माण करायचाय."

उद्धवरावदादांच्या भाषणाला शेवटी टाळ्यांचा कडकडाट झाला.

अनुक्रमाणिका

काँग्रेसेतर सर्व राजकीय पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून 'मुंबई, विदर्भ, मराठवाडा, बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' या निर्धाराने चळवळीला सुरुवात केली. या समितीमध्ये सर्व विरोधी पक्षाच्या एकूण तीस सदस्यांचा समावेश होता. एस. एम. जोशी हे तिचे सेक्रेटरी होते. १ ऑक्टोबर १९५६ रोजी शिवाजी पार्कवर संयुक्त महाराष्ट्र समिती नेत्यांची परिषद भरली. त्यात भाई उद्धवराव पाटील समितीचे शे. का. पक्षाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते त्यात केंद्र सरकार हे महाराष्ट्रावर करीत असलेल्या अन्यायाविरुद्ध प्रखर आंदोलन उभारण्याचा निर्णय झाला. संयुक्त महाराष्ट्र समितीने या प्रश्नावर राज्यव्यापी आंदोलन सुरू केले.

शहरी भागात कॉ. डांगे, एस. एम. जोशी आणि आचार्य अत्रे यांच्या तोफा गडगडू लागल्या. ग्रामीण भागात क्रांतिसिंह नाना पाटील आणि भाई उद्धवराव पाटील यांनी सारे रान पेटविले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोर्चे आणि सत्याग्रहात उद्धवराव पाटील अग्रणी असायचे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विरोधात मोरारजी देसाईनी अश्रूधूर सोडले. लाठीमार केले. उद्धवरावांना पोलिसांच्या लाठ्यांचा मार बसला. त्यांच्या गुडघ्याला जखम झाली. तेव्हा त्यांना दवाखान्यात जाऊन उपचार करून घेण्याची सूचना केली. पण उद्धवरावांनी त्यास स्पष्ट नकार दिला आणि तशाही परिस्थितीत सत्याग्रह करून अटक करवून घेतली. ऑर्थर रोड तुरुंगात त्यांना डांबले. तेथे तुरुंगातील डॉक्टरकडून त्यांनी गुडघ्यावर उपचार करून घेतले.

या वेगवान घटनामुळे काँग्रेसपक्ष हादरून गेला. त्रिराज्यसूत्र आणि मुंबई महानगर केंद्रशासित ठेवणे लोकक्षोभापुढे टिकणार नाही. म्हणून केंद्र शासनाने मुंबईसह मराठी भाषिक आणि गुजराथी भाषिक प्रदेशाचा समावेश करून विशाल मुंबई राज्याच्या स्थापनेचा निर्णय दि. २४ जुलै १९५६ रोजी संसदेत पास केला. आणि १ नोव्हेंबर १९५६ रोजी या मुंबईसह द्विभाषिकराज्याचे पहिले व शेवटचे मुख्यमंत्री म्हणून ना. यशवंतराव चव्हाणांनी जबाबदारी स्वीकारली. ही योजना धड महाराष्ट्राला आणि गुजराथलाही मान्य नव्हती. त्यामुळे लोकांच्या असंतोषात भरच पडली. या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत १२५ जण हुतात्मे झाले. हजारो स्त्री-पुरुषांनी सत्याग्रह केले. ३२ आमदारांनी द्विभाषिकाला विरोध म्हणून राजिनामे दिले. या पार्श्वभूमीवर १९५७ ची निवडणुक काँग्रेसेतर पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे लढविण्याचे जाहीर केले.

सन १९५७ च्या निवडणुकीत महाराष्ट्रातील वातावरण काँग्रेसविरुद्ध चांगलेच तापले होते. त्याचा फायदा विरोधी पक्षांनी जागा वाटपात समंजसपणा दाखवून उठवला असता तर संयुक्त महाराष्ट्र समितीच सत्तेवर आली असती. पण घटक पक्षांनी जागा वाटपात अतिशयोक्तीपूर्ण दावे केल्याने समितीत तीव्र मतभेद झाले पण लोकेच्छेच्या दबावाखाली त्यांना मुंबई शहर, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रापुरता जागा वाटपाचा समझोता करावा लागला. मराठवाडा आणि विदर्भात एकमत होऊ शकले नाही. त्यात काँग्रेस पक्षाचे नेते मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी समंजस व समन्वयवादी भूमिका घेतली तर संयुक्त महाराष्ट्र समितीची प्रचार मोहिम अत्यंत आक्रमक स्वरूपाची होती. या निवडणूकीत विधानसभेच्या २६४ जागापैकी समितीने १२९ आणि लोकसभेच्या ४४ पैकी २३ जागा जिंकल्या. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मुंबई शहरात काँग्रेसचं पानिपत झालं. काँग्रेसचे अनेक जेष्ठ नेते पराभूत झाले. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीतही संयुक्त महाराष्ट्र समितीने काँग्रेसला पराभूत केले. लोकक्षोभाचे चटके काँग्रेसला अनुभवायला मिळाले पण गुजराथमधील काँग्रेसच्या आमदारांच्या संख्येमुळे काँग्रेसला निसटते बहुमत मिळाले. पुन्हा ना. यशवंतरावजी मुख्यमंत्री झाले.

अनुक्रमाणिका

ना. यशवंतराव चव्हाण हे चतुर राजकारणी. त्यांनी प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ शिवपुतळा बसविला. त्याचे अनावरण करण्यासाठी पंतप्रधान पंडित नेहरुंना आमंत्रित केले. पुतळा अनावरणाचा कार्यक्रम दि. ३० नोव्हेंबर ५७ रोजी व्हायचा होता. तेव्हा समितीमध्ये मतभेद असतानाही एस. एम. जोशींनी नेहरुपुढे शांततापूर्ण निदर्शने करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेण्यात भाई उद्धवरावांचा आग्रह आणि सहभाग मोठा होता. शिवपुतळ्याचे अनावरण करण्याचा दिवस उगवला. भाई उद्धवरावांनी ग्रामीण भागातील लोकांचे लोंढेच्या लोंढे खेचून आणले. शिवपुतळ्याचे अनावरण करण्यास नेहरु येत असताना त्यांच्या मार्गावर मराठी भाषिक जनतेने रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शिस्तीत उभे राहून प्रचंड निदर्शने केली. वाईपासून पसरणीच्या घाटापर्यंत जाईपर्यंत 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.' या निदर्शकांच्या घोषणा नेहरुंच्या कानावर आदळत होत्या. त्या काळात भाई उद्धवराव पाटील हे विधानसभेत एस्. एम्. जोशीनंतर विरोधी पक्ष नेते होते. विधानसभेतही त्यांनी आपल्या घणाघाती, तर्कशुद्ध भाषणांनी सत्ताधारी काँग्रेस पक्षाची सळो की पळो अशी स्थिती करून सोडली. आणि अनेकवेळी मुख्यमंत्र्यांची बोलती बंद केली. एवढेच नाही तर उद्धवरावदादांनी यशवंतरावजींच्या नेहरुभक्तीसही आव्हान दिले होते. व्यक्तीपेक्षा महाराष्ट्र मोठा, हेच त्यातून त्यांना सुचवायचे होते.

प्रतापगडावरील अश्वारूढ शिवपुतळ्याचे अनावरण केल्यानंतर नेहरूंना महाराष्ट्रातील लोकक्षोभाची खरी जाण आली. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष वाचविण्यासाठी अखेर नेहरूनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आणि गुजराथ राज्याच्या निर्मितीस मान्यता दिली. आणि १ मे १९६० रोजी या नव्या राज्याचे उद्‌घाटन करून लोकशाहीत लोकेच्छेचं महत्त्व मान्य केले.

भाई उद्धवराव पाटील हे सुरुवातीपासून संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आघाडीवर होते. "भाषावार प्रांतरचना ही मराठी जनतेच्या न्याय्य हक्काची चळवळ आहे. ती कोणीही दडपू शकणार नाही." हे त्यांचे आग्रही मत होते, तेच शेवटी खरे ठरले.

जेव्हा भाई उद्धवराव पाटील हे शे. का. पक्षाचे प्रतिनिधी म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीत काम करू लागले तेव्हापासून या चळवळीला त्यांनी एक वेगळीच धार आणली. महाराष्ट्रातील ग्रामीण भाग त्यांनी आपल्या बुलंद आवाजाने ढवळून काढला. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे, अस्मितेचे वारे सर्वत्र खेळू लागले. इंग्रजाविरुद्धच्या गांधींच्या 'चलेजाव' चळवळीनंतर महाराष्ट्रात झालेली ही चळवळ ग्रामीण भागात पोहचविण्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांचेबरोबर भाई उद्धवरावदादांचा सिंहाचा वाटा होता. शेतकरी, शेतमजूर, श्रमिकदलित आणि स्त्रिया या सर्वांनी मोठ्या संख्येने केवळ उद्धवरावांच्या शब्दाखातर या चळवळीत झोकून दिले होते. ग्रामीण भागातून सत्याग्रहासाठी उद्धवरावांनी गटामागून अनेक गट तयार करून पाठविले होते. त्यामुळे शासनाचे तुरुंग अपुरे पडले. या कामी बार्शीचे महाराष्ट्र शाहीर अमरशेख आणि मोहळचे लोकशाहीर विश्वासराव फाटे यांच्या कलापथकाची सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यात जागृती करण्यास भाई उद्धवरावजींना फार चांगली साथ मिळाली होती.

एक चक्रीवादळ येऊन गेल्यावर जशी पडझड होते. तशी काँग्रेसशी पडझड १९५७ च्या निवडणूकीत झाली होती. त्यात उद्धवरावांच्या वादळाचाही मोठा हिस्सा होता. एस्. एम्. जोशी यांच्यानंतर भाई उद्धवरावदादांना मिळालेलं विधानसभेतील विरोधीपक्ष नेतेपद पांढरपेशीना खुपले. त्यांची टिंगळटवाळीही झाली. पण संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील त्यांच्या झंझावती कर्तृत्वामुळं त्या अग्नीपरीक्षेतूनही ते सोन्यासारखे तावून सुलाखून अधिकच लखलखीत झाले.

अनुक्रमाणिका

संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्लीत मोठा मोर्चा नेला होता. मोर्चाचे रुपांतर शेवटी जाहीर सभेत झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दल बिगरमराठी जनतेत बरेचसे गैरसमज होते. सभेत काही वक्ते मराठीत तर काही मोडक्यातोडक्या हिंदीत बोलले. सभेला शीख व उत्तर भारतातील लोकांची उपस्थिती लक्षणीय होती. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाची न्याय्य बाजू भाई उद्धवरावांनी आपल्या अस्खलित उर्दू भाषेतून प्रभावीपणे मांडली. त्याला बिगरमराठी श्रोत्यांनी वारंवार दाद दिली. भाई उद्धवराव हे मराठी भाषेतील प्रभावी वक्ते पण उर्दूतही तितक्याच प्रभावीपणे ते बोलतात हे सर्वांना प्रथमच जाणवले. दुसऱ्या दिवशीच्या दिल्लीतील वर्तमानपत्रात भाई उद्धवरावजीचे भाषण झळकले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळण्यापूर्वी दिल्लीत निघालेला मोर्चात भाई उद्धवराव हिरो ठरले होते.

या ऐतिहासिक संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाई उद्धवरावदादांनी जीवाचे रान केले. अपार कष्ट उपसले. त्यामुळेच शेवटी मुंबईसह महाराष्ट्राचा मंगल कलश महाराष्ट्राला मिळाला. तो दिल्लीहून ज्यांनी आणला त्यांना जेवढे महत्त्व आहे, त्यापेक्षाही हा मंगलकलश महाराष्ट्राला द्यायला ज्यांनी केंद्राला भाग पाडले, त्यांचे महत्त्व कोण नाकारील?

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण दहावे**

## ।। सीमा चळवळीचे समर्थ सरसेनापती ।।

१ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे राज्य मिळाले. 'आम्ही जिंकलो' या आनंदात काँग्रेस पक्षाबरोबरच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ करणारेही मशगूल झाले. सदर आनंद परिपूर्ण नव्हता, याचेही भान कार्यकर्त्यांना राहिले नव्हते. पण विरोधी पक्षनेत्यांना असे भान सोडून चालत नसते. लोकांच्या भावनाआणि विचार यांचा जो सुंदर मेळ घालतो, तो खरा नेता असतो. एस. एम. जोशी आणि भाई उद्धवराव पाटील हे असे भान असणारे नेते होते. त्यांनी मुंबईसह महाराष्ट्र राज्य सुरू झालेल्या घटनेवर विचार करण्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र समिती'ची बैठक बोलावली. त्या बैठकीत भाई उद्धवराव पाटील यांनी "हा विजय अपुरा आहे. सीमा भाग महाराष्ट्रात समाविष्ट झाल्यानेच तो पूरा होईल. सीमा भागासाठी लढा दिल्याशिवाय झोपेचं सोंग घेतलेल्या केंद्र सरकारला जाग येणार नाही. लोखंड तापलेलं आहे. तोवर घाव घातले पाहिजेत." असे सांगून त्यांनी बेळगांव, कारवार, निपाणी आणि भालकी हा सीमाप्रदेश महाराष्ट्रात सामील होण्याची गरज पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी पुन्हा चळवळ उभी करावी लागली तर ती ही उभारावी लागेल याची गरजही प्रतिपादन केली.

सदर बैठकीत श्री. एस. एम. जोशी हे उद्धवरावदादांच्या मताचेच होते. ते सर्वांना पोट तिडकीने म्हणाले, "आपली मागणी केवळ मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे, अशी नव्हती. आपली मागणी 'मुंबई, बेळगाव, कारवार, निपाणी, भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशी होती. आपण तडजोड न स्वीकारता आपल्या संपूर्ण मागणीचा प्रश्न आत्ताच धसाला लावावा. आता या प्रश्नाचा निकाल लावून घेतला नाही तर कदाचित तो दीर्घकाळ लोंबकळत पडेल आणि सीमा भागातील आपल्या बांधवाशी आपण प्रतारणा केली असे होईल!"

भाई उद्धवराव पाटील आणि श्री. एस. एम. जोशी यांच्या या म्हणण्याला संयुक्त महाराष्ट्र समितीत पुरेसा पाठिंबा मिळू शकला नाही. तरीही समितीमधील भाई उद्धवराव पाटील, कॉ. व्ही. डी. चितळे, दत्ता देशमुख, दाजीबा देसाई आणि एस. एम. जोशी यांनी या प्रश्नासाठी जीवाचे रान केले.

हा सीमा प्रश्नाचा इतिहास तसा मोठा आहे. त्याची संक्षेपाने माहिती घेणे आणि त्यामधील भाई उद्धवराव पाटील यांचे योगदान पहाणे ही बाब गरजेची वाटते.

सन १९२१ सालीच काँग्रेसने हा बेळगाव जिल्हा कर्नाटक प्रांतिक काँग्रेस कमिटीत घालण्याऐवजी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस समितीत घातला असता तर सीमाप्रश्नाचे पुढील महाभारत घडले नसते. सातारा आणि बेळगाव यांच्यामध्ये पूर्वी विविध संस्थाने होती. त्यावेळी संस्थांनी मुलखात काँग्रेस कार्यरत नव्हती. त्यावेळी बेळगाव भौगोलिक कारणामुळे कर्नाटक प्रांतिक काँग्रेसमध्ये घातला गेला. पण पुढे संस्थाने भारतात सामील करून घेतल्यानंतर परिस्थिती बदलली. बेळगांव हा मराठी भाषिक प्रदेश असूनही राज्य पुनर्रचना आयोगापुढे तो महाराष्ट्रात घालण्यासाठी डाळ शिजली नाही. तरीही फाजल अली कमिशनने आपल्या अहवालात "बेल्लारी आंध्रला न देता कर्नाटकास दिल्यास बेळगाव महाराष्ट्रात घातला पाहिजे." अशा अर्थाचे मत नोंदवले होते. पण त्याचा केंद्रशासनाने विचारच केला नाही. मराठी भाषिक सीमा भाग

महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीने पहिल्यापासून आग्रह धरला होता. त्यासाठी सीमा लढाही प्राणपणाने लढविला होता. हा इतिहास कोणीही विसरणार नाही.

१६ जानेवारी १९५६ रोजी नेहरुंनी राज्य पुनर्रचना कमिशनच्या महाराष्ट्रावरील अन्यायी शिफारसी स्वीकारल्यानंतर सीमा भागात आगडोंब उसळला. १७ जानेवारी १९५६ हा दिवस म्हैसूर शासनाच्या गोळीबारामुळे रक्तलांच्छित दिन ठरला. त्यात पाच हुतात्मे झाले. १९५७ च्या निवडणुका महाराष्ट्र एकीकरण समितीने जिंकल्या. महाराष्ट्रातही संयुक्त महाराष्ट्र समितीने कॉंग्रेसचे पानिपत केले. पण द्विभाषीक राज्यातील गुजराथच्या कॉंग्रेस आमदारांच्या आधिक्यामुळे कॉंग्रेसला निसटते बहुमत मिळाले. ना. यशवंतरावजी चव्हाण द्विभाषीकाचे मुख्यमंत्री झाले. खरे पाहिले तर संयुक्त महाराष्ट्र समितीने जो लढा सुरू केला होता. तो केवळ मुंबईसाठी नव्हता तर सीमा भागासाठीही होता.

१ नोव्हेंबर १९५७ मध्ये भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखालील सीमा सत्याग्रह खूपच गाजला. हा सीमा सत्याग्रह यशस्वी करण्यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील, भाई उद्धवराव पाटील यांनी हजारो सत्याग्रहींना आपल्या सभातून प्रेरणा देऊन तयार केले होते. सोळा हजार सत्याग्रहींनी त्यावेळी सीमा सत्याग्रहात भाग घेतला होता. या सत्याग्रहीनी लाठीमार आणि तुरुंगवास पत्करला होता. भाई उद्धवराव पाटील यांनाही लाठीमार खावा लागला होता. बेळगांव येथील हिंडलगा जेलमध्ये त्यांना तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली होती. त्यावेळी सीमा सत्याग्रहात सामील झालेल्या महिला नेत्या अहिल्या रांगणेकर याही तुरुंगात भाईउद्धवरावाच्या बरोबरीने शिक्षा भोगत होत्या. सुदैवाने त्या दोघांनाही तुरुंगात ‘अ’ दर्जा दिला होता. ‘अ’ दर्जा मिळाला असल्याने उद्धवराव दादांना चांगले जेवण दिले जायचे. पण दादांनी आपल्या जेवणातील दूध, पाव, भाज्या, भात हे पदार्थ ‘क’ वर्गातील सत्याग्रहींना खायला द्यायचे आणि त्यांना मिळत असलेले निकृष्ट जेवण ते स्वतः घेत असायचे. शासनाने सत्याग्रहीत दर्जा देऊन वर्ग पाडले पण वर्ग व्यवस्थेविरुद्ध लढणारे उद्धवराव अशा तऱ्हेने खालच्या दर्जामध्ये घातलेल्या सत्याग्रहींना माणुसकीची जमेल ती वागणूक देऊन वर्गभेद नाहीसा करण्याचा संदेशच देत नव्हते काय? अशा तऱ्हेने भाई माधवराव बांगलांच्या नेतृत्वाखालील सीमा सत्याग्रह पूर्णपणे यशस्वी झाला होता. पण त्याकडेही केंद्रशासनाने हेतुपुरस्सर डोळे झाक केली होती.

केंद्र सरकारचे डोळे उघडावेत, त्यांची सोंगी-ढोंगी झोप उडून जावी. मुंबई आणि सीमाभागासह संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष कटाक्षाने वेधावे, यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्यावतीने दिनांक १८ डिसेंबर १९५८ रोजी दिल्लीतील संसदभवनावर मोर्चा नेला. त्यावेळी सीमा भागातील १२०० लोक त्यात सामील झाले होते. त्यावेळी या मोर्चात ‘सीमा प्रश्नाची तड लावा’ ही घोषणा प्रामुख्याने देण्याचे ठरले असताना मुंबईकर मोर्चेवाल्यांनी ‘आम्हाला मुंबई हवी’ या घोषणेवर भर दिला. शेवटी मोर्चाचे रुपांतर जंगी सभेत झाले. सभेला दिल्लीकरांनी जशी गर्दी केली त्याप्रमाणे शिख आणि उत्तर प्रदेशातील लोकांनीही गर्दी केली होती. या सभेतील भाई उद्धवराव पाटील यांचे उर्दूतून केलेले भाषण खूपच गाजले. बिगर मराठी श्रोत्यांना मुंबई, बेळगाव, कारवार, भालकी आदी मराठी भाषिक सीमा भाग संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट का केला पाहिजे, याबद्दल भाई उद्धवरावांनी उर्दूभाषेतून तर्कशुद्ध विचार मांडले. त्याला श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. एवढेच नाहीतर दिल्लीतील वर्तमानपत्रांनीही उद्धवरावांच्या भाषणाला पहिल्या पानावर ठळक प्रसिद्धी दिली होती. पण कॉंग्रेस श्रेष्ठींनी आणि कर्नाटकांच्या नेत्यांनी एकत्र येऊन केलेल्या सौदेबाजीतून व संयुक्त महाराष्ट्रातील काही पुढाऱ्यांच्या बोटचेपी धोरणामुळे हा मराठीभाषिक सीमा प्रश्न

तसाच लोंबकळत राहिला. तरीही भाई उद्धवराव पाटील आणि महाराष्ट्रातील जनतेने या प्रश्नावर अभूतपूर्व चळवळ चालूच ठेवली होती.

मुंबईसह महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर काही विरोधी पक्षांना देखील संयुक्त महाराष्ट्र समितीचे ऐतिहासिक कार्य संपल्यासारखे वाटले. संयुक्त महाराष्ट्र समितीत फूट पडली. पण त्यातील सीमा लढा समिती शिल्लक राहिली. त्या समितीने हा सीमा प्रश्न हाती घेतला. या समितीमध्ये प्रामुख्याने भाई उद्धवराव पाटील कॉ. व्ही. डी. चितळे, दत्ता देशमुख आणि एस. एम. जोशी कार्यरत होते. या समितीच्या वतीने सीमा भागात 'सारा बंदी' हा ऐतिहासिक लढा संघटित करण्यात आला. सीमा भागात त्या अगोदर अनेकांनी दोन वेळा सत्याग्रह करून तुरुंगवास पत्करले होते पण 'साराबंदी' चा लढा हा त्यावरचा कळस होता. या लढ्यात सीमा भागातील शंभरेक खेड्यातील शेतकरी सामील झाले होते. या लढ्याचे सरसेनापती अर्थातच भाई उद्धवराव पाटील होते. त्यांनी हे नेतृत्व समर्थपणे सांभाळले. सरकारने अनेक प्रकारची दडपशाही करूनदेखील शेतकऱ्यांनी शेवटपर्यंत सारा भरला नाही. एवढेच नाही तर सरकारने जमिनीचे लिलाव पुकारून त्यातून सारा वसूल करण्याचे प्रयत्न आरंभिले पण शेतकरी वर्गाची एकजूट भाई उद्धवरावदादांनी इतकी पक्की केली होती की जमिनीच्या लिलावासाठी कोणी माणूस पुढे येऊ शकला नाही. शेवटी सरकारने शेतकऱ्यांच्या घरांचे दरवाजे बळजबरीने फोडून घरातील चीजवस्तू, धनधान्य लुटून नेण्यास सुरुवात केली. या दडपशाहीचा उद्रेक म्हणजे येळ्ळूर गावाला पोलीसांचा वेढा पडला. या दडपशाहीला तोंड देण्यासाठी भाई उद्धवराव पाटील प्रथम पुढे सरसावले. त्यांनी पोलिसांची दडपशाही हाणून पाडण्यासाठी निधड्या छातीने पुढाकार घेतला. त्यावेळी उद्धवरावांना पकडून तुरुंगात डांबले पण त्यानंतर पोलीसांची दडपशाही कमी झाली आणि कायद्याप्रमाणे शासनाने जप्ती सुरू केली. येळ्ळूर गावावर आलेली पोलिसी टोळधाड आणि त्या टोळधाडी विरुद्धच्या प्रतिकारासाठी उद्धवरावांनी टाकलेले खंबीर पाऊल या गोष्टी येळ्ळूरचे लोक कधीही विसरणे शक्य नाही.

उद्धवरावदादांनी सीमा लढ्यात हा ऐतिहासिक स्वरुपाचा साराबंदी लढा तर समर्थपणे लढविलाच पण त्याबरोबरच त्यांनी इतर पुढाऱ्याबरोबर बेळगाव- कारवार सीमा भागात अनेक दौरे काढले. सीमा लढ्यातील सुसंगत आणि शास्त्रशुद्ध भूमिका आपल्या सडेतोड भाषणांनी अनेकांना पटवून दिली. उद्धवराव पाटलांच्या मागे शे. का. पक्ष आणि इतर डावेपक्ष खंबीरपणाने उभे राहिले. सीमा भागातील उद्धवरावांची कामगिरी लढ्यातील सरसेनापतीला शोभणारी अशीच होती. यामुळे सीमा भागातील जनतेमध्ये उद्धवरावांबद्दल प्रचंड आदर आणि प्रेम निर्माण झाले. त्यांना ते आपले उद्धारकर्ते वाटल्यास नवल नाही.

सन १९६२ आणि १९६५ च्या शेजारी राष्ट्राबरोबर झालेल्या दोन्ही युद्धांनी केंद्र सरकारचे आणि पर्यायाने साऱ्या देशाचे लक्ष युद्धाकडे लागले. भारताची इंच इंच भूमी लढविण्यात सारे गुंतून गेले. त्यामुळे साहजिकच सीमा प्रश्न आणि सीमा चळवळीकडे दुर्लक्ष होऊ लागले. बासष्टच्या निवडणुकीत समितीच्या वाट्याला प्रचंड पराभव आला. संयुक्त महाराष्ट्र समितीने सीमा लढा प्रमुख लक्ष बनवून एकजूट टिकविली असती तर हा प्रश्न अधांतरी लोंबकळत राहिल्याची नामुष्की पदरी पडली नसती.

सीमा प्रश्नासाठी संपूर्ण महाराष्ट्र समितीचा विचार पूर्वीही झाला होता. पण काहीनी मुंबईवरच समाधान मानल्याने सीमा लढ्यात नाही म्हटले तरी थोडीबहूत शिथिलता आली होती. पण सेनापती बापट यांच्या उपोषणामुळे अखेर मे १९६६ मध्ये 'संपूर्ण महाराष्ट्र समिती'ची स्थापना झाली. या समितीचे अध्यक्ष म्हणून भाई उद्धवराव पाटील यांचेवर सीमा प्रश्नाची जबाबदारी सोपविण्यात आली. याचाच परिणाम की

काय म्हणून काँग्रेस श्रेष्ठीनी सीमा प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी एक सदस्य आयोग नेमण्याचा ठराव केला. यानुसार दिनांक १७ ऑगस्ट १९६६ रोजी एक सदस्य महाजन कमिशन नेमले.

खरे म्हणजे हे एक सदस्य कमिशन सर्वांनीच नाकारायला हवे होते. कारण त्या कमिशनवर वेळेचे कोणतेच बंधन घातले नव्हते. वेळकाढूपणासाठीच केंद्राने हा डाव टाकला होता. महाजन समितीने कुठलीही तात्विक भूमिका न घेता, आपल्या मर्जीप्रमाणे सीमा भागाच्या प्रश्नावर तोडगा काढण्याची भूमिका घेतली. त्यांच्याच निर्णयात त्यांनी विविध ठिकाणी परस्परविरोधी भूमिका घेऊन महाराष्ट्रावर अन्याय करण्यासाठीच आपली नेमणूक झाल्याचा प्रत्यय महाराष्ट्राला आणून दिला. या पार्श्वभूमीवर आणि महाजन कमिशनच्या पक्षपाती अन्याय्य भूमिकेला विरोध करण्यासाठी भाई उद्धवरावदादांनी आकाशपाताळ एक केले. त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या वतीने कोल्हापूरात वरुण तीर्थ मैदानात खास उभारलेल्या हुतात्मा तोरसकर नगरात दिनांक २ डिसेंबर १९६७ रोजी सीमा परिषद आयोजित केली.

ही सीमा परिषद अनेक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण होती. ती सीमेलगतच्या शहरी असल्याने सीमा भागातील हजारो शेतकरी तेथे आले होते. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू श्री. हरीभाऊ पाटसकर हे या परिषदेचे उद्‌घाटक होते. कुलगुरू पाटसकर हे गांधीजींचे भक्त. आमदार-खासदार-राज्यमंत्री म्हणून नावाजलेले. मध्यप्रदेशाचे राज्यपाल म्हणून काम केलेले. एवढेच नव्हे तर राज्य पुनर्रचना सीमा तंटा प्रश्नातील त्यांचा अनुभव आणि अधिकार फार मोठा. आंध्र राज्य निर्मितीच्या वेळी आंध्र व मद्रास राज्यातील सीमेचा प्रश्न लवाद म्हणून बहुभाषिक खेडे व प्रादेशिक संलग्नता या तत्त्वाच्या आधारे त्यांनी सोडविलेला होता. त्या तत्त्वास पाटसकर फॉर्म्यूला म्हणून आजही ओळखला जातो. महाराष्ट्राची मागणी त्याच तत्त्वावर आधारलेली होती. भाई उद्धवराव पाटील यांच्या मते तर या तत्त्वानुसार देशातील कोणताही सीमातंटा सहजपणे सोडविता येईल. हा तत्त्वनिष्ठ आणि शास्त्रशुद्ध दृष्टिकोण केंद्राने प्रथमपासून स्वीकारला असता तर तंटेबखेडे, चळवळी आणि कटूता-कडवटपणाचा वासही आला नसता. म्हणूनच उद्‌घाटक म्हणून पाटसकरांचे मार्गदर्शन सर्वांनाच उपकारक ठरेल, आणि महाराष्ट्राची बौद्धिक बाजूही बळकट होईल, अशी भाई उद्धवराव पाटलांची भूमिका होती. या सीमा परिषदेचे अध्यक्ष भाई उद्धवराव पाटील हे तर या प्रश्नातील अभ्यासू नेते. सीमा लढा प्राणपणाने लढविणारे सरसेनापती. या परिषदेच्या स्वागताध्यक्ष खा. राजमाता विजयमाला राणीसाहेब असल्याने या परिषदेला एक नवे तेज, प्रतिष्ठा आणि परिमाण लाभले होते.

या परिषदेत डॉ. पाटसकर यांचे सीमा प्रश्नाबाबत मोलाचे, मूलगामी मार्गदर्शन तर झालेच पण त्याबरोबर भाई उद्धवराव पाटलांनी महाजन कमिशनच्या अहवालावर तुफानी हल्ला चढविला. त्यातील अनेक विसंगत आणि परस्परविरोधी विधानांची चिरफाड केली. हा अहवाल कोणत्याही कसोट्यावर टिकणारा नसल्याचे प्रतिपादन केले. म्हणूनच असा 'महाजन अहवाल सप्तपाताळात गाडा' हा नारा आणि आदेश त्यांनी जनतेला दिला. सदर महाजन अहवाल महाराष्ट्र शासनाने फेटाळला हे एकपरीने बरे केले. पण महाराष्ट्र शासनाने केंद्रिय नेतृत्वापुढे नांगी टाकली होती. निदान त्या अहवालात न्याय्य दुरुस्त्या करून घेण्यासाठी भारत सरकारवर पार्लमेंटमध्ये दबाव आणला पाहिजे होता. त्याबरोबरच लोकचळवळीचा जबरदस्त धक्का देण्याचीही गरज उद्धवरावांनी आपल्या भाषणात बोलून दाखविली. हा प्रश्न केंद्राने जाणून बुजून अधांतरी लटकत ठेवून महाराष्ट्राला सापत्नभावाची वागणूक दिली. केंद्राचा हा चुकीचा दृष्टिकोण बदलण्यासाठी उग्र आंदोलनाशिवाय दुसरा पर्याय नसल्याचेही उद्धवरावांनी शेवटी

पटवून दिले. ही सीमा परिषद सर्वार्थाने यशस्वी झाली तरी झोपेचे सोंग घेणाऱ्या केंद्रातील सरकारला जाग आली नाही. पण याचवेळी सीमा चळवळीतील उद्धवराव पाटलाचे लढवय्ये नेतृत्व सर्वमान्य झाले.

या सीमा परिषदेनंतर दोन वर्षांनी नोव्हेंबर १९६९ मध्ये सीमाप्रश्न एकदम उसळून वर आला. निमित्त घडले चंदीगडच्या प्रश्नावर संत फत्तेसिंग यांनी आत्मदहनाचा इशारा दिल्याचे. सीमा समितीने महाजन कमिशनपुढे साक्षी दिल्याने तो महाराष्ट्रावर बंधनकारक असल्याची पोरकट भूमिका कॉंग्रेस श्रेष्ठींनी घेतली. त्यातच बेळगाव केंद्रशासित करावे, अथवा ते शहर आणि मराठी भाषिक सीमा भाग गोव्यात घालून विशाल गोमंतक राज्य करावे, या चर्चेत केंद्र शासनाने लोकांना गुंतवून ठेवले. पण याही बाबतीत एक तप उलटले तरी केंद्राने निर्णय घेतला नाही.

त्यानंतर सन १९८१ मध्ये बेळगाव गोव्यात घालण्याचा प्रश्न उसळी मारून पुन्हा वर आला. महाराष्ट्रातील शिवसेनेने हीच मागणी उचलून धरली. त्यासाठी त्यांनी विधानसभेवर मोर्चाही नेला. भारत सरकारने याबाबत गुळमुळीत आश्वासने देण्यापलीकडे काही केले नाही.

सन १९८१ मध्ये ‘आपण तीन महिन्यात बाहेर पडणार’ असे बेळगांवकर आत्मविश्वासाने बोलू लागले. १८ मार्च १९८१ मध्ये सीमा भागातील पाच आमदारांनी बेमुदत उपोषण सुरू केले पण मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांच्या आश्वासनावर विसंबून ते सोडलेही. त्याची तडही अंतुल्यानी लावली नाही किंवा गुंडूरावांशी बोलण्यासाठी बैठकही होऊ शकली नाही. त्याचे कारण केंद्र शासनाला हा प्रश्न लोंबकळत ठेवायचा होता, हेच सिद्ध होते.

सन १९८३ च्या जानेवारीत कर्नाटक विधानसभेची निवडणूक आली. पंतप्रधान राजीव गांधींनी सीमावासियांना सांगितले, “तुम्ही आतापर्यंतच्या निवडणुका जिंकल्या हे ठीक आहे पण ही निवडणूक जिंकून दाखवा.” ती निवडणूकही सीमावासियांनी जिंकली. तरीही केंद्र शासनाने सीमावासियांकडे दुर्लक्ष केले. याच काळात दुर्दैवाने सीमा लढा समर्पण वृत्तीने लढणारे सरसेनापती भाई उद्धवराव पाटील यांना कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाने ग्रासले. अशा विकलांग अवस्थेतही भाई उद्धवराव पाटील सीमा लढ्याची चळवळ तेज करण्याची भाषा बोलत असायचे. हा प्रश्न सोडविण्यासाठी मा.यशवंतराव चव्हाण आणि एस. एम. जोशी यांनी लक्ष घालावे, असे त्यांना वाटे. बेळगाव, कारवार, निपाणी, खानापूर, बिदर, भालकी-संतपूरसह संपूर्ण महाराष्ट्र राज्य झाल्याचे आपण जिवंत असताना पाहण्याची त्यांची इच्छा होती. त्यांची इच्छा अपूर्णच राहिली. महाराष्ट्र राज्य आजही अपूर्णच आहे.

आता महाराष्ट्र शासन या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागणार असे ऐकायला मिळते आहे. भाई उद्धवराव दादांचे अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण होईल का?

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण अकरावे**

## ।। अव्वल दर्जाचे अभ्यासू तत्त्वनिष्ठ संसदपटू ।।

भाई उद्धवराव पाटील हे ईर्ल्यासारख्या मागासलेल्या मराठवाड्यातील एका खेड्यात शेतकरी कुटुंबात वाढलेलं व्यक्तिमत्व. त्यांच्या घराण्यात ना विद्येच्या उपासनेची परंपरा ना राजकीय वारसा. उद्धवराव हे अशा प्रतिकूल परिस्थितीशी झगडा करीत स्वकर्तृत्वाने उदयाला आलेले एक क्रियाशील स्वयंभू विचारवंत नेते. ते मूळातच अभ्यासू. कुठल्याही विषयाच्या आकलनाची लागणारी कुशाग्र बुद्धी, विदारक वास्तवाचं निरिक्षण, परीक्षण आणि पृथक्करण करण्याची शक्ती, त्यांच्याकडे असल्याने त्यांचा ग्रंथाभ्यास निव्वळ पुस्तकी राहिला नाही. तो वास्तवाच्या व्यवहारी शहाणपणाच्या शहाणेवर घासून पुसून घेण्याकडे त्यांचा कल. म्हणूनच विधानसभा, राज्यसभा आणि लोकसभा या विद्वत आणि राजनीतिज्ञांच्या लोकप्रतिनिधीगृहात त्यांची साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी. विचारांची खोल जाण. त्यांची सुस्पष्ट आखणी, आपल्या मताची तर्कसंगत सडेतोड मांडणी. गोरगरीबांच्या सुखदुःखाशी त्यांची चपलक जोडणी आणि तत्त्वनिष्ठेला घट्ट चिटकून राहणारी त्यांची धारोदत्त धाटणी या सर्व गुणामुळे त्यांची अव्वल दर्जाच्या अभ्यासू तत्त्वनिष्ठ संसदपटूमध्ये वरच्या श्रेणीत गणना केली जाते. हे संसदपटूत्व त्यांनी स्वकष्टाने कमावले होते.

उत्तम संसदपटूची लक्षणं कोणती आहेत? ती लक्षणं भाई उद्धवरावांच्या व्यक्तिमत्वात आणि कर्तृत्वात कशी दिसून येतात, हे पहाणं महत्त्वाचं आहे. उत्तम संसदपटूचं पहिलं लक्षण अभ्यासूपणा होय. भाई उद्धवरावदादा हे पहिल्यापासून अभ्यासू होते. त्यासाठी ते रात्ररात्र जागून ग्रंथवाचन करीत. त्यातील नोट्स काढीत. आपण जन्मभर विद्यार्थी असल्याची त्यांची भावना होती. ‘केल्याने अभ्यास’ हा तुकारामाचा उपदेश त्यांनी अंगी बाणवला होता. उद्धवरावदादा अभ्यासू होते पण पुस्तकी पंडित नव्हते. त्यांना वास्तवाचं पुरेपूर भान होतं. वास्तवातील व्यवहारी शहाणपण त्यांच्यात उपजतच होतं. वास्तवाच्या शहाणेवर ते ग्रंथातील विचार घासूनपुसून घेत असत.

उत्तम संसदपटू हा तत्त्वदर्शी असावा लागतो. त्याच्या विचाराला तत्त्वाचं भक्कम अधिष्ठान असावं लागतं. भाई उद्धवरावांच्या विचाराचे, अधिष्ठान महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, कार्ल मार्क्स आणि लेनिन ह्या पाच देवताच्या विचाराचे होते. ते पक्के होते. शे. का. पक्षाचे तत्त्वज्ञान या पाच महात्म्यांच्या विचाराने भरलेले आणि भारलेले होते. तेच त्यांच्याही जीवनाचे तत्त्वज्ञान होते. त्या विचारावरील त्यांची निष्ठा वादातीत होती. मोहाचे आणि प्रलोभनाचे अनेक प्रसंग त्यांच्या राजकीय जीवनात आले पण त्यांची तत्त्वनिष्ठा तसूभरही ढळली नाही. ती अखंड अभंग राहिली.

जीवनाच्या राजकारणातल्या वास्तवाला सामोरे जाताना संसदपटूचं मन संवेदनशील असावं लागतं. पण भावनेच्या पुरात ते वाहून जाऊ नये म्हणून प्रखर बुद्धीचा कासराही त्याच्या हाती असावा लागतो. भावना आणि विचार यांचा समन्वय साधून सामाजिक बांधिलकी तर संसदपटूच्या व्यक्तिमत्त्वात असावीच लागते. पण त्याबरोबरच सामाजिक न्याय मिळवून देण्याची रग आणि धगही त्याच्यात असावी लागते. त्यासाठी प्रसंगी संघर्षात झोकून देण्याचीही त्याची तयारी असावी लागते. ही लक्षणंही भाईच्या व्यक्तिमत्वात दिसून येतात. सावकारशाही विरुद्धचे लढे, गोवा मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, सीमा लढा यातील त्यांचा सहभाग हा ते झुंजार सेनानी असल्याचे दाखवून द्यायला पुरेसे आहेत.

लोकशाही क्रांतीवर उद्धवरावांचा विश्वास होता. लोकशाहीत आपली मते, विचार इतरांना पटवून देण्यासाठी संसदपटूकडे वक्तृत्वकला असणे गरजेचे असते. ही वक्तृत्व कला भाई उद्धवरावांनी चांगली जोपासली होती. त्यांचे वक्तृत्व सुस्पष्ट विचारांच्या धाग्याने विणलेले असे. एकेक वाक्य ते तोलून मापून उच्चारीत असत. त्यांच्या भाषणाची शैली भावनाप्रधान नसे. आपले विचार संथ लयबद्ध स्वरात श्रोत्यांच्या अंतःकरणात घुसवून ते आपली बाजू पटवून देत असत. त्यांच्या भाषणात ग्रामीण भागातील उदाहरणे, दृष्टांत यांची मांदियाळी असे. त्याबरोबरच विविध अहवालातील आकडेवारीही अधून मधून पेरून ते आपला मुद्दा भक्कम करीत असत. विरोधकांचे मुद्दे लक्षपूर्वक ऐकून घेण्याची त्यांची तयारी असे पण त्यातील वैचारिक कच्चे दुवे हेरून त्यावर प्रहार करण्यास ते मागेपुढे पहात नसत. त्यांची हैद्राबाद विधानसभा आणि महाराष्ट्र विधानसभा यातील विविध भाषणे म्हणजे आदर्श संसदपटूंच्या भाषणाचा आदर्श वस्तूपाठच असे. 'उद्धवरावांच्या इतका अभ्यासू लोकप्रतिनिधी अद्यापी आम्ही पाहिला नाही' असे हैद्राबाद राज्यातील श्री. एम. चेन्नारेडी, श्री. गोपाळराव एकबोटे, श्री. व्ही. सुब्रम्हण्यम् आदी मंत्री सभापती यांनी प्रांजळपणे कबूल केले आहे. उद्धवरावांची भाषणे म्हणजे सत्ताधारी पक्षाच्या कॅबिनेट मिटिंगचे विषय ठरत असत. आदर्श संसदपटू व्हायचे असेल तर उद्धवरावांच्या भाषणांचा अभ्यास करायला मुख्यमंत्री आपल्या मंत्र्यांना आणि आमदारांना आवर्जून सांगत. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण, ना. दादासाहेब कन्नमवार, ना. वसंतराव नाईक हे उद्धवरावांच्या विधानसभेतील भाषणाला आठवण ठेऊन हजर राहत असत. महाराष्ट्र विधान सभेतील त्यांची एकेक भाषणे म्हणजे अभ्यासू, तत्त्वनिष्ठ संसदपटू कसा असावा याचा आदर्श भाई उद्धवरावांच्या रुपाने मिळाला आहे. विधानसभेत उद्धवरावजी बोलायला उभे राहिले म्हणजे सारे सभागृह एकचित्ताने त्यांचे विचार ऐकत असे. भाई उद्धवरावजी महाराष्ट्र विधानसभेत विरोधी पक्षनेते झाले तेव्हा आचार्य अत्र्यासारख्यांनी 'ज्यांना धड कपडे घालता येत नाहीत, ते महाराष्ट्राचे पुढारीपण करायला निघाले आहेत' अशी शंका उद्धवरावांच्या कर्तृत्वाबद्दल घेतली होती पण विरोधीपक्ष नेतेपदाच्या काळातील उद्धवरावांची भाषणे गाजली. तेव्हा आचार्य अत्रे यांनी उद्धवरावावर स्तुतीसुमने उधळली. तर 'उद्धवरावजींच्या या कार्यकर्तृत्वामुळे विरोधीपक्षाची उंची वाढली.' असे बोलून सत्ताधारी पक्षातील लोकांनी मोकळ्या मनाने त्यांच्या संसदपटूत्वाला मान्यता दिली.

वक्तृत्वकला ही विधायक कामासाठी वापरायची का विध्वंसक कामासाठी वापरायची? हा उत्तम संसदपटूपुढे प्रश्न असतो. उत्तम संसदपटूने आपली वक्तृत्वकला ही विधायक कामासाठीच वापरली पाहिजे. हे लक्षणही उद्धवरावांच्या वक्तृत्व कलेमध्ये दिसून येते. बावन्नच्या पहिल्या निवडणूकीत विजयी होऊन उद्धवराव हैद्राबाद विधानसभेत गेले. विरोधी पक्षातील एका गटातील प्रमुख नेत्यापैकी ते एक होते. या विधानसभेत दीन-दुबळ्यांचा आवाज बुलंद करणारा आमदार म्हणून त्यांनी त्या काळात ख्याती मिळविली होती. तेथे त्यांनी शेतकरी शेतमजूरांची बाजू समर्थपणे मांडली. हैद्राबादच्या कूळ कायद्याला जास्तीत जास्त पुरोगामी स्वरूप मिळवून देण्यात उद्धवरावांचा सिंहाचा वाटा होता. या कायद्यात उद्धवरावांनी आपल्या भाषणातून सुचविलेल्या व मंजूर झालेल्या कमाल जमीन धारणेच्या, जमीन सुधारण्याच्या आणि कुळाच्या संरक्षणाच्या सुचना आणि तरतुदी आजही राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

महाराष्ट्र विधानसभेतील दहा वर्षाच्या काळातील (१९५७ ते ६२ आणि १९६७-७२) उद्धवरावांची भाषणे म्हणजे उत्तम अभ्यासू तत्त्वनिष्ठ संसदपटूचा आदर्श ठरली. आपल्या भाषणांनी त्यांनी विधानसभा अक्षरशः दणाणून सोडली. या काळात त्यांच्या नेतृत्वाचा कस लागला. संयुक्त महाराष्ट्र आणि सीमा लढा या दोन्ही चळवळी महाराष्ट्रव्यापी बनविण्यातील भाई उद्धवरावांचे योगदान कुणालाही दुर्लक्षित करता

येणार नाही, इतके मोलाचे ते आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सत्ताधारी पक्षाचे चतूर मुत्सद्दी मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण एका बाजूला आणि तत्त्वनिष्ठ उद्धवराव दुसऱ्या बाजूला असा सामना रंगत असे. त्यात उद्धवराव दादांच्या भाषणातील मुद्दे सडेतोड असत. ते पूर्णार्थाने खोडून टाकणे सत्ताधारी मंत्री मुख्यमंत्र्यांना शक्य होत नव्हते. उद्धवरावांनी सीमा प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी सत्ताधाऱ्यांना अनेकवेळा कोंडित पकडले. त्यांची बोलती बंद केली. या दोन्ही ऐतिहासिक चळवळीमुळे भाई उद्धवराव हे महाराष्ट्राचे नेते म्हणून पुढे आले. महाराष्ट्रातील आणि सीमा भागातील लोकांच्या गळ्यातील ते ताईत बनले!

संसदपटू हा सामाजिक बांधिलकी मानणारा; सामाजिक न्यायासाठी धडपडणारा; राष्ट्राची बांधणी आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणारा शुद्ध चारित्र्याचा देशभक्त असला पाहिजे. उद्धवरावदादांच्या व्यक्तिमत्वात समाजनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा हे गुण अंगभूत होते. राष्ट्र हे समाजाने बनलेले असते. राष्ट्राची भौतिक प्रगती ही लोकांच्या श्रमातून आणि घामातून होत असते. म्हणूनच श्रमजिवी शेतकरी कामगार, शेतमजूर, दलित आणि स्त्रिया या दुर्बल घटकांचे राष्ट्र  उभारणीतील योगदान हे फार मोठं असतं. याचं भान उद्धवरावांना पुरेपूर होतं. या दुर्बल घटकाचं हित म्हणजे राष्ट्रहित. या दुर्बल घटकांचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास ही त्यांची दृढ धारणा. या दुर्बल घटकावर उद्धवरावदादाचं मनस्वी प्रेम होतं. त्यादृष्टीने ते खरे राष्ट्रप्रेमी होते. खरे देशभक्त होते.

विधानसभा, राज्यसभा आणि लोकसभा या लोकशाहीच्या मंदीरात भाई उद्धवरावांनी केलेल्या कामाची केवळ यादीच पाहिली तरी त्यांचं सारं वक्तृत्व, कर्तृत्व आणि संसद विधानसभा पटूत्व हे वर उल्लेखिलेल्या दुर्बल घटकांना मध्यवर्ती ठेऊनच केल्याचं स्पष्ट होतं. शेतकऱ्यांना द्यावी लागणारी चुकीची लेव्ही, जमीन सुधारणा, कसेल त्याची जमीन या तत्त्वावर जमिनीचे पुर्नवाटप, त्यासाठी करावयाचा कुळकायदा, कमाल जमीन धारणा, शेतीमालास त्याच्या उत्पादन खर्चावर आधारित भाव, शेतीमालाला स्वतंत्र बाजारपेठ, शेतकऱ्यांच्या एकजुटीतून सहकारी तत्त्वावर शेती, साखरकारखाने शेतकऱ्यांच्या ताब्यात देणे, शेती व्यवसायाला औद्योगिक धंद्याचा दर्जा आणि उद्योगधंद्याला मिळणाऱ्या सर्व सोयीसवलती शेतीधंद्याला मिळाव्यात हे धोरण, शेतकऱ्यांना कमी व्याजदराने दीर्घ मुदतीची कर्जे देणे, अल्पभूधारकांना सारा माफ, दुष्काळी काळात कर्जमाफी, शेतमजुरांना आधुनिक राहणीमानानुसार मजुरी मिळावी, महाराष्ट्रातील विविध भागातील विकासाचा समतोल साधावा, ग्रामीण भागातील गोरगरीबांना शासनाने प्राथमिक शिक्षण सक्तीचे नी मोफत द्यावे; दलितांना समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिष्यवृत्तीयुक्त शिक्षण, त्यांना नोकरीत आरक्षण आणि सत्तेत भागिदारी द्यावी इत्यादी मागण्या त्यांनी या लोकशाही मंदिरात मोठ्या पोटतिडकीने मांडल्या. त्यासाठी या गोरगरीबांचा सतत कैवार घेतला.

दुष्काळाच्या काळात मागेल त्याला काम, कामाचा योग्य दाम, पोटापुरते धान्य मिळावे, शेतकऱ्यांची त्या काळात कर्जे माफ व्हावीत. दुष्काळ संपल्यावर त्यांना बी-बियाणे, औषधे, बैलंबारदान्यासाठी शासनाने मदत करावी या गोष्टी करण्यासाठी शासनाकडे सभागृहात आग्रह धरला. त्यासाठी जनतेत जाऊन चळवळी केल्या. मोर्चे काढले. विधानसभेत त्यासाठी शासनाला धारेवर धरले. शासनाला योग्य निर्णय घेण्यासाठी भाग पाडले. रोजगार हमी योजनेचा कायदा करण्यासाठी प्रसंगी विधानसभेचे कामकाज बंद पाडले. शेतकऱ्यांच्या मालाला किफायतशीर भाव बांधून देण्यासाठी शासनावर दडपण आणले. कापूस एकाधिकार योजनाही त्यातून जन्माला आली. शेतकऱ्यांच्या सर्व पिकांना विमा योजना सुरू करण्याच्या मागणीला तोंड फोडलं! या सर्व विचाराचं आणि चळवळीचं त्यांचं अधिष्ठान मात्र

श्रमजिवी जनतेच्या हिताचे संरक्षण हेच होते. म्हणूनच भाई उद्धवराव हे जेवढे उत्तम अभ्यासू संसदपटू म्हणून गाजले त्याहीपेक्षा ते श्रमिक कष्टकऱ्यांचे कैवारी, गोरगरीबांचे उद्धारकर्ते म्हणून लोकांच्या अधिक लक्षात राहिले आहेत.

भाई उद्धवराव पाटील हे सन १९६४ ते १९६६ च्या काळात दोन वर्षाकाठी राज्यसभेवर निवडून गेले तर सन १९७७ साली लोकसभेत खासदार म्हणून त्यांनी अडीच वर्षे काम केले. या कार्यकाळात त्यांनी तेथेही शेतकरी कामगारांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. विधीमंडळात, राज्यसभेत वा लोकसभेत बोलताना ते केवळ विरोधासाठी कधीच विरोध करत नसत. तेथे चर्चा करताना ते एखाद्याच्या इभ्रतीला धक्का लागेल असे बोलत नसत. त्यांचा विरोध तत्वापुरता, विचारापुरता होता. इतरवेळी ते सत्ताधारी आमदार-खासदार, मंत्री यांचेशी सौजन्याने, नम्रतेने वागत. मनमोकळेपणाने बोलत. राजकारणात त्यांनी माणुसकी जोपासली. त्यामुळे विरोधकही त्यांचे जिव्हाळ्याचे मित्र बनले होते. लोकहित आणि देशहितासाठी त्यांनी आघाड्याचे राजकारण केले. पण त्यात कटूता कधी येऊ दिली नाही. ही लक्षणंही उत्तम संसदपटूचीच नव्हेत का?

'सत्तेसाठी आपला जन्म नाहीच आम्ही जन्मलो केवळ संघर्षासाठीच!' ते तत्त्व त्यांनी शेवटपर्यंत सांभाळले. महाराष्ट्रात मंत्री मुख्यमंत्री पदाची प्रलोभने त्यांना दाखविण्यात आली पण त्यांनी ती नम्रपणे नाकारली. पक्षाच्या तत्त्वाशी त्यांनी तडजोडी कधी केल्याच नाहीत. तत्त्वावरील अव्यभिचारी निष्ठेचे ते चालते बोलते उदाहरण ठरले. पंतप्रधान श्री चरणसिंग यांच्या शेती धोरणाबद्दल त्यांनी प्रशंसोद्‌गार काढले पण त्यावेळच्या लोकसभेतील मंत्रीमंडळात केंद्रिय शेतकी मंत्री होण्याचे तितक्याच स्पष्टपणे नाकारले. मा. यशवंतरावजी चव्हाण यांची उद्धवरावांच्या दिल्लीतील खासदारकी संदर्भात एक वेगळे मतप्रदर्शन केले. ते लिहितात, "ते (उद्धवराव) दिल्लीलाही राज्यसभेचे सभासद म्हणून निवडून आले... ते लोकसभेतही निवडून आले पण दिल्लीच्या संसदीय कामात त्यांनी फारसा रस घेतला नाही. मी त्यांना एकदा विचारलेही की, मुंबई गाजवित होता, दिल्लीत दुर्लक्ष का? (त्यावर) ते म्हणायचे 'मन लागत नाही. रस येत नाही...' खरे म्हणजे त्यांची प्रश्नांची जाण इतकी चांगली आहे की, ज्या निष्ठेने त्यांनी महाराष्ट्राचे प्रश्न हाताळले, त्याच जाणिवेने राष्ट्राचे प्रश्न हाती घेतले असते तर देशवाशियांना त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव झाली असती. पण त्यांनी असे का केले नाही. याचे कोडे मला अजून उलगडले नाही. राजकीय पक्षाचे काम किती निष्ठेने करावे व आपले व्यक्तिमत्व मागे ठेवून पक्षाच्या कामाला प्राधान्य द्यावे, अशा प्रकारचे समर्पित जीवन जगणारे ते नेते आहेत. उद्धवरावांची शेतकरी व कामगारसंबंधीची मानसिक ओढ मोठी तीव्र आहे."

कंधारचे माजी आमदार श्री. गुरुनाथ कुरुडे यांनी 'अभ्यासू संसदपटू : उद्धवराव पाटील' या लेखात उद्धवरावांच्या संसदपटू म्हणून असलेल्या गुणांचा उहापोह केला आहे. त्यातील निवडक भाग खाली देत आहे.

"मा. उद्धवराव पाटलांना जवळून पाहिले. त्यांची अनेक भाषणे ऐकली.... महाराष्ट्र विधान सभेतील विरोधी पक्ष नेतेपद, लोकसभेत गटनेतेपद भुषवून त्यांनी पक्षाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सखोल अभ्यास व समाजाचे बारकाईने निरिक्षण यातून त्यांनी शेतकरी व कष्टकरी समाजाचे अनेक प्रश्न प्रभावीपणे मांडले. लोकसभेतसुद्धा आपल्या उर्दू , हिंदी व इंग्रजी  भाषेतून महाराष्ट्राच्या व देशाच्या शेतकऱ्यांचे प्रश्न परिणामकारकपणे मांडून शेकापक्षाचे नाव दिल्लीत गाजवले.... त्यांच्या भाषणाची शैली भावनाप्रधान नव्हती. संथ लयबद्ध स्वरात श्रोत्यांच्या मनात घुसून ते आपली बाजू पटवून देत. याच त्यांच्या शैलीमुळे ते उत्तम संसदपटू म्हणून प्रसिद्धी पावले. त्यांनी विरोधी पक्षनेता असताना केलेले सविस्तर

अनुक्रमाणिका

मुद्देसुद भाषण अजूनही माझ्या स्मरणात आहे. ‘शेतीधंदा आणि बेकारी’ या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण असा जणू प्रबंधच त्यांनी सभागृहापुढे मांडला. बारीक सारीक प्रश्नांचा मागोवा घेत आकडेवारीतून शेती धंद्यास कसे उर्जित अवस्थेत आणता येईल व त्यावरच लाखो करोडो मजुरांना कसे सामावून घेता येईल, हा सिद्धांत त्यांनी विधानसभेत मांडला, तेव्हा सर्व सभागृह स्तंभित झाले. ना. मुख्यमंत्री, सभापती व सर्व आमदारपण थक्क झाले. ते एक उत्तम वकील असतानासुद्धा अर्थशास्त्रज्ञालाही लाजवील अशा झोकात त्यांनी शेतीचा सिद्धांत मांडला व शासनाला मार्गदर्शन केले. एकूण त्यांच्या वक्तव्यातून नेहमीच मार्गदर्शनचं होत असे. अवांतर फापट पसारा कधीच नव्हता. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाचा तो सुवर्ण काळ ठरला.”

नियमित वाचन, शांत चिंतन, कठोर परीक्षण, आणि वास्तवाशी इमान राखणारं संवेदनशील मनं, यामुळे त्यांची भाषणं अंतःकरणाला भिडणारी आणि बुद्धीला-विचाराला प्रेरणा देणारी असत. त्यांची भाषणं एकत्र करणं आणि त्यांचा स्वतंत्र अभ्यास करणं हा पी.एच्.डी. करू इच्छिणाऱ्या संशोधकाचा महत्त्वाचा विषय आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास भाई उद्धवराव पाटील यांचे अव्वलदर्जाचे अभ्यासू संसद पटूत्व संस्मरणीय तर आहेच पण भावी पिढ्यांना दीपस्तंभाप्रमाणे प्रकाशवाटा दाखवणारे आहे.

*

अनुक्रमाणिका

प्रकरण बारावे

## ||उद्धवराव दादांचा घर संसार||

उद्धवरावदादांनी उस्मानाबादला भाड्याच्या खोलीत संसार थाटलेला! हळूहळू प्रपंच वाढत गेला. पहिली मुलगी मंदाकिनी जन्मली. उद्धवरावदादांचं शे.का. पक्षाचं कामही वाढलं. ५२ च्या पहिल्या निवडणुकीची धावपळ सुरू झाली. घरी कार्यकर्त्यांचा-शेतकऱ्यांचा राबता वाढला. त्यांचं चहापाणी आणि प्रसंगी जेवणखाणी एकट्या शारदाबाईंनाच उरकावी लागत. धुण्याभांड्याला मोलकरीण ठेवणंही त्यांना शक्य नव्हतं. या पहिल्या निवडणुकीच्यावेळी दुसरी मुलगी झाली. त्या निवडणुकीत उद्धवराव विजयी झाले म्हणून मुलीचे नाव 'विजया' असं ठेवलं. हैद्राबाद असेंब्लित आमदार म्हणून दादा गेले. तेथे त्यांनी काही महिन्यापुरतं घर केलं पण ते परवडत नसल्याचे लक्षात येताच पुन्हा उस्मानाबाद येथेच कायमस्वरूपी घर ठेवलं आणि ते राजकरणाच्या संग्रामात बुडून गेले. घरी काय आहे, काय नाही याची चौकशी करण्याचीदेखील त्यांना उसंत मिळत नसे.

उद्धवरावदादांचं उस्मानाबादचं घर म्हणजे 'हम दो हमारे दो' अशा लहान सुखी कुटुंबासारखं मुळीच नव्हतं. घरी दोन मुली. नवीन जन्मलेला 'विश्वास' नावाचा मुलगा. त्यांच्या बरोबरीनं शारदाबाईंच्या नणंदेची दोन मुलं शिक्षणासाठी घरात आलेली. आर्थिक परिस्थिती जेमतेम. त्यामुळं घरातली सगळी कामं शारदाबाईंनाच करावी लागायची. आमदाराची पत्नी म्हणून मानमरातब, घरकामासाठी गडीमाणसं अशी कधी नव्हतीच. स्वतःची मुलं आणि शिक्षणासाठी असलेली मुलं यांचं हवं नको पाहाणं आलं. उद्धवरावदादा घरी आले आले, गेले, गेले असं चालायचं.

असा संसार चालवणं शारदाबाईंना अवघड जाऊ लागलं. त्यातून त्यांनी स्वावलंबनाचा नवा मार्ग शोधला. म्हशी-कोंबड्या त्या पाळू लागल्या. घराच्या आवारात सांडपाण्यावर भाजी पिकवू लागल्या. घरप्रपंच सांभाळीत या जोडधंद्यातून येणाऱ्या लहानश्या उत्पन्नाची घरसंसार चालवायला मदत होऊ लागली. मुली मोठ्या होत होत्या. शाळेत शिकत होत्या. त्या आपल्या आईला विचारायच्या, "आई, तू तर श्रीमंत घरातील मुलगी, तू स्वतःला इथं कसं बदललंस?" त्यावर शारदाबाई अभिमानानं उत्तर द्यायच्या,"माझा नवरा वकिली शिकलेला, याचाच मला अभिमान वाटायचा. हा नवरा प्रामाणिकपणानं राजकारण करणारा; गोरगरीबांना मदत करणारा, आधार देणारा आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या माहेरच्या लोकांनासुद्धा चांगला मार्ग दाखवणारा असल्यानं माझा त्यांच्याबद्दल आदर वाढत गेला. ह्यांच्या कर्तृत्वात माझा अडाणीपणा झाकून गेला. अनेक गोरगरीबांचे त्यांनी कल्याण केले. ती माणसं मला मान द्यायची. आपल्या शेतीतली भाजी कधी मधी आणून द्यायची. त्यांच्या रुपानं धनदौलतीपेक्षा माणुसकीची दौलत मला मिळाली. अजून मला काय पाहिजे? सारं काही भरभरून मिळालयं."

उद्धवरावदादांचा संसार असा तसाच चाललेला. तो वाढतच होता. दोन मुलीनंतर एक मुलगा विश्वास नावाचा, नंतर सुनंदा, बाळ, धनंजय, साधना आणि सुलभा अशी अपत्ये जन्मली. पहिला मुलगा विश्वास लहानपणी आजारी होता. सन १९४९-५० साली वाढाव (जि. सातारा) येथे शे. का. पक्षाचे अधिवेशन होते. उद्धवरावदादा त्यावेळी शे. का. पक्षाचे चिटणीस होते. त्यामुळे घरी मुलगा आजारी असला तरी सदर अधिवेशन चुकविणे दादांना शक्य नव्हते. अधिवेशनहून परत येत असतानाच त्यांना त्यांचा पहिला मुलगा विश्वास देवाघरी गेल्याची दुःखद बातमी ऐकावी लागली. या मुलाच्या मृत्यूने शारदाबाईंना

खूप दुःख झाले. पण हजारो गरीबांच्या दुःखाची ओझी खांद्यावर घेतलेल्या उद्धवरावांना स्वतःच्या मुलाचे दुःख व्यक्त करण्यास सवडच कोठे होती?

असाच प्रसंग उद्धवरावजींच्या जीवनात १९६३ साली आला. १४ डिसेंबर १९६३ रोजी शेतीमालाला किफायतशीर भाव आणि शेतीधंद्यातील इतर मागण्यासाठी शे.का. पक्षाच्यावतीने मुंबई विधानभवनावर भाई उद्धवरावांच्या नेतृत्वाखाली मोर्चा ठरला होता. त्याच सुमारास त्यांचा अकरा वर्षांचा बाळासाहेब नावाचा मुलगा टायफाईडने आजारी पडला. त्याला दादांनी उस्मानाबादच्या सरकारी दवाखान्यात ठेवले आणि ते मुंबईला मोर्चाचे नेतृत्व करायला गेले. मोर्चावर लाठीमार झाला. उद्धवरावादादांच्या पाठीवर काठ्या पडल्या. त्या अगोदरच 'मुलगा खूप आजारी' असल्याची तार दादांना मिळाली होती. ती खिशात ठेवून त्यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. भावनेपेक्षा कर्तृव्य श्रेष्ठ मानणाऱ्या दादांना पोलिसांनी अटक केली. दादांच्या कपड्यांची तपासणी करताना ती तार पोलिसांना मिळाली. ते खूप शरमिंदे झाले. मोर्चा संपल्यानंतरच दादा उस्मानाबादला परत येण्यास निघाले. उस्मानाबाद हॉस्पिटलात ते गेले. त्यांचा मुलगा बाळासाहेब डोळ्यात प्राण आणून त्यांची वाट पाहत होता. पितापुत्राची डोळा भेट झाली. दादांनी आपल्या पुत्राचा हात हाती घेतला आणि बाळासाहेबाने प्राण सोडला. शारदाबाईंवर आकाश कोसळलं. पहिली दोन मुलं अशी अकाली सोडून गेलेल्या मातेचं दुःख वर्णन करणं केवळ अशक्य. तरीही शारदाबाई लहानग्या धनंजयकडे पाहून त्याला परमेश्वरानं खूप आयुष्य द्यावं, अशी प्रार्थना करीत दिवस काढू लागल्या. महाभारतात 'सर्वात मोठे दुःख हे पुत्रशोकाचे असते' हे सांगितले आहे. अशी दुःखेही उद्धवरावदादांनी स्थितप्रज्ञाप्रमाणे राहून पचविली. उद्धवरावदादा हे गोरगरीबांच्या आभाळा एवढ्या दुःखांना ठिगळे लावण्यात गुंतून पडलेलेच राहिले.

उद्धवरावदादांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात भूमीगत राहून सशस्त्रे लढे दिले. त्याकाळी त्यांना दिवसरात्री लपत लपत पायी फिरावे लागे. दिवसदिवस वेळेवर जेवण मिळायचे नाही. काही वेळा डाळे-चुरमुरे खाऊन त्यावर भरपूर पाणी पिऊन पुढचा प्रवास करावा लागे. कधीतरी ते घरी परत आल्यानंतर त्यांच्या गुडघ्यापासून खाली पिंढऱ्यात-पायात काटे घुसलेले असायचे. ते काटे शारदाबाई सुईने काढायच्या. संयुक्त महाराष्ट्र आणि सीमा लढ्यात त्यांना पोलीसांच्या लाठ्या अंगावर झेलाव्या लागल्या. घरी आल्यावर त्यांच्या पाठीवर वळ उमटलेले पाहून शारदाबाई दुःखी कष्टी व्हायच्या. पाठीवर औषधाचा लेप द्यायच्या. पाठ शेकायच्या. पाठ शेकता-शेकता म्हणायच्या, "आता पुरी करा ही जीवघेणी कामं!" त्यावर उद्धवदादा खुलासा करायचे, "गोरगरीबांची दुःख यापेक्षा कितीतरी मोठी आहेत. त्यापुढं आपली दुःखं काहीच नाहीत. गरीबांची दुःखं पाहून ती दूर करण्यासाठी मन उसळी मारतं त्याला मी काय करू?" शारदाबाई मग त्यांची पाठ शेकत बसायच्या. रात्री अशी मलमपट्टी केल्यानंतर दादा सकाळी उठून पुन्हा गोरगरीबांच्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी संघर्षात सामील व्हायला बाहेर पडायचे!

सीमा चळवळीच्या काळात उद्धवरावदादांना बेळगांवमध्ये अटक करून तुरुंगात ठेवले. त्यावेळी त्यांचे वडील साहेबरावआण्णा खूप घाबरले. रडकुंडीला आले. तेव्हा त्यांचे जावई ॲड. नरसिंगरावदादांनी साहेबराव आण्णांना बेळगावला नेले. उद्धवराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांची केलेली उत्तम सोय दाखविली. तेव्हाच साहेबराव आण्णांचा जीव भांड्यात पडला. भाई उद्धवरावदादा बेळगावी तुरुंगात असताना उस्मानाबादला घरी तिन्ही मुलांना गोवर आला होता. त्यांच्या अंगाला लावायला घरात तेल नव्हते. औषधोपचाराला मग पैसे कुठले? तेव्हा शारदाबाईंनी घरातली थोडी ज्वारी विकून तेल आणले. तेव्हा कुठे तेल लावून मुला-मुलींना आंघोळी घालता आल्या. या फुटक्या-तुटक्या संसारात शारदाबाईंच्या

बालविधवा बहिणीचा.... चंद्रामावशीचा खूप मोठा हातभार लागला होता. चंद्रामावशी उस्मानाबादला आल्या त्या शाररदाबाईंला मदतीचा हात देण्यासाठीच! चंद्रामावशी म्हणजे मुलाबाळांना मायेची सावली लाभली. त्यामुळे घरात त्यांची आबाळ होत होती तरी चंद्रामावशीचे आभाळमायेचे पांघरूण त्यांना आनंददायी वाटत असे.

दादांच्या थोरल्या मुलीचे-मंदाकिनीचे लग्न कातपूरच्या प्रा. मधुकरराव देशमुख (शाहू कॉलेज-लातूर) यांचेबरोबर झाले. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पद्धतीप्रमाणे उद्धवरावदादांनी हे लग्न आगदी साध्या पद्धतीने लावले. उद्धवराव जन्मभर राजकारणात राहिले. आमदार खासदार झाले. पण त्यांनी आपले खाजगी आयुष्य व कौटुंबिक कार्यक्रम खाजगीच ठेवले. स्वपक्षातील अथवा इतर पक्षातील राजकीय मित्रांनाही त्यांनी निमंत्रणे दिली नाहीत. आपल्या उभ्या आयुष्यात आपल्या व्यक्तिगत कार्यक्रमांना त्यांनी राजकीय स्वरूप येऊ दिले नाही.

आमदार असतानाही मोठ्या मुलीचे-मंदाकिनीचे लग्न होईपर्यंत उद्धवराव पाटील यांना उस्मानाबादमध्ये स्वतःच्या मालकीचे घर नव्हते. हे सांगितले तर त्यावर कुणाचा विश्वास बसणार नाही. पण हे कटू सत्य आहे. ते उस्मानाबादेत भाड्याच्या घरातच राहत होते. एखादा भला मोठा प्लॉट घ्यावा. तेथे दुमजली बंगला उभा करावा; बंगल्याभोवती बगीचा फुलवावा, असे त्यांना कधी वाटलेच नाही. तसे वाटण्याला त्यांना वेळच नव्हता. बंगला-गाडी, सत्ता, सत्तेतून येणारी समृद्धी यांची स्वप्नं त्यांनी कधी पाहिलीच नाहीत. मात्र ‘बळीचं राज्य’ आणण्याचे एकमेव स्वप्न पाहण्यात ते मश्गूल असत.

स्वतःचं घर असावं, असा शारदाबाईंनी विषय काढला तर त्याकडे ते दुर्लक्ष करीत. दुसऱ्या विषयावर बोलणं नेत. शेवटी शारदाबाईंनी काटकसर करून जमवलेल्या पैपैशातून शंभर रुपये खर्च करून घरासाठी जागा खरेदी केली. पण ते बांधायला पैसा कुठाय? दादांच्या कार्यकर्त्यांनी घर बांधण्याचा हट्ट धरला तेव्हा त्यांनी अल्पउत्पन्न गटाच्या योजनेतून कर्ज काढले. घर बांधले. ते कर्ज फेडण्यासाठी त्यांना मरेपर्यंत हप्ते भरावे लागले.

इर्ले येथे उद्धवरावांचे वडील आणि चुलते एकत्र राहायचे. पुढे चुलत्यांनी वेगळं राहण्याचा विचार साहेबरावांच्या पुढं मांडला. साहेबरावांना वेगळं राहण्याची कल्पना आवडणे शक्य नव्हतं. पण भावांच्या मताचा आदर राखण्यासाठी ते घरशेताच्या वाटण्या करायला नाईलाजाने तयार झाले. वाटण्या करताना थोरल्याने वाटण्या करायच्या आणि लहान भावांनी उचलायच्या ही शेतकरी कुटुंबातील परंपरा. पण साहेबराव आण्णांनी मनाचा मोठेपणा दाखवून धाकल्या भावानांच वाटण्या करायला आणि उचलायलाही सांगितले. तेव्हा धाकल्या भावांनी चांगल्या शेतीच्या तीन वाटण्या आणि राहिलेल्या शेतीची एक वाटणी केली आणि तिघांनीही चांगल्या वाटण्या उचलल्या. राहिलेली डावी वाटणी साहेबराव आण्णांना स्वीकारावी लागली. तरीही राहून राहून डावी वाटणी मिळाली म्हणून साहेबराव आण्णा खट्टू झाले. अस्वस्थ बनले. हे भावांच्या लक्षात आल्यावर त्यांनी उद्धवराव दादाच्या कानावर साऱ्या गोष्टी घातल्या आणि त्यांनी इर्ले गावी बोलावून घेतले.

उद्धवरावदादा इर्ले गावी आले. वडील, चुलते, पुतणे एकत्र बसले. झालेल्या वाटण्याबाबत उद्धवरावदादा म्हणाले, “पुढच्या पिढीनं वाटणीत लक्ष घालायचं नाही हे माझं तत्त्व आहे. त्यामुळे झालेल्या वाटण्या योग्यच झाल्या आहेत आणि त्या मला मान्य आहेत.”

अनुक्रमाणिका

“असं कसं?” साहेबराव आण्णा बोलू लागले, “सगळ्यापेक्षा डावी वाटणी आपणाला. हे बरोबर आहे का?”

“होय आण्णा, तेच बरोबर आहे. वाटण्यासाठी आपण भांडत बसलो तर भावाभावात वैमनस्य वाढेल. आण्णा, आता तुम्ही थकला आहात. तुमचे बंधूच तुमची शेती करून देतात. भांडल्यावर ते आपली शेती करतील का? त्याशिवाय या तिघांच्या घरात माझ्यासारखा कोणी शिकून वकील झाला आहे का? त्यांना शेतीशिवाय जगण्यासारखं दुसरं साधन आहे का? तेव्हा त्यांनी वाटण्या घेणं हे न्यायाला धरूनच आहे. चांगली वाटणी तुम्ही माझ्यासाठीच मागत आहात ना? मला आता आलेली वाटणी पसंत आहे?”

यावर साहेबराव आण्णा स्वस्थ राहिले. होणारे भांडण टळले. प्रेम वाढले. या चुलत्यांनीच पुढे उद्धवरावादादांची शेती करण्यात खूपच मदत केली.

उद्धवरावदादा मूळात हाडाचे शेतकरी. शेती कसायची  खूप इच्छा पण राजकारणामुळं त्यांना वेळच मिळायचा नाही. ते भुविकास बँकेचे संचालक असताना सदर बँकेतून कर्ज काढून त्यांनी विहिर खोदली. इंजिन बसवले. ऊस लावला. पण हे सारे करण्यात त्यांच्या चुलत्यांनी त्यांना खूप सहकार्य केले. पण हे काढलेले कर्ज काही त्यांना पूर्णपणे फेडता आले नाही. त्यांच्या मृत्यूनंतर ते कर्ज त्यांचे सुपुत्र धनंजयला फेडावे लागले.

उद्धवरावदादा असे राजकारणातील दरिद्री नारायण असले तरी त्यांच्या मुली मात्र चांगल्या घरी नांदायला गेल्या. दुसऱ्या नंबरच्या विजया या मुलीचे लग्न मिरजगाव (जि. अहमदनगर) येथील डॉ. गजाननराव सावंत (शेती) यांच्याबरोबर झाले. पहिली मुलगी मंदाकिनी मध्येच वारल्याने जावई प्रा. मधुकरराव देशमुख कहीसे उघडे पडल्यासारखे दिसल्यावर त्यांनाच आपली सुनंदा ही तिसरी मुलगी देऊन उद्धवरावांनी जावयाचे घर सावरण्यात हातभार लावला. साधना ही चवथी मुलगी नाशिकला प्रताप कोतवालांची पत्नी झाली. हल्ली हे दांपत्य अमेरिकेत असते. तर शेवटची पाचवी मुलगी सुलभा (सई) हिचा विवाह वरपगाव (ता. केज) येथील डॉ. अविनाश देशमुख (एम्. डी.) यांचेशी झाला. सारे जावई सुशिक्षित आणि सुसंस्कृत आहेत. शारदाबाई ह्या नातवंडाच्या गोकुळात समाधान मानीत आहेत.

उद्धवरावदादांनी जीवनात अनेक पथ्ये सांभाळली. पाळली. शेतकऱ्यासारखं साधं राहणं हे त्यातील एक पथ्य! दादा राजकारणाच्या निमित्तानं मोठमोठ्या शहरातून फिरून यायचे पण तेथून पत्नीसाठी वा मुलीसाठी साड्या आणाव्यात असे त्यांना कधी वाटले नाही. मुलाबाळांसाठी खाऊदेखील ते परगावहून आणत नसत. या वागण्यामागे त्यांचे एक तत्त्व आहे. कसलीही अगदी छोटीशीही खरेदी करायची ती आपण राहतो त्या उस्मानाबाद मध्येच करायची. हे त्यांचे पथ्य! असे केल्याने आपल्या गावातील लोकांचा व्यापार-धंदा दुकाने चांगली चालण्यात अप्रत्यक्षपणे मदतच होत असते. ती आपण केलीच पाहिजे, हे त्यांचे मत. आजारी मुलास सरकारी दवाखान्यात ठेवले असताना तिथल्याच औषधानी तो बरा झाला पाहिजे. कारण सरकारचे ते कर्तव्य आहे. कारण बाहेरची महागडी औषधे गोरगरीबांना परवडत नाहीत. मग आपण तरी ती का वापरायची? असा त्यांचा सवाल असे. हा त्यांचा गरिबांशी कृतीशील नातं जोडण्याचा तत्त्वदर्शी मार्ग होता. भारतातील गरीबांना अंगभर कपडा मिळत नाही म्हणून गांधीजी एका पंचाने शरीर झाकायचे. त्याच पद्धतीचं उद्धवरावदादांच्या वागण्यानं गांधीजीशीही नात जुळतं

अनुक्रमाणिका

नाही काय? गांधीजीचं आणि उद्धवरावांचं गरिबी दूर करण्याचे मार्ग वेगळे असले तरी अंतिम ध्येय सारखेच नव्हते काय?

उद्धवरावदादा आणि शारदाबाईंच्या संसारात दादा म्हणजे वादळवारा तर शारदाबाई पहाटेची मंद सुगंधीत झुळूक! दादा म्हणजे पेटता पलिता तर शारदाबाई देवघरातील मंद प्रकाश देणारी शांत समई! दादांनी घराबाहेरील गोरगरीबांचा संसार सांभाळला तर शारदाबाईंनी दादांचा संसार मोठ्या कष्टाने सांभाळला.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण तेरावे**

## ।।लोकलेखा समिती अध्यक्ष, दुष्काळ निवारण समिती सदस्य आणि राज्यस्तरीय भूविकास बँकेचे संचालक।।

(१)

भाई उद्धवराव पाटील यांच्या वक्तृत्व, कर्तृत्व, निष्कलंक चारित्र्य आणि स्नेहशील वागण्यामुळे सत्ताधारी पक्षात त्यांना नेहमीच मानाचे आणि आदराचे स्थान होते. म्हणून ते विरोधी पक्षाचे आमदार असतानाही त्यांना शासनाने लोकलेखा समितीचे अध्यक्षपद बहाल केले होते. तसेच ७२ च्या निवडणुकीत उद्धवरावदादा पराभूत झाल्यावर शासनाने त्यांच्यावर दुष्काळ निवारण समितीचे सदस्य आणि राज्यस्तरीय भूविकास बँकेचे संचालक म्हणून महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविल्या. आणि उद्धवरावदादांनी आपल्या अंगीकृत तत्त्वाशी, ध्येयधोरणाशी कुठलीही तडजोड न करता त्या यशस्वीपणे पार पाडल्या.

लोकलेखा समितीचे अध्यक्ष असताना भाई उद्धवरावांनी त्यासंबंधीत विभागाचा अभ्यास केला. अंदाजपत्रकाप्रमाणे खर्च झाला आहे का नाही; तो चालू वर्षात कसकसा होतो; तो योग्य तऱ्हेने होतो की नाही; विविध विभागावर खर्च ठरल्याप्रमाणे होतो किंवा नाही आणि वायपट खर्च केला जातो का; या बाबी त्यांनी पहायला सुरुवात केली. त्यांनी आर्थिकदृष्ट्या होणाऱ्या उधळपट्टीला लगाम लावला. त्यात एक प्रकारची शिस्त आणली. त्यांच्या आयुष्यातील लोकलेखा समितीचा काळ खूप गाजला. या समितीत काम करताना उद्धवरावांनी आपले बुद्धीकौशल्य जसे पणाला लावले तसे व्यवस्थापनातील मानवी कौशल्येही माणुसकीची वागणूक देऊन कार्यप्रवण केली. स्वतःला बुद्धिमान म्हणवून घेणारे आय्. सी. एस्. कर्तबगार जुने अभ्यासू सचिवदेखील त्यांनी विचारलेल्या मूलगामी प्रश्नांची अचूक पद्धतीने उत्तरे किंवा विचारलेली माहिती पूर्णपणे देऊ शकत नसत. कारण भाई उद्धवराव हे विविध विषयांचा बारकाईने चौफेर अभ्यास करीत असत. त्यांच्या या अभ्यासूवृत्तीने सारे अचंबित होत. सारे त्यांचेबद्दल आदरयुक्त भीती बाळगून असत.

(२)

एकाहत्तर-बहात्तरच्या दुष्काळाचे अस्मानी संकट महाराष्ट्रावर कोसळले. शे.का. पक्षातर्फे भाई उद्धवरावजींनी 'मागेल त्याला काम द्या. कामाचा योग्य दाम द्या.' वगैरे मागण्यासाठी मोर्चे काढले. त्याच काळात शासनाने दुष्काळ निवारण समिती स्थापन केली. त्यात त्यांनी उद्धवरावांचा आवर्जून समावेश केला. त्या समितीत शंकरराव मोहिते पाटील आणि डॉ. वि. म. दांडेकर यांचाही समावेश होता. दुष्काळग्रस्तांना उपदेशाचे डोस पाजण्यापेक्षा त्यांच्या अडअडचणी प्रश्न आणि दुःखे ऐकूण घेण्यावर उद्धवरावांचा अधिक भर असे. त्यावर तोडगा काढण्यासाठी वास्तववादी व्यवहारी तोडगे काढण्यात ते तरबेज होते. या तोडग्यांची-धोरणांची योग्य अंमलबजावणी व्हावी, यावरही त्यांचे बारीक लक्ष असे.

या दुष्काळात सुशिक्षित बेकार तरुणांना बँकेमार्फत कर्ज देऊन त्यांना स्वावलंबी करण्यावर त्यांनी फार मोठा भर देला होता. जवळे (दु.) येथील पदवीधर तरुण श्री अर्जून जाधव हा बेकार होता. त्याला बँक मॅनेजर कर्ज काही मंजूर करीनात. हेलपाटे घालून घालून तो कंटाळून गेला. कॉलेजात शिकत असताना

अनुक्रमाणिका

त्याने विद्यार्थांची दुष्काळ निवारण समिती स्थापून दोनशे मुलांची जेवणाची व्यवस्था उस्मानाबादेत केली होती. त्यामुळे उद्धवरावदादा त्याला ओळखत होते. अशा तरुणाला बँक कर्ज मंजूर करीत नाही, हे ऐकून ते बँक मॅनेजरला समक्ष भेटले. त्यांची कानउघडणी केली आणि ताबडतोब कर्ज मंजूर करायला भाग पाडले, अशा अनेकांना कर्ज मिळण्याच्या कामात त्यांनी मदत केली.

दुष्काळी भागात लोकांना काम कसे मिळेल; त्यांना त्या कामाचा पुरेपूर दाम कसा मिळेल; सुकडी वाटपात सुरळीतपणा कसा येईल; शेतकऱ्यांनी बँकेकडून काढलेल्या कर्जाचे हप्ते कसे तहकूब होतील; त्यांचा शेतसारा कसा माफ होईल, या गोष्टीवर उद्धवराव डोळ्यात तेल घालून पाहात असत. त्यासाठी समिती सदस्यासह दौरे काढीत. लोकांची दुःखे समजून घेत. त्यांचे अश्रू पुसत. दिलासा देत. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. असा दुष्काळ पुन्हा उद्‌भवू नये. तर त्याला तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीव्यवसायाला कायमस्वरूपी उपयुक्त ठरतील अशा योजना सरकारने हाती घ्याव्यात, अशा सूचना देत. त्यानुसार मुख्य रस्त्याला खेडी जोडण्यासाठीचे जोड रस्ते, लहानमोठे पाझरतलाव, विहिरी, मोठी धरणे, बांधबंदिस्ती, इत्यादी कामे शासनाने दुष्काळी काळात सुरू केली. शंकरराव मोहिते-पाटील पूर्वाश्रमीचे शे. का. पक्षाचे कार्यकर्ते असल्याने ते भाई उद्धवरावांशी या कामी एकरूप झाले. तर डॉ. दांडेकर हे बुद्धिमान ग्रहस्थ. त्यांनाही भाई उद्धवरावांच्या कामाचा लाभ झाला. लोभ जडला. या दुष्काळ निवारण समितीने दुष्काळी काळात दुष्काळग्रस्तासाठी खूप चांगली कामे केली.

(३)

सन १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व भूविकास बँकांची गैरकारभारामुळे आर्थिक स्थिती केविलवाणी झाली होती. जवळजवळ सर्व बँकावर शासनाने प्रशासक नेमले होते. उस्मानाबाद जिल्हा भूविकास बँकेत वारेवडगाव स्कीमखाली गैरकर्जवाटपाचे प्रकरण गाजत होते. भाई उद्धवरावांनी या प्रकरणातील दोषीविरुद्ध शासनाने कार्यवाही करणेबाबत शेतकऱ्यांचे नेतृत्व केले होते. या साऱ्यांचा परिपाक म्हणून मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी राज्यातील जिल्हा भूविकास बँकांचे 'राज्य भूविकास बँके'त विलिनीकरण केले आणि या नव्या राज्यस्तरीय भूविकास बँकेवर जे संचालक नेमले त्यात १ मे १९७३ पासून भाई उद्धवराव पाटील यांचा समावेश केला. विरोधी पक्षाचे ते एकमेव संचालक होते. 'आपणाला संचालकपदी नेमण्यात मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांचा काही राजकीय हेतू असेल तर पदरी निराशा पडेल' हे भाई उद्धवरावांनी पत्र लिहून मुख्यमंत्र्यांना कळविले होते.

या राज्यस्तरीय भूविकास बँकेचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त आय्. सी. एस्. अधिकारी श्री. डी. एस. जोशी यांची नेमणूक केली होती. उद्धवरावासह अनेक दिग्गज मंडळी या बँकेच्या संचालक मंडळात काम करीत होती.

शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या कल्याणासाठी अहोरात्र झगडणारे उद्धवरावदादा या बँकेवर संचालक म्हणून काम करू लागले, त्यावेळी शेतकऱ्याकडून कर्जवसुलीसाठी जप्त्यांचे सत्र सुरू झाले होते. ते उद्धवरावांना पटणे अशक्य. त्या जप्त्या थांबाव्यात म्हणून त्यांनी दोन वेळा आपल्या संचालकपदाचा राजीनामा देऊ केला होता. शेतकऱ्यावर जप्त्या नेण्यापेक्षा बँकेत चाललेली लाचलुचपत आणि भ्रष्टाचार अगोदर थांबविला पाहिजे, हा त्यांचा आग्रह. भ्रष्टाचारी अधिकारी वा कर्मचारी यांचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी त्यांनी बँकांना भेटी दिल्या. भ्रष्टाचारी अधिकारी-कर्मचारी यांचेवर कठोर कारवाई

केली. काहीच्या मराठवाड्याबाहेर बदल्या केल्या. हे करताना स्वतःच्या नातेवाईकांना आणि पक्ष कार्यकर्त्यांनाही जुमानले नाही. बोगस कर्जवाटप करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निलंबित केले. काही कर्मचाऱ्याविरुद्ध पोलिसात फिर्यादी दाखल करण्यास बँकांना भाग पाडले. वरवंटी (जि. उस्मानाबाद) येथील प्रकराणातील जिल्हा मॅनेजरच्या भ्रष्टाचाराबद्दल वरिष्ठाकडे अहवाल सादर केला. अशा अधिकाऱ्यांना राज्यात कुठल्याही बँकेत मॅनेजर म्हणून नेमू नये, असा हट्ट धरला.

अशी साफसफाई केल्यानंतर भाई उद्धवरावांनी बँकेत काटकसरीचे धोरण राबविण्यासाठी स्वतःपासून सुरुवात केली. राज्यस्तरीय भूविकास बँकेचे संचालक म्हणून त्यांना स्वीय सहाय्यक आणि बँकेची कारही पुरविण्यात आली होती. त्याचा त्यांनी बँकेच्या कामापुरताच वापर सुरू केला. स्वीय सहाय्यकास त्यांचेकडील काम संपताच बँकेतील इतर नियमित कामे करायला ते बजावत. आपले खाजगी काम करण्यास तर ते त्याला कधीच सांगत नसत. कारची तीच गोष्ट! बँकेच्या कामासाठी जिल्ह्याबाहेर जायचे असेल तर उद्धवराव अगोदर मुख्य कार्यालयाची परवानगी घेत. खाजगी कामासाठी तर ते कार वापरणे केवळ अशक्य!

एकदा बँकेची कार खाजगी कामासाठी वापरण्याचा प्रसंग आला. स्वतःच्या मुलीचे लग्न तुळजापुरी देवीच्या मंदीरात होते. उस्मानाबाद ते तुळजापूर असा प्रवास त्यांना बँकेच्या कारने नाईलाजाने करावा लागला. तेव्हा लग्नाहून परत आल्यावर त्यांनी कारचा खाजगी कामासाठी प्रवास झालेला असून त्याचे जाण्या-येण्याचे किलोमीटरचे बँक दराने झालेले पैसे घ्यावेत असा अर्ज बँकेला दिला. सदर रक्कम बँकेत भरून त्याची पावती घेतली. संचालक म्हणून त्यांचे हे वागणे आदर्श होय.

स्वीय सहाय्यकाच्या क्षुल्लक चुकीमुळे उद्धवरावांच्या स्वच्छ चरित्र्यावर शिंतोडे उडण्याच्या शक्यतेचा प्रसंग खूप बोलका आहे. उदगीर येथे पाच तालुक्यासाठी बँकेचे एक कार्यालय होते. ते उस्मानाबाद भूविकास जिल्हा बँकेच्या अधीन राहून काम करीत होते. त्या भागातील सात शेतकऱ्यांची आपली कर्ज प्रकरणे उदगीर शाखेत प्रलंबित असल्याची तक्रार त्यांच्याकडे आली. ती पोस्टकार्डावरील तक्रार वाचून संबंधित शेतकऱ्यांची प्रकरणे मंजुरासाठी सभेपुढे ठेवण्यासाठी उदगीरच्या मॅनेजरला पत्रे लिहिण्यास त्यांनी स्वीय सहाय्यकास सांगितले. त्याप्रमाणे उदगीर बँकेला व संबंधित शेतकऱ्यांना पत्रे स्वीय सहाय्यकाने पाठविली.

असे रीतसर काम चालले असताना राज्यबँकेचे अध्यक्ष श्री. डी. एस. जोशी यांच्याकडे तीन ब्राह्मण शेतकऱ्यांनी 'भाई उद्धवराव पाटील हे कर्जमंजुरीत पक्षपात करतात' अशा आशयाची तक्रार केली होती. ती तक्रार त्यांनी भाई उद्धवरावाकडे पाठविली. ती तक्रार वाचून भाई उद्धवराव चक्रावून गेले. त्यांनी स्वीय सहाय्यकास बोलावून घेतले. मूळ कार्ड आणायला सांगितले. त्यातील एका पूर्ण भागावर तक्रार व चार मराठा शेतकऱ्यांच्या सह्या तर कार्डाच्या दुसऱ्या अर्ध्याभागात तीन ब्राह्मण शेतकऱ्यांची नावे व सह्या पाहिल्या. त्यांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. रागाची सणक उठली. स्वीय सहाय्यकाला त्यांनी धारेवर धरले. कार्डाच्या दुसऱ्या बाजूवर असलेल्या ब्राह्मण शेतकऱ्यांनी स्वीय सहाय्यकाने जाणते अजाणते पत्रे पाठविली नव्हती, हे त्याने कबूल केले. तेव्हा त्यांनी स्वीय सहाय्यकास या चुकीबद्दल शिक्षा म्हणून स्वीय सहाय्यकाचे कामकाज काढून घेतले. तसे बँक मॅनेजरला कळविले आणि हा स्वीय सहाय्यकाचा हलगर्जीपणा श्री. जोशी यांना पत्राने मुंबईला कळविला. सोबत त्या कार्डाची सत्यप्रतही पाठविली. पत्रात त्यांनी लिहिले, "मी आजपर्यंत ४० वर्षाच्या माझ्या राजकीय जीवनात कधीही जातीभेद मानला नाही.

अनुक्रमाणिका

आमच्या मुंबईसह महाराष्ट्र झालाच पाहिजे या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत कॉ. डांगे, आचार्य अत्रे, एस्. एम् जोशी इत्यादी दिग्गज नेते होते. ते जातीने ब्राह्मण होते परंतु असा विचार माझ्या मनाला कधीही शिवला नाही. त्यांच्याकडेही ही माहिती मिळू शकेल. या तक्रारीतील तीन ब्राह्मण शेतकऱ्यांची कर्जे नियमाप्रमाणे जातीने लक्ष घालून मंजुरीसाठी कार्यवाही करून घेत आहे."

बँकेच्या सभासदाकडील वाढत्या थकबाक्याबद्दलच्या प्रश्नाची चर्चा एकदा राज्यस्तरीय संचालक मंडळाच्या सभेत चालू होती, त्यावेळी पुणे जिल्ह्याचे संचालक म्हणाले, "बहुसंख्य थकबाकी ही विरोधी पक्षाच्या पुढारी वा नेते मंडळीकडेच आहे." ही बाब उद्धवरावांना खटकली. ते म्हणाले, "थकबाकीदार पदाधिकाऱ्यांच्या प्रत्येक जिल्ह्यातून पक्षनिहाय याद्या मागवून घ्या. इतरापेक्षा माझ्या पक्षाचे जास्त पदाधिकारी थकबाकीदार निघाल्यास त्या थकबाकीची संपूर्ण वसुली करण्याची मी हमी घेतो. पण बाकीचे सर्व संचालक त्यांच्या पक्ष पदाधिकाऱ्यांची बाकी वसूल करण्यास तयार आहेत का याची हमी द्यावी. सत्ताधारी पक्षाच्या सभासदाकडील थकबाकी वसूल करण्याची हमी सहकार मंत्री महोदयांनी घ्यावी. सध्या सहकारी संस्थेत थकबाकीदाराला पदाधिकारी होता येत नाही. हाच नियम मंत्री, खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती ते ग्रामपंचायत सदस्यापर्यंत लागू करा. कुठल्याही क्षेत्रात पदाधिकारी होण्यासाठी सहकारी संस्थांची थकबाकी नसावी, अशी कायद्यात दुरुस्ती करून तो नियम करून टाकावा. तसेच तारणातील जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार बंद करण्यासाठी रजिस्ट्रेशन कायद्यातच दुरुस्ती करावी. सात बारावरील बँकेच्या कर्जाचा बोजा कमी झाल्यानंतरच खरेदी विक्री कागदपत्रे नोंदविण्याबाबत दुय्यम निबंधकांना मुभा द्यावी. शासन संपादित जमिनीच्या प्रकरणात शासनाने प्रथम बँकेच्या कर्जाची भरपाई करूनच जमिनीच्या संपादनाचे काम हाती घ्यावे. असे अनेक उपाय करता येण्यासारखे आहेत. यासाठी शासन तयार व्हायला हवे. तुम्ही सारे शासनाच्या पक्षाचे संचालक आहात. तेव्हा हे सारे करण्यास शासनास भाग पाडा. तुमच्या शिष्टमंडळात मीही सहभागी होऊन शासनाकडे आपली बाजू मांडायला तयार आहे. एवढी कार्यवाही मान्य झाली तर बहुसंख्य बँकांची थकबाकीची समस्या सुटण्यास मदत होईल." या उद्धवरावांच्या विचाराशी सर्व संचालक सहमत झाले पण शासनदरबारी याबाबत प्रयत्न करण्यास कोणी फारशी उत्सुकता दाखविली नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील काँग्रेस पक्षातील मंडळींनीही 'बँकेच्या कर्जवाटपात भाई उद्धवराव पक्षपात करत असल्याची गाऱ्हाणी ना. यशवंतराव मोहिते यांचेपर्यंत नेली. ही गोष्ट उद्धवरावांना कळली, तेव्हा त्यांनी श्री यशवंतराव मोहिते यांना पत्र पाठवून आपली बाजू स्पष्ट केली, "बँकेकडे कर्ज घेण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना कोणताही पक्ष नसतो. शेती हाच त्यांचा पक्ष असतो. मी कोणत्याही कर्ज मंजुरीत कधीही पक्षपात केला नाही. उस्मानाबाद बँकेत असा पक्षपात केल्याचे एक जरी उदाहरण निघाले तरी काँग्रेसच्या नेते मंडळींसहीत आपण ठरवाल त्या दिवशी व ठिकाणी मी चर्चा करण्यास तयार आहे. माझ्याकडून पक्षपात झाल्याचे सिद्ध झाल्यास मी संचालक पदाचा राजीनामाच काय पण राजकारणही सोडण्यास तयार आहे. परंतु माझा पक्षपात सिद्ध न झाल्यास तक्रारकर्ते जिल्हा परिषद अध्यक्ष निदान त्यांच्या सध्याच्या पदाचा तरी राजीनामा देण्यास तयार आहेत काय हे विचारून पहावे." यानंतर तक्रारखोर काँग्रेस नेते मंडळीनी आपल्या तोंडाला कुलूप लावले.

बँक अधिकारी आणि कर्मचारी यांनी कर्ज मागणीसाठी खेड्यातून येणाऱ्या शेतकऱ्यांशी सौजन्यपूर्ण वागणूक ठेवली पाहिजे. त्यांना सर्व तऱ्हेचे मार्गदर्शन व सहकार्य केले पाहिजे. हा उद्धवराव दादांचा आग्रह

असे. ते स्वतः कर्ज मागायला येणाऱ्या सर्वांची आस्थेने विचारपूस करीत. योग्य ते मार्गदर्शन करीत. बँका ह्या धनको म्हणजे श्रेष्ठ आणि कर्ज मागणारे ऋणको म्हणून कनिष्ठ मानणे हे उद्धवरावदादांना मान्य नव्हते.

विहीर, इलेक्ट्रीक मोटार, वीजेचे कनेक्शन व पाईप लाईनच्या प्रकरणात कर्ज देण्यापूर्वीच वीजेची लाईन उपलब्ध असल्याबाबतचा वीज मंडळाचा दाखला अर्जासोबत दाखल करण्याचा आग्रह त्यांनी धरला. त्यासाठी वीज मंडळाच्या कार्यकारी अभियंत्यास कर्ज मंजुरीच्या बैठकीस आवर्जून ते बोलावून घेत असत. शेतकऱ्यांना इलेक्ट्रिक मोटारीचे कर्ज पुरवणे, त्या मोटारींना वीज मंडळाने त्वरीत कनेक्शन देणे आणि त्यानंतर अशा शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेनेही पीक कर्जाचे वाटप पेरणी हंगामा अगोदर करणे हा त्रिसुत्री कार्यक्रम यशस्वी करण्यात भाई उद्धवराव अग्रेसर राहिले.

काही शेतकरी विहिर, इले. मोटार आणि पाईप लाईनसाठी कर्ज काढतात आणि दुसऱ्याच घरगुती बाबींवर खर्च करतात. त्यामुळे त्यांचे प्रकल्प अपुरे राहतात आणि शेतीमधील त्यांचे उत्पन्न घटते. तो कर्जफेड करू शकत नाही. शेवटी त्याला शेतीच विक्रीला काढावी लागते. हा सर्वसामान्य अनुभव! अशा बाबत बँक अधिकाऱ्यांनी सतत जागरुक राहूनच टप्प्याटप्प्याने काम पाहून कर्ज पुरवठा केला पाहिजे. ह्या मताचे उद्धवराव होते.

आपण बँकेचे संचालक आहोत. आपणही कर्ज घेऊन विहीर खोदावी, त्यावर इले-मोटार बसवावी. शेतीत पाईपलाईन टाकून शेती उत्पादन वाढवावे व कर्ज फेड करून दाखवावी आणि इतर शेतकऱ्यांना आपले उदाहरण आदर्श म्हणून ठेवावे. म्हणून उद्धवरावदादांनी बँकेकडून रीतसर कर्ज काढले. काम सुरू केले. उद्धवराव खरेच विहिरीचे काम करीत आहेत की नाहीत, हे पाहण्यासाठी मुंबई बँकेचे अध्यक्ष श्री. डी. एस. जोशी यांनी त्यांच्या शेतीला भेट दिली. कामाची पाहाणी केली आणि झालेल्या कामाचे कौतुकही केले.

उद्धवरावांनी बँक कर्जातून लिफ्टइरिगेशन प्रकल्प पूर्ण केला. प्रथमवर्षी शेतात ऊस लावला. ऊसापासून गूळ केला. या गुळाच्या पट्टीचे पंच्याऐंशी हजार रुपये आल्याचे पाहून त्यांना समाधान वाटले. बँककर्जावर शेतकरी आपली शेती बागायत करून समृद्ध होऊ शकतो. हे त्यांनी स्वानुभवावरून सिद्ध केले. तो आदर्श शेतकऱ्यांनी गिरवावा, असेच कोणीही म्हणेल.

भूविकास बँकेचे संचालक म्हणून काम करताना उद्धवरावांनी शेतकऱ्यांना संघटित करून, बँकेच्या अन्याय्य कर्जवसुलीला विरोध केला. निदर्शने केली. त्यांचे हे वर्तन बँकेच्या हिताच्या विरोधी असल्याचा त्यावेळचे भूविकास बँकेचे अध्यक्ष श्री. जोशी यांनी उद्धवरावांना एका बैठकीत जाब विचारला. तेव्हा भाई उद्धवरावांनी आपले ठाम मत ठणकावून सांगितले. “बँकेपेक्षा माझी लॉयल्टी (निष्ठा) शेतकऱ्याकडेच राहील. त्यांच्या संघटित ताकदीवरच मी सत्यासाठी लढाया लढविल्या आहेत. म्हणून संचालकपदासाठी मी माझी भूमिका बदलणार नाही. बँका शेतकऱ्यांच्या विकासासाठी असल्या पाहिजेत. शेतकऱ्यांना भिकेला लावून बँकेचे हित काय कामाचे? हे माझे मत शासनास परवडत नसेल तर त्यांनी मला संचालकपदावरून कमी करावे.” पण आश्चर्याची गोष्ट अशी की मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी उद्धवरावांना याबाबत एका शब्दानेही विचारले नाही.

अनुक्रमाणिका

एकदा शेतकऱ्याकडील कर्जवसुलीच्या प्रश्नावर भाई उद्धवरावांची रिझर्व बँकेच्या शेती विभागाचे प्रमुख श्री. दाते यांच्याशी अशीच खडाजंगी झाली होती. बँका शेतकऱ्यांना कर्जे देतात म्हणजे उपकार करीत नाहीत. हा मुद्दा पटवून देताना उद्धवराव त्यांना म्हणाले, “तुम्ही शेतकऱ्यासाठी कर्ज देत नसून राष्ट्राच्या गरजा भागविण्यासाठी जो अन्नधान्याचे उत्पादन करतो ते उत्पादन वाढावे, यासाठी कर्ज देत असता. शेतकऱ्यांनीच देशासाठी तोटा सहन करावा, अशी शासनाची नीती असेल तर शेतकरी व शेतमजूर कधीच सुखी होऊ शकणार नाही. शासन शेतकऱ्यांना तोटा सहन करण्याचा सल्ला देते मग कारखानदारांना त्यांच्या उत्पादन खर्चाच्या कमी किंमतीत मला विकण्यास का सल्ला देत नाही?” अशा मूलगामी तात्त्विक मांडणीमुळे श्री. दाते यांना पुढे बोलता आले नाही.

महाराष्ट्र व देशातील बऱ्याच राज्यात दुष्काळी परिस्थिती उद्‌भवल्याने शेतीबरोबर पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला. हा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना विहिरी खोदण्यासाठी जागतिक बँकेकडून मोठे कर्ज मंजूर करून घेतले. पण ते कर्ज शेतकऱ्यांना देताना जागतिक बँकेने रिझर्व बँक आणि अर्थ खात्याशी चर्चा करून अनेक क्लिष्ट अटी घातल्या. त्यामुळे रिझर्व बँकेने सर्व भूविकास बँकांना हा निधी उपलब्ध करून देताना त्या सर्व अव्यवहार्य अटीही लागू केल्या. या जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्यात गतीच येईना. जागतिक बँकेकडून घेतलेल कर्ज बसून राहून लागले.

देशभरातील सर्व राज्यातील भूविकास बँकांचे चेअरमन राष्ट्रीय बैठकीस दिल्लीला येत. ते कर्जवितरणातील जाचक अटीमुळे येणाऱ्या अडचणीचा पाढा वाचत पण रिझर्व बँकेचे दातेसाहेब कायद्यातील तरतुदी दाखवून सर्वांना निरुत्तर करत. परिणामी सर्व ठिकाणी कर्ज वितरणाचे घोडे अडून बसले.

दिल्लीला होणाऱ्या आगामी बैठकीपूर्वी महाराष्ट्र राज्य भूविकास बँकेचे चेअरमन उद्धवराव दादांना म्हणाले, “उद्धवरावजी, भूविकास बँकेच्या दिल्लीला होणाऱ्या येत्या बैठकीला तुम्ही जा आणि दातेसाहेबांचे दात त्यांच्याच घशात घालून परत या. आम्ही प्रयत्न करून थकलो पण ते आम्हा कुणाचं काही चालूच देत नाहीत.”

चेअरमनच्या आदेशानुसार भाई उद्धवराव दिल्लीला गेले. बैठक सुरू झाली. जाचक अटींचा प्रश्न नेहमीप्रमाणे चर्चेला आला. पण जागतिक बँकेच्या प्रतिनिधीने व दातेसाहेबांनी त्या अटीचे समर्थन केले. तेव्हा भाई उद्धवरावांनी त्यांना चांगलेच सुनावले. दादा म्हणाले, “जाचक अटीमुळे वितरणाअभावी पडून राहिलेल्या जागतिक बँकेच्या कर्जाच्या व्याजाचा प्रचंड भूर्दंड आधीच दुर्बल झालेल्या बँकावर लादून त्या आणखी अशक्त करण्यापेक्षा या कर्जाची रक्कम जागतिक बँकेस परत करण्याचा निर्णय अर्थखाते व रिझर्व बँकेने घ्यावा, असे माझे स्पष्ट मत बनले आहे.” एवढे बोलल्यानंतर भाई उद्धवरावांनी आपल्या भाषणात या जाचक अटींची अव्यवहार्यता व त्यातील अनेक विसंगतीचे अभ्यासपूर्ण विवेचन इतक्या प्रभावीपणे आणि नेमकेपणाने केले की, जागतिक बँकेचे प्रतिनिधी आणि रिझर्व बँकेच्या कृषी विभागाचे प्रमुख श्री. दाते साहेब ते मुद्दे खोडू शकले नाहीत. उद्धवरावांच्या या भाषणाचा, भाषणातील विवेचनाचा चांगला परिणाम झाला. पूर्वीच्या जाचक अटीतील महत्त्वाच्या जाचक अटी शिथील करण्याचे जागतिक बँक प्रतिनिधी, रिझर्व बँक आणि अर्थखाते यांनी मान्य केले.

अनुक्रमाणिका

अशा प्रकारे उद्धवराव दादा दिल्लीहून विजयी होऊन आले. यामुळे महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण देशात विहिरीसाठी शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या कामास पुरेशी गती मिळाली. भाई उद्धवराव पाटील यांच्या प्रयत्नामुळे भूविकास बँकेकडून गरजू शेतकऱ्यांना विहिरी खोदण्यासाठी भराभर वेळेवर कर्जे मिळू शकली आणि दुष्काळातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत झाली. त्याचबरोबर भूविकास बँकेचे व शासनाचे उद्दिष्ट सफल होण्यास हातभार लागला. भूविकास बँकेच्या व्यवस्थापनेतही उद्धवरावानी आमुलाग्र सुधारणा सुचवल्या. त्या मान्य होऊन भूविकास बँका त्यावेळी शेतकऱ्यांच्या खरेखुरे मित्र बनल्या.

*

**प्रकरण चौदावे**

## ।।शेतकरी, शेतमजूर कष्टकऱ्यांचे चालते बोलते कृषी विद्यापीठ।।

"उद्धवराव हे खरे धरतीचे पूत्र होते." हे प्रा. ग. प्र. प्रधान यांचे म्हणणे सर्वार्थाने खरे आहे. त्यांचा वेष शेतकऱ्यांचा, भाषा शेतकऱ्यांची आणि संस्कृतीही शेतकऱ्याची होती. कमरेला धोतर, अंगात नेहरू शर्ट आणि डोकीला टोपी. पुढे ती टोपीही उडाली. डोकीचे केस मागे फिरविलेले. पायात उस्मानाबादी शेतकरी वहाणा. तोंडात पानाचा तोबरा. लालभडक पिचकाऱ्या टाकताना सदऱ्यावर उडालेल्या लाल तुषारांच्या खुणा. शेतकऱ्यांचा खराखुरा नेता शोभेल असं सारं व्यक्तिमत्व! हे व्यक्तिमत्व दाखविण्यापुरते नव्हते. शेतकऱ्यांचं जीवनच ते नेहमी जगायचे. शेतात काम करायची त्यांना कधी लाज वाटली नाही.

भाई उद्धवराव वकील झालेले पण वकील म्हणवून घेण्यापेक्षा त्यांना शेतकरी म्हणून घेणं आवडायचे. नव्हे त्याचा त्यांना अभिमान वाटायचा. धान्याची खळीदळी झाल्यावर एकावर्षी त्यांनी बैलगाडीत धान्याची पोती टाकली. स्वतःच बैलगाडी हाकीत ते वैरागच्या बाजाराला गेले. गाडी हाकणाऱ्या उद्धवरावांना पाहून वैरागमधील एक सराफ त्यांना म्हणाले, "उद्धवराव, तुम्ही आमदार खासदार म्हणून मिरवलेली माणसं. असं शेतकऱ्याप्रमाणं गाडी हाकणं बरं दिसत नाही. ते तुम्हाला शोभाही देत नाही." तेव्हा उद्धवराव दादांनी गाडी थांबविली. ते खाली उतरले. बैलाच्या पाठीवर थाप टाकली आणि ते सराफाच्या दुकानात जाऊन बसले आणि म्हणाले, "तुमचा सराफीचा वडिलोपार्जित धंदा. ते करतांना तुम्हाला लाज वाटत नाही. मग माझा शेतीचा धंदा तर पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला. मला त्याची लाज का म्हणून वाटावी? उलट मला या शेतीधंद्याचा अभिमानच वाटतो." या बोलण्याने सराफाचे तोंडच बंद झाले. त्याने उद्धवरावांच्यापुढे पानसुपारीचे तबक सारले.

भाई उद्धवराव पाटील यांचा शेतकरी म्हणजे श्वास होता. शेतकरी कल्याणाचा त्यांना ध्यास होता. म्हणूनच शेतकऱ्यांच्या उद्धाराचा त्यांनी वसा घेतला होता. शेतकऱ्यांचे प्रश्न वेशीवर टांगण्याचे त्यांचे जिवीत ध्येय होते. शेतकऱ्यावर शेतमजूरावर होणारे अन्याय, अत्याचार आणि त्यांची होणारी पिळवणूक आणि छळणूक थांबविण्यासाठी त्यांनी जीवनभर संग्राम केला. शेती व्यवसायाला प्रतिष्ठा मिळावी म्हणून त्यांनी शेती व्यवसायाचा मूलगामी अभ्यास केला. शेती व्यवसायाला उर्जितावस्था आणण्यासाठी आणि शेती व्यवसायाला उद्योगधंद्याचा दर्जा मिळवून देण्यासाठी अनेक चळवळी केल्या. विधानसभेत-लोकसभेत आणि लोक समुदायापुढे अनेक भाषणे केली. त्यातून शेतकऱ्यांना आणि कष्टकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा अटोकाट प्रयत्न केला. शेती, शेतीचे प्रश्न, शेतकरी, त्यांची दुःखे, यांच्यात आणि उद्धवरावांच्यात एक अद्वैतच निर्माण झाले होते. त्यांच्या कार्यकर्तृत्वावर अनेकांनी अनेक लेख लिहिले. त्या लेखांची शिर्षके जरी पाहिली तरी या अद्वैताची कल्पना येते. 'कष्टकऱ्यांच्या उद्धारासाठी लढणारा सेनानी' (प्रा. रमेश दाबके), 'सर्वसामान्यांचा असामान्य नेता' (प्रा. अर्जुन जाधव), 'श्रमजिवी जनतेचे सुजाण नेतृत्व' (श्री. सुरेश तापडिया), 'पुरोगामी विचाराचा आधुनिक कृषीतज्ञ' (श्री. विश्वनाथ खोत-पाटील), 'श्रमिकांचा सच्चा नेता' (भाई दाजिबा देसाई), 'शेती समस्यांचा जबरदस्त जाण असणारा नेता' (प्रा.एन्.डी. पाटील), 'शेतकऱ्यांचा वेष, भाषा आणि हितासाठी लढलेले उद्धवराव' (श्रीमती अहिल्या रांगणेकर), 'महाराष्ट्राचे अस्सल ग्रामीण नेते' (श्री. मधुकर भावे), आणि 'शेती व्यवसायाचे ज्ञानकोश' (श्री. व्यंकटेश हंबिरे), ही शीर्षके वानगीदाखल दिली आहेत.

अनुक्रमाणिका

कार्लमार्क्सप्रमाणेच महात्मा फुल्यांचे भाई उद्धवराव भक्त. फुल्यांना ते महाराष्ट्राचा मार्क्सच मानत. सन १८८२ साली म. फुल्यांनी 'शेतकऱ्याचा असुड' हा ग्रंथ त्यांचा आवडता ग्रंथ. या ग्रंथात फुल्यांनी त्या काळातील शेतकऱ्यांची दारूण स्थिती सविस्तरपणे शब्दबद्ध केलेली. अज्ञान, अंधश्रद्धा आणि धर्माच्या नावावर भट भिक्षुकाकडून चाललेली त्यांची क्रूर पिळवणूक, लहान मोठ्या शासकीय ब्राह्मण अधिकाऱ्यांकडून होणारी त्यांची छळवणूक, सावकारशाहीकडून चाललेली त्यांच्या संपत्तीची लयलूट आणि दारिद्र्याच्या दरीत चाललेली त्यांची दीनवाणी ससेहोलपट या साऱ्या वास्तवाची माहिति फुल्यांनी वर्णन केली होती. या साऱ्या रोगावर रामबाण सुचविणारे एक महावाक्य त्यांनी याच पुस्तकाच्या उपोद्घाताच्या आरंभी लिहिले. 'विद्येविना मति गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गति गेली, गतीविना वित्त गेले. वित्ताविना शुद्र खचले. इतके अनर्थ एका अविद्येने केले.'

ही शेतकऱ्यांची स्थिती सव्वाशे वर्षापूर्वीची. आजही त्या स्थितीत काहीही फरक पडलेला नाही. स्वातंत्र्य मिळून ५५ वर्षे उलटून गेली तरी शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा झाली नाही. उलट ती स्थिती वरचेवर बिघडतच चाललीय. हे भेसूर चित्र भाई उद्धवरावांच्या तीक्ष्ण नजरेतून, नीरक्षीर न्यायाच्या निरिक्षणातून आणि अभ्यासू वृत्तीतून सुटणे अशक्य. म्हणून शेतकरी शूद्रांचा उद्धार करण्यासाठीच आपला जन्म असल्याचे मानून ते राजकारणात उतरले. आणि जीवनाच्या अंतापर्यंत ते त्यासाठी चंदनासारखे झिजले. दीपज्योतीसारखे जळत राहिले. समाजाला सुगंध देत! प्रकाशवाटा दाखवत!!

उद्धवरावांनी निजामाच्या राजवटीत शेतकऱ्यांवर होणारे अन्याय कमी करण्यासाठी लढे दिले. निजामी राज्यात सर्व ठिकाणी शेतकऱ्यांना सारा सारखा नव्हता. तो सर्वांनाच उत्पादनाच्या प्रमाणात करावा. शेतसारा माफ करून ॲग्रीकल्चर टॅक्स लावावा. रयतवारी पद्धत बंद करावी. या मागण्या उद्धवरावदादांनी मार्गी लावल्या. सावकारशाहीविरुद्ध चळवळ उभारून शेतकऱ्यांना सावकारी व्याजाच्या जंजाळातून मुक्त केले. लेव्ही देण्याबाबतच्या जाचक अन्यायी नियमाने हैराण झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळवून दिला. हैद्राबाद विधानसभेत पुरोगामी स्वरुपाचा कुळकायदा करायला भाग पाडले. हैद्राबाद संस्थानात जमिनीची कमालमर्यादा १४५ एकरावरून १०८ एकरावर आणण्यात त्यांनी यश मिळवले.

महाराष्ट्र विधानसभेत जमिन सेलिंगचा कायदा चर्चेला आला त्यावेळी भाई उद्धवरावजींची आपली शेतकऱ्यांच्या हिताबद्दलची मते मोठ्या परखडपणे मांडली. जमीनधारणा कायद्यात अनेक पळवाटा ठेवल्यामुळे जमिनदारांनी आपल्या कुटुंबातील प्रत्येकाच्या नावावर जमिनी करून घेतल्या. त्यामुळे मूळ हेतूच पराजित करण्याची जमिनदारांना संधी दिली गेली. या पद्धतीने जमीनदारी खऱ्या अर्थाने नष्ट होणार नाहीच पण जमिनीचे विकेंद्रीकरणही होणारं नाही आणि भूमिहिनांना जमिनीही मिळणार नाहीत. हे वास्तव त्यांनी ठणकावून सांगितले. यामुळे शेतकऱ्यांच्या पुढील पिढ्या अल्पभूधारक होणार. ते मार्केटमध्ये टिकाव धरू शकणार नाहीत. आणि शेवटी ते जमिनी विकून शेतमजूर होणार. हे दुष्टचक्र थांबवायचे असेल तर जमिन धारणा कायद्याची चोख काटेकोरपणे अंमलबजावणी शासनाने केली पाहिजे. या विचारावर ते ठाम होते.

उद्धवरावांनी शेतकऱ्यांच्या शेतातील पीक आणेवारी ठरविण्याच्या पद्धतीविरुद्धही विधानसभेत आवाज उठविला. पीकांची आणेवारी ठरवितांना अधिकारी मोटारीने जातात. शेतात जाऊन पीक पहाणी करण्याऐवजी ते मोटारीत बसूनच तलाठी सांगेल तशी पीक आणेवारी लावतात. शेतात प्रत्यक्ष जाऊन पीक

अनुक्रमाणिका

पहाणी करून, कणसे वगैरे पाहूनच खरी पीक आणेवारी निश्चित करणे गरजेचे असते. जेथे पीक आणेवारी कमी असेल तेथे सरकारने कामे तर सुरू करावीतच पण शेतकऱ्यांचा सारा माफ करावा. तगईचे हप्ते तहकूब करावेत. शेतकऱ्यांना मदत करावी. अन्यथा शेतकरी भिकेला लागल्याशिवाय राहणार नाही. हे त्यांनी शासनाला पटवून दिले होते.

अल्पबचतीत गुंतवणूक करणे कामी शासन शेतकऱ्यावर सक्ती करते. ही गोष्ट अन्यायकारक आहे. कारण शेतकऱ्यांना शेतीत गुंतवणुकीसाठीच तुटपुंजे भांडवल असते. प्रसंगी त्यांना चढ्या व्याजदराने कर्जे काढावी लागतात. ती फेडतांना त्यांची दमछाक होत असतांना ते अल्पबचतीत गुंतवणूक तरी कशी करणार? बड्या शेतकऱ्याकडून अल्पबचतीमध्ये गुंतवणूक व्हावी पण तेथेही सक्ती नसावी. त्यासाठी ही अल्पबचत योजना राबविण्याचे काम सरकारी अधिकाऱ्याकडून काढून घ्यावे आणि ती जबाबदारी सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांवर सोपवावी म्हणजे ते या योजनेचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगून त्यात शेतकऱ्यांना त्यांच्या इच्छेनुसार व कुवतीनुसार सहभागी करून घेतील, अशा सूचना भाई उद्धवरावांनी शासनाला वेळोवेळी केल्या.

शेतकऱ्यांची शेती निसर्गावर अवलंबून असते. वेळेवर पाऊस पडला नाही तर त्यानी पेरलेले बीही वाया जाते. मग दुष्काळी परिस्थितीत त्यांचे काय हाल होत असतील, यांची कल्पनाच केलेली बरी. दुष्काळी परिस्थितीत शासनाने शेतसारा तर माफ केला पाहिजेच पण कर्जवसुलीही तहकूब केली पाहिजे. आणि शेतकरी शेतमजुरासाठी रोजगार हमी योजना सुरू केली पाहिजे. हे उद्धवरावाचे आग्रही मत होते. पण त्याकडे शासनाने १९५७ पासून दुर्लक्ष केले होते. पुढे १९७१-७२ च्या भीषण दुष्काळात या मागणीसाठी शे. का. पक्षातर्फे भाई उद्धवरावांच्या नेतृत्वाखाली पंधरा हजार शेतकरी-शेतमजुरांचा मोर्चा उस्मानाबाद जिल्हा कचेरीवर नेला होता. या मोर्चात मा. मंत्री महोदय भाऊसाहेब वर्तक यांची गाडी मोर्चेकरांनी काम मागण्यासाठी उस्मानाबादेत अडविली. पोलीसांनी मोर्चावर अश्रूधूर सोडला. लाठीमार केला. हा प्रश्न विधानसभेतही गाजला. काम मागणाऱ्या दुष्काळग्रस्त भुकेजलेल्या मोर्चेकरांना काम न देता लाठीमार खावा लागला. यावर भाई उद्धवरावांनी शासनाचे वाभाडे काढले. याच काळात काम आणि धान्य मागणाऱ्या शेतकऱ्यांच्या-शेतमजुरांच्या मोर्चावर शासनाने वैराग आणि इस्लामपूर येथे अमानुष गोळीबार केला. त्यांत अनुक्रमे आठ आणि दोन मोर्चेकऱ्यांना शासनाने यमसदनाला पाठविले. संयुक्त महाराष्ट्रातील मोरारजीभाई देसाई यांचा क्रूर वारसा शासनाने पुढे चालविला म्हणून त्यांच्या अब्रूचे धिंडवडे भाई उद्धवरावांनी विधानसभेत काढले. एवढेच नाहीतर रोजगार हमी योजनेसाठी भाई उद्धवराव यांनी विरोधी पक्षांच्या साह्याने विधानसभेचे कामकाज सतत सात दिवसासाठी बंद पाडले. त्याचा परिणाम म्हणून शासनाला महाराष्ट्रात रोजगार हमी योजना कायदा करावा लागला. ही योजना सुरू करणारे महाराष्ट्र हे राज्य भारतातले पहिले राज्य आहे.

शेतकऱ्यांची शेती पूर्णतः निसर्गावर अवलंबून असते. अवर्षणाच्या पट्ट्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती तर त्याहून वाईट असते. विहिर बागायतदार कर्जे काढून द्राक्षे, ऊस आणि फळबाग फुलवतात. पण निसर्गाचा प्रकोप झाला. वादळवारे सुटले, अवेळी पाऊस वा गारपीठ झाली. पिकावर रोग पडले तर त्यांची वर्षभराची सारी मेहनत वाया जाते. त्यांच्या पिकाला कुठलेच संरक्षण नसते. उद्योगधंद्याला विम्याचे संरक्षण मिळते. नोकरीत असलेल्यांना सर्वप्रकारचे संरक्षण असते पण रात्रंदिवस उन्हातान्हात, वादळ वाऱ्यात आणि पावसाचिखलात काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि त्यांच्या पिकांना मात्र कसलेच संरक्षण मिळत नाही. सरकार या दृष्टीने विचारही करीत नाही. शासनाने शेतीव्यवसायाला संरक्षण मिळवून

अनुक्रमाणिका

देण्यासाठी पीक-विमा योजना सुरू केली पाहिजे. ही भाई उद्धवरावांची सततची मागणी होती. आता कुठे या पीकविमा योजनेचा विचार शासन करू लागले आहे. पण ती योजना राबवतांना चालढकलच होत आहे. या पीकविमा योजनेबाबत राज्यकर्त्यांनी गांभिर्याने विचार करून निर्णय घेतला नाही तर देशातील कष्टकरी वर्ग क्रांती केल्याशिवाय राहाणार नाही, अशा इशारा भाई उद्धवरावांनी शासनाला अनेकवेळा दिला आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणाचा प्रसार वाढला. शेतकरी, शेतमजूर आणि दलितांची मुले पदवीधर होऊ लागली. पण त्यांना शासन नोकऱ्या देऊ शकत नसल्याने बेसुमारी बेकारी वाढली. बेकार तरुणांना एक तर नोकऱ्या दिल्या पाहिजेत. नोकऱ्या देता येत नसतील तर त्यांना स्वतःचे लहान मोठे उद्यागधंदे काढायला कर्जपुरवठा केला पाहिजे. बेकारांना कर्जे मिळण्यातही अनेक अडचणी आहेत. असे बेकार तरुण निराश होऊन नक्षलवादाकडे झुकले तर दोष कुणाचा? युवा शक्ती अशी भरकटत जाऊ द्यायची नसेल तर त्यांना निदान जगण्यापुरता बेकारभत्ता दिला पाहिजे. पाश्चिमात्य देशात असा बेकारभत्ता दिला जातो. अशा बेकारांचा बेकारभत्ता मिळवून देण्यासाठी शे. का. पक्षातर्फे भाई उद्धवरावांची चळवळी उभारल्या. मोर्चे काढले. शासनाने त्या दृष्टीने अत्यंत मंदगतीने पाऊले उचलायला सुरवात केलीय पण खऱ्या अर्थाने बेकारभत्ता योजना राबविण्यात शासनाला पूर्ण यश आले, असे म्हणता येईल? कल्याणकारी राज्य म्हणवून घेण्यासाठी ही योजना योग्य तऱ्हेने राबविण्याचा निर्णय घेऊन त्याची योग्य पद्धतीचे अंमलबजावणी करणे गरजेच असल्याने त्यांनी शासनाला वारंवार बजावले आहे.

शासकीय, निमशासकीय आणि औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर पेन्शन मिळते. ही पेन्शन योजना आमदार-खासदार-मंत्री या लोकप्रतिनिधींना मंजूर करण्यात कसलीच खळखळ होत नाही. कायदे करणारेच असे कायदे करून स्वतःचे फायदे करून घेतात. मात्र शेतकरी, शेतमजूर, भाजीपाला विक्रेते, हमाल आदि लोकांना म्हातारपणी काम होईनासे झाल्यानंतर उर्वरित जीवन जगण्यासाठी पेन्शन का नको? त्यांनाही शासनाने पेन्शन देण्याची व्यवस्था केली पाहिजे, ही बाबही उद्धवराव पाटील यांनी सातत्याने मांडली. त्याचा आता विचार होऊ लागला आहे. अशा हातावर पोट असणाऱ्या अडीच कोटी कष्टकऱ्यांसाठी पेन्शन व सामुदायिक विमा योजना लागू करण्याची योजना महाराष्ट्र शासनाने आखली असल्याची घोषणा नुकतीच डिसेंबर २००१ मध्ये जळगाव येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य, हमाल, मापाडी महामंडळाच्या अधिवेशनात ना. सतीश चतुर्वेदी यांनी घोषित केली आहे. त्यासाठी डॉ. बाबा आढाव यांनी गेली अनेक वर्षे आंदोलने केली आहेत. भाई उद्धवरावजींच्या मागणीचाच हा विजय आहे.

शेतकऱ्यांच्या शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित किफायतशीर भाव बांधून देण्याची मागणी शे. का. पक्षाने पन्नासवर्षापूर्वीच केली आहे. शेतकऱ्याने पिकवलेल्या मालाची किंमत लिलाव पुकारून दलाल करीत आले आहेत. या प्रथेविरुद्ध शे. का. पक्षाने प्रथम आवाज उठविला. क्रांतीसिंह नाना पाटील या विषयावर पोटतिडकीने बोलत. शेतकऱ्यांच्या मालाला लिलावात बोली बोलून भाव ठरविणारे दलाल आपल्या पैरणीच्या आत दुसऱ्या दलालाचा हात घेऊन संगनमताने शेतकऱ्यांच्या मालांची कमीतकमी किंमत ठरवितात. त्यात दलाली, हमाली, आडत, धर्मादाय फंड, घसारा वगैरे बाबींची रक्कम कापून घेऊन राहिलेली तुटपुंजी रक्कम शेतकऱ्यांच्या हाती दिली जाते. आजही शेतकऱ्यांना आपल्या मालाची किंमत ठरविता येत नाही. शेतकरी जेव्हा बाजारात माल आणतो, त्यावेळी भाव कोसळलेले असतात. पण तोच माल दलालांच्या वखारीत गेला की त्याचे भाव दोनअडीच पटीने वाढतात. त्यामुळे व्यापारी दलाल अधिक श्रीमंत होतात. तर गरीब शेतकरी अधिक गरीब होतो. इतर उत्पादित वस्तूंचे भाव मात्र लिलाव बोलून होत

नाहीत. त्या वस्तूंची किंमत उद्योजक आणि व्यापारी ठरवतात. हे भाव ठरवितांना ते खरेदीची किंमत, वहातूक खर्च, त्या किंमतीवरील सेल टॅक्स, इनकम टॅक्स, सुपर टॅक्स वगैरे करांची रक्कम त्या मालाच्या किंमतीवर लादतात. एवढेच नाही तर नोकरांचे पगार, दुकानाचे भाडे, इतकेच काय पण दुकान झाडण्यासाठी आणलेल्या केरसुणीची रक्कम त्यात मिसळतात. व त्यावर आपला नफा आकारून मालाची-वस्तूची किंमत ठरवतात. व ती गिऱ्हाईकाकडून वसूल करतात. या गोष्टी सांगून झाल्या म्हणजे क्रांतीसिंह म्हणायचे, "शेतकऱ्यांनी कापड दुकानदाराचे दुकानात जाऊन त्याच्या कपाटातून धोतरजोडी, मांजरपाट, लुगडी, चोळखण वगैरे माल बाहेर काढून त्याचा लिलाव करायचे ठरविले आणि आपल्या मनाने आपणच बोली बोलायला लागून 'एकवार, दोनवार आणि तीनवार' असे म्हणून धोतरजोडी दिली. घेतली असे म्हणू लागलो तर तो दुकानदार त्या मालाचा लिलाव आपणास करू देईल कां?" याच विचाराचा वारसा भाई उद्धवराव पाटील यांनी पुढे सजगतेने चालू ठेवला होता.

भाई उद्धवरावजीनी शेतीमालाला किफायतशीर भाव शासनाने बांधून दिले पाहिजेत, हा विषय प्रथमच मुंबई विधानसभेत उपस्थित केला होता. त्यांच्या मते, भारतीय अर्थव्यवस्था भांडवलदारी स्वरुपाची बनली असल्याने शासनाने उद्योगधंद्याला अधिक महत्त्व दिले. आणि कृषी व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असूनही त्याकडे शासनाने जाणूनबुजून डोळेझाक केली. जोपर्यंत उत्पादनखर्चाच्या प्रमाणात शेतीमालाला भाव मिळत नाही तोपर्यत भारतीय शेती तोट्यातच चालणार आहे. त्यामुळे शेती व्यवसाय उध्वस्त होऊ लागला आहे. भारतातलं अर्थकारण हे भांडवली अर्थकारण झाल्याने शेतीधंद्यावर फार मोठं आक्रमण होत आहे. शेतकरी शेतमजूर बनू लागला आहे. शेतमजुरांची संख्या वाढत आहे. ही परिस्थिती विशद करून भाई उद्धवराव पाटील यांनी प्रा. बा. ह. कल्याणकर यांना दिलेल्या मुलाखतीमध्ये आपली तर्कशुद्ध, शास्त्रशुद्ध मते मांडली आहेत. ते म्हणतात, "शेतीधंद्याला संरक्षण देण्यासाठी श्रमाचा मोबदला भावरुपानं मिळाला पाहिजे. या पक्षाच्या विचाराला ३०-३५ वर्षानंतर अखिल भारतीय वैचारिक मान्यता मिळाली आहे.... आम्ही शेतीमालाला रास्त भाव द्या. असा आग्रह सुरू केला त्यावेळी देशातल्या कम्युनिस्टांनी आमच्यावर अग्रलेख लिहिले की 'ही श्रीमंत शेतकऱ्यांची चळवळ आहे.' यात लाल निशाण गट, कॉ. डांगे यांनी सपाटून विरोध केला. यशवंतरावजी चव्हाणही विरोध करीत असत. परंतु यात कम्युनिष्ट आघाडीवर होते. शेती मालाला रास्त भाव द्या ही शेतकरी कामगार पक्षाची मागणी मॉर्किस्ट मागणी नाही. मार्क्सवादाच्या विरोधातली आहे. असा कम्युनिस्ट पार्टीच्या अनेक पुढाऱ्यांचा समज होता. १९५३ साली रशियन कम्युनिस्ट पार्टी मुखपत्र 'एव्हर लास्टिंग पीस' मध्ये अग्रलेख आला होता. त्यात असं म्हटलं होतं की, 'अविकसित देशामध्ये शेतमालाला भाव मागणं ही मागणी क्रांतीकारक आहे. (ती) श्रमजिवी जनतेची मागणी आहे.' तेथून कम्युनिस्ट पार्टीने आमच्या मागणीला पाठिंबा दिला.... मार्क्सवाद आणि लेनिनवाद हे समाजाचं विश्लेषण करून पर्याय सुचविणारं शास्त्र आहे. या शास्त्राच्या आधारावरच या गोष्टी केल्या. त्याला भारतीय पातळीवर तत्वतः मान्यता मिळत चालली आहे." शेतीमालाला किफायतशीर भाव मिळण्याच्या मागणीला प्रथम यशवंतराव चव्हाणांचा विरोध होता. पण पुढे त्यांनाही हा विचार पटला म्हणून १९८० मध्ये विरोधी पक्षांनी या विषयाच्या मागण्या घेऊन आयोजित केलेल्या शेतकरी दिंडीमध्ये यशवंतरावजी सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांच्या शेतीमालाला किफायतशीर भाव बांधून मिळणे कामी भाई उद्धवरावदादा विधानसभेतच आवाज उठवून थांबले नाहीत. त्यांनी लोकमानसात जाऊन अनेक सभा-संम्मेलनातून या प्रश्नावर आकाश-पाताळ एक केले. १४ डिसेंबर १९६३ रोजी शेतीमालाला किफायतशीर भाव आणि शेतीधंद्यातील इतर मागण्यासाठी मुंबई विधानभवनावर त्यांच्या नेतृत्वाखाली एक लाख शेतकऱ्यांचा प्रचंड

मोर्चा काढला. नेमके त्यावेळी भाई उद्धवरावांचा ११ वर्षाचा मुलगा टाइफाइडने अत्यावस्थ होता. त्याचेजवळ थांबणे उद्धवरावांना गरजेचे होते. परंतु शेतीप्रधान देशातील उपेक्षित शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या पदरात पाडून घेण्याच्या विचाराने भारावून गेलेल्या उद्धवरावदादांनी कौटुंबिक प्रश्न, मुलांबद्दलचा जिव्हाळा आणि प्रेम बाजूला ठेवून या प्रचंड मोर्चाचे नेतृत्व मुंबईला जाऊन केले.

मोर्चावर शासनाच्या पोलीसांनी लाठीमार केला. त्यात उद्धवरावांनाही लाठ्यांचा जबर मार खावा लागला. मोर्चेवाल्यासोबत उद्धवरावांनाही अटक झाली. पोलीसांनी त्यांचे खिसे तपासले. त्यात उस्मानाबादहून आलेली तार त्यांना मिळाली. त्यात 'मुलाची प्रकृती गंभीर असल्याने ताबडतोब उस्मानाबादला या' अशा अर्थाचा मजकूर होता. स्वतःचा मुलगा मृत्यूशय्येवर शेवटच्या घटका मोजत असतानाही भाई उद्धवरावांनी विराटमोर्चाचे नेतृत्व स्वतःचे दुःख बाजूला ठेवून केलं. ही त्यांची ध्येय धुंदवृत्ती, पाहून पोलिसही दिङमूढ झाले. त्यांची मस्तके उद्धवरावांच्यापुढे आदरान झुंकली.

उद्धवराव उस्मानाबादला आल्यावर त्यांना 'त्यांचा मुलगा त्यांची सारखी आठवण काढतोय' हे ऐकताच ते तडक हॉस्पीटलमध्ये गेले. बापलेकांची डोळे भेट झाली. त्या दोघांचे डोळे खूप काही सांगत होते. उद्धवरावांनी मुलाचा निस्तेज हात आपल्या हाती घेतला. मुलाने लहानग्या बाळाने आपल्या वडिलांकडे क्षणभर पाहिले आणि आपले डोळे कायमचे मिटून घेतले. शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यासाठी जणू त्याने बलिदानच केले. उद्धवरावांना स्वतःच्या मुलाच्या मृत्युने निःशब्द व्याकूळ होण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

आता शेतीमालाला किफायतशीर भाव मिळण्याची वाटचाल सुरू झाली आहे. कापूस एकाधिकार योजनाही त्याचेच फलित आहे. साखर कारखान्याला पुरवला जाणाऱ्या उसाचाही भाव बांधून मिळणेबाबत चळवळ सुरू होते आहे. ज्वारीलाही चांगले नसले तरी बरे भाव बांधून दिले जाऊ लागले आहेत. ती ज्वारीही शासन खरेदी करू लागले आहे. शेती धंद्याशी निगडित असलेल्या गोष्टीवर पक्षोपक्षांच्या जाहीरनाम्यात विविध कलमे येऊ लागली आहेत. वीज बिलात सवलत, दहा हजारापर्यंतच्या कर्जास माफी, शेतीमालाच्या भावाची हमी, पीक विमा, आणि शेतकऱ्यांसाठी इतर सोईसवलती मिळवून देण्याबाबत सारेच पक्ष कमीअधिक प्रमाणात विचार करू लागले आहेत.

देशाच्या नियोजनात औद्योगिक क्षेत्राला जे स्थान आहे, तेच स्थान कृषीक्षेत्रालाही मिळणे आवश्यक आहे. ही गोष्ट जर केंद्र शासनाने केली तर भारतीय कृषीक्षेत्राचा झपाट्याने कायापालट होईल, या विचारावर भाई उद्धवरावदादा शेवटपर्यंत ठाम होते. भाई उद्धवरावांचा औरंगाबादेत जो सर्वपक्षीय गौरव समारंभ दि. ९ ऑक्टोबर १९८३ रोजी झाला, त्यातही त्यांनी ह्याच मुद्द्यावर भर दिला होता. नियोजनात औद्योगिक क्षेत्राचे स्थान कृषीक्षेत्राला मिळणे म्हणजे औद्योगिक क्षेत्राला मिळणाऱ्या भांडवल, कर्ज, सबसिडिज् इत्यादी सर्वसोयी सवलती कृषीक्षेत्रालाही मिळणे होय. शासन औद्योगिक क्षेत्राला स्वतः भाग भांडवल कमी व्याजदराने पुरविते, बँकाकडून कर्जरुपाने कमी व्याजदराने पैसे पुरवते. कारखाना उभा करायला यंत्रसामुग्री, कच्चा माल पुरवते. अशा सर्व तऱ्हेची मदत करते. कारखाना आजारी पडला तर त्याला जिवंत ठेवण्यासाठी मोठीमोठी अनुदाने देते. सबसिडीज देते. बाजारपेठ उपलब्ध करून देते. त्याचपद्धतीने शासनाने कृषी क्षेत्राला पायाभूत भांडवल पुरवावे, बँकाकडून दीर्घ मुदतीची अल्पव्याजदराने कर्जे देण्यास भाग पाडावे, शेतीमध्ये उत्पादन वाढविण्यासाठी नवे शास्त्रीय ज्ञान आणि तंत्रज्ञान पुरवावे. त्यासाठी शेतीची आधुनिक अवजारे-यंत्रे पुरवावीत. बी-बीयाणे, खते-औषधे भरपूर सबसिडीज् देऊन

पुरवावीत. कर्जाची वसुली दिर्घ मुदतीची असावी. निसर्गाचा कोप झाल्याने शेतीधंद्यावर आघात होवून ते आजारी पडल्यास गरजेनुसार अनुदाने द्यावीत. शेती उत्पादनाचे किफायतशीर भाव शेती तज्ञाकडून बांधून द्यावेत. शेती मालांच्या बाजारातील दलालांचे आस्तित्व संपवून टाकावे. त्यासाठी स्वतंत्र बाजारपेठ निर्माण करावी. त्यावर शेतकऱ्यांचे नियंत्रण असावे. ह्या साऱ्या गोष्टी ओघानेच येतात. अशाप्रकारे कृषीक्षेत्राला औद्योगिक क्षेत्राचा दर्जा मिळाला तर शेतकरी अधिकाधिक धान्य उत्पादन करील. कारण अशा सोईसवलती नसतानाही शेतकऱ्यांनी आपल्या निढळाच्या घामाने देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनवले आहे. औद्योगिक क्षेत्राप्रमाणे सोईसवलती मिळाल्यावर तर तो अन्नधान्याची विक्रमी वाढ करील. पर्यायाने ही वाढ निर्यातीला उपयुक्त ठरेल आणि परकीय चलनही मिळवून देईल, हे भाई उद्धवरावांचे बळीच्या राज्याचे सुंदर स्वप्न होते.

देश विकसित आहे की नाही हे औद्योगिकीकरणाच्या टप्प्यावरून पाहिले जाते. वास्तविक शेती किती प्रगत आणि शेतकऱ्यांना किती न्याय मिळतो यावरच देश किती विकसित झाला, हे पाहिले पाहिजे. हा मूलभूत विचार उद्धवराव पाटलांनी सातत्याने समाजात आणि शासनाकडे मांडला होता.

या पद्धतीने शेतकरी सधन झाला तर त्याची क्रय शक्ती वाढेल. शेतीला पूरक असणारे इतर छोटेमोठे उद्योगधंदे तो उभा करील. तरुण-बेकारांना, शेतमजुरांना काम देईल. कामाचा योग्य दाम देईल. आणि बेकारीवर कुरघोडी करण्यात शासनाला मदत करील. यासाठी शासनाने एक गोष्ट नेहमी ध्यानात घेणे व त्यानुसार कार्यवाही करणे गरजेचे आहे. शेतीधंद्याला लागणारे बी-बीयाणे, खते औषधे, वीजपाणी आणि अवजारे-यंत्रे यांच्या किंमतीत जे चढउतार होतील त्याप्रमाणात शेतीमालाचेही भाव कमीअधिक केले पाहिजेत. औद्योगिक क्षेत्र व कृषीक्षेत्र यांचा समतोल साधता येईल, याचा विचार करून निर्णय घेतले पाहिजेत. शासनाची इच्छाशक्ती असेल तर या साऱ्यागोष्टी शक्य होणार आहेत. कृषीक्षेत्राविषयीचे हे उद्धवरावांचे विचार कृतीत येतील, तेंव्हाच कृषी क्षेत्राच्या आणि शेतकरी शेतमजुरांच्या कल्याणांचे त्यांचे स्वप्न पुरे होईल.

कम्युनिस्ट पक्षांनी शहरातील औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या एकजुटीवर आणि चळवळीवर भर दिला. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर-दलित यांच्या एकजुटीकडे थोडे बहुत दुर्लक्ष त्यांचेकडून झाले. शे. का. पक्षाचे आणि पर्यायाने भाई उद्धवराव पाटील यांचे लक्ष प्रामुख्याने ग्रामीण शेतकरी-शेतमजूर यांच्या प्रश्नावर, चळवळी करण्यावर होते. तरीही शेतकरी-शेतमजूर आणि कामगार यांच्या खऱ्या एकजुटीतूनच भारतात खरी क्रांती घडून येईल, यावर भाई उद्धवरावांचा ठाम विश्वास होता. पण औद्योगिक क्षेत्रातील कामगारांना संप करण्यासाठी भडकावून आपले पुढारीपण टिकविण्यात त्यांना रस वाटत नव्हता. त्यापेक्षा कामगार कसा जिवंत राहील, त्याचा विकास कसा होईल, याकडे त्यांचे लक्ष असे. सोलापूरच्या नरसिंग गिरजी मिलमधील कामगारांना संप करू नका, असे पटवून देणारा नेता म्हणूनही उद्धवरावांचं मोठेपण दिसून येतं. संप करणं, न करणं हे त्या त्या प्रसंगात कामगाराचं जीवन उध्वस्त होऊ न देण्यावर आधारलेलं असलं पाहिजे. यावर उद्धवरावांच्या विचारांचा निर्णयक्षमतेचा जोर होता.

सोलापूरची नरसिंग गिरणी मिल बंद पडली. ती पुन्हा चालू व्हावी, यासाठी पत्रकार श्री. पु. ज. बुवा यांनी पुण्याच्या तरुण भारतात लेखमाला लिहिली. ती वाचून एस्. एम्. जोशी आणि उद्धवरावांनी त्यावेळचे मंजूरमंत्री ना. शांतीभाई शहा यांचेशी वाटाघाटी केल्या आणि शासनाने सदर मिल ताब्यात घेऊन सुरू केली. पण त्यावेळी सोलापूर येथील कम्युनिस्ट कामगार नेत्यांनी आपले प्रभुत्व प्रस्थापित

करण्यासाठी कामगारांना भडकावून पुन्हा संप करण्याची तारीख जाहीर केली. तेव्हा मंजूर मंत्रीही चिडले, “गिरणी पुन्हा बंद पडली तरी चालेल.” असा इशारा त्यांनी दिला. हा संप टाळण्याची जबाबदारी एस्. एम्. जोशींनी उद्धवरावावर टाकली. उद्धवराव मराठवाड्याचा दौरा अर्धवट सोडून सोलापूरला आले. सोलापूरी झालेल्या कामगारांच्या सभेत उद्धवरावांनी कामगारांना संप न करता कामावर जाण्याची भूमिका पटवून दिली. कामगारांनी त्यांचे म्हणणे मान्य केले. संप झाला नाही. कामगारांचे जीवन उध्वस्त होण्यापासून वाचविण्यात उद्धवरावांचा मोठा वाटा होता. ‘कामगारांना संप करू नका. कामावरच जा’ असे प्रसंगाचा अभ्यास करून सांगणारा नेता म्हणजे भाई उद्धवराव पाटील हे होत.

शेतकरी कामगार पक्षाने शेतमजुरांच्या प्रश्नाला हात घातला नाही; त्यांच्या संघटना बांधल्या नाहीत, वा त्यांच्या चळवळी केल्या नाहीत, असा एक ठराविक आरोप केला जातो. तो पूर्णपणाने खरा नाही, हे स्पष्ट करून सांगतांना भाई उद्धवराव म्हणतात की, “शेतमजुरांच्या वेतनाकरिता आंदोलन करण्याची वेळ आलेली नाही. शेतमजुर हा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या गावाच्या समाजरचनेत अडकून पडला आहे. समाजाच्या इतर वर्गात त्याचे हितसंबंध गुंतले आहेत. श्रीमंत व मध्यम शेतकऱ्यांच्या शेतात तो काम करतो. शेतमजुरांच्यात स्पृश्य व अस्पृश्य असे दोन गट पडतात. शेतमजुरांच्या वेतनासाठी आंदोलन सुरू केले तर गांवच्या सामाजिक परिस्थितीमुळे शेतमजुरात हरिजन व हरिजनेतर शेतमजूर अशी विभागणी होते. शेतमजुरांचे आंदोलन सुरू झाले तर त्या गावातील जमीन मालक सामाजिक परिस्थितीचा फायदा घेऊन शेतमजुरांमध्ये गट पाडतात. शेतमजुरांच्यात संघर्ष होण्याचा धोका आहे. शेतमजुरांच्या फाटाफुटीमुळे चळवळीला आधार राहात नाही. ही फूट टाळून त्यांना रोजगारांची हमी मिळावी, याकरिता सरकारमार्फत योजना राबविली पाहिजे, हा आमचा आग्रह राहिला आहे.” या दाजीबा देसाईच्या मताचे उद्धवराव समर्थक होते.

दुष्काळात रोजगार हमी योजनेचा कायदा करण्यास भाई उद्धवरावांनी खूप मोठी चळवळ केली. ती शेतमजुरासाठीच प्रामुख्याने नव्हती काय? या रोजगार हमी योजनेतील कामाला जी मजुरी मिळते ती शेतकऱ्यांनाही आपोआप आपल्या शेतावर कामाला येणाऱ्या शेतमजुरांना द्यावी लागेल. अन्यथा रोजगार हमी योजना सोडून शेतमजूर शेतकऱ्यांच्या शेतात कामावर येणार नाहीत. हे त्यांचे निरिक्षण वास्तववादी आणि शेतमजूरांच्या हिताचेच नाही का?

शेतमजुरांचे वेतन ठरविण्यासाठीही भाई उद्धवरावदादांनी सरकारकडे आपले बुद्धीकौशल्य पणाला लावले होते. महाराष्ट्र शासन शेतमजुरांसाठी किमान वेतन निर्धारित करून देण्यास सुरवातीला तयार नव्हते. या संदर्भात उद्धवरावांनी आणि विरोधी पक्षातील सभासदांनी विधानसभेत तेंव्हाचे कामगार मंत्री ना. नरेंद्र तिडके यांचेवर सतत दबाव आणला होता. हा वाढता दबाव लक्षात घेऊनच शेवटी महाराष्ट्र शासनाचे शेतमजुरांचे किमान वेतन ठरवून देण्याचे मान्य केले. परंतु शासनाने ठरवून दिलेले वेतन शेतमजुरांना उपासमारीच्या खाईत ढकलणारे अतिशय अपुरे असल्याचे त्यांनी शासनाच्या कानीकपाळी ओरडून सांगितले होते. शिवाय हे शेतमजुरांचे वेतन लागू करणाऱ्या यंत्रणेचा अभाव असल्याचे त्यांनी वेळोवेळी शासनाच्या नजरेसमोर मांडले होते. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती व राहणीमान ज्या प्रमाणात वाढते, त्याच्या आधारे शेतमजुरांचे वेतन निश्चित केले पाहिजे, असे त्यांचे प्रमाणिक मत होते.

शेतकऱ्याप्रमाणेच शेतमजुरांचे प्रश्न हे भाई उद्धवरावांचे जिव्हाळ्याचे प्रश्न होते. शेतमजुरांची मजुरी वाढवायची झाली तर मूळ शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले पाहिजे. त्यावरच शेतमजुरांची वेतनवाढ अवलंबून

अनुक्रमाणिका

असते. शेतमजुरांना श्रमाचा मोबदला काही प्रमाणात धान्याच्या रुपाने दिला तरच शेतमजुरांची मजुरी वाढेल. म्हणूनच कृषीक्षेत्राला औद्योगिकक्षेत्राचा दर्जा मिळाला व औद्योगिक क्षेत्रातील सेवासवलतीसुविधा कृषीक्षेत्राला मिळाल्या तर शेतमजुरांचे वेतन वाढवून देण्यास शेतकरीही आपखुशीने तयार होईल, यावर भाई उद्धवरावदादांचा दृढ विश्वास होता.

भाई उद्धवराव पाटील म्हणजे शेतकरी, शेतमजुर आणि दलित कष्टकऱ्यांचे खऱ्या अर्थाने थोरले भाऊ होते. त्यांचे अस्सल प्रतिनिधी होते. शेतकऱ्यांचा वेष घालून इंग्रज राजपुत्राला भेटायला गेलेल्या महात्मा फुल्यांचे खरे वारसदार. ते शेतकऱ्यांच्या वेषात वावरले. कष्टकऱ्यांच्या भाषेत बोलत राहिले. दलिताघरच्या चटणीभाकरीला जागले. त्यांनी दिलेल्या पानसुपारीने रंगले. त्यांचा कैवार घेऊन सतत लढले. शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी दलितांमध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवत राहिले. त्यांच्या सुखदुःखात रमले. त्यांच्या अडीअडचणीच्यावेळी त्यांच्या मदतीला तत्परतेने धावले. त्यांना बसता-उठता, चालता-बोलता, भाषण देतांना, चळवळी करतांना त्यांना शिकवत राहिले. त्यांच्यात एकरूप झाले.

काळ्या आईचा अभ्यास हा त्यांचा श्वास बनलेला. बळीचं राज्य आणण्याचा त्यांना ध्यास लागलेला. एक अस्सल भूमीपूत्र, आधुनिक कृषीतज्ञ, शेती व्यवसायाचा ज्ञानकोश. भाई उद्धवरावजी म्हणजे शेतकरी, शेतमजूर, दलित कष्टकऱ्यांचे चालते बोलते कृषी विद्यापीठ!

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण पंधरावे**

## ।।दलित चळवळ : नामांतर विरोधी चळवळीचे दुःस्वप्न।।

भाई उद्धवराव पाटील यांचं सारं जीवन म्हणजे तळागाळातल्या तुडविल्या जाणाऱ्या सामान्य श्रमिक जनतेला न्याय मिळवून देण्याचा संघर्ष होता. या संघर्षात लढतांना शेतकरी कामगार पक्षाचं तत्वज्ञान, ध्येय धोरणे आणि चळवळी यामध्ये ते नेहमीच आघाडीवर असत. शे. का. पक्षानं जसा मार्क्सवाद स्वीकारला तशी महात्मा फुल्यांची परंपराही सांभाळली. मार्क्सवादी डाव्या पक्षांना चळवळी उभा करतांना अनेक अडणींना, समाजव्यवस्थेतील उभा आडव्या तिरक्या छेदांना, अज्ञ जनतेच्या अंधश्रद्धांना आणि जाती श्रेष्ठत्वाच्या कल्पनांना सामोरे जावे लागले. मार्क्सवादी डाव्या पक्षाचे राजकारण भारतातील वर्ग, वर्ण-जाती या त्रिविध कोंडाळ्यात अडकलेले आहे. मनुस्मृतीमधील चार्तुवण्य व्यवस्था, त्यातून निर्माण झालेल्या हजारो जाती-उपजाती व्यवस्था आणि त्या जातीभेदातील श्रेष्ठ कनिष्ठ उच्चनीच परंपरांनी ग्रासलेला आहे. विषमतेने किडलेल्या समाजातील शूद्र अतिशूद्र म्हणजे हल्लीचे शेतकरी, शेतमजूर आणि दलित हे उच्च वर्णियांच्या अन्यायाखाली भरडले जात असलेल्या समाजात स्वातंत्र्य, समता आणि बंधूभावाचा अभाव. जातीव्यवस्थेमुळे भारतात सर्व समाजात ऐक्य कधीच निर्माण झाले नाही त्यामुळे परकियांनी या देशावर मनसोक्त-मनमानी केली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डाव्या विचारसरणीच्या पक्षोपक्षांनी जातीभेद मोडून बहुजन समाजात ऐक्य स्थापन व्हावे, यासाठी प्रयत्न केले. त्यातील शे. का. पक्ष आणि त्या पक्षाचे नेते भाई उद्धवराव पाटील यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

शेतकरी कामगार पक्ष आणि भाई उद्धवराव पाटील यांनी जातीयतेच्या विरोधात सतत भूमिका मांडली आहे. शे. का. पक्षातील बहुतेक नेते मंडळी म. फुल्यांच्या ब्राह्मणेत्तर चळवळीतून आल्यामुळे त्यांनी वर्ण-जाती संस्कृतीला मार्क्सवादी भूमिकेतून विरोध केला आहे. शे. का. पक्ष महात्मा फुल्यांचा वारसा सांगणारा पक्ष असल्याने या पक्षात जातीभेदाला जागाच नाही. हिंदू संस्कृतीमध्ये व्यवसायावरून, धंद्यावरून जाती निर्माण झाल्या. दलित हा या उत्तरंडीतील तळागाळातला साऱ्याचं ओझं वहाणारा आणि माणुसकीलाही पारखा असलेला घटक. या घटकाला इतर उच्चवर्णियाच्या बरोबरीने समाज प्रवाहात सामील करून घेण्यासाठी शे. का. पक्षाने आणि भाई उद्धवरावांनी खूप प्रयत्न केले.जातीयवादाला मूठमाती देण्याचा किंबहुना तो मुळातूनच नाहीसा करण्याचे त्यांनी शे. का. पक्षाच्या माध्यमातून जाणीवपूर्वक प्रयत्न केले. राजर्षी शाहू महाराजाचा आदर्श समोर असलेल्या भाई उद्धवराव पाटील आणि त्यांच्या पक्षकार्यकर्त्यांनी उस्मानाबाद आणि परभणी जिल्ह्यात दलितांना प्रतिष्ठा मिळवून देण्यात मोठे योगदान दिले. 'दलितांना गांवचे पोलीस पाटील केले पाहिजे.' अशी मागणी करणारे उद्धवरावदादा हे महाराष्ट्रातले एकमेव नेते होते. या दोन जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थात शेतकरी कामगार पक्षाचे बहुमत होते. त्या सहापैकी तीन नगरपरिषदांचे अध्यक्ष दलित समाजातले होते. उस्मानाबाद जिल्ह्यात असलेल्या ग्रामपंचायतीपैकी चाळीस टक्के ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी दलितांना बसविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात भाई उद्धवरावांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. सार्वजनिक ठिकाणीच केवळ नव्हे तर आपल्या घरीदारी दलितांना उद्धवरावांनी मुक्तद्वार ठेवले होते. पक्ष कार्याच्या वा निवडणुकाच्या काळात दौऱ्यावर असतांना उद्धवराव दलितांच्या चंद्रमौळी झोपडीत विसाव्याला मुद्दाम जात. त्यांची चटणीभाकरी खात. त्यांच्या अडीअडचणी सोडवत. त्यांच्या होणाऱ्या अन्यायाचा पाडावा करण्यासाठी धावून जात. ह्या त्यांच्या वागण्याने साऱ्यांना राजर्षी शाहू महाराजांची आठवण होत असल्यास नवल नाही. म्हणूनच

राजकारणात दलित वर्ग नेहमीच शे. का. पक्षाबरोबर रहात असे. उद्धवरावांच्या साऱ्या निवडणूका जिंकण्यात दलितांचा सिंहाचा वाटा होता.

बुलढाणा जिल्ह्यात ज्या जातीय दंगली झाल्या. त्यावेळी शे. का. पक्षानं आणि पक्षकार्यकर्त्यांनी अल्पसंख्यांकाना संरक्षण दिले आहे. नामांतराच्या प्रश्नावरदेखील शे. का. पक्षानं आणि भाई उद्धवराव पाटील यांनी उस्मानाबाद जिल्ह्यात ज्या ज्या गावात शे. का. पक्षाचं कार्य आहे, संघटना कार्यरत आहेत. त्या त्या गावात या नामांतर विरोधी चळवळीच्या वादळाला मूळ धरू दिलं नाही. कांही निवडक गावात तर भाई उद्धवरावांनी 'आम्ही दलितावरील अन्याय-अत्याचाराचे प्रकार चालू देणार नाही.' अशी खंबीर भूमिका घेतली. आणि काही अंशी दलितांना या जाळपोळीतून वाचवण्याचे प्रयत्न केले.

औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबडकरांचे नाव देण्याची दलितांची मागणी ही त्यांच्या अस्मीतेची प्रतिकात्मक मागणी होती. डॉ. आंबेडकरांचे विद्यापीठाला नाव दिल्याने त्यांचे प्रश्न चुटकीसारखे संपणार होते, असेही त्यांना वाटत नव्हते. पण भारताच्या घटनेचे शिल्पकार ठरलेल्या डॉ. बाबासाहेबांनी औरंगाबादला सन १९५१ मध्ये त्यांच्या मुंबईला कार्यरत असलेल्या पिपल्स् एज्युकेशन सोसायटीचे पहिले 'मिलिंद महाविद्यालय' काढून बहुजन समाजातील रयतेला उच्च शिक्षणाची दारे खुली केली. हे त्यांचे शैक्षणिक कार्य लाखमोलाचे ठरले. एवढेच नाही तर औरंगाबादला उच्च शिक्षणाचे विद्यापीठ होईल. ही भावना बोलून दाखवली होती. त्यामुळेच दलितांनी डॉ. बाबासाहेबाचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देऊन त्यांचा गौरव करण्याची मागणी पुढे रेटली होती. या मागणीला मंजुरी दिल्याने समाजात शिक्षणाचा, दलितोद्धाराचा आणि बंधूभावाचा संदेश जाईल ही त्या पाठीमागे त्यांची भावना होती.

या नामांतराच्या मागणीला खरी प्रेरणा मिळाली ती जनता पार्टीच्या राज्याच्या काळात. डॉ. आंबेडकरांनी मार्च १९२७ मध्ये दलितांच्या न्याय हक्कासाठी महाडच्या चवदारतळ्याचा सत्याग्रह केला होता. 'जनावरे तळ्याचे पाणी पितात तर आम्ही तुमच्यासारखी माणसे आहोत, आम्हालाही ते पाणी चाखायला मिळावे' हा त्यांचा रास्त मुद्दा होता. या सत्याग्रहाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात सन १९७७ साली ह्या नामांतराच्या चळवळीच्या कल्पनेनं मूळ धरलं, त्याचा अर्थात दलितांनी आग्रह धरला. विचारवंतांनीही त्या कल्पनेला पाठिंबा दिला. २५ जुलै १९७७ पासून या मागणीबाबत महाराष्ट्र शासन आणि लोकामध्ये संवाद सुरू झाला. या मागणीला मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे दिनांक २७ जुलै १९७८ ला ठराव करून एकमुखी पाठिंबा दिला. महाराष्ट्रातील पक्षोपपक्षानी तसेच ठराव करून दलितांची मागणी उचलून धरली. महाराष्ट्र राज्यांतील निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीनीही, पुलोद सरकारच्या शरद पवारांच्या पुढाकाराने विधानसभेत २७ जुलै १९७८ रोजी एकमुखी ठराव करून मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' या नावाने करण्याची कायदेशीर तरतूद पूर्ण केली. या ठरावास त्यावेळी एकाही पक्षाच्या एकाही आमदारांने विरोध दर्शविला नाही. येथपर्यंत नामांतराचे काम सुरळितपणे पार पडले! पण काही नव्या प्रतिक्रियावादी कधीही निवडून येऊ शकणाऱ्या पुढाऱ्यांना हे आवडले नाही. त्यांनी मराठवाड्याच्या अस्मितेचा प्रश्न हाती घेऊन लोकांची मने पेटवली आणि नामांतर विरोधी चळवळीचा वणवा मराठवाड्यात पसरू लागला.

दिनांक २७ जुलै १९७८ ते ६ ऑगस्ट १९७८ ह्या अकरा दिवसात मराठवाड्यातील औरंगाबाद, बीड, परभणी आणि उस्मानाबादला या नामांतर विरोधी चळवळीची आग भडकली. हा नामांतर विरोधी चळवळीचा काळ म्हणजे मराठवाड्यातील दलितांना पडलेले एक दुःस्वप्न होते.

अनुक्रमाणिका

हा नामांतरविरोधी चळवळीचा वणवा विझवण्याचे प्रयत्न संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रगण्य नेते श्री. एस्. एम्. जोशी आणि भाई उद्धवराव पाटील यांनी पोट तिडकीने केले. हे करत असतांना उद्गीरला एस्. एम्. जोशी यांच्या गळ्यात चपलांचा हार घालण्यापर्यंत विरोधकांच्या चेल्यांनी चाल केली. भाई उद्धवरावांना उस्मानाबाद येथील सभेत वेडेवाकडे प्रश्न विचारले गेले. धुमाकूळ घालून सभेची कोंडी करण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केला गेला. पण उद्धवराव पाटील हे कच्च्यागुरूंचे चेले नव्हते. असा धांगडधिंगाणा घालून सभेत व्यत्यय निर्माण करणारे कोण होते, हे हेरून उद्धवरावांनी शे. का. पक्षातर्फे त्या गुंडगिरी करू पाहणाऱ्याच्या बोलवत्या धन्याचे कार्यालयात जाऊन त्यांच्या कार्यातील चुकाचा पाढा वाचायला कार्यकर्ते पाठविले व त्यांची तोंडे बंद केली. एवढेच नाही तर दलितावरील ही झुंडशाही आम्ही चालू देणार नसल्याचे सांगितले. दलितांना संरक्षण देण्याचा लक्षणीय प्रयत्न केला. एवढेच नाहीतर ह्या चळवळीच्या मागे जो छुपा हेतु होता त्याचे वाभाडे करणारी भाषणे ठिकठिकाणी करून अनेक संशयात्म्यांचा राग थंड करायला आणि थंड डोक्याने विचार करायला भाग पाडले.

या नामांतर विरोधी चळवळीने मराठवाड्यातील ग्रामीण भागात सवर्ण तरुण आणि अस्पृश्य तरुण यांच्या अंतर पडू लागल्याचं पाहून भाई उद्धवराव पाटील यांना खूप दुःख झालं. खऱ्या अर्थानं समतेची चळवळ उभी करण्यास आणि ती यशस्वी करण्यासाठी ग्रामीण भागातील गरीब सवर्ण तरुण आणि दलित तरुणांची अभेद्य जोडच लागणार आहे. श्रमजीवी सवर्ण आणि दलित यांच्यात भांडणे होऊ नयेत, यासाठी भाई उद्धवरावांनी प्रयत्न तर केलेच पण अनुभवाचे बोलही त्यांनी सर्वांना ऐकविले. ते म्हणायचे, "संयुक्त महाराष्ट्र चळवळीत रिपब्लिकन पक्षही सामील झाला होता. त्या काळात दलितावर अन्याय करण्याचं सामर्थ्य गावातील बड्या मंडळीनी वा गुंडांनी दाखवलं नाही. कारण तिथं त्यावेळी राजकीय मैत्री होती. ग्रामपंचायतीपासून ते विधी मंडळापर्यंत रिपब्लिकन पक्ष डाव्या पक्षात होता. त्यामुळे सवर्ण मंडळीत व दलितात मैत्रीचं वातावरण होतं." हा इतिहास कथन करून भाई उद्धवराव पाटील नेहमी सांगत की, "दलितावर अन्याय करणाऱ्या, श्रमिक सवर्ण आणि दलितात भांडणे लावणाऱ्या मंडळीच्या विरोधात गरीबांची एकजूट करणं हे काम अतिशय महत्त्वाचं आहे. पोलीसांचं संरक्षण अथवा कोणत्याही सत्तीच्या संरक्षणापेक्षा दलिताचं जनतेनं केलेलं संरक्षण हे अधिक प्रभावी असतं. म्हणून श्रमजिवी सवर्ण आणि दलित यांची राजकीय मैत्री गावपातळीपर्यंत व्हायला हवी. त्याच्यात राजकीय विचारांच्या बैठकीची आणि राजकीय मैत्रीची जोड दिली जाणं अत्यंत आवश्यक असून या एकजुटीतूनच समतेचं राज्य वा 'बळीचं राज्य' भारतात पुन्हा येण्याची शक्यता आहे. हा विचार दलित आणि श्रमजिवी सवर्ण तरुण करतील अशी आशा बाळगू या."

'बळीचं राज्य' हे भाई उद्धवरावांचं भव्य स्वप्नं होतं. ते स्वप्नं साकार करण्यात श्रमजिवी सवर्ण आणि दलित तरुण एकदिलाने काम करतील तर तीच त्यांची भाई उद्धवराव पाटील यांना खरी आदरांजली ठरणार आहे.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण सोळावे**

## ||फुले शाहू कर्मवीरांचा वसा घेऊन शिक्षणसंस्था चालवा||

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आणि कर्मवीर मामासाहेब जगदाळे या शिक्षण प्रसारातून समाज परिवर्तन करणाऱ्या समाजसुधारकांचा वसा घेऊनच शे. का. पक्षाची स्थापना झाली होती. भाई उद्धवराव पाटील यांनीही या समाजसुधारकांचे आणि कार्ल मार्क्स आणि लेनिनचे क्रांतीकारक तत्वज्ञान उराशी बाळगून राजकारणात उडी घेतली होती. भाई उद्धवरावांना शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज वाटत होती. शिक्षण हे तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहोचल्याशिवाय भारताची लोकशाही विकसित होणार नाही, ही त्यांची दृढ धारणा होती. हजारो वर्षे ज्ञानाची दारे बंद असणाऱ्या बहुजन समाजाला शिक्षण म्हणजे नवी संजीवनी असल्याचे ते मानत होते. म्हणूनच मराठवाड्यात 'मराठा तत्सम जाती शिक्षण परिषदे' ची स्थापना ॲड. नरसिंगराव देशमुख, श्री. बलभीमराव कदम, साहेबराव हंगरगेकर आदी कार्यकर्त्यांनी केली होती. त्यात भाई उद्धवराव पाटील हेही पुढे कार्यरत झाले. अनेक ठिकाणी वसतीगृहे काढून त्यांनी फुले शाहू कर्मवीरांची शिक्षणप्रसाराची कल्पना राबवायला हातभार लावला होता. ग्रामीण भागातील गोरगरीबांच्या मुलांना शिक्षणाची दारे उघडून दिली होती.

मराठवाडा हा निजामी राज्यामध्ये असल्याने सर्वच बाबतीत मागासलेला, शिक्षण प्रसाराच्या दृष्टीने तर तो उर्वरित महाराष्ट्राच्या मानाने खूपच मागासलेला होता. ग्रामीण भागातील खेडोपाड्यातील शाळेच्या अभावाने झालेली शिक्षणाची दुरावस्था पाहून शिक्षण हे सार्वत्रिक करून तशी व्यापक मोहीम शासनाने राबविली पाहिजे. अशी उद्धवरावांची पहिल्यापासून सततची मागणी होती. मुलोद्योग शिक्षण, मल्टिपर्पज शिक्षण आणि शेतकऱ्यांच्या मुलांना प्रामुख्याने शेतीविषयक शिक्षण शासनाने सर्वांना दिले पाहिजे. शासनाचे ते आद्य कर्तव्य आहे. हा त्यांचा आग्रह होता. मराठवाडा विद्यापीठ परीपूर्ण व्हावे, यासाठीही उद्धवरावदादांनी प्रयत्न केले होते.

महाराष्ट्रात शिक्षण प्रसाराचे काम करणाऱ्या खाजगी शिक्षणसंस्थांचे आणि कार्यकर्त्यांचे मोहोळ निर्माण झाले होते. त्यामुळे महाराष्ट्र शिक्षणाच्याबाबतीत भारतात अग्रेसर राहीला. त्यातील खाजगी शिक्षण संस्थांच्या योगदानाबद्दल त्यांचे मनात नितांत आदराची भावना होती. तरीही शिक्षण संस्थांना शाळा-कॉलेजेस चालविण्यास परवानगी देण्यापेक्षा शासनानेच त्या चालविल्या पाहिजेत, यावर त्यांचा कटाक्ष होता. कारण खाजगी संस्थांना अशा परवानग्या दिल्याने पुढे त्या संस्थात भ्रष्टाचार माजण्याची शक्यता त्यांना वाटत असे.

कुठल्याही पातळीवरचे शिक्षण देत असताना त्याचा उपयोग ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि श्रमजीवी दलितांच्या मुलांना झाला पाहिजे, हा त्यांचा दंडक होता. महाराष्ट्र विधानसभेत ते विरोधी पक्षाचे आमदार असतांना अमेरिकेतील लँड-ग्रँट कॉलेजच्या धर्तीवरचे महाविद्यालय सुरू करण्याचे विधेयक चर्चेसाठी आले होते. महाराष्ट्रातील ८५ टक्के शेतकरी अल्पभूधारक आणि ९० टक्के जमीन कोरडवाहू असल्याने लँड-ग्रँट पद्धतीच्या कॉलेजचा गोरगरीब शेतकऱ्यांना काहीच फायदा होणार नाही याची उद्धवरावांना कल्पना आली. लँड-ग्रँट कॉलेजची रचना, तिची उद्दिष्ठ्ये आणि मोठ्या यांत्रिक पद्धतीने बागायती शेती सुधारण्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाचे संशोधन यावर या विधेयकात भर होता. अशा

कॉलेजचा फायदा फक्त मुठभर धनिक शेतकऱ्यांनाच होणार हे स्पष्ट होते. उद्धवराव दादांनी या साऱ्या गोष्टी व्यावहारिक भूमिकेतून स्पष्ट करून विधेयकाला विरोध केला. त्यापेक्षा शेती सुधारणेचे लहान लहान अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरू केले तर त्यांचा उपयोग गरीब शेतकऱ्यांना होईल, हेही त्यांनी आपल्या भाषणात पटवून दिले. त्यांच्या या मांडणीचा त्यावेळचे कृषीमंत्री पी. के. सावंत यांचेवर चांगला प्रभाव पडला. त्यांनी आग्रह करून महात्मा फुले-कृषी विद्यापीठ राहुरी (जि. अहमदनगर) च्या पहिल्या कार्यकारिणीवर उद्धवरावजींना बिनविरोध निवडून आणले.

महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठात होणाऱ्या कृषीविषयक संशोधनाचा लहान शेतकरी आणि मुख्यतः कोरडवाहू जमिनीच्या शेतकऱ्यांना उपयोग व्हावा. त्यासाठी शेतकऱ्यांच्या समुहांना विद्यापीठाला भेटी देण्याच्या आणि त्यांना या संशोधनाची माहिती देण्याच्या योजना कृषी विद्यापीठांनी राबवाव्यात. या सूचना त्यांनी कृषी विद्यापीठापुढे आग्रहाने केल्या. राहुरी आणि परभणी येथील कृषी विद्यापीठे शेतकरीअभिमुख व्हावीत, यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले होते.

महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक धोरणाबद्दल भाई उद्धवराव पाटील नेहमी जागरुक असत. हे शिक्षण श्रीमंत आणि पारंपारिक पांढरपेशींची मक्तेदारी होऊ नये. ते शिक्षण ग्रामीण भागातील गोरगरीबांच्या मुलांनाही चांगल्या तऱ्हेने मिळाले पाहिजे, हा त्यांचा आग्रह असे. सन १९६८ साली महाराष्ट्र शासनाने शिक्षणात विक्रमी बदल सुचविणारी एक श्वेतपत्रिका जाहीर केली. ही श्वेतपत्रिका ग्रामीण विद्यार्थ्यांचे खच्चीकरण करणारी होती. ज्या दिवशी ही श्वेतपत्रिका वर्तमान पत्रात प्रसिद्ध झाली, त्यादिवशी उद्धवराव कोल्हापूरात होते. कोल्हापूरातील एका शाळेला शे. का. पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार कै. भाऊसाहेब महागावकर यांचे नाव देण्याचा कार्यक्रम ठरला होता. भाई उद्धवरावदादा या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. या समारंभात शिक्षणक्षेत्रातील विविध पातळीवरील श्रोते विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि शिक्षणाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

या समारंभात भाई उद्धवरावजीनी या महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणविषयक श्वेतपत्रिकेचे काळे स्वरूप जाहीरपणे उघड केले. ग्रामीण भागातील सर्रास विद्यार्थ्यांचे आणि शहरातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिकदृष्ट्या शिरकाण करणारी ही श्वेतपत्रिका गाडून टाकण्यासाठी रान उठवण्याचा सल्ला त्यांनी तेथील कार्यकर्त्यांना आणि शिक्षणतज्ज्ञांना दिला. महाराष्ट्रात सर्वात अगोदर या श्वेतपत्रिकेच्या विरोधात आवाज उठविण्याचे श्रेय भाई उद्धवरावजीकडे जाते. ग्रामीण भागातील गोरगरीबांच्या पाल्यांच्या शिक्षणाकडे ते डोळ्यात तेल घालून पहात आणि पोटतिडकीने बोलत.

त्यानंतर कोल्हापूरात भाई हिंदूराव साळोखे यांनी या श्वेतपत्रिकेच्या विरोधात एक परिसंवाद आयोजित केला. परिषदही भरविली. या परिसंवाद-परिषदेत प्रा. एन. डी. पाटील, बॅ. पी. जी. पाटील, प्रिं. नानासाहेब वैद्य, प्रिं. पी. बी पाटील आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ए. जी. पवार हे सहभागी झाले होते. या परिसंवादात या श्वेतपत्रिकेची शास्त्रशुद्ध चिरफाड करण्यात आली. त्यानंतर प्रा. एन्. डी. पाटील यांची मुलूख मैदान तोफ धडधडू लागली. त्यांनी नागपुरात काँग्रेस आमदारापुढे या श्वेतपत्रिकेचे काळे स्वरूप तर स्पष्ट केलेच पण महाराष्ट्रात झंझावाती दौरा काढून श्वेतपत्रिकेविरुद्ध लोक जागरण केले. तेंव्हा वरून पांढरी आणि आतून काळी असलेली ही श्वेतपत्रिका महाराष्ट्र शासनाने मागे घेतली. भाई उद्धवरावांनी या श्वेतपत्रिकेविरुद्ध पहिला आवाज उठवून आपली शिक्षणक्षेत्रातील दूरदृष्टी तर दाखवून

अनुक्रमाणिका

दिलीच पण ग्रामीण भागातील गोरगरीबांच्या मुलांचे जीवन धोक्यात येऊ पहाणारा रस्ता निष्कंटक आणि प्रकाशमान केला.

भाई उद्धवरावदादांचं उस्मानाबादेतलं घर. त्या घरातील फाटका-तुटका संसार. त्यांचे घरी शिकायला असलेल्या नातेवाईकांच्या मुलांनी ते छोटंस वसतिगृहच बनलेलं. उद्धवरावांच्या पत्नी शारदाबाई आपल्या मुलींचं व नातेवाईकांच्या मुलांचं सर्व काही पहायच्या. उद्धवराव घरी असले म्हणजे त्या मुलांमुलींचे ते शिक्षक-पालक बनायचे. त्यांचा अभ्यास पाहायचे. या नातेवाईकांच्या मुलांत दादांच्या साडूचा मुलगा श्री. मनोहर ज्ञानदेव देशमुखही होता. लहानपणापासून त्याच्या तोंडाला व्यंग असल्याने तो लाजरा, बुजरा आणि एकलकोंडा दिसायचा. एक प्रकारच्या न्यूनगंडाने त्याला पछाडलेले. उद्धवराव दादांनी त्याच्यावर पद्धतशीर प्रयोग करून त्याच्यातील न्यूनगंडाची भावना काढून टाकली. त्याला आत्मविश्वासू बनविले. तोंडाचे व्यंग आणि बुद्धी याचा काडीमात्र संबंध नसल्याने त्याला जाणवेल अशा तऱ्हेने ते त्याच्याशी वागायचे. शिक्षण हा सर्व रोगावर रामबाण उपाय असल्याचे ते साऱ्यांना पटवून यायचे. सर्वसामान्य बहुजन समाजातील शेतकऱ्यांची, कामगारांची, शेतमजूरांची आणि दलितांची मुलंमुली शिकली पाहिजेत. त्यांच्यासाठी शासनाने मोफत शिक्षण दिले पाहिजे. जोपर्यंत हा तळागाळातला समाज सुशिक्षित, स्वावलंबी आणि स्वाभिमानी होत नाही. तोपर्यंत समाजाचा आर्थिक-सामाजिक आणि नैतिक विकास होणार नाही. ही उद्धवरावांची कार्यकर्त्याबरोबर चर्चा करतांनाची मते ऐकून हा मुलगा प्रेरित व्हायचा. तो पदवीधर झाला आणि पुढे शिक्षकही झाला.

श्री. मनोहर देशमुख यांच्या जीवनाचे उद्धवरावांच्या परीसस्पर्शाने सोने झाले. दादांच्या विचाराने तो प्रभावित झाला. उद्धवरावदादा हे त्यांचे शिक्षणक्षेत्रातील दीपस्तंभ होते. श्री. मनोहर देशमुख यांना वाटायचे की उद्धवरावदादांनी उस्मानाबादला एखादी शैक्षणिक संस्था सुरू करावी. हायस्कूल काढावे. त्यात आपण ध्येयधुंद होऊन काम करावे. अशी शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा विचार हे नरसिंगराव दादा व उद्धवरावदादापुढे पुन्हापुन्हा मांडायचे. तेव्हा सुरवातीला उद्धवरावदादांनी या कल्पनेला विरोध केला. ते म्हणत, "शैक्षणिक क्षेत्र मला पवित्र ठेवायचे आहे. त्यामध्ये राजकारण आणायचे नाही. शैक्षणिक क्षेत्रात राजकारण शिरले तर शिक्षणक्षेत्र देखील अपवित्र आणि भ्रष्ट होईल." हा विचार पटत असला तरी श्री. मनोहर देशमुखांना वाटायचे की, दादांनी एखादी शाळा आपणास काढून द्यावी. म्हणजे ती त्यांच्या विचाराप्रमाणे आपण चालवून दाखवू. म्हणून ते पुन्हा पुन्हा उद्धवराव दादाकडे तशी मागणी करायचे. तेंव्हा उद्धवरावदादा त्यांना म्हणायचे, "अरे शैक्षणिक संस्था चालवायला कर्मवीर भाऊराव पाटील, म. फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यासारखी उत्तुंग व्यक्तिमत्वाची माणसं लागतात. तेथे येरागबाळांचे काम नोहे."

उद्धवरावदादा असे म्हणत असले तरी हायस्कूल सुरू करण्यासंबंधीच्या मागणीची चिकाटी मनोहररावांनी सोडली नाही. शेवटी ॲड. नरसिंगरराव देशमुख आणि उद्धवराव दादांनी सन १९७८ मध्ये 'राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळ' ही संस्था स्थापन केली. रजिस्टर केली. या संस्थेने पहिले अध्यक्ष ॲड. नरसिंगरावदादा होते. उद्धवराव दादा केवळ सभासद राहिले. या संस्थेतर्फे सन १९७९ मध्ये उद्धवराव दादांनी 'छत्रपति शिवाजी हायस्कूल' सुरू केले. यावेळी त्यांनी मनोहररावांना बजावून सांगितले. "शाळा चालवायची असेल तर म. फुले, राजर्षी शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा वसा घेऊन चालवा. कसल्याही प्रकारची देवघेव न करता सरकारी अनुदानातून जशी चालवता येईल तशी चालवा. येथे अखंड निरपेक्ष भावनेने दीनदलित, गोरगरीब शेतकरी-शेतमजूर या

सारख्या परीसरातील बहुजन समाजाच्या तळागाळातील मुलांना दर्जेदार, शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्या.”

पुढे या हायस्कूलच्या इमारतीचा प्रश्न उभा राहिला. तेव्हा उद्धवराव दादा मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांचेकडे गेले. बॅ. अंतुले उद्धवराव दादांना खूप मानत असत. शाळेच्या इमारत निधीसाठी दादांनी मुख्यमंत्री निधीतून मदत मागताक्षणी अंतुले यांची आपल्या मुख्यमंत्री निधीतून सन १९८१ मध्ये पाच लाख रुपये दिले. शाळेची इमारत उभी राहिली. शिक्षक आमदार श्री. पी. जी. दस्तूरकर यांनी आपल्या आमदार निधीतून शाळेला ‘भाई उद्धवराव पाटील’ सभागृह बांधून दिले. श्री. मनोहर देशमुख मुख्याध्यापक झाले. दादांच्या शिकवणीनुसार हायस्कूल चालवू लागले. शाळा भरभराटीला येऊ लागली.

मुख्याध्यापक देशमुख यांनी दलित समाजातील भंडारी या मुलास शाळेत मोफत प्रवेश दिला. त्याची राहण्याजेवणाची सोय केली. स्वतः त्याला कपडे पुस्तकं दिली. ही गोष्ट उद्धवरावांना खूप आवडली. हा भंडारी पुढे इंजिनियर झाला. मुंबई महानगरपालिकेत अधिकारी झाला. त्याचे जीवन सुखी झाले. “हीच परंपरा चालवा. वाढवा.” हा उद्धवरावांचा संदेश आणि आदेश आजही छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये राबवला जातोय. हायस्कूल प्रगतीपथावर घोडदौड करीत आहे. मुख्याध्यापक श्री. मनोहर देशमुख यांना त्यांच्या अशा कार्याचे पारितोषिक मिळाले. महाराष्ट्र शासनाने त्यांना ‘आदर्श शिक्षक पुरस्कार ’ देऊन गौरविले आहे.

भाई उद्धवराव पाटील यांचा गौरव करण्यासाठी श्री. बळवंतराव घोगरे यांनी उस्मानाबादला ‘उद्धवराव पाटील कन्या प्रशाळा’ सुरू केली आहे. औरंगाबादला श्री. ज्ञानोबा मुंढे यांनी ‘उद्धवराव पाटील विद्यालय’ सुरू केले आहे. महाराष्ट्र शासनातर्फे औरंगाबादला ‘भाई उद्धवराव पाटील स्मारक’ उभारण्यासाठी २५ लाखांचे अनुदान मंजूर झाल्याचेही कळते आहे. या अनुदानातून शेतकरी, शेतमजूर आणि श्रमजीवी दलितांच्या मुलाबाळासाठी एखादे भव्य ग्रंथालय उभे राहिले तर भाई उद्धवरावांच्या प्रेरणा तळागाळापर्यंत पसरत जातील आणि ‘बळीचं राज्य’ उभारणीला शक्ती लाभेल, असे वाटते.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण सतरावे**

## ।।गरीबांच्या सहभागाविना सहकार। नाही खरा उद्धार।।

सन १९०४ मध्ये सहकार कायदा ब्रिटिशांनी पास केला. महाराष्ट्रात सहकारी चळवळीची सुरवात सन १९१८ मध्ये बारामती (जि. पुणे) येथे श्री. लल्लूभाई समळदास आणि श्री. जी. एन्. सहस्त्रबुद्धे यांनी ‘दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना’ काढून केली. त्यानंतर सन १९३४ मध्ये श्री. हरिभाऊ बळवंत गिरमे यांनी माळीनगर (जि. सोलापूर) येथे ‘दि सासवड माळी शुगर फॅक्टरी’ नावाचा साखर कारखाना काढला पण तो काही सहकारी तत्त्वावर काढलेला नव्हता. पण असा सहकारी साखर कारखाना सहकारी तत्वावर चालू शकेल याची एक लहानशी प्रेरणा मात्र त्याने दिली. त्यात ब्रिटिशांनी या साखर उत्पादनाला चालना मिळावी म्हणून सरकारी करही बरेचशा प्रमाणात कमी केले होते. तरीही महाष्ट्रात सहकारी तत्वावर साखर कारखाना सुरु होण्यास दशकाहून जास्त काळ जावा लागला. सन १९४५ मध्ये प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. विठ्ठलराव विखेपाटील या नगर जिल्ह्यातील धडपडणाऱ्या शेतकऱ्याने लोणी येथे ‘प्रवरा सहकारी साखर कारखाना’ सुरू केला. हा महाराष्ट्रातला सहकारी तत्वावर स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेला शेतकऱ्यांचा कारखाना होता. हा साखर कारखाना यशस्वी व्हावा म्हणून डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि श्री. विखेपाटील यांनी जे कष्ट उपसले त्याला सहकारी चळवळीच्या इतिहासात मोठे महत्व आहे. या कारखान्याच्या यशामुळेच सहकार चळवळ महाराष्ट्रात रूजली, वाढली आणि पुढे फोफावली. त्यात परिस्थितीनुसार बदल होत गेले. तसे गुणदोषही शिरले.

‘विना सहकार, नही उद्धार’ हे सहकार चळवळीतील तत्व मात्र या चळवळीचा गाभा आहे. या तत्वावर भाई उद्धवरावांचा ठाम विश्वास होता. कारण भांडवलशाहीत भांडवलदार अधिकाधिक श्रीमंत होतात तर गरीब अधिकाधिक गर्गेत ढकलला जातो. म्हणून उद्धवरावांना ती त्याज्य होती. हुकूमशाही स्वरुपाच्या कोणत्याही राज्यपद्धतीत व्यक्तिगत स्वातंत्र्याचा संकोच होतो. व्यक्तिविकासाला तो मारक असतो. त्यामुळे समाजाचाही विकास थांबतो म्हणून याही पद्धतीबद्दल उद्धवरावांच्या मनात किंतू होता. या दोन्ही पद्धतीपेक्षा लोकशाही पद्धत आणि लोकशाहीत राबवल्या जाणाऱ्या सहकार चळवळीची पद्धत त्यांना प्रिय होती. लोकशाहीतील सहकार चळवळ जर चांगल्या चारित्र्यवान माणसाच्या हाती सुपूर्द केली तर ती भारतात यशस्वी होईल, असे त्यांना मनोमन वाटत होते.

भारताने निधर्मी लोकशाही पद्धत स्वीकारली पण या लोकशाहीत पहिल्यापासून भांडवलदाराना ती पूरक राहू लागली. त्यामुळेच औद्योगिकीकरणाला येथे प्राधान्य देण्यात आले. औद्योगिकीकरणानंतर राज्यकर्त्यांनी व्यक्तीगत कारखानदारांना प्रोत्साहन देण्याची पद्धती अवलंबिली. ती चुकीची असल्याचं शे. का. पक्षानं आणि भाई उद्धवराव पाटील यांनी विधानसभेत, लोकसभेत आणि बाहेरही आपली शास्त्रशुद्ध मतं परखडेपणे मांडली. शासनाच्या व्यक्तीगत कारखानदारी पध्दतीमुळे ती मुठभर लोकांच्या हातात एकवटली आणि तिने देशात गरिबी वाढविली, हा उद्धवरावांचा विचार आता मान्य होऊ लागला आहे.

उद्योजक आणि कारखानदार, हे कामगारांच्या श्रमाधिक्याचा पुरेपूर फायदा घेतात. गडगंज नफा कमावतात. आणि विधानसभा वा लोकसभा आपल्या हातात ठेवण्यासाठी करोडो रुपयांची गुंतवणूक करतात आणि त्यातून पुढे सरकारी फायदे आणि पूर्वीपेक्षा जास्त नफे ते पदरी पाडून घेण्याची पद्धतशीर

अनुक्रमाणिका

योजना कार्यान्वित करतात आणि गरीबांना पुन्हा चरखात घालून पिळीत रहातात. लोकसभा वा विधानसभा आपल्या प्रभुत्वाखाली आणण्याची जाणीव ना शेतकऱ्यात आहे ना कामगारात आहे. म्हणूनच उद्यागधंदे आणि कारखानदारी व्यक्तिगत स्वरुपाची न ठेवता तिचे राष्ट्रीयकरण करावे, अथवा सहकार चळवळीच्या हाती तिची सूत्रे द्यावीत अशी भाई उद्धवरावांची विचारसरणी होती.

महाराष्ट्रात सहकारी तत्वावर अनेक साखर कारखाने निघाले. ते व्यक्तिगत मालकीचे न राहता सर्व सभासदांच्या मालकीचे असतात. लोकशाही पद्धतीने निवडून गेलेले प्रतिनिधी असे कारखाने चालवतात. त्यातही व्यक्तिगत कारखानदारीचे दोष पुढे शिरले. त्यामुळे सहकारचळवळीने फार मोठा बदल झाला असं ते मानायला तयार नव्हते. महाराष्ट्रात शंभराच्यावर साखर कारखाने झाले. पण त्या साखर कारखान्यावर पाच पन्नास शेतकऱ्यांच्या घराण्याचंच वर्चस्व असतं. अशा सहकारी साखर कारखान्याच्या गोरगरीब शेतकरी सभासदांना साखर कारखान्याच्या पुढाऱ्यांच्या मेहरनजरेवरच अवलंबून राहावे लागते. दोनदोन महिने ऊस उशीरा गेला तर वजन कमी भरतं. खर्च वाढतो. त्यामुळे सर्वसामान्य ऊस उत्पादक शेतकरी गुलामासारखे भित्रे बनतात. ऊस जसा चरखात जाऊन चोयटी होऊन बाहेर पडतो तीच स्थिती सामान्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांची होते. सहकार क्षेत्रामुळे शेतकऱ्यांचा स्वाभिमान वाढलाय किंवा तो फार मोठ्या प्रगतीवर गेलाय, असं दिसत नाही. हे उद्धवरावांचं निरिक्षण अत्यंत बोलकं आहे.

या सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून पूर्वीचे धनिक असलेले मुठभर शेतकरी हॉटेलच्या किंवा मालट्रकच्या धंद्यात शिरले. पण त्यात लोकशाही समाजवादाची वाटचाल झाल्याचे भाई उद्धवरावांच्या पहाण्यात आले नाही. सहकारक्षेत्र मुठभर धनिकांच्या हाती एकवटल्यानं या क्षेत्रात व्यक्तिगत कारखानदारीप्रमाणे विषमता वाढविण्याचा गुणधर्म आला. विषम समाजरचना आहे तिथंच राहिली. त्यामुळे सहकार क्षेत्रातून समाजवाद येण्याची 'को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ' ही कल्पना मातीला मिळाली. हे उद्धवरावांचे ठाम मत होते.

सहकारी चळवळीचे मूळ उद्देश कितीही चांगले असले तरी सहकाराची गंगा ग्रामीण भागातील तळागाळातील तहानलेल्या गरीब शेतकऱ्यापर्यंत खऱ्या अर्थाने येऊन पोहचलेली नाही. हे विदारक वास्तव उद्धवरावांनी नेहमी बोलून दाखविले आहे.

सन १९५७-५८ च्या अंदाजपत्रकात आवडी काँग्रेसच्या ठरावानुसार सेवा सोसायटीतून सहकारशेती असं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. तेव्हाच उद्धवरावजीनी त्यांना बजावलं होतं. "जमिनीची विषम होल्डिंग असल्यामुळं ही सोसायटी श्रीमंत शेतकऱ्यांना अधिक श्रीमंत करणारी ठरेल. गरीब शेतकरी अधिक गरीब होतील. ही प्रक्रिया आता विकोपाला गेली आहे. या सोसायट्याचे सभासद फक्त गरीब शेतकऱ्यांना करा. श्रीमंत शेतकऱ्यांना करू नका", असं भाई उद्धवरावांनी यशवंतरावांना सुचवलं होतं कारण सहकाराची खरी गरज अल्पभूधारक गरीब शेतकरी आणि शेतमजूर यानाच असल्याचे आणि त्यांच्या विश्वासास पात्र असणारं पुढारीपणं सहकारातून निर्माण होणं गरजेचं असल्याचं आपलं प्रांजल मत त्यांनी मांडलं होतं.

सहकारी चळवळीबद्दल सरकारने विधानसभेत विधेयक मांडल्यानंतर त्यावर भाष्य करतांना भाई उद्धवरावांनी मांडलेले विचार किती वास्तववादी आहेत, याचे प्रत्यंतर आजही येते. ते म्हणाले होते की, "सरकारने या चळवळीत असलेले दोष अत्यंत प्रामाणिकपणाने कबूल केले आहेत. चळवळ शुद्ध व्हावी.

चांगली चालावी, या चळवळीतून लोकांची सेवा व्हावी, अशी सदिच्छा सरकारने व्यक्त केली आहे. यातील काही तरतुदी ही चळवळ शुद्ध करण्याच्या दृष्टीने घालण्यात आलेल्या आहेत. परंतु सहकारी संस्थांचे ऑडिट रिपोर्टस् पाहिले व डेप्युटी रजिस्ट्रारने सहकारी संस्थांची यादी केली तर मंत्र्यापासून अनेक सदस्यापर्यंत असे सांगण्याची पाळी येईल की, पुन्हा आम्ही अशा गैरगोष्टी करणार नाहीत. खरा प्रश्न आहे की, आपले अधिकार वापरू शकतील असे डेप्युटी रजिस्ट्रार्स आता तरी सरकार निर्माण करणार आहे काय तो. केवळ कायदा केल्याने पंचायत समित्या, ग्रामपंचायती आणि सहकारी चळवळी यातील लाचलुचपत व भ्रष्टाचार आपल्याला दूर करता येणार नाही... सहकार चळवळीमध्ये काम करणाऱ्या मंडळीचे राज्यकर्त्यावर दडपण असल्यामुळे राज्यकर्ते त्यांच्या ठिकाणी असलेला भ्रष्टाचार व लाचलुचपत नाहीशी करू शकत नाहीत. सदर विधेयकाचा हेतू चांगला आहे. परंतु त्याच्या अंमलबजावणीच्या मार्गात अडथळा आणणारी हा आपलीच यंत्रणा आहे. जो माणूस पंचायती सारख्या संस्थात, सहकारी संस्थात डिफॉल्ट करील त्याला आम्ही सामाजिक प्रतिष्ठा देणार नाही, हे कबूल करण्याची आपली तयारी आहे का? जोपर्यंत अशा लोकावर आपण सामाजिक दडपण निर्माण करीत नाही, तोपर्यंत या तरतुदींचा काही उपयोग होणार नाही."

"या सहकारी चळवळीच्या माध्यमातून शेतकरी समाजात जी पुनर्रचना करावयाची आहे त्यासाठी काही दुरुस्त्या कराव्या लागतील. त्याचं आपल्या मतानं स्वरूप कोणतं आहे?" हा प्रश्न भाई उद्धवरावांची मुलाखत घेणारे प्रा. बा. ह. कल्याणकर यांनी विचारल्यानंतर भाई उद्धवरावांनी खालील उत्तर दिले आहे.

"ही जी ग्रामीण रचना आहे. तिला आधारभूत असलेले अर्थकरण कसं आहे? समाजरचना कशावर आधारित आहे? हे पहाणं महत्त्वाचं आहे. आज छोटे छोटे कारखाने निघत आहेत, ते मालकी हक्काच्या आधारावरच. पण जोपर्यंत विषम जमीन धारणा आहे. तोपर्यंत किरकोळ दुरुस्त्या करून भागणार नाही... ज्या भागात सहकारी चळवळ नाही, तिथं सहकार क्षेत्राच्या परिसरांपेक्षा विषमतेची चिन्हं आपणास कमी दिसतील. जसं मुंबईला फोर्ट एरिया, मलबार हिल एका बाजूला तर झोपडपट्ट्या दुसऱ्या बाजूला. ती विषमता वाढत गेली. कारखाने वाढले. उत्पन्नाच्या बाबी वाढल्या. तेच चित्र अल्प प्रमाणात का होईना साखर कारखान्याच्या परिसरात दिसेल. दुरूस्ती म्हणजे एकच. काटेकोरपणे कमाल जमीन धारणेचा सिलिंगचा कायदा अंमलात आणणे. मुख्यतः त्याहीपेक्षा देशातल्या मुठभर कारखानदारांच्या मगरमिठीत जो हा धंदा गेला आहे तो त्यांचेपासून वाचवणे. व्यक्तिगत कारखानदारीबरोबर व्यक्तिगत जमीनही राहातच असते पण कारखानदारी ज्या दिवशी सामाजिक क्षेत्रात येईल त्यानंतरच शेतीचं सामाजिकीकरण करण्याचा दुसरा क्रमांक येत असतो."

सहकारी चळवळ गोरगरीब शेतकरी-शेतमजुर-दलित यांच्या फायद्यासाठी राबावयची असेल तर उद्धवरावांच्या मताने भारतात शेतीचे नियोजन केले गेले पाहिजे. कसेल त्याची जमीन हे सूत्र स्वीकारलं पाहिजे. फक्त ६ टक्के दराने १०० टक्के कर्जपुरवठा या गरीब शेतकऱ्यांना झाला पाहिजे. शेतीमध्ये तंत्रज्ञान, नवज्ञानविज्ञान आणलं पाहिजे. नवीन रासायनिक खते आली पाहिजेत. शेतीचं यांत्रिकीकरण केलं पाहिजे. त्यासाठी छोटे शेतकरी एकत्रित झाले पाहिजेत. छोट्या शेतकऱ्यांना एकत्रित करणं ही कल्पना जरी कुणाला विडंबन वाटत असली तरी पुढं गरज म्हणून शेतकऱ्यामधूनच ही संघटना होईल यावर उद्धवरावांदादांना विश्वास वाटत होता.

अनुक्रमाणिका

शेतकऱ्यांचा साखर कारखाना आपल्या आदर्श तत्वाप्रमाणे चालावा म्हणून भाई उद्धवरावांनी भोगावती सहकारी साखर कारखाना, इर्ले-वैराग उभा करण्यात हिरीरीने भाग घेतला होता. शेअर्स जमा करण्यापासून तर शासनाची त्याला मंजुरी मिळेपर्यंत त्यांनी खूप मोठी धावपळ केली. जमीन खरेदी झाली, मशीनरी त्या जागेवर येऊन पडली. तेव्हा हा कारखाना इर्ले-वैरागऐवजी पानगाव परिसरात व्हावा, यासाठी बार्शी-पानगावकरांनी चळवळ उभी केली. प्रकरण दिल्लीपर्यंत गेले. तेव्हा भाई उद्धवरावजी खासदार होते. जनता पक्षाचं राज्य होतं. तेव्हा भाई उद्धवरावांनी सदर कारखाना इर्ले-वैराग भागातच झाला पाहिजे, याचे जणू वकीलपत्रच घेतले होते.

भाई उद्धवरावजी हे तुळशीदासजी जाधव यांच्यासोबत शिष्टमंडळात दिल्लीला गेले. आणि केंद्रीय मंत्र्यांपुढे त्यांनी कारखान्याची न्याय्य बाजू तर्कशुद्ध पद्धतीने मांडली. सदर इर्लेवैरागचा नियोजित कारखाना पानगावला हलवायचा म्हणजे पूर्वी तेथे घेतलेल्या जमिनीचे काय करायचे? पानगावला नव्याने जमीन खरेदी करायची, त्यावर पूर्वीच्या जमिनीवर येऊन पडलेली यंत्रसामुग्री-मशीनरी तिकडे हलवायचा खर्च कोठून करायचा? गोरगरीब शेतकऱ्यांच्या पैशातून झालेल्या पूर्व खर्चाला जबाबदार कोण राहाणार? इत्यादी बिनतोड मुद्दे मांडून सदर कारखाना इर्ले-वैराग येथेय उभारायची केंद्र शासनाकडून मान्यता मिळविली. मात्र या कारखान्यात त्यांनी कसलेही पद स्वीकारले नाही!

पुढे हा कारखानाही आपल्या तत्वानुसार चालेल की नाही, याची शंका उद्धवरावांच्या मनात येतांच त्यांनी वाशी (जि. उस्मानाबाद) येथे गोरगरीब शेतकऱ्यांना 'शिवशक्ती सहकारी साखर कारखाना' उभारण्याची जबाबदारी शे. का. पक्षाचे कार्यकर्ते श्री. पंडितराव चेडे यांच्यावर सोपविली. त्यांना हरतऱ्हेचे मार्गदर्शन आणि सहकार्य केले पण राजकीय कारणांमुळे या कारखान्यास उद्धवरावांच्या हयातीत अंतीम मंजूरी मिळाली नाही. ती नुकतीच मिळाली. सदर शिवशक्ती सहकारी साखर कारखान्याचे उद्‌घाटन प्रा. एन्. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मा. मुख्यमंत्री ना. विलासरावजी देखमुख यांचे हस्ते.... शनिवार दि. २६-१०-२००२ रोजी झाले. श्री. पंडितराव चेडे हे उद्धवरावांचे निस्सिम भक्त. उद्धवरावांचे स्वप्न ते पूर्ण करतील?

भाई उद्धवरावजींनी आपल्या अर्थशास्त्रीय विचारावर आधारित सहकारी तत्वावर शेतीचा मोठा प्रयोग हाती घेऊन तो यशस्वी करून दाखवण्याचे स्वप्नं उरी बाळगले होते. पण ते अपुरेच राहिले आहे. हल्लीच्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या दाट चिल्लारीच्या कोंडाळ्यात शेतकऱ्यांचे भवितव्यच अंधारमय होऊ लागले असतांना छोट्या छोट्या शेतकऱ्यांच्या एकजुटीतून सहकारी शेतीचे उद्धवरावदादांचे स्वप्न पूर्ण होईल?

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण अठरावे**

## ।।‘उद्धवराव झिजले माणूस उद्धराया!’।।

उद्धवरावांना कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाची लागण झाली. त्यांची प्रकृती वरचेवर क्षीण होऊ लागली. जीवनभर समतेच्या चळवळीत झुंजलेल्या झुंजार सेनानीचा अशा परिस्थितीत मराठवाडा पातळीवर औरंगाबादला सर्वपक्षीय नागरी सत्कार करण्याचे निश्चित करण्यात आले.

दि. ९ ऑक्टोबर १९८३ रोजी भाई उद्धवरावांचा सर्वपक्षीय नागरी सत्कार निश्चित झाला. हा सत्कार दुपारी ३ वाजता होता. तर सकाळी ९ वाजतां शेतीविषयक परिसंवाद आयोजित केला होता. शेतीविषय हा उद्धवराव दादांचा जीव की प्राण होता. कार्यक्रमाचा रविवारचा दिवस उजाडला. देवगिरी महाविद्यालयाच्या परिसरात भव्य सभामंडप उभारलेला. फुलापानांनी फुललेला! विविध पक्षांच्या झेंड्यानी सजलेला! महाराष्ट्राच्या आणि मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यातून पांढऱ्या, पिवळ्या-तांबड्या, हिरव्या फेटेधारी शेतकरी शेतमजुराची कार्यक्रमस्थळी रीघ लागलेली.

सकाळी ९ वाजता ॲड. नरसिंगरावजी देशमुख, काटीकर यांच्या अध्यक्षतेखाली ‘शेतीविषयक परिसंवाद’ सुरू झाला. या परिसंवादात आमदार किशनराव देशमुख, प्रा. विष्णु पाटील, श्री. विजय बोराडे, प्रा. देसरडा, आमदार कवी ना. धों. महानोर आणि प्रा. एन्. डी. पाटील यांनी आपापले विचार मांडले. खुद्द भाई उद्धवरावजींनी ही या परिसंवादात भाग घेतला. शेतीविषयाची शेतकऱ्यांना उपयुक्त आणि मार्गदर्शक अशी बहुअंगी चर्चा रंगली.

भाई उद्धवरावांच्या सर्वपक्षीय नागरी सत्काराच्या मुख्य कार्यक्रमासाठी उभारलेला मंडप गच्च भरलेला. सत्कारमूर्ती, पाहुणे आणि अध्यक्ष यांचे व्यासपीठाकडे आगमन होऊ लागले तेव्हा तुतारीच्या निनादात आणि सनईच्या मंजूळ स्वरात त्यांचे स्वागत करण्यात आले. पुरोगामी युवक संघटनेच्या नेतृत्वाखालील सुमारे तीनशे स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांनी हातात लालबावटे घेऊन मिरवणूकीने, “उद्धवराव दादा, लाल सलाम, लाल सलाम” च्या घोषणांनी भाईबद्दलचा आपला आदरभाव प्रकट केला.

गौरव समितीचे अध्यक्ष खा. बाळासाहेब पवार यांनी उपस्थित पाहुण्यांचे पुष्पहार देऊन स्वागत केले आणि प्रास्ताविक भाषणात ह्या कार्यक्रमाच्या योजनेमागील सद्हेतूचे कथन केले. त्यानंतर विविधसंस्था, संघटना, आणि व्यक्तींच्या वतीने भाई उद्धवराव दादांना पुष्पहार घातले गेले. व्यासपीठावर पुष्पहारांचा डोंगरच उभा राहिला. भाई उद्धवरावांच्या ८५ वर्षाच्या वडिलांना साहेबराव आण्णांना बाळासाहेब पवार हार घालू लागले. तो स्वीकारतांना लाल फेटा बांधलेले वयोवृद्ध साहेबराव आण्णा लडखडत उभे राहिले तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. त्याच वेळी श्रीमती रत्नप्रभा पवार यांनी दादांच्या पत्नी सौ. शारदाबाईचाही पुष्पहार घालून सत्कार केला. शेवटी शिवछत्रपतीकालीन तुताऱ्यांच्या निनादात खासदार यशवंरावजी चव्हाण यांच्या हस्ते उद्धवराव दादांना शाल, पुष्पहार, श्रीफळ आणि मानपत्र आणि प्रा. दिलीप बडे यांनी रेखाटलेले (त्यात कार्लमार्क्स, शेतकरी आणि दोन ज्योतीपैकी एक प्रकाशमान तर दुसरी विझलेली सीमा प्रश्नाचं प्रतिक असलेलं) चित्र उद्धवरावजींना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यावेळी ‘उद्धवराव पाटील, झिंदाबाद’ च्या घोषणांनी सारा आसमंत दुमदुमून गेला.

अनुक्रमाणिका

याचवेळी श्री. श्रीपतराव कदम यांचे हस्ते भाई उद्धवराव पाटील यांच्या जीवन कार्याचा आढावा घेणाऱ्या प्रा. बा. ह. कल्याणकर संपादित 'संघर्ष' या गौरव अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

मानपत्राचे वाचन झाल्यानंतर शे. का. पक्षाचे जेष्ठ नेते श्री. आण्णासाहेब गव्हाणे आणि श्री. भाऊसाहेब राऊत यांनी भाईजींच्या पक्षकार्याचा आलेख मांडला. भाई उद्धवरावजी हे शे. का. पक्षाची चालतीबोलती शक्ती असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यमंत्री अब्दूल अजीज आणि सोलापूरचे अब्दुल सतार यांनी आपल्या भाषणात भाई उद्धवराव दादांच्या धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी विचार आणि कृतीचा गौरव केला. स्वतःच्या जातीपातीचे राजकारण न करता अल्पसंख्य समाजाचे रक्षण करण्यासाठी त्यांनी जीवाची बाजी लावल्याचेही त्यांनी सांगितले. प्राचार्य राजाराम राठोड आणि ॲड. खुशालराव मोताळे यांनी आपल्या भाषणात उद्धवरावांनी राजकारणातून समाजाची वकिली केली. तीही कसलीही फी न घेता केल्याचे प्रतिपादन केले. 'मराठवाडा' या दैनिकाचे संपादक श्री. अनंत भालेराव यांनी भाईंच्या प्रसिद्धीपरान्मुख राहून समाजसेवा करण्याच्या शैलीचे कौतुक करून ते धाडसी योद्धा असल्याचे सांगून त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारा, 'कहो ना खुदासे, के लंगर उठा ले । मै तुफाँकी जिद देखना चाहता हूँ ।' हा उर्दू शेर श्रोत्यांना ऐकवला. तर कॉ. माधवराव गायकवाड आपल्या भाषणात म्हणाले, "उद्धवरावांनी समाजातील दुर्बळ घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी चळवळी केल्या. आता डाव्या विचारसरणीच्या सर्व पक्षांनी एकत्र येऊन चळवळीचा कल्लोळ उभा केला तरच शेतकरी, कामगार, कष्टकरी आणि दलितांचे प्रश्न लवकर सुटण्यास मदत होईल."

जनता पक्षाचे डॉ. बापूसाहेब काळदाते यांचे भाषण नेहमीप्रमाणे रंगले. त्यांचे भाषण चालू असतांना काही काळ पावसानेही हजेरी लावली. तरीही मंडपातून कुणी हलले नाही. डॉ. काळदाते यांनी आपल्या अस्खालित वाणीने, काव्यात्म भाषेने आणि वास्तववादी दृष्टांताने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी भाई उद्धवरावांच्या राजकीय जीवनातील तत्वनिष्ठेतील ताठपणा आणि खंबीरपणाचा गौरव केला. भाई उद्धवरावांचे मोठेपण पकडण्यासाठी त्यांनी कवीवर्य वसंत बापटांच्या गाजलेल्या 'बांभुळझाड' या प्रतिकात्मक कवितेतील खालील ओळी आपल्या खड्या आवाजात उद्धृत केल्या.

"अस्सल लाकूड, भक्कम गाठ, ताठर कणा टणक पाठ
वारा खात, गारा खात, बाभुळझाड उभेच आहे.
देहाला फुटले बारा फाटे, अंगावरचे पिकले काटे
आभाळात खुपसून बोटे, बाभूळझाड उभेच आहे.
अंगावरची लवलव मिटली, माथ्यावरची हळद विटली
छाताडाची ढलपी फुटली, बाभुळझाड उभेच आहे."

ह्या 'बाभुळझाडा' च्या रुपकाने श्रोत्यामधील जाणत्या माणसांना क्रांतिसिंह नाना पाटलांच्या 'आता बाभळीलाच आपण पार बांधू या' या प्रसिद्ध भाषणाची आठवण झाली. भाई उद्धवराव पाटील हे क्रांतीसिंहाचे खरे वारसदार! दोघांचीही जीवने बहुगुणी आणि बहुउपयोगी पण दुर्लक्षित राहिलेली! क्रांतीसिंह सांगायचे त्याप्रमाणे आता वड पिंपळ या झाडाऐवजी बाभळीच्या झाडालाच आपण पार बांधला पाहिजे, त्यालाच पूजले पाहिजे. म्हणजेच बाभळीचे प्रतिक असणाऱ्या क्रांतिसिंह नाना पाटील आणि भाई उद्धवराव पाटील यांनाच आणि त्यांच्या तत्वज्ञानाची पूजा केली पाहिजे. हा विचार भाई उद्धवराव दादांच्या गौरव समारंभाच्या निमित्ताने जनमानसात रुजवण्याची प्रक्रिया सुरू झाली!

भाईच्या गौरवपर भाषणे झाल्यावर प्रमुख पाहुणे भारतीय अर्थआयोगाचे त्यावेळचे अध्यक्ष खा. यशवंतरावजी चव्हाण हे भाषणास उभे राहिले. श्रोते कान टवकारून ऐकू लागले. “उद्धवरावांचा सत्कार आपल्या डोळ्यांनी पाहण्यासाठी मी आलो आहे... मी मुख्यमंत्री असताना उद्धवराव पाटील विरोधी पक्ष नेते होते. आमची दोस्ती विरोधाची आहे. मी आणि उद्धवरावांनी परस्पर विरोधी पक्षात कार्य केलेले असले तरी राजकारण म्हणजे संपूर्ण जीवन नव्हे तर माणसांच्या जीवनामध्ये जे अनेक पैलू असतात, त्यापैकी राजकारण हा एक पैलू असल्याने आमच्या वैयक्तिक संबंधामध्ये राजकारण कधीच आड आले नाही. कारण राजकारण माणुसकीसाठी असते आणि असे माणुसकीचे राजकारण करणाऱ्यांचे उद्धवराव प्रतिनिधी आहेत.”

“महाराष्ट्राची गरज होती म्हणून शे. का. पक्षाचा जन्म झाला. या पक्षाने महाराष्ट्राच्या राजकारणात जी गरज होती ती भागवली. हे सांगायला मला काहीच संकोच वाटत नाही. शे. का. पक्षाद्वारे उद्धवराव पाटलांनी शेतकरी, कामगार श्रमजिवी वर्गासाठी मानापमानाची तमा न बाळगता केलेले कार्य फार मोलाचे आहे. त्यांनी ज्या निष्ठेने काम केले, तो आदर्श आजच्या तरुणांनी समोर ठेवावा.”

“उद्धवरावांनी स्वातंत्र्य चळवळीत आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोलाचे कार्य केले आहे. उद्धवराव आणि विरोधी पक्षांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी प्रतापगडावर नेहरूंच्या विरोधात आणलेल्या प्रचंड मोर्चाबद्दल मी त्यावेळी त्यांच्यावर टीका केली होती. त्यांना संकुचित प्रवृत्तीचे ठरविले होते पण आज मी प्रांजळपणे सांगतो की, प्रतापगडाच्या मोर्चामुळेच संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येणे शक्य झाले. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे श्रेय मला दिले जाते पण माझ्याइतकाच त्या श्रेयात महाराष्ट्र जागृत करणाऱ्या उद्धवरावांचाही वाटा आहे.”

“उद्धवराव पाटलांनी जीवनात अहंकाराला थारा न देता विचारांची दृढनिष्ठा शेवटपर्यंत कायम ठेवली. राष्ट्रीय प्रश्नांचा अभ्यास आणि जाण असणारे व्यक्तिमत्व म्हणजे उद्धवराव पाटील! देशाच्या राजकारणाला भाई उद्धवरावांच्या रुपाने मोलाची देणगी लाभली आहे.”

यानंतर भाई उद्धवराव पाटील सत्काराला उत्तर द्यायला माईकपुढे ताठ उभे राहिले. नेहमीच्या खड्या आवाजात ते बोलू लागले. “सत्कार हा माझ्या जीवनातील पहिला प्रसंग आहे. तो यायला नको होता. कारण अनेक लोक त्याग करतात त्यापैकी मी एक आहे.... मी आयुष्यात संयुक्त आघाड्यातच राजकारण खेळत आलो. हा सत्कार समारंभही संयुक्त आघाड्यांचेच प्रतिक आहे. मी विदाऊट प्लॅन राजकारणात आलो. अन्यायाला विरोध करण्याच्या उर्मीपोटी राजकारणात आलो. निवडणुकीत कधी पराभवही झाला. पण त्याची खंत कधी केली नाही. लोक चळवळीपासून दूर कधी गेलो नाही. जनतेच्याबरोबर, जनतेच्या लढ्यात लढत असतानाच मी घडत गेलो. लोकांनी मला जीवनभर अलोट प्रेम दिले. कै. फुलचंद गांधी आणि त्यावेळेपासून महाराष्ट्राचे नेतृत्व करत असलेले काँग्रेसचे नेते यशवंतराव चव्हाण या दोन व्यक्ती माझ्या जीवनात अशा आल्या की, त्यांच्याकडून मी राजकारणाबाबत बरेच काही शिकलो. आम्ही जातीपातीचे राजकारण कधी केले नाही. निवडणुकीलाही तत्वनिष्ठेच्या लढाईचे एक शास्त्र मानले. अन्याय दिसला की प्रतीकार कर, कष्टकरी नि शेतकरी दिसला की मदर कर, हा आता स्वभावच बनला आहे. जातीपातीवर मात करायची तर सवर्ण आणि दलितांनी एकत्र येऊन राजकीय क्षेत्रात काम केले पाहिजे.”

अनुक्रमाणिका

संयुक्त महाराष्ट्राबद्दल बोलताना उद्धवरावदादा म्हणाले, “संयुक्त महाराष्ट्र होणार नाही, असे सारेजण सांगत होते. पण लोकशाहीत लोकचळवळीपुढे सत्ताधाऱ्यांनाही पडते घ्यावे लागते. याचा मला विश्वास वाटत होता. त्यातच संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्यावेळी सत्ताधारी आणि आम्ही विरोधक यांच्यात राजकीय दुमत होते. तेव्हा लोकचळवळीतून लोकेच्छा प्रबळ ठरल्याने संयुक्त महाराष्ट्र मिळाला. पण बेळगाव, कारवार आदी सीमाप्रश्नावर साऱ्यांचे एकमत असूनही तो प्रश्न सुटू शकला नाही, याची खंत वाटते. एस्. एम्. जोशी आणि यशवंतराव आदीनी याबाबत लक्ष घालावे आणि भाषिक पुनर्रचनेचा आग्रह धरावा. भाषिक राज्ये झाल्याने देशाचे तुकडे पडतील ही भीती खोटी ठरली आहे. पंजाबातील चंदीगड आणि सीमेचाही प्रश्न अशा रीतीने सुटू शकेल.”

शेतीधंद्याबद्दल बोलतांना सकाळी झालेल्या शेतीविषयक परिसंवादाचा उद्धवरावांनी उल्लेख केला. त्या परिसंवादात त्यांनी केलेल्या मुद्यावर जोर देत ते म्हणाले,”देशाच्या नियोजनात औद्योगिक क्षेत्राला जे स्थान आहे, तेच स्थान कृषीक्षेत्राला मिळणे आवश्यक आहे, कसेल त्याची जमीन आणि कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीमालाला शेती खर्चावर आधारित परवडणारे भाव हवेत. ही आमची न्याय्य आणि शास्त्रीय मागणी आहे. या शेतीधंद्यातील जमीन मालकीतील मध्यस्थ जसा आपण हटविला तसाच शेतीमालांच्या बाजारपेठेतील मध्यस्थही हटवायला हवा. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या शेतमालाचे भाव ठरवून भागत नाही. त्यासाठी किफायतशीर भाव देणारी बाजारपेठ निर्माण केली पाहिजे. ते होण्यासाठी शासनाने एकाधिकार खरेदी यंत्रणा उभी करावी आणि त्यापुढे जाऊन त्याची वाटप-वितरण यंत्रणाही खेड्यापर्यंत निर्माण करावी. इतर धंद्याप्रमाणे शेती धंद्याला इतर नफे-सोईसवलती मिळाल्या पाहिजेत; तरच हल्ली उध्वस्त होत चाललेल्या शेतीधंद्याला बरे दिवस येतील.” असे ठणकावून सांगून त्यांनी खेड्यापाड्यातून शेतकरी, शेतमजूर आणि दलितावर होणाऱ्या जुलमाविरुद्ध तरुणांनी लढा उभारण्याचीही सूचना केली.

भाई उद्धवरावांना कॅन्सरचा आजार असल्याने आपले भाषण आटोपते घेतांना शेवटी ते म्हणाले, “मी आजारी आहे. उपचार चालू आहेत. परंतु मी आजारी माणसांसारखे बोललो तरी कां? पण प्रश्न पडलाय की, हा माझा सत्कार समारंभ आहे का निरोप समारंभ?” त्यांच्या उद्‌गाराने सभामंडपात क्षणार्धात सर्वत्र गंभीर वातावरण पसरले.

शेवटी श्री. एस्. एम्. जोशी यांनी अध्यक्षीय भाषणास सुरूवात केली. “उद्धवरावांनी जीवनभर समतेसाठी संघर्ष केला. त्यासाठी त्यांनी अनेक संकटांना आणि समस्यांना समर्थपणे तोंड दिले. उद्धवराव खऱ्या अर्थाने पुरुषार्थी जीवन जगले. या संदर्भात मला ‘देखना है जोर कितना, बाजू ए कातिल मे है?’ या ओळी उधृत कराव्याशा वाटतात.”

भाई उद्धवरावांच्या तत्वनिष्ठेचा गौरव करून ते पुढे म्हणाले, “तत्त्वनिष्ठांना बाजारात काहीच किंमत नाही, हा समज उद्धवरावांच्या या सत्काराने खोटा ठरला आहे. उद्धवराव पाटलांचा सत्कार पहाता मानवी मूल्ये आजही कायम आहेत. त्याला ग्रहण लागलेले नाही, असे वाटते... उद्धवराव ही एक प्रेरणारुप मूर्ती आहे. माणसाला सत्ता उभा करता येते पण सत्तेला माणूस उभा करता येत नाही. त्यासाठी निष्ठा असावी लागते. ती निष्ठा उद्धवरावांच्याकडे अमाप आहे. म्हणूनच ते सामान्य माणसांना उभा करू शकले. सामान्य माणसांचा उद्धार करण्यासाठी उद्धवरावांचा जन्म झाला. त्यासाठी त्यांनी जीवनभर सत्तेशी संघर्ष केला. त्यांची प्रेरणा आजच्या तरुणांनी कायम ठेवावी. त्यासाठी उद्धवराव आम्हाला खूप वर्षे हवे आहेत.” असे म्हणून त्यांनी उद्धवरावांना निरामय जीवन लाभावे, ही भावना व्यक्त करून अध्यक्षीय भाषण पुरे केले.

अनुक्रमाणिका

अशा झुंजार सेनानीच्या संघर्षमय जीवनाची कहाणी जेवढी चित्तथरारक आहे, तेवढीच ती रोचक, रोमांचक आणि समाजाला दीपस्तंभासारखी उजळलेल्या वाटा दाखवणारी आहे.

*

अनुक्रमाणिका

**प्रकरण एकोणीसावे**

## ।।कॅन्सरशी कडवी झुंज आणि महानिर्वाण।।

भाई उद्धवराव पाटील यांची प्रकृती लहानपणापासून ठणठणीत होती. पण हैद्राबाद मुक्ती संग्रामात भूमीगत राहून रझाकारांशी सशस्त्र लढा देणं; पुढे शे. का. पक्षाचा लालबावटा खांद्यावर घेऊन पक्षप्रचार खेडोपाड्यातून करणं; कार्यकर्त्यांच्या अभ्यास शिबीरासाठी रात्ररात्र जागून ग्रंथवाचन करून व्याख्यानांची तयारी करणं; अभ्यास शिबीरं घेण्याचं व्यवस्थापन सांभाळणं; निवडणूक प्रचारात जेवण-खाणी विसरून दिवसरात्र फिरणं; गोवा मुक्ती आंदोलनात व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बेभान होऊन झोकून देणं आणि सीमा लढ्यासाठी रक्त ओकेपर्यंत झपाटून जाणं, या साऱ्या धावपळीने आणि दगदगीमुळे त्यांची प्रकृती कधी ढासळली हे पहायलाही ते विसरून गेले होते. त्यात त्यांचा पानतंबाखू खाण्याचं व्यसन. ते व्यसन इतकं वाढलं की पुसता सोय नाही. एक पान खावून संपलं की ते दुसरा पानविडा बनवायच्या तयारीला लागत. कार्यकर्त्यांनी बैठक असो; सभेमध्ये व्याख्यान देणे असो की प्रवास करणे असो, त्यांची पान खाण्याची प्रक्रिया चालूच असायची. विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास चालू असतानाही त्याचं पान खाणं बंद नसायचं. प्रश्नोत्तराच्या तासात त्यांना पुरवणी प्रश्न विचारण्याची उबळ यायची. त्यावेळीही त्यांच्या तोंडात पान असायचंच. मग सदस्यांना मिळणाऱ्या पाकीटात पानाचा रस भरून ते प्रश्न विचारायचे. विधानसभा संपल्यानंतर पाकीटभर रसचोथा बाहेर नेऊन टाकला जात असे.

शे. का. पक्षाचा लालबावटा ही त्यांची जशी अभिमानाची बाब असे तशी सतत पान खाण्याची सवय हीदेखील त्यांच्या आनंदाची बाब असे. उस्मानाबादचे त्यांचे शिष्य श्री. शिवाजीराव साळुंखे तर पानाबरोबर उद्धवरावादादांचे भाषण रंगावे म्हणून बाबा जर्दाचे पान स्टेजवर पाठवून देत. साळुंखे यांच्या मते, आपल्या देशात पानसुपारी शुभ व मंगलकार्याचे द्योतक समजतात. पण या मंगलदानानेच आमचे मात्र अमंगळ केले." उद्धवरावदादांना कॅन्सरने घेरले.

कॅन्सर कुणाला होईल, हे का सांगता येते? स्वामी विवेकानंदांचे गुरु रामकृष्ण परमहंस यांना कॅन्सर झाला होता. पण कॅन्सर या रोगाचा उद्धवरावांच्या घरावर विशेष लोभ असावा. उद्धवराव दादांच्या मातोश्री कॅन्सरने आजारी पडल्या. कॅन्सरने त्यांच्या घरात प्रवेश केला आणि उंटाप्रमाणे हळूहळू आपले पाय पसरू लागला तो घराच्या मालकाला बाहेर काढण्यासाठीच जणू! उद्धवराव दादांची ही कॅन्सरची पहिली ओळख! दादा आणि शारदाबाई हे दादांच्या आईचे आजारपण सांभाळायचे. दादांनी आईला मुंबई येथील टाटा हॉस्पीटलमध्ये ठेवले. औषधपाणी केले. सेवाशुश्रूषा केली. पण त्यात त्यांना यश आले नाही. आई कॅन्सरने गेल्यानंतर ह्या दुर्धर रोगाने दादांच्या बहिणीला-गोदाबाई देवराव बागल यांना पकडले. त्यांना पुन्हा टाटा हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ ठेवले. खूप धावाधाव केली पण तेथेही त्यांना यशाने हुलकावणी दिली. ह्या रोगाची इजाबीजा तिजा होईल. कॅन्सरचा मोर्चा आपल्याकडे वळेल ही गोष्ट त्यांच्या स्वप्नातही आली नाही. तेवढा विचार करायला आणि या रोगासाठी तज्ञ डॉक्टरकडून तपासण्या करून घ्यायला आणि त्यावर वेळीच प्राथमिक उपचार करून घेण्यासाठी त्यांना वेळच कुठे होता? पंडित जवाहरलाल नेहरू दिवसाचे अठराअठरा तास काम करायचे असे म्हणतात. पण भाई उद्धवरावदादा दिवसाचे वीसवीस तास काम करायचे. त्यांना झोपायला कसेबसे चारपांच तास मिळत असत. त्यात खाण्यात अनियमितपणा झाल्याने त्यांना अशक्तपणा जाणवू लागला. सन १९८० साली कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथे शे. का. पक्षाच्या शिबीरासाठी उद्धवरावजी धडपड करून गेले. तेथे त्यांना घास

गिळतांना खूपच त्रास होऊ लागला. तेव्हा पक्ष कार्यकर्त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. भाई दाजीबा देसाई तर चक्रावून गेले. त्यांनी उद्धवरावांना मुंबईला नेऊन तपासणी करून घेण्याची जबाबदारी प्रा. एन. डी. पाटील यांच्यावर सोपवली. एन्डीनी उद्धवरावदादांना मुंबईला नेले. तपासण्या पार पडल्या. त्याचे निष्कर्ष धक्कादायक होते. कर्करोगाचे निदान झाले. कार्यकर्त्यांना आणि भाई उद्धवरावांच्या कुटुंबियांना सारे आकाशच फाटल्यासारखे झाले. कर्करोगाच्या निदानानंतर ठराविक सोपस्कार सुरु झाले. शेक देणे, आणि ऑपरेशन करणे क्रमप्राप्त ठरले. ऑपरेशन केल्यावर तरी हा आजार संपेल, असे सर्वांना वाटले. ऑपरेशन चालू असतांनाच डॉ. व्यास बाहेर आले. 'ऑपरेशन होऊ शकत नाही' हा त्याचा निर्णय ऐकून सारेच हवालदिल आणि हतबुध्द झाले. ऑपरेशन पूर्ण न करताच डॉक्टरांची दादांची जखम शिवून टाकली. पुढे काय होणार हे सांगायला कुणा ज्योतिबाची गरज नव्हती. एवढा कणखर नेता. कोणत्याही संकटाला भीक न घालणारा धाडसी योद्धा आणि कसल्याही दुःखाला स्थितप्रज्ञाप्रमाणे सामोरे जाणारा हा नेता. परंतु कर्करोगाचे सारे शरीर पोखरले गेल्याने जर्जर झाला.

भाई उद्धवरावदादांनी जीवनभर 'बळीचे राज्य' आणण्यासाठी अनेक संघर्ष केले. शेवटी त्यांना कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाशीही संघर्ष करण्याची पाळी आली. दादांनी हा संघर्षही स्थितप्रज्ञाच्या वृत्तीने केला. त्यांना कॅन्सर झाल्याचे कळाल्याबरोबर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लहान मोठे कार्यकर्ते मुंबईला येऊन त्यांना भेटण्यासाठी गर्दी करू लागले. त्यावेळी उद्धवराव दादा आपल्या आजाराचे दुःख यातना चेहऱ्यावर दिसू देत नव्हते. आपल्या आजारपणाबद्दल बोलण्यापेक्षा ते कार्यकर्त्यांची आस्थेने विचारपूस करीत. त्याचबरोबर पुढे लढवावयाच्या लढ्याची चर्चा करीत. सीमा प्रश्नाच्या विलंबनाची खंत बोलून दाखवीत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तासन्तास गप्पा मारीत. आपले शास्त्रशुध्द विचार त्यांना ऐकवीत. शेवटी जवळचे कार्यकर्ते आणि घरातील नातेवाईक त्यांचेवर जास्त न बोलण्याचे बंधन घालीत. पण ते बंधन पाळतील तर ते उद्धवराव कसले! उद्धवरावदादा हे कॅन्सरने जर्जर झाले होते. तरी त्यांनी रायगड जिल्ह्यातील उरणचा लढा लढविण्याबाबत आमदार निवासात राहून लढ्याची भूमिका, लढ्याचा कार्यक्रम आखून दिला. आणि तो पार पाडला जातो की नाही ते बारकाईने पाहिले.

उद्धवरावदादांना आपल्यावर कोणाच्या ही उपकाराचे ओझे नको वाटे. किंवा आपल्यासाठी कुणी त्रास घ्यावा, असेही वाटत नसे. ते जेव्हा मुंबईला हॉस्पीटलमध्ये उपचार घेत होते तेव्हा महाराष्ट्र राज्याचे मत्स्य विभागाचे संचालक श्री. सुंदरराव सवनेकर दादांना दवाखान्यात नेण्यासाठी आपली कार पाठवित असत. त्यावेळी उद्धवरावदादांना संकोचल्यासारखे होई. ते म्हणत "सरकारी गाडी कशाला पाठवता? मी टॅक्सीने दवाखान्यात जाईन." पण त्यांचे हे म्हणणे सवनेकर ऐकत नसत. इतका त्यांचा दादांशी स्नेह होता. आपुलकी होती.

उद्धवराव दादांना औषधोपचारासाठी परदेशी पाठविण्यासाठी बरेच साखरसम्राट तयार होते. ते तसा आग्रहही दादांपाशी करत असत. पण दादा नम्रपणाने त्यांच्या आग्रहाला नकार देत. ही बाब तेरखेड्याचे शे. का. पक्षाचे कार्यकर्ते श्री. कांतीलाल बोराणा यांना खटकली. ते उस्मानाबादला जाऊन दादांना भेटले आणि जिज्ञासेपोटी त्यांनी दादांना प्रश्न टाकला. "दादा, आपण साखरसम्राटाकडून मिळू पहात असलेल्या मदतीला कां बरे नाकारता?" त्यावर दादा उत्तरले, "हे बघ कांतीलाल, ही धेंडं मला परदेशी पाठवितील. कदाचित मी बराही होईन. पण इकडे शेतकरी कुटुंबे उध्वस्थ होतील? असा उपचार मला त्रासदायकच ठरेल." यावरून उद्धवरावदादांच्या मोठेपणाची कल्पना कुणालाही येईल.

अनुक्रमणिका

भाई उद्धवराव हे कॅन्सरने आजारी असल्याने त्यांनी विश्रांती घ्यावी, असे डॉक्टर मंडळी आणि उद्धवरावाचे कुटुंबिय सांगत पण तशा परिस्थीतीत उद्धवरावदादा पक्ष कामासाठी दौऱ्यावर जात असत. एकदा असेच दौऱ्यावर असतांना कळंब येथे कॉ. राम मुकादम यांची भेट झाली. कॉ. मुकादम हे दादांचे हैद्राबादला शिकायला असतानाचे महाविद्यालयीन मित्र. दोघेही डाव्या विचारसरणीचे. लोकलढ्यात दोघेही काम करणारे. या भेटीत पूर्वकालीन आठवणीने दोघेही मित्र सद्‌गदीत झाले. त्यांना गहिवरून आले. त्या दोघांनीही गप्पा-टप्पा आणि शेतीविषयक प्रश्नावर चर्चाही केली. शेवटी कॉ. मुकादम म्हणाले, "दादा तुम्ही कॅन्सरने आजारी आहात आणि अशावेळी तुम्ही बाहेर फिरणे प्रकृतीला धोकादायक आहे. तुम्ही विश्रांती घेणे आवश्यक आहे."

त्यावर दादा त्यांना म्हणाले, "अरे राम, जन्माला आलेला प्रत्येक माणूस मरणारच असतो आणि मला जर दौऱ्यावर असतांना, शेतकरी श्रमिक जनतेची चळवळ करतांना मृत्यू आला तर ते मी वीरोचित मरण समजेन. जसे लढाईवर असतांना सैनिकांना मृत्यू आला तर विरोचित मरण येते तसे!"

यावर कॉ. राम मुकादम काय बोलणार? बोलणे थांबते तेथे काव्य स्फुरते. कॉ. मुकादमांनी या प्रसंगावर एक मराठी गझल लिहिले आहे. त्यातील काही ओळी नमुन्यादाखल खाली देत आहे.

"वेदनेचे बांधून ओझे मी निघालो
प्रवासात माझ्या सोबती घेऊन श्वास माझे
जन्म वाटेवरी यात्रिकांच्या झेलले मी निखारे या हाती
पुनव आलेल्या त्या निळ्या चांदराती!
दोस्तहो, कोण मी? मी कुणाचा?
भान नाही मला राहिलेले
सैल धुंदीत या वादळाच्या
चाललो घेऊन स्वप्न माझे."

हळूहळू भाई उद्धवराव दादांच्यावर कॅन्सरने आपले क्रूर पाश आवळायला सुरवात केली. उद्धवराव दादांना आपले शेवटचे क्षण जवळ येत असल्याची चाहूल लागली असावी. आपल्या लाडक्या नेत्याला डोळे भरून पहण्यासाठी अनेक माणसं यायची. त्यात येडशीचे उस्मानाबादेत घर करून राहाणारे शे. का. पक्षाचे कार्यकर्ते, स्नेही त्यांना दादांचे भक्त म्हणा हवे तर असे श्री. झुंबरलाल तापडिया दादांच्याजवळ कायमचे ठाण मांडून असायचे. दादांच्या चेहऱ्यावर काळजीचा अजिबात लवलेशही नसायचा पण ते आपल्या काही खंता बोलून दाखवायचे. दादा म्हणायचे, "माझं काही नाही पण माझ्यानंतर हा आघात माझे वडील कसे सहन करतील?" त्यांचे वडील साहेबराव आण्णा हे ऐकून असहायपणे अश्रू ढाळायचे.

बोलता बोलता उद्धवराव दादा आपली दुसरी खंत उगाळायचे. "संयुक्त महाराष्ट्राबद्दल आमचे आणि सत्ताधारी काँग्रेस पक्षात मतभेद असायचे पण आमच्या चळवळीने संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न मिटला. पण बेळगाव, कारवार, निपाणी, खानापूर, बिदर, भालकी, संतपूरसह संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न मतभेद नसतानाही लोंबकळत राहिला आहे. तो प्रश्न माझ्या मरणापूर्वी सुटल्याचे पहाण्याची माझी इच्छा आहे." ही खंत त्यांनी दि. ९ ऑक्टोबर १९८३ रोजी औरंगाबादला झालेल्या त्यांच्या सर्वपक्षीय गौरव समारंभातही बोलून दाखवली होती आणि त्याच समारंभात "हा माझा सत्कार समारंभ आहे की निरोप समारंभ आहे?"हे

अनुक्रमाणिका

भावपूर्ण मनाला चटका लावणारे उद्‌गारही काढले होते. या गौरव-सत्कार समारंभानंतर त्यांचे शेवटचे भाषण बीड येथील बलभीम महाविद्यालयात झाले होते. त्यावेळी महाविद्यालयात त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला होता. उद्धवराव दादांनी आपली तब्येत चांगली नसतांनाही त्या सभेत दीडतास प्रेरणादायी भाषण केले होते.

आयुष्याच्या सायंकाळी कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर उद्धवरावदादा दुर्गादेवी (रामलिंग स्टेशन लगत) येथे विश्रांतीसाठी थोड्या दिवसासाठी गेले होते. प्रा. विलास जगदाळे हे दादांचे एक औषध येऊन तेथे गेले होते. दुर्गादेवीच्या टेकडीवरील हवेशीर बंगल्यात उद्धवराव एका कॉटवर बसलेले. समोर सतरंजीवर काही मुंडासे बहाद्दर शेतकरी बसलेले. त्यातील एकाने दादापुढे आपल्या कौटुंबिक कटकटी मांडलेल्या. विश्रांतीच्या काळातही दादा त्यावर उपाय सांगत असलेले. त्याबरोबर शेतकरी, शेतमजूर आणि दलितांच्या चळवळी उभ्या करून त्या लढविण्याबद्दल पोटतिडकीने भाष्य करीत असलेले. आपणाला जणू काहीच झाले नसल्याचा त्यांच्या हसतमुखावर अविर्भाव. या परिस्थितीतही अन्यायाविरुद्ध लढे लढविण्याची त्यांची जिद्द प्रा. जगदाळेना जगावेगळी दिसली.

हाच अनुभव नांदेडच्या दैनिक प्रजावाणीचे संपादक श्री. सुधाकर डोईफोडे यांना आलेला. त्यांनी तो आपल्या दैनिकाच्या ८ ऑक्टोबर १९८३ च्या अंकातील संपादकीयात व्यक्त केला आहे. ते लिहितात. “भाई उद्धवराव सध्या कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाशी सामना करीत आहेत... आम्ही त्यांना भेटण्यासाठी घरी गेलो होतो. त्याहीवेळी ते शरीराने ताठ व विचारांनी ठाम होते. तासभराच्या चर्चेत आपल्या रोगाचा त्यांनी चुकूनही उल्लेख केला नाही. की हताशपणा दाखविला नाही. या वेळेत त्यांचे सारे बोलणे जनतेचे लढे पुन्हा कसे संघटित करता येतील यावर होते. ‘पिचेल मनगट परी उरातील अभंग आवेश’, अशाच प्रकारचे वागणे होते. भाईनी आता धावपळ सोडून स्वस्थपणाने शरीरप्रकृतीकडे लक्ष द्यावे, असे सांगण्यात अर्थ नाही. कारण अशा अपेक्षांना ते कधीच धूप घालणार नाहीत. भाई लढवय्ये आहेत व तोच त्यांचा स्वभाव आहे. सामाजिक चळवळीचे पुष्कळसे लढे अजून लढवायचे आहेत. भाईजींच्या जीवित काळात यातील काही प्रश्नांची तड लागलेली त्यांना पहाता यावी, अशी अपेक्षा आम्ही व्यक्त करतो.”

भाई उद्धवराव दादा आमदार-खासदार झाले पण स्वतःच्या संसाराकडे लक्ष द्यायला त्यांना पुरेसा वेळच मिळाला नाही. त्यांनी फारसा पैसाही साठवून ठेवला नाही. आजारात त्यांना उपचारासाठी मुंबईला जातांना खर्चासाठीच्या पैशाचा प्रश्न भेडसावत होता. मुंबईला जातांना शारदाबाईंना पीठमीठ मिरचीची गठुडी बांधून न्यावी लागली. तेथे त्यांना स्वतः स्वयंपाक करून दादांची देखभाल करावी लागली. दादाही असे की, त्यांना भेटायला आलेल्या दूरदूरच्या कार्यकर्त्यांना त्यांचेबरोबर जेवल्याशिवाय ते परत पाठवत नसत. “इतक्या लांबून मला भेटायला येणाऱ्याला मी उपाशी कसा पाठवू?” असे ते शारदाबाईंना सांगत. पतीची सेवा करतांना पतीचं मन सांभाळावं लागतं, हे त्यांना चांगलं कळत होतं. म्हणून कष्ट थोडे जास्त पडले तरी त्या त्यांच्या इच्छेप्रमाणे वागत.

या आजारपणात शारदाबाईंनी अतोनात कष्ट उपसले. या आजारपणात सर्वश्री प्रा. एन्. डी. पाटील, भाई बंदरकर, बॅ. बी. एन्. देशमुख, पुंडालिकराव घोडके, बळीराम बापू चेडें इत्यादी अनेक कार्यकर्त्यांनी आणि चहात्यांनी दादांची खूप सेवा केली. दादाच्या कुटुंबाला खूप मदत केली.

अनुक्रमाणिका

शेवटच्या काही दिवसात कॅन्सरने दादांना कोंडीत पकडायला सुरवात केली. त्याने दादांचा आवाजच बंद केला. त्यांना बोलता येईना. कार्यकर्त्यांच्या बैठका आपल्या विचारानं पानाच्या पिचकाऱ्याबरोबर रंगविणं; सभा संम्मेलनं आपल्या प्रतिभाशाली वक्तृत्वानं गाजविणं; विधानसभा अभ्यासपूर्ण भाषणानं दणाणून सोडणं हे सारं करण्याचं उद्धवराव दादांचं प्रमुख हत्यार म्हणजे त्यांच बोलणं! तेच बंद झालं, त्यामुळे त्यांना त्याबद्दल मरण यातनांचे दुःख होत होते. पण त्यावर त्यांनी उपाय शोधला. ते आपलं म्हणणं कागदावर लिहून सांगायचे.

दोन मुली साधना व सुलभा आणि एकुलता एक मुलगा लग्नाचे राहिलेले. त्यांची लग्नं आपल्या हातून व्हायला हवी होती. एक लाखाच्यावर कर्ज डोक्यावर राहिलेलं. ते आपण फेडायला हवं होतं. या जबाबदाऱ्यांचं भान त्यांचं मन पोखरत असायचं! शेवटी कॅन्सरनं उचल खाल्ली. या शेवटच्या संघर्षात कॅन्सरने बाजी मारली. दिनांक १२ जुलै १९८४ गुरुवारी पहाटे उद्धवराव दादांचं महानिर्वाण झालं. शेतकरी, कामगार, शेतमजूर, दलित आणि नातेवाईक पक्ष कार्यकर्ते पोरके झाले.

भाई उद्धवराव दादांच्या निधनाची बातमी सर्वत्र वाऱ्यासारखी पसरली. बेंबळी, किणी, उपळे व जवळपासच्या प्रदेशातील व उस्मानाबाद शहरातील दुकानदारांनी आपले व्यवहार बंद ठेवले. अशा शोकाकुल अवस्थेत दादांच्या घराकडे त्यांच्या पक्ष कार्यकर्त्यांचे, चाहत्यांचे आणि हितचिंतकांचे लोंढेच्या लोंढे अंत्यदर्शनासाठी येऊ लागले. दुपारी चार वाजता त्यांच्या निवासस्थानातून त्यांच्या अंत्ययात्रेला प्रारंभ झाला. उद्धवराव दादांचा देह एका उघड्या जीपमध्ये ठेवला गेला. त्यावर पक्षाचा लाल बावटा पसरून ठेवला होता. पार्थिवाच्या शेजारी जीपमध्ये माजी खासदार ॲड. नरसिंगराव देशमुख, कॉ. देशपांडे, शिवाजीराव नलावडे आदी नेते मंडळी शोकाकूल अवस्थेत उभी होती. या अंत्ययात्रेला पंचेवीस-तीस हजारांचा जमाव जमला होता. त्यांच्या हृदयातील हळहळ आणि डोळ्यातील अश्रू हे भाई उद्धवरावांचे मोठेपण स्पष्ट करीत होते. अंतयात्रा उस्मानाबादच्या प्रमुख गल्ल्यातून जाऊ लागली. ती मुस्लीमांच्या मोहल्ल्यातून जाणार नव्हती, हे कळल्यावर मुसलमान बांधवांनी डबडबलेल्या डोळ्यांनी संयोजकाकडे करुणा भाकली. “आमच्या पालनहार आणि उद्धारकर्ता गेलाय. आमच्या लोकांना त्यांचे अंत्यदर्शन घडू द्या. अंतयात्रा आमच्या मोहल्ल्यातून न्या.” विनंती मान्य झाली. अंतयात्रा मुस्लीम मोहल्ल्यातून जाऊ लागली तेव्हा तेथील बायाबापड्यांनी छातीवर हात मारून दुःखाने टाहो फोडले. ते ऐकून अनेकांच्या डोळ्यातून अश्रूंचा घळघळ पूर वाहू लागला. शेवटी अंतयात्रा छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या आवारात गेली. दादांचा देह चितेवर ठेवला. त्यांचे चिरंजीव ‘धनंजय’ याने वडिलांच्या देहाला मंत्राग्नी दिला.

भाई उद्धवराव पाटील यांच्या निधनाने हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील शूर सेनानी, संयुक्त महाराष्ट्र आणि सीमा लढा चळवळीचा झुंजार सेनानी, शे. का. पक्षाचा निष्ठावंत नेता आणि समाजवादाचे स्वप्न हृदयाशी कुरवाळणारा, लाखो गोरगरीबांचा कुटुंबकर्ता, हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे वेळी ‘आमचा लढा निजामाच्या प्रवृत्ती विरुद्ध आहे. तो सर्वसामान्य मुस्लिमांच्या विरुद्ध नाही’ हे ठणकावून सांगणारा, गोरगरीब शेतकऱ्यांची, शेतमजुरांची, कामकऱ्यांची, दीनदलितांची डोंगराएवढी दुःखे स्वतःच्या खांद्यावर वाहून नेणारा आणि गोरगरीबांचे अश्रू पुसणारा महामानव आमच्यातून कायमचा निघून गेला.

भाई उद्धवराव पाटील यांची आठवण चिरंतन रहावी, यासाठी उस्मानाबाद शहरात भाई उद्धवरावदादांचं कायमस्वरुपी स्मारक शासनाने उभारावे ही महाराष्ट्रातील लोकेच्छा शासन पूर्ण करेल का?

अनुक्रमाणिका

## ।। भाई उद्धवराव पाटील यांचा जीवनपट, ऋणनिर्देश लेखकांचा आणि संदर्भग्रंथ -स्मरणिका विशेषांक दैनिके यांची सूची आणि मुलाखाती देणाऱ्यांची यादी ।।

अ) जीवनपट

- ३० जानेवारी १९२० : जन्म. माणकेश्वर (ता. परांडा) येथे आजोळी.
- १९३७ : उस्मानाबाद येथील गव्हर्मेंट मल्टिपर्पज हायस्कूलमधून मॅट्रिक.
- १९३५ ते १९३९ : विद्यार्थी युनियन व सावकार नियंत्रण चळवळीत सहभाग.
- १९३८ ते १९४५ : उच्च शिक्षण. हैद्राबाद विद्यापीठ, अलिगड उस्मानिया विद्यापीठातून गणित घेऊ बी. ए. प्रथम वर्गात उत्तीर्ण आणि हैद्राबाद उस्मानिया विद्यापीठातून एल्. एल्. बी.
- १९४६ ते १९४८ : हैद्राबाद मुक्ती संग्रामात सहभाग. रझाकारविरुद्ध सशस्त्र लढा. पांगरी - काजळ कँपचे नेतृत्व.
- १९४५ : थोडे दिवस उस्मानाबाद येथे वकिली. वकिली सोडून 'भक्षक हा रक्षक होऊ शकत नाही' हे पत्रक काढून सावकारशाहीला विरोध.
- १९४९-५० : मराठवाडा शे. का. पक्ष स्थापनेत पुढाकार. सत्तीच्या लेव्हीविरुद्ध लढा. दुष्काळ पिडीतासाठी आंदोलन.
- १९५२ : तुळजापूर-उस्मानाबाद जोड मतदार संघातून शे. का. पक्षाचे उमेदवार म्हणून हैद्राबाद विधानसभेत निवडून गेले.
- १९४९ ते १९५३ : कुळ संरक्षणासाठी चळवळीत सहभाग.
- १९५४-१९५५ : गोवा मुक्ती आंदोलनात सहभाग.
- १९५७ : उस्मानाबाद मतदार संघातून शे. का. पक्षाचे उमेदवार म्हणून महाराष्ट्र विधानसभेत निवडून गेले.
- १९५७ ते १९६० : शे. का. पक्षाचे प्रतिनिधी म्हणून संयुक्त महाराष्ट्र चळवळीत योगदान.
- १९५८ : महाराष्ट्र विधानसभेत विरोधी पक्ष नेते आणि भूदान चळवळीस विरोध.
- १४ डिसेंबर १९६३ : शेतीमालाला किफायतशीर भाव आणि इतर मागण्यासाठी विधानभवनावर एक लाखाच्या प्रचंड मोर्चाचे नेतृत्व. लाठीमार सोसावा लागला.
- मार्च १९६४ : दिल्लीच्या राज्यसभेचे सदस्य म्हणून महाराष्ट्रातून निवडून गेले.
- १९६७ : महाराष्ट्र विधानसभेवर उस्मानाबाद मतदार संघातून शे. का. पक्षाचे उमेदवार म्हणून निवडून गेले.
- १९६७ : संपूर्ण महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष म्हणून निवड.
- २ डिसेंबर १९६७ : कोल्हापूरात वरुणतीर्थ मैदानात हुतात्मा तोरसकर नगरात भव्य सीमा परिषद गाजविली.

- १९६८ : महाराष्ट्र राज्याच्या लोकलेखा समितीचे अध्यक्ष.
- १९७२ : महाराष्ट्र दुष्काळ निवारण समितीचे सदस्य.
- १९७३ ते १९७७ : महाराष्ट्र शासनाकडून राज्यस्तरीय भूविकास बँकेचे संचालक म्हणून नियुक्ती.
- १९७७ ते १९८० : लातूर मतदार संघातून शे. का. पक्षाचे उमेदवार म्हणून लोकसभेत निवडून गेले.
- १९८० : कॅन्सर या दुर्धर रोगाने गाठले.
- १९८२ : शे. का. पक्षाच्या अलीबाग येथील अधिवेशनाचे अध्यक्ष
- ९ ऑक्टोबर १९८३ : औरंगाबाद येथे सर्वपक्षीयाकडून अभूतपूर्व गौरव.
- १२ जुलै १९८४ : उस्मानाबाद येथे मृत्यू.

**ब) ऋणनिर्देश लेखकांचा :**

भाई उद्धवराव पाटील यांचे चरित्र लिहितांना विविध ग्रंथ, उद्धवरावांच्या जीवन कार्यावरील स्मृतीग्रंथ, गौरवांक, विशेषांक, साप्ताहिके, दैनिके, अप्रकाशित लेख यांचा मला लाभ झाला. ग्रंथलेखक, स्मृती-गौरव-विशेषांक आणि नियतकालिके-दैनिके यामधून अनेक लेखकांनी भाई उद्धवरावदादांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि कार्यावर लेख-कविता लिहिल्या आहेत. त्या लेखांचाही ह्या चरित्रलेखनास साह्य झाले. त्या सर्व लेखकांचा मी ऋणी आहे त्यांना नामनिर्देश येथे करीत आहे.

१. **'झुंझार सेनानी' या स्मृतीग्रंथातील लेखक :**
प्रा. फ. मु. शिंदे, प्रा. रमेश दाबके, सुरेशभाई झुं. तापडीया, प्रा. आर. टी. देशमुख, प्रा. अर्जुन जाधव, खा. रामरावजी आवरगावकर, दे. भ. तु. सु. जाधव, देवसिंहजी चौहान, प्रा. विलासराव जगदाळे, श्री. वा. मा. वाघमारे, नामदेव ताकभाते, विश्वनाथ खोत पाटील, कु. अनिता नरसिंगराव देशमुख, विष्णूदास तापडिया. प्रा. बा. ह. कल्याणकर, प्रा. एच्. के. कामटे.

२. **'संघर्ष' : भाई उद्धवराव पाटील गौरवांक ९ ऑक्टो. १९८३ मधील लेखक :**
मा. यशवंतरावजी चव्हाण, दाजीबा देसाई, अनंत भालेराव, डॉ. बापू काळदाते, बी. डी. किल्लेदार, कॉ. व्ही. डी. देशपांडे, प्रा. बा. ह. कल्याणकर, ॲड. नरसिंगराव देशमुख काटीकर, भाई हिंदुराव साळोखे, कॉ. चंद्रगुप्त चौधरी, पंडितराव हर्षे.

३. **भाई उद्धवराव पाटील विशेषांक ३० जानेवारी १९८९ मधील लेखक :**
सर्वश्री भारत गजेंद्र गडकर, विष्णूदास तापडिया, कॉ. राम मुकादम, शिवाजीराव साळुंके, विश्वनाथ खोत, सुरेश पाटील, रामराव आवरगांवकर,

अनुक्रमाणिका

**४. ‘संघर्ष समाजवादाचा’ या दैनिकाचा भाई उद्धवराव पाटील स्मृती विशेषांक २००१ दि. १२ जुलै २००१ मधील लेखक :**

प्रा. एन्. डी. पाटील, पन्नालाल सुराणा, ॲड. वासुदेवराव उर्फ नानासाहेब देशमुख, झुलाल भिलाजीराव पाटील, अहिल्या रांगणेकर, भाई प्रताप भानुदास ठाकूर, प्राचार्य मा. य. वैद्य, गुरुनाथ कुरुडे, मधुकर भावे, भाई झुंबरलाल रामकिसन तापडीया, ग. प्र. प्रधान, व्यंकटेश हंबीरे, एम्. डी. देशमुख, ॲड. प्रल्हादराव भ. मोरे, प्रा. आनंद जाधव, कांतीलाला बोराणा, ॲड. भाऊसाहेब देसाई, अनंत माधवराव पाटील, नानासाहेब पाटील, दिलीप पाठक नारीकर, माणिकराव खपले, ॲड. राजेंद्र देशमुख, सौ. जिजाबाई राजेंद्र देशमुख.

**५. उद्धवराव पाटील विद्यालय, औरंगाबाद स्मरणिकामधील लेखक :**

न्या. बी. एन्. देशमुख आणि ॲड. श्री. शिवाजीराव शिंदे.

**अप्रकाशित लेखांचे लेखक :**

सौ. सुलभा (सई) देशमुख, श्री. अमर मधुकरराव देशमुख, सर्वश्री राजाभाऊ कुळकर्णी, रमेश घुटे, व्ही. एस्. माळी आणि श्री. द. ब. पाटील

संदर्भ ग्रंथसूचीमधील ग्रंथ लेखक या सर्व लेखकांचा आणि ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष माहिती पुरविली त्यांचाही लेखक ऋणी आहे.

**क)संदर्भ ग्रंथसूची :**


**ग्रंथप्रबंध**

१. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी : स्वामी रामानंद तीर्थ

२. Reflections on Counter Revolution in Marathwada by Prin. D. N. Sandanshiv Foreword by Prin. M. B. Chitnis

३. पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य : भाई जी. डी. लाड.

४. मी एस्. एम्. (आत्मकथा) : श्री. एस्. एम्. जोशी

५. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण : अशोक जैन

६. झुंझार सेनानी : स्मृतीग्रंथ : संपादक श्री. सुरेशभाई तापडिया प्रकाशन १२ जुलै १९८७

७. उद्धवराव पाटील : विविध अंगी राजकीय नेतृत्व : प्रा. शहाजी अ. पाटील (शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फील परीक्षेसाठी सादर केलेला शोध निबंध. नोव्हेंबर १९८८)

८. सातारचा सिंह : श्री. राघव शिवणीकर

९. साता उत्तराची कहाणी : प्रा. ग. प्र. प्रधान.

**गौरवांक – विशेषांक :**

१०. ‘संघर्ष’ : भाई उद्धवराव पाटील गौरवांक ९ ऑक्टोबर १९८३ : संपादक प्रा. बा. ह. कल्याणकर.

११. भाई उद्धवराव पाटील विशेषांक : ४ मार्च १९८९ संपादक सर्वश्री सुरेश पाटील, सुरेश तापडिया आणि एम्. डी. देखमुख


अनुक्रमाणिका

१२. भाई उद्धवराव पाटील स्मृती विशेषांक २००१ : दै. संघर्ष समाजवादाचा दि. १२ जुलै २००१. संपादक श्री. व्यंकटेश हंबिरे.
१३. उद्धवराव पाटील विद्यालय, औरंगाबाद स्मरणिक वर्ष २ रे : मुख्याध्यापक श्री. दिनकर भ. घुले.
१४. नरसिंगराव काटीकर गौरविका, उस्मानाबाद.

**साप्ताहिके दैनिके :**

१५. साप्ताहिक 'राष्ट्रवीर' बेळगांव दि. ५ ऑक्टोबर व १२ ऑक्टोबर १९८३.
१६. दै. महाराष्ट्रटाईम्स, मुंबई दि. १० ऑक्टोबर १९८३.
१७. दै. मराठवाडा, औरंगाबाद दि. ९,१० ऑक्टोबर १९८३ आणि ३० ऑक्टोबर १९९५. संपादक अनंत भालेराव.
१८. दै. लोकमत, औरंगाबाद : दि. ९, १० ऑक्टोबर १९८३, दि. १९ ऑक्टोबर १९८३, आणि ३० जानेवारी २००१ संपादक राजेंद्र दर्डा.
१९. दै. सत्यवादी, कोल्हापूर दि. २ डिसेंबर १९६७. संपादक बाळासाहेब आ. पाटील
२०. दै. अजिंठा, औरंगाबाद दि. ९ ऑक्टोबर १९८३. संपादक श्री. अ. द. पोतनीस
२१. दै. प्रजावाणी, नांदेड-परभणी दि. ८ ऑक्टोबर १९८३ संपादक श्री. सुधाकर डोईफोडे
२२. दै. संघर्ष समाजवादाचा दि. १२ जुलै १९८७ संपादक व्यंकटेश हंबिरे
२३. दै. कृषीवल, रायगड दि. २६ डिसेंबर १९९९.
२४. दै. 'एकमत' दि. १९ जून १९९४ मधील 'क्षण एकपुरे दादांचा' हा सुरेश तापडियांचा लेख.
२५. 'मध्यमा' दि. १३ मे १९९२.

**अप्रकाशित लेख :**

२६. बँकेच्या सानिध्यात उद्धवरावजी : सर्वश्री राजाभाऊ कुलकर्णी, रमेश घुटे आणि व्ही. एस्. माळी
२७. 'माझी आई' : सौ. सुलभा (सई) देशमुख
२८. मला दिसलेले भाई उद्धवराव पाटील आणि प्रज्ञावंत उद्धवराव : श्री. द. ब. पाटील
२९. एक अमोघ कर्तत्वाचा उद्‌गाता : कै. भाई उद्धवरावजी पाटील : श्री. अमर मधुकरराव देशमुख

**मुलाखती : सुसंवाद**

श्री. अंबादास कृ. पाटील (बार्शी), सौ. मनूबाई फरताडे, सर्वश्री सुरेंद्र ज्ञानेश्वर पाटील, आत्माराम ज्ञानेश्वर पाटील आणि अंबादास शंकरराव पाटील (सारे इर्ले ता बार्शी), श्रीमती शारदाबाई उ. पाटील, सर्वश्री धनंजय उद्धवराव पाटील, श्री. एम्. डी. देशमुख, झुंबरलाल तापडीया, सुरेश पाटील, विष्णू शंकर धाबेकर, शिवाजीराव नलावडे, शिवाजीराव साळुंखे, ॲड. अविनाश देशमुख (सारे उस्मानाबाद) तसेच प्रा. एस. ए पाटील, प्रा. एल्. एम्. तायडे, प्रा. टी. एस्. मोरे, ज्ञानेश्वर पाटील कासारवाडीकर, प्रा. पी. एन्. इंगळे ग्रंथपाल आणि प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे (सर्व बार्शी), गुरुवर्य श्री. रामचंद्र गे. शिंदे (तुळजापूर).

*

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाराष्ट्राचा इतिहास प्रागैतिहासिक महाराष्ट्र (खंड पहिला भाग-१) | शां. भा. देव | रु. १२७/- |
| २) | महाराष्ट्राचा इतिहास (मध्ययुगीन कालखंड भाग-१) | संपादक गो. त्र्यं कुलकर्णी | रु. १४५/- |
| ३) | मध्ययुगीन महाराष्ट्र (सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन) | प्रा. म. श्री. माटे | रु. ७५/- |
| ४) | समाजशास्त्रीय विचारातील प्रमुख प्रवाह (भाग पहिला) | अनुवादक हेमकांत बळकुंदी | रु. २९५/- |
| ५) | प्रासाद मंडन | डॉ. र. पु. कुलकर्णी | रु. ११४/- |
| ६) | शिल्पप्रकाश | डॉ. र. पु. कुलकर्णी | रु. १६७/- |
| ७) | एक होता गंधर्व | डॉ. राम म्हैसाळकर | रु. ९३/- |
| ८) | गजाआडच्या कविता | श्री. उत्तम कांबळे | रु. ३०/- |
| ९) | प. जवाहरलाल नेहरू व्यक्ती आणि कार्य | संपादक. बा. ह. कल्याणकर | रु. १४०/- |
| १०) | भारताचा स्वातंत्र्यलढा | डॉ. वा. ना. कुबेर | रु. १०९/- |
| ११) | मराठी वाङ्मयकोश खंड-४ | समन्वय संपादक डॉ. विजया राजाध्यक्ष | रु. ३२०/- |
| १२) | दादासाहेब गाडकवाड काल आणि कर्तृत्व | संपादक मंडळ | रु. ६०/- |
| १३) | भारतातील आदिवासी वंश | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | रु. १२५/- |
| १४) | खानदेशातील कृषक जीवन | डॉ. रमेश सूर्यवंशी | रु. ६०/- |
| १५) | चरियापिटक | डॉ. शेषराव मेश्राम | रु. ३३/- |
| १६) | चिरकालीन सिरॅमिक्स | डॉ. प्रकाश दळवी | रु. ४५/- |
| १७) | छत्रपती शिवाजी महाराज | श्री. प्र. न. देशपांडे | रु. ४८/- |
| १८) | सर्वज्ञ चक्रधर | प्रा. पुरुषोत्तम नागपुरे | रु. ३७/- |
| १९) | संत जनाबाई | डॉ. सुहासिनी इर्लेकर | रु. ५०/- |
| २०) | मराठ्यांची प्रशासन व्यवस्था | सौ. विजया कुलकर्णी | रु. १४५/- |
| २१) | लैंगिक नीती आणि समाज | श्रीमती शकुंतला क्षीरसागर | रु. १४५/- |
| २२) | मराठी वाङ्मयकोश खंड दुसरा भाग-१ | डॉ. गो. म. कुलकर्णी | रु. १३०/- |
| २३) | महाराष्ट्रातील वन्य प्राणी (द्वितीय आवृत्ती) | सौ. शैलेजा रॉबर्ट ग्रब | रु. १०५/- |
| २४) | माणसाचा मेंदू व त्याचे कार्य (द्वितीय आवृत्ती) | डॉ. म. ग. गोगटे | रु. १०५/- |
| २५) | संत रोहिदास (द्वितीय आवृत्ती) | श्री. मा. आ कारंडे | रु. १५०/- |
| २६) | सृष्टीज्ञान आकाशदर्शन ॲटलास (द्वितीय | प्रा. गो. रा. परांजपे | रु. ११९/- |

अनुक्रमाणिका

| | | | |
|---|---|---|---|
| | आवृत्ती) | | |
| २७) | ज्ञानेश्वरीची प्रस्तावना ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण (द्वितीय आवृत्ती) | डॉ. सं. गो. तुळपुळे | रु. ९०/ |
| २८) | सत्यशोधक समाजाचा इतिहास (द्वितीय आवृत्ती) | श्री. महेश जोशी | रु. ६०/- |
| २९) | आरोग्य आणि आहार शास्त्र (तृतीय आवृत्ती) | प्रा. शांता केळकर | रु. ८०/- |
| ३०) | अस्पृश्यांचा लष्करी पेशा (तृतीय आवृत्ती) | श्री. चांगदेव भ. खैरमोडे | रु. ४०/- |
| ३१) | तुरुंगातील पत्रे (द्वितीय आवृत्ती) | अनुवाद श्री. द्वा. भ. कर्णिक | रु. ५५/- |
| ३२) | भारतीय मुसलमानांचा राजकीय इतिहास (द्वितीय आवृत्ती) | श्रीमती कमल पाध्ये | रु. २४२/- |
| ३३) | साहित्य - सिद्धान्त (द्वितीय आवृत्ती) | अनुवाद डॉ. स. ग. मालशे | रु. १८६/- |

**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे**

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

**अधिक माहिती/चौकशीसाठी**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी-२४१४४०२१, २४१४६००५

अनुक्रमाणिका

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

### महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेअंतर्गत चरित्रग्रंथ मालिकेतील चरित्रग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) | साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) | दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) | क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) | डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) | शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) | मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) | तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) | यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |

**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे**

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व महाराष्ट्रातील
प्रमुख ग्रंथविक्रेते

**अधिक माहिती/चौकशीसाठी**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी-२४१४४०२१, २४१४६००५

अनुक्रमाणिका

## प्राचार्य व. न. इंगळे, संक्षिप्त जीवनरेखा



हल्लीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील जवळे (दुमाला) या खेड्यात वारकरी पंथाच्या शेतकरी कुटुंबात जन्म. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे (बार्शी) आणि कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या संस्थातून 'कमवा व शिका' योजनेत श्रम करून स्वावलंबनाने शिक्षण. कर्मवीर मामांच्या संस्थेच्या विविध महाविद्यालयांत दहा वर्षे इंग्रजीचे प्राध्यापक आणि चोवीस वर्षे प्राचार्य. प्राचार्य संघटनेच्या वार्षिक परिषदांत सक्रिय सहभाग. ऑस्ट्रियातील आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या साल्झबर्ग सेमिनारमध्ये फेलो म्हणून निवड व सहभाग (१९८८). तसेच १९९२ साली आशियायी मुक्त विद्यापीठाच्या सेऊल (साऊथ कोरिया) येथे भरलेल्या वार्षिक परिषदेत सहभाग. 'निबंधवाचन' या परदेश प्रवासवर्णनपर पुस्तकांचे लेखन चालू.

लेखन आणि पत्रकारितेची विद्यार्थीदशेपासून आवड. विद्यार्थिदशेत 'समता' हस्तलिखिताचे संपादक. सातारा येथे महाविद्ययीन काळात सातारात 'दि शिवाजीयन' या चक्रिमुद्रित अनियतकालिकाचे संपादक. प्राध्यापक-प्राचार्य म्हणून काम करताना बार्शीला 'जीवनसंग्राम' आणि 'सूर्यदर्शन' साप्ताहिकाचे संपादक.

'अभिरुची' (मुंबई), 'वीणा'(मुंबई),'सुदर्शन'(पुणे) आणि 'रुद्रवाणी' (पुणे) मधून कथालेखन. महाविद्यालयीन विद्यार्थिदशेत 'शिक्षण गंगेचा भगीरथ' ही कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्यावरील पुस्तिका प्रकाशित. 'तपस्या' हा कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावरील चरित्रग्रंथ. 'पेरणी' हा विविध कवींच्या कवितांचा कवितासंग्रह संपादित. 'अमृतकुंभ' हा कर्मवीर मामांच्यावरील विविध लेखकांचा लेखसंग्रह संपादित. मथ्यू अरनोल्ड यांच्या 'सोहराब अँड रूस्तम' या काव्यग्रंथाच्या संपादनात सहभाग. 'दि आर्ट ऑफ इफेक्टिव रीडिंग अँड रायटिंग' या इंग्रजी ग्रंथाच्या संपादनात प्रमुख सहभाग.

'दरिद्री नारायण' ही ग्रामीण जीवनावरील कादंबरी (२००१). सदर कादंबरीस शिवगिरिजा प्रतिष्ठान, कुर्डूवाडीचा 'कै. सदाशिव नारायण कदम गुरुजी वाङ्मय पुरस्कार' प्राप्त. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्याकडून २००१ मधील उत्कृष्ट कादंबरी म्हणून वा. म. जोशी पुरस्कार प्राप्त. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी 'इंग्रजी भाषेतील काळ' आणि 'इंग्रजी भाषा शिक्षक' ही पुस्तके प्रकाशित. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईतर्फे महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेत 'शिक्षण पंढरीचा वारकरी' कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे हा चरित्रग्रंथ जुलै २००२ मध्ये प्रकाशित.

व्हर्नाक्यूलर सातवीच्या परीक्षेत जिल्ह्यात प्रथम (१९५२). त्या प्रीत्यर्थ गावकऱ्यांकडून गौरव. सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजात 'आदर्श विद्यार्थी' म्हणून गौरव. मराठी साहित्य मंडळ, बार्शीच्या रौप्य महोत्सवी वर्षात 'मृत्युंजय'कार श्री. शिवाजी सावंत यांच्या हस्ते शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरव (१९९०). बार्शीतील 'कवी कालिदास मंडळ' या संस्थेतर्फे प्रा. डॉ. निर्मलकुमार यांचे हस्ते दि. ६-७-०३ रोजी 'मेघदूत' पुरस्कार प्रदान. सेवा निवृत्तीच्या काळात वाचन लेखन आणि भाषण ह्या वाङ्‌यज्ञात दंग.

अनुक्रमाणिका